कौटिलीय अर्थशास्त्र-प्रदीप.

लेखक

प्रोफेसर गोविंद गोपाळ टिपनीस.

सन १९२३.

किंमत २ रुपये.

ंथमालेचें दुसरें पुस्तक.

य अर्थशास्त्र-प्रदीप.

लेखक

फेसर–गोविंद गोपाळ टिपनीस.

मुद्रक व प्रकाशक

ाराम गोविंद विरकुड, बी. ए.

थ

किंमत २ रुपये.

मुद्रक व प्रकाशकः—स. गो. विरकुड, बी. ए.
' रवींन्द्र प्रिंटिंग वर्क्स ' आंबेवाडी ' ई ' ब्लॉक,
गिरगांव–मुंबई.

ऊ।५४

अल्प निवेदन.

ह्या पुस्तकासंबंधानें विशेष महत्वाचें असें जें कांहीं सांगावयाचें तें मीं आरंभीं 'विषय प्रवेश' नामक एका स्वतंत्र प्रकरणांत सांगितलें असल्यामुळें येथें फक्त एकदोन गोष्टींचेंच निवेदन करावयाचें आहे.

पंडित शामशास्त्री बी. ए., एम्. आर. ए. एस्. यांनीं प्रकाशित केलेलें मूळ संस्कृत **कौटिलीय अर्थशास्त्र** आणि त्यांनीं स्वतः केलेलें त्याचें इंग्रजी भाषांतर हीं दोन पुस्तकें, महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध, ओजस्वी, प्रतिभावान् आणि बाणेदार नवमतवादी लेखक माझे मित्र रा. **केशव सिताराम ठाकरे**, संपादक प्रबोधन, यांनीं मला सन १९२० च्या डिसेंबर महिन्यांत, मी मुंबईस गेलों असतां दिलीं. तीं त्यांनीं अत्यंत काळजीपूर्वक वाचलीं होतीं. त्यांतील विशेष महत्वाचा कांहीं भाग त्यांनीं मला वाचून दाखविला आणि त्या पुस्तकांतील माहितीच्या आधारें मी कांहीं लेख लिहावे अशी अतिशय कळकळीनें इच्छा प्रदर्शित केली. माझ्या सवडीप्रमाणें मी हें पुस्तक दोन वेळां वाचलें आणि लेखास अथवा व्याख्यानास उपयोगी पडण्यासारखीं भरपूर टिपणें काढून ठेविलीं. रा. ठाकरे यांच्या इच्छेस मान देण्याचा सुयोग आज आला ह्याबद्दल समाधान वाटतें.

सन १९२१ च्या जून महिन्यांत मराठी भाषेचा अध्यापक म्हणून माझी नेमणूक एल्फिन्स्टन कॉलेजांत झाली, आणि मी मुंबईस राहूं लागलों. याच वर्षीं मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कार्यकारी मंडळाच्या तर्फे संग्रहालयाचे उत्साही चिटणीस रा. पुणतांबेकर यांनीं शारदीय महोत्सवाचे प्रसंगीं मी एक व्याखान द्यावें असें मला आग्रहपूर्वक सुचविलें आणि मी त्यांच्या सूचनेप्रमाणें "**कौटिलीय अर्थशास्त्र**" याच विषयावर माझ्या उपरोक्त टिपणांच्या आधारें सदर प्रसंगीं, संग्रहालयांत व्याख्यान दिलें. ह्या व्याख्यानांत ह्या ग्रंथाचें भाषांतर मराठीमध्यें प्रसिद्ध झाल्यास, महाराष्ट्रभाषेंत एक बहुमोल ग्रंथाची भर पडेलअसें मी सांगितल्यावरून रा. ओगले यांनीं हें काम हातीं घेतलें आहे असें एका उपवक्त्यानीं आपल्या भाषणांत सांगितलें. रा. ओगले यांचें हें भाषांतर जर प्रसिद्ध झालें असतें तर फार चांगलें झालें असतें आणि प्रस्तुतचें केवळ त्या ग्रंथाच्या आधारें लिहिलेलें हें पुस्तक लिहून प्रसिद्ध करण्याचें कारणच उरलें नसतें.

माझ्या उपरोक्त व्याख्यानाचा सारांश त्यावेळीं कित्येक इंग्रजी व मराठी वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध झालेला वाचून सुमारें १५।२० विद्याव्यासंगी आणि जिज्ञासु सद्‌गृहस्थांचीं मला जीं पत्रें आलीं त्यांवरून 'कौटिलीय अर्थशास्त्रा'चा प्रसार त्यावेळीं तरी महाराष्ट्रांत विशेष झालेला नव्हता असें मला वाटलें आणि रा. ओगले यांचें भाषांतर लौकर प्रसिद्ध न झाल्यास कौटिलीय अर्थशास्त्राचा महाराष्ट्र वाचकांशीं परिचय करून देण्या पुरतें तरी एखादें पुस्तक आपण लिहावें अशी इच्छा झाली. प्रस्तुत पुस्तक हें याच तळमळीचें फळ होय.

मूळ पुस्तक वाचावयास देऊन त्याचा आस्वाद मराठी वाचकांस रा. ठाकरे यांनींच माझ्याकडून देवविला, म्हणून मी त्यांचा फार आभारी आहें. मराठींतील कसलेले प्रागतिक लेखक रा. पुरुषोत्तम गोपाळ काणेकर (शारदाश्रमवासी) आणि महाड राष्ट्रीय शाळेंतील संस्कृताचे अध्यापक रा. सखाराम जगन्नाथ भागवत यांनीं, मी अजारी असल्यामुळें माझी इच्छा असतांही मला न होण्या-सारखीं ह्या पुस्तकासंबंधीं कांहीं कामें केवळ माझी ती इच्छा पूर्ण करण्याकरि-तांच करून, मला उपकारबद्ध केलें आहें.

महाराष्ट्र-साहित्य मासिकाचे संपादक रा. विरकूड, बी. ए. यांनीं सदर मासिक तोट्यानें चालत असतांच, तें पुढें चालविण्याचा भार केवळ वाङ्मयविषयक प्रेमानें आपल्या शिरावर घेतला; ह्या त्यांच्या उपकार–ऋणांतून अंशतः तरी मुक्त व्हावें म्हणून मी ह्या पुस्तकाची प्रथमावृत्ति काढण्याचा हक्क कोणत्याही प्रकारचा मोबदला न घेतां त्यांस दिला. ही सुसंधी त्यांनीं मला दिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. माझ्या इच्छेप्रमाणें मला त्यांच्या ऋणांतून मुक्त करण्याचें कार्य महाराष्ट्र-भाषाप्रेमी वाचक करतील असा भरंवसा आहे.

कार्तिक शु. ११ महाड
शके १८४५

गोविंद गोपाळ टिपनीस.

प्रकाशकाचें हृद्गत.

महाराष्ट्र–साहित्य ग्रंथमालेचें दुसरें पुस्तक '**कौटिलीय अर्थशास्त्र–प्रदीप**' हें आज दिपवाळीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध करून महाराष्ट्र रसिक जनांच्या हातीं देतांना आम्हांस परमानंद वाटत आहे. मालेचें पहिलें पुस्तक '**प्रेम कीं लौकिक**' प्रसिद्ध होऊन आज सात महिने झाले. इतक्या अल्पावधींतच त्या पुस्तकाची प्रथमावृत्ति खलास झाली व सदर पुस्तक कॉलेजांतील विद्यार्थ्यांना लावण्या-विषयीं मुंबई युनिव्हर्सिटीनें शिफारस केली आहे. त्यामुळें त्या पुस्तकाची द्वितीयावृत्ति लवकरच काढावी लागेल असा रंग दिसत आहे. मराठी भाषेंत लिहिलेलें पुस्तक अथवा वर्तमानपत्र पाहून आमचा सुशिक्षित विद्वान् वर्ग इतके दिवस नाक मुरडीत असे. आंग्लभाषा ही वाघिणीचें दूध आहे; अर्थात् पुष्टिवर्धनार्थ तेंच प्राशन करणें इष्ट आहे असें त्यास वाटे. पण तें चांगलें पचविण्याची ताकद सर्वसाधारण लोकांच्या अंगीं नसल्यामुळें त्यांची भूक शमविण्यासाठीं व त्यांना सुदृढ करण्यासाठीं मातृभाषेचाच अवलंब करण्याची जरूरी आमच्या सुशिक्षित वर्गास पटून तिच्याकडे त्याचें लक्ष दिवसेंदिवस अधिकाधीक वेधूं लागलें आहे हें सुचिन्ह होय. ईश्वरकृपेनें आज मराठी भाषेंत, भारदस्त, तेजस्वी, व जोरदार विचारांनीं युक्त, तसेंच स्वतंत्र बुद्धीनें लिहिलेल्या अशा ग्रंथांची निष्पत्ति होऊं लागली आहे. त्यामुळें परभाषेच्या पांगुळ गाड्याची आतां जरूरी उरली आहे असें आम्हांस वाटत नाहीं. अलिकडे बरींच शास्त्रीय पुस्तकें प्रसिद्ध होत आहेत व प्रो. गोविंद गोपाळ टिपनीस यांनीं प्रस्तुतचें पुस्तक अत्यंत परिश्रमानें लिहून शास्त्रीय वाङ्मयांत महत्त्वाची भर घातली आहे. त्याबद्दल मराठी वाचक वर्ग त्यांचा फार ऋणी राहील. इतकें सुंदर पुस्तक प्रसिद्ध कर-ण्याचा मान प्रोफेसरसाहेबांनीं महाराष्ट्र–साहित्य ग्रंथमालेस दिला याबद्दल आह्मी त्यांचे अतिशय आभारी आहोंत.

ग्रंथमालेच्या प्रथम पुष्पाचा प्रेमानें स्वीकार करून महाराष्ट्र-रसिक जनांनीं आम्हांस त्यावेळीं प्रोत्साहन दिलें तसेंच यावेळींही देतील अशी आम्हांस आशा आहे. ग्रंथमालेचें पुढील कार्य केवळ लोकाश्रयावर व रसिक वाचकांच्या प्रेमवृद्धीवर अवलंबून राहील. ही प्रेमवृद्धि अखंड चालू ठेवण्याची बुद्धि आमच्या **आश्रयाच्या अनंताला** होऊन मराठी भाषेच्या निस्सीम सेवेंत महाराष्ट्र-साहित्य व ही ग्रंथमाला सदासर्वकाळ उत्कर्ष पावोत, व त्याप्रीत्यर्थ आमचे हातून अनन्यभावें परिश्रम घडोत हीच दयाघन प्रभूजवळ प्रार्थना आहे.

सर्वांचा कृपाभिलाषी,

आंबेवाडी, ई. ब्लॉक, गिरगांव-मुंबई, ता. ६।११।२३.

सखाराम गोविंद विरकुड.
चिटणीस-महाराष्ट्र-साहित्य ग्रंथमाला.

अनुक्रमणिका.

ग्रंथ
आम्हां
आहे.
द्वीवर
आश्रय
साहित्य
अनन्य

अ
गिरगां

कौटिलीय अर्थशास्त्र-प्रदीप.

विषय-संक्षेप.

प्रकरण चवथें. ....पृष्ठें ५०–६२.

प्रकरण पांचवें..........पृष्ठें ६३–७१.

कौटिलीय अर्थशास्त्र-प्रदीप.

विषय प्रवेश

बुद्धिजलणिज्झरें सिञ्चन्ती देसआलकलसेहिं ।
दंसिस्सदि कज्जफलं गरुअं चाणक्कणीदिलदा ॥

मुद्राराक्षस नाटकाच्या पांचव्या अंकाच्या आरंभीं सिद्धार्थकानें चाणक्य-नीतिचें वर्णन करीत असतां उपरोक्त उद्गार काढिले आहेत. तो ह्मणतोः— " चाणक्यनीतिरूप लतेवर देशकालाच्या घटांनीं बुद्धिजलाचें सिंचन केलें असतां, कार्यसिद्धि हें सुंदर फल प्राप्त होईल; " सिद्धार्थशंसित सकल फलदायी अशी ही चाणक्यनीति काय आहे, ती सांगणारा हा महापुरुष होता तरी कोण, त्यानें आपली ही नीति कोणाला सांगितली आणि कधीं सांगितली तसेंच ह्या नीति-कथनावरून, ही नीति ज्या काळीं अवतीर्ण झाली त्या काळच्या लोकस्थिती-संबंधानें काय अनुमानें निघतात इत्यादि प्रश्नांचा उलगडा प्रस्तुत पुस्तकांत करण्याचें योजिलें आहे.

ह्याच चाणक्याचें नांव **विष्णुगुप्त** असें असून **कौटिल्य** ह्या नांवानेंही तो प्रसिद्ध आहे; असें जरी आहे, तरी चाणक्य, नांवांची कोणी व्यक्तीच झाली नाहीं. ही व्यक्तीच जर काल्पनिक तर तिच्यासंबंधाचा सर्व इतिहास आणि तिच्या नांवावर मोडत असलेला नीति ग्रंथहि पण काल्पनिकच असला पाहिजे. असा आजपर्यंत पुष्कळांचा समज होता. पण आतां हा समज अगदीं खोटा होता; ही गोष्ट सप्रमाण रीतीनें सिद्ध झाली आहे.

स. १९०४ च्या सुमारास तंजावर भागांतील एका पंडितानें **कौटि-लीय अर्थशास्त्राची** एक हस्तलिखित प्रत म्हैसूर येथील पौरस्त्य ग्रंथसं-ग्रहास नजर केली. सध्यां बंगलोर येथील **चामराजेंद्र** संस्कृत पाठशाळेच्या प्रमुख पदावर असलेले, श्री. **शामशास्त्री** बी. ए. एम्. आर. ए. एस्. हे त्यावेळीं त्या ग्रंथसंग्रहाचे व्यवस्थापक होते. कौटिलीय अर्थशास्त्राचें तें

हस्तलिखित पाहून त्यांना फार समाधान वाटलें. त्यांनीं त्याचें अत्यंत परिश्रमपूर्वक अध्ययन केलें आणि पुढल्या वर्षापासूनच त्यांतील कांहीं भाग इंडियन अँटिक्वेरी वगैरेसारख्या कांहीं नियतकालिकांतून भाषांतर रूपानें देण्यास आरंभ केला. ज्या पंडितानें मूळ ग्रंथाची हस्तलिखित प्रत आणून दिली त्यानेंच त्या ग्रंथाच्या कांहीं भागावर असलेली **भट्टस्वामी** नामक विद्वानाची **प्रतिपच्चंद्रिका** नांवाची एक टीकाहि पण आणून दिली होती. श्री. शामशास्त्री यांनीं म्हैसूर दरबाराच्या उदार आश्रयाखालीं सदर टीकेसह ही मूळ हस्तलिखित प्रत सन १९०८ अखेर प्रसिद्ध केली व स० १९१४ सालीं तिचें इंग्रजी भाषांतर प्रकट केलें. याच सुमारास ह्या ग्रंथाच्या आणखी दोन तीन प्रती उपलब्ध झाल्या. संस्कृत मूळ पुस्तकाची पहिली आवृत्ति खलास झाली आणि ह्या नूतनोपलब्ध प्रतींचा योग्य उपयोग करून श्री. शास्त्रीबोवांनीं सन १९१९ सालीं दुसरी आवृत्ति काढिली. सन १९०४ सालीं तंजावराकडे अर्थशास्त्राचें हस्तलिखित मिळतांच जर्मनींतील प्रख्यात ' म्युनीच रॉयल लायब्ररी ' तर्फे त्याची एक प्रत करून घेण्यांत आली. ह्या तंजावरच्या हस्तलिखितांत जो मजकूर गाळल्यासारखा वाटतो तो विस्तारानें देणारें व अनेक महत्वाचे पाठभेद असलेलें अर्थशास्त्राचें दुसरें एक हस्तलिखित यानंतर लौकरच मद्रासेस उपलब्ध झालें. तावडतोब त्याचीहि एक प्रत **म्युनिच रॉयल लायब्ररी** मध्यें नेण्यांत आली. हीं हस्तलिखितें, शामशास्त्र्यांचें भाषांतर आणि उपरोक्त **प्रतिपच्चंद्रिका** नामक टीका यांच्या आधारें दक्षिण हैदराबाद येथील बॅरिस्टर जहांगीर सोराबजी, बी. ए. (मुंबई. आणि कँटब) यांनीं अर्थशास्त्राच्या दुसऱ्या पुस्तकावर विस्तृत टिपणें लिहून १९१४ सालीं प्रसिद्ध केलीं आहेत. अशा रीतीनें ज्या ग्रंथाच्या अनेक हस्तलिखित प्रती उपलब्ध असून आज ज्याच्या दोन आवृत्या आणि भाषांतरहि प्रसिद्ध झालें आहे त्याला यापुढें तरी काल्पनिक ग्रंथ समजणें मूर्खपणाचें नसलें तरी हटवादीपणाचें खास आहे; असें आम्हाला वाटतें.

हा ग्रंथ केवळ काल्पनिक म्हणजे मनाच्या मनोऱ्यावर उभारलेला नाहीं इतकेंच नव्हे तर तो प्राचीन काळापासून सर्वविश्रुत असून त्याच्या कर्त्यासंबंधानेंहि अनेक प्राचीन ग्रंथकारांनीं उल्लेख केलेला आहे. विष्णुपुराणाच्या चौथ्या अंशाच्या चोविसाव्या अध्यायांत ' कौटिल्य नंदकुलाचा समुच्छेद करून मगध देशाच्या राज्यावर चंद्रगुप्ताची स्थापना करील, चंद्रगुप्तानंतर त्याचा पुत्र बिंदुसार आणि त्यानंतर बिंदुसाराचा पुत्र अशोक ह्याप्रमाणें राजे होतील' असें भविष्य कथन केलें

आहे. विष्णुपुराणकर्ता म्हणतो तसें हें खरोखर भविष्य नसलें तरी त्यानें ही घडलेली हकीकत अशोकानंतर केव्हां तरी लिहून ठेवलेली आहे यांत शंका नाहीं. वाल्मीकीनें रामाआधींच रामायण लिहून ठेविलें ही गोष्ट जशी रामायणांतर्गत पुराव्यावरूनच खोटी ठरते तशीच अशोकापूर्वी किंबहुना चंद्रगुप्तापूर्वींच, विष्णुपुराणकर्त्यानें आपल्या पुराणाचा हा भविष्यकथनाचा भाग लिहिला ही गोष्टहि खोटीच ठरली पाहिजे. दशकुमारचरिताच्या आठव्या उच्छ्वासांत "**विष्णुगुप्तानें चंद्रगुप्त मौर्याला उपदेश करण्यकरितां सहा हजार श्लोकांची दण्डनीति लिहिली;**" असें दण्डीनें म्हटलें असून त्याच्या ग्रंथांत आणखीहि कित्येक ठिकाणीं यासंबंधाचे उल्लेख आलेले आहेत. '**कामंदकीय नीतिसार**' नांवाचा एक राजनीतिविषयक ग्रंथ असून त्याच्या आरंभींच:—

नीतिशास्त्रामृतं धीमानर्थशास्त्रमहोदधेः
समुद्दध्रे नमस्तस्मै विष्णुगुप्ताय वेधसे

अशा प्रकारें विष्णुगुप्ताचा आणि त्याच्या अर्थशास्त्राचा उल्लेख करून त्यास आदरपूर्वक नमन केलें आहे. पंचतंत्राच्या आरंभींच, मन्वादिकांच्या धर्मशास्त्राबरोबरच आणि वात्स्यायनादिकांच्या कामशास्त्राबरोबरच चाणक्यादिकांच्या अर्थशास्त्रांचाहि नामनिर्देश केलेला आहे; अर्थात् पंचतंत्रकार विष्णुशर्म्याला चाणक्याची आणि त्याच्या अर्थशास्त्राची चांगलीच माहिती होती. नंदिसूत्र नामक जैन ग्रंथांत भारत रामायणादिकांबरोबरच कौटिलीय अर्थशास्त्राचा निर्देश आला आहे, रघुवंशाच्या १७ व्या आणि १८ व्या सर्गावर टीका लिहीत असतां **मल्लिनाथ सूरिनें** अर्थशास्त्रविषयक शब्दांच्या विषदिकरणार्थ कौटिलीय अर्थशास्त्रांतील कांहीं पंक्ति उद्धृत केल्या आहेत. सारांश ख्रिस्ती शकाच्या आरंभापासून पंधराव्या शतकापर्यंत झालेल्या अनेक लेखकांस ह्या ग्रंथाची आणि त्याच्या कर्त्याची चांगलीच माहिती होती ही गोष्ट उपरोक्त विवेचनावरून निर्विवाद ठरत आहे.

आतां आपण प्रत्यक्ष **अर्थशास्त्र** ग्रंथाच्या, अंतःप्रमाणांवरून त्याचें पुराणत्व कसें सिद्ध होतें याचा थोडक्यांत विचार करूं. ग्रंथाची भाषासरणी अपस्तंब, बौद्धायन वगैरेंच्या ग्रंथांप्रमाणें सूत्ररूप आहे ग्रंथाच्या शेवटच्या श्लोकांत कौटिल्य ह्मणतो:—

दृष्ट्वा विप्रतिपत्तिं बहुधा शास्त्रेषु भाष्यकाराणाम् ।
स्वयमेव विष्णुगुप्तश्चकार सूत्रंच भाष्यं च ।

हीं कौटिल्याचीं सूत्रें म्हणजे त्यानें आपल्या ग्रंथाच्या दीडशें प्रकरणांवर जे गूढार्थदर्शक शिरोलेख केले आहेत तेच होत आणि प्रकरणांतील गद्यपद्यात्मक मजकूर हें त्याचें त्यांवरील भाष्य होय! "पुष्कळ भाष्यकारांनीं सूत्रांचे अर्थ करण्यांत चुका केल्या असल्यामुळें मी आपल्या सूत्ररूप ग्रंथावर स्वतःच भाष्य लिहिलें" असें विष्णुगुप्तानें उपरिनिर्दिष्ट श्लोकांत म्हटलें आहे. हें त्याचें भाष्य-सुद्धां पुष्कळ ठिकाणीं सूत्ररूपच वाटतें. कित्येक स्थळीं त्याच्या भाष्याची भाषा उपनिषदाच्या भाषेसारखी तर कित्येक ठिकाणीं ती त्यानंतरच्या ब्राह्मणग्रंथांच्या स्वरूपाची भासते. अर्थशास्त्रांतील कांहीं शब्द अर्वाचीन संस्कृतांतून नष्ट झाले असून कांहीं पाणिनीच्या नियमाविरुद्ध बनविण्यांत आले आहेत. उदाहरणार्थ कांहीं शब्द येथें देतों:—

१ नष्ट झालेले शब्द.

युक्त—सरकारी अधिकारी.

उपयुक्त—सरकारी अधिकाऱ्याच्या हाताखालचा.

तत्पुरुष—नोकर.

परिघ—कर.

पारीक्षिक—नाण्यावरील कर.

परोक्त—गुन्हा.

२ पाणिनीच्या नियमांविरुद्ध बनविलेले शब्द.

औपनिषदिक. ऐवजीं औपनिषत्क.

सर्वज्ञख्यापन. ,, सर्वज्ञत्वख्यापन.

रोचयन्ते. ,, रोचन्ते.

असे आणखी शेंकडों शब्द नमूद करितां येतील. यावरून कौटिल्याला पाणिनीची माहिती नसावी असें उघड दिसतें. याज्ञवल्क्यानें आपल्या स्मृतींत जे शब्द योजिले आहेत ते कौटिल्याच्या वरील शब्दांप्रमाणें संस्कृत भाषेंतून नष्टप्राय झालेले नसून त्यानें कोठेंहि पाणिनीच्या नियमांचें अतिक्रमण केलेलें

नाहीं. 'शपथवाक्यानुयोग' हा शब्द कौटिल्यानें गुन्हेगाराची शपथेवर चौकशी ह्या अर्थानें उपयोजिला असून याज्ञवल्क्यानें तो आजच्याच, म्हणजे अयोग्य शपथ, अशा अर्थानेंच उपयोगांत आणिला आहे. युक्त म्हणजे सरकारी अधिकारी आणि अयुक्त म्हणजे सरकारी अधिकाऱ्यावांचून इतर, ही कौटिल्याची शब्दार्थ योजना अशोकाच्या शिलालेखांतून मात्र आढळते. याज्ञवल्क्यानें अशी योजना कोठेंहि केलेली नाहीं. "भयंकर गळवावांचून इतर गळवावर शस्त्रप्रयोग केल्यानें रोगी मृत्यु पावला तरच शस्त्रक्रिया करणारा शिक्षेला पात्र आहे," असें कौटिल्याचें मत असून याज्ञवल्क्य गळवावर शस्त्रप्रयोग करणेंच शिक्षेला पात्र ठरवितो ह्यावरून अशोकानंतर, म्हणजे कौटिल्यानंतर, जवळ जवळ एक शतकानें याज्ञवल्क्य झाला असावा असें उघड होतें.

सध्यां मनुस्मृति म्हणून जो ग्रंथ प्रसिद्ध आहे तोही याज्ञवल्क्य स्मृतिप्रमाणेंच अर्थशास्त्रानंतर अस्तित्वांत आला असला पाहिजे असेंही स्मृति आणि अर्थशास्त्र यांत वर्णन केलेल्या सामाजिक स्थितीचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां दिसून येतें. अर्थशास्त्र जरी बुद्धानंतर कित्येक शतकांनीं लिहिलें गेलें तरी त्यांत बुद्ध पूर्वकालीन परिस्थितीचें वर्णन असून, मनु आणि याज्ञवल्क्य यांच्या स्मृतींत, सर्वत्र विजय पावलेल्या बुद्धधर्माशीं झगडल्यानंतर ज्याचें पुनःसंस्करण करण्यांत आलें त्या हिंदुसमाजाचें आणि हिंदुधर्माचें चित्र रेखाटलेलें आहे.

इसवीसनापूर्वी ३०५ च्या सुमारास **सेल्युकस निकेटर** यानें सिंधु नदी उतरून आर्यावर्तावर स्वारी केली. चंद्रगुप्तानें त्याचा पराभव करून त्याला हांकून लावलें इतकेंच नाहीं तर तह करण्यास भाग पाडून सध्यांची काबूल, कंदहार आणि हिरात हीं शहरें ज्या प्रांतांच्या राजधान्या होत्या ते प्रांत त्याजकडून घेतले आणि आपण त्याला फक्त पांचशें हत्ती दिले. चंद्रगुप्त मौर्यानें याच प्रसंगीं सेल्युकसच्या कन्येशीं विवाह केला आणि अशा रीतीनें सेल्युकस आणि चंद्रगुप्त ह्या उभयतांमध्यें सख्य झालें. हा तह इ. पू. ३०३ वर्षी झाला असावा. हिंदुकुश पर्वताला ग्रीक लोक हिंदी काकेसस (Indian caucasus) असें म्हणतात. हा पर्वत हीच आपल्या राज्याची उत्तर मर्यादा असावी म्हणून सोळाव्या आणि सतराव्या शतकांत मोंगल बादशहांनीं आणि त्यापुढें इंग्रजांनीं खूप धडपड केली पण **ह्यापैकीं कोणालाहि जें साधलें नाहीं तें बावीसशें वर्षांपूर्वी एका हिंदु राजानें साधलें.** हिंदुकुश पर्वताच्या दक्षिणेस काबूल आणि हिरातपर्यंत चंद्रगुप्ताच्या राज्याचा विस्तार झाला; यालाच लागून त्या पर्वताच्या उत्तरेस

सेल्युकसचा बॅक्ट्रिया प्रांत होता. इ. पू. ३०३ चा तह झाल्यानंतर लौकरच सेल्युकसनें **मेगस्थिनिस** नांवाचा एक अधिकारी चंद्रगुप्ताच्या दरबारीं वकील म्हणून पाठविला. हा वकील येथें सुमारें पांच वर्षें होता. त्यानें आपल्या फुरसतीच्या वेळीं कित्येक गोष्टींसंबंधानें अत्यंत परिश्रमपूर्वक माहिती मिळवून आणि कित्येक गोष्टींचें समक्ष सूक्ष्म निरीक्षण करून जीं टांचणें करून ठेविलीं आहेत त्यांचें हिंदुस्थानच्या ह्या काळाच्या इतिहासांत फारच महत्त्व आहे. मेगस्थिनीसच्या ह्या टाचणांत वर्णिलेली परिस्थिति आणि कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत वर्णिलेली परिस्थिति अगदीं तंतोतंत जुळते; अर्थात् **अर्थशास्त्र ग्रंथ याच काळांत लिहिला गेला** याबद्दल संशयाला जागा रहात नाहीं.

आज आपण अर्थशास्त्र हा शब्द फक्त Political economy (पोलिटिकल एकॉनमी) ह्या इंग्रजी शब्दाऐवजीं उपयोगांत आणितों पण कौटिल्याचें अर्थशास्त्र म्हणजे केवळ संपत्तिशास्त्रच नसून संपत्तिशास्त्राप्रमाणेंच त्यांत शिल्पशास्त्र, वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र इत्याद्यनेक शास्त्रांचा सामान्यतः विचार केला आहे तसेंच राजशासनशास्त्राचें यांत विशेष विवेचन केलें आहे. ह्या शास्त्राच्या अध्ययनाची फलश्रुति सांगतांना कौटिल्य म्हणतोः—

एवं शास्त्रमिदं युक्तं एताभिस्तन्त्रयुक्तिभिः
अवाप्तौ पलने चोक्तं लोकस्यास्य परस्य च
धर्ममर्थं च कामं च प्रवर्तयति पाति च
अधर्मानर्थ विद्वेषानिदं शास्त्रं निहन्ति च

निरनिराळ्या भागांनीं सांगितलेलें हें शास्त्र अध्ययन करून त्याप्रमाणें जो वागेल त्याला इहलोकीं आणि परलोकीं सुख कसें मिळवावें आणि तें जतन कसें करावें हें चांगलेंच समजेल.

धर्मप्रवृत्ति, संपत्ति आणि सुख हीं मिळवून जतन करण्याचें ज्ञान जसें ह्या ग्रंथापासून होईल तसेंच अधर्मप्रवृत्तीचा नाश कसा करावा आणि संपत्ति व सुख यांच्या आड येणाऱ्या गोष्टींची खोड कशी जिरवावी हेंही यापासून कळेल.

कौटिल्य पुढें म्हणतोः—

येन शास्त्रं च शस्त्रं च नन्दराजगता च भूः
अमर्षेणोद्धृतान्याशु तेन शास्त्रमिदं कृतम्.

ज्यानें नंदराजाच्या जुलमापासून शास्त्राचें, शस्त्रविद्येचें आणि त्याच्या हातीं गेलेल्या पृथ्वीचें संरक्षण केलें त्यानेंच हें अर्थशास्त्र केलें. ह्या अर्थशास्त्राची व्याख्या कौटिल्याच्याच शब्दांत येथें देऊन नंतर आपण उपरोक्त श्लोकांत ग्रथित केलेल्या इतिहासाच्या भागाकडे वळूं.

मनुष्याणां वृत्तिरर्थः । मनुष्यवती भूमिरित्यर्थः । तस्याः पृथिव्या लाभपालनोपायः शास्त्रमर्थशास्त्रमिति ।

"मनुष्यप्राण्याचें जीवित अर्थावर म्हणजे संपत्तीवर अवलंबून आहे. मनुष्यें ज्या पृथ्वीवर रहातात तिला वसुधा, वसुमती, रत्नगर्भा इत्यादि अर्थनिदर्शक म्हणजे संपत्तीद्योतकच नांवें आहेत तेव्हां अशा अर्थवती पृथ्वीचा लाभ कसा करून घ्यावा आणि तिचें पालन कसें करावें याचा मार्ग ह्या शास्त्रांत दाखविला असल्यामुळें मी या शास्त्राला **अर्थशास्त्र** असें अन्वर्थक नांव दिलें आहे."

असो, आतां आपण '**येन शास्त्रम्**' इ० उपरिनिर्दिष्ट श्लोकांत सूत्ररूपानें सांगितलेल्या इतिहासाकडे आपला मोर्चा फिरवूं.

बॅक्ट्रिया जिंकल्यानंतर हिंदुस्थानावर स्वारी करण्याच्या आपल्या फार दिवसांच्या बेताच्या तयारीस लागून अलेक्झांडरानें इ. पू. ३२७ च्या एप्रिलच्या सुमारास बरोबर पन्नास साठ हजार युरोपियन सैन्य घेऊन हिंदुकुश पर्वताच्या रोंखानें कूच करण्यास प्रारंभ केला. आगस्टच्या सुमारास त्याचें सैन्य सिंधु नदावर येऊन थडकलें. वाटेंत जसे तक्षीला अथवा तक्षशीला वगैरे ठिकाणचे राजे त्याला विनहरकत येऊन मिळाले तसेच कित्येक पहाडी लढवय्ये लोकहि त्यानें त्यांस कत्तलीची दहशत घालून आपल्या नोकरींत ठेविले. कित्येक पहाडी लोक त्याच्याशीं मोठ्या नेटानें लढले. बायकांमुलांना मध्यें ठेवून त्यांनीं त्यांच्याभोंवतीं गोट कला आणि अलेक्झांडराच्या त्या प्रचंड सेनेला घटकाभर चकित करून टाकिलें. अलेक्झांडरानें ह्या स्वारींत वियास नदीपर्यंत पंजाबचा भाग काबीज केला आणि लाखो एतद्देशीय लोकांची त्यांच्या बायकांमुलांसह कत्तल उडवून त्यांच्या घरादारांची राखरांगोळी केली ! त्याच्या ह्या स्वारीला एकंदर तीन वर्षें लागली. जेवढा मुलूख ताब्यांत घ्यावा तेवढ्याच्या बंदोबस्ताकरितां आपल्या एखाद्या सत्रपाची अथवा सुभेदाराची नेमणूक करावी; असा ह्या मुलुखगिरींत अलेक्झांडराचा क्रम होता. ह्याशिवाय कांहीं प्रांतांची व्यवस्था पोरस राजाकडे व कांहीं प्रांतांची तक्षशीला येथील राजाकडे त्यानें सोंपविली होती.

बियास नदी पलीकडे त्याच्या सैन्यानें जाण्याचें नाकारलें. तो बाबीलोन येथें परत गेला आणि इ. स. पूर्वी ३२३ च्या जून महिन्यांत तेथें मृत्यु पावला! त्याच्या मृत्युनंतर त्याच्या सेनाध्यक्षांची सभा होऊन राज्याची जी व्यवस्था ठरविण्यांत आली तींत, हिंदुस्थान देश दूर अंतरावर असल्यामुळें तेथील ज्या प्रांताची व्यवस्था अलेक्झांडरानें ज्याकडे दिलेली होती त्याजकडेच ती तूर्त राहूं द्यावी, असें ठरलें. परंतु हिंदुस्थानाचीं राज्यसूत्रें यापुढें परक्यांच्या हातांत रहावयाचीं नव्हतीं! व्हिन्सेंट स्मिथ, आपल्या 'हिंदुस्थानाचा प्राचीन इतिहास' नामक सुप्रसिद्ध ग्रंथांत म्हणतोः—

"Within three years of his departure, his officers had been ousted, his garrisons destroyed, and all trace of his rule had disappeared. The colonies which he founded in India, unlike those established in the other Asiatic provinces, took no root. The campaign, although carefully designed to secure a a permanent conquest, was in actual effect no more than a brilliantly successful raid on a gigantic scale, which left upon India no mark save the horrid scars of bloody war."

"अलेक्झांडर हिंदुस्थानांतून गेल्यापासून तीन वर्षांच्या आंतच त्याच्या सर्व अधिकाऱ्यांना त्यांच्या हुद्यावरून दूर करण्यांत आलें. त्याच्या सैनिकांचा सत्यानाश उडविण्यांत आला आणि त्याच्या सत्तेची पाळेंमुळें खणण्यांत आलीं. त्यानें हिंदुस्थानांत स्थापिलेल्या वसाहती आशिया खंडाच्या इतर भागांतील त्याच्या वसाहतीप्रमाणें कायमपणा धरून राहिल्या नाहींत. आपली विजय-पताका हिंदुस्तानांत अक्षय फडकत रहावी अशा उद्देशानें अलेक्झांडरानें जरी आपल्या ह्या स्वारीची सर्व व्यवस्था ठेविली होती तरी फलनिष्पत्तीच्या दृष्टीनें पाहतां हिंदुस्थानावर विजय पावलेली एक मोठी राक्षसी धाड, ह्या पलीकडे ह्या स्वारीस विशेष महत्त्व देतां येईल असें वाटत नाहीं. अलेक्झांडरानें आर्य-भूमीच्या वक्षस्थळावर वहाविलेल्या रक्ताच्या नद्यांच्या भयंकर डागांवांचून त्याच्या स्वारीचा मागमूसहि हिंदुस्थानांत राहिला नाहीं."

इ. स. पूर्वी ३२३ च्या जून महिन्यांत अलेक्झांडर मेला आणि त्याच आगस्टांत ती बातमी हिंदुस्थानांत पोहोंचून नोव्हेंबरच्या सुमारास मौर्यवंशीय चंद्रगुप्तानें पहाडी लोकांचें एक मोठें सैन्य उभारून आपल्या ह्या मायभूमीला परकीयांच्या जाचांतून सोडविण्याचा उपक्रम केला. इ. पू. ३२२ च्या आरंभींच त्यानें ग्रीक सत्तेखालीं गेलेले सर्व प्रांत आपल्या ताब्यांत घेतले. चंद्रगुप्ताचें वय ह्यावेळीं फार झालें तर पंचवीस वर्षांचें असेल.

ज्याला इतिहासदृष्ट्या विशेष महत्त्व देतां येईल असा पुराणांत वर्णिलेला राजा म्हणजे **शिशुनाग** होय. याची राजधानी जें **राजगृह** नांवाचें शहर तें गयेनजीकच्या पर्वतराजींत होतें. ह्या शिशुनागाच्या वंशापैकीं फक्त **बिंबीसार** राजाचीच कांहीं माहिती उपलब्ध आहे. त्यानें अंग–सध्यांचें भागलपूर आणि मुंगीर प्रांत–देशाचें राज्य घेतलें. मगध साम्राज्याचा संस्थापक हाच बिंबीसार राजा ! यानें अठ्ठावीस वर्षें राज्य करून आपला मुलगा **अजातशत्रु** ह्याला सिंहासनावर बसविलें आणि आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारिला. हाच अजातशत्रु **कुनिक** अथवा **कुनीय** अशा नांवानें प्रसिद्ध आहे. बिंबीसारानें कौसल देशाचें राज्य घेतलेंच होतें, अजातशत्रूनें वैसालीचें राज्य घेतलें. अजातशत्रू इ. स. पूर्वी ४७५ वर्षी मुत्यु पावला. यानेंच गंगातीरावर असलेल्या पाटली नांवाच्या गांवीं एक मोठा मजबूत किल्ला बांधिला. याच्या कारकीर्दींत गंगा आणि हिमालय यांच्या दरम्यानचा सर्व प्रांत मगधांच्या ताब्यांत गेला. अजातशत्रूचा मुलगा **दर्शक** किंवा हर्षक आणि त्याचा मुलगा **उदय** ! उदय इ. स. पूर्वी ४५० ह्या वर्षी मगध देशाच्या गादीवर बसला. ह्यानें आपल्या आजोबानें बांधिलेल्या किल्ल्याच्या पायथ्याशीं, जें शहर बसविलें त्यालाच कुसुमपुर, पुष्पपुर अथवा **पाटलीपुत्र** असें म्हणतात. पुढें हेंच शहर मगधाची राजधानी झालें. उदयाचा पुत्र **नंदीवर्धन** आणि त्याचा **महानंदीन.** ह्या महानंदीनाला शुद्र स्त्रीपासून **महापद्मनंद** म्हणून जो मुलगा झाला त्यानेंच मगधाचें राज्य बळकाविलें ! हाच नंदवंशाचा पहिला राजा. (इ. स. पूर्वी ३७१) ह्याच्या राणीला एका न्हाव्यापासून जो मुलगा झाला त्याचें नांव **धनानंद** त्यानें महापद्मनंदाला ठार मारून मगधाचें राज्य घेतलें. ह्याच नंदवंशांतील एका पुरुषापासून **मुरा** नामक शुद्र स्त्रीच्या उदरीं **चंद्रगुप्ताचा** जन्म झाला आणि तो **मुरेचा मुलगा** ह्मणून त्याला **चंद्रगुप्त मौर्य** अशी संज्ञा मिळाली. याचा वंश, इतिहासांत मौर्य नांवानें प्रसिद्ध आहे. अशा रितीनें हा नंदवंश दूषित अस-

त्यामुळेंच 'नंदान्तं क्षत्रियकुलम्' असें म्हणण्याचा प्रचार पडला असावा. पण हा एक वंश म्हणजे कांहीं अखिल भारतवर्षातील निखिल क्षत्रिय वर्ण नव्हे! असो, महापद्मनंदानें आपली जातकुळी लक्षांत न घेतां चंद्रगुप्त हलक्या कुळांतला म्हणून त्याला हांकलून लाविला पण ह्या हद्दपारींतच त्याचा उर्जितकाळ होता आणि ह्या हीन कुळांतच त्याच्या साम्राज्याचें बीज होतें. त्यानें आपल्या ह्या हद्दपारींतच वर एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें वायव्य सर हद्दीवरील पहाडी लोकांचें अफाट सैन्य जमविलें, त्यांना चांगली कवायत शिकविली आणि त्याच्या मदतीनें प्रथम अलेक्झांडराच्या लोकांचा समाचार घेऊन त्यांच्या ताब्यांत गेलेला पंजाब प्रांत आणि त्याच्या आसपासचा सर्व मुलूख आपल्या स्वाधीन करून घेतला.

अशा रीतीनें परकीय लोकांचा खरपूस समाचार घेऊन त्यांच्या पारतंत्र्यांतून आपल्या मातृभूमिची मुक्तता केल्यावर चंद्रगुप्तानें आपली विजयी दृष्टी, जुलमी धनानंदाकडे वळविली. त्याची प्रजा त्याच्या जुलमामुळें आधींच त्रस्त झालेली होती. ज्या राजाची प्रजा असंतुष्ट असते त्याच्या आंगांत रावणाचें बळ असलें तरी त्याचें सिंहासन डळमळीतच असतें. अशा स्थितींत सहज कोणी तरी येतो आणि एक लाथ मारून तें उलथें पालथें करून टाकितो. मगध सम्राट् धनानंद याची हीच अवस्था झाली! चंद्रगुप्तानें आपल्या सैन्याच्या मदतीनें त्याला सिंहासनावरून खेचलें, त्याचा प्राण घेतला आणि समूळ नंदवंश नेस्तनाबूद केला. व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो:

"चंद्रगुप्तानें उत्तरेकडील सर्व राज्यें आपल्या अमलाखालीं आणिलीं इतकेंच काय पण त्यानें नर्मदेच्या पलीकडचाहि कांहीं मुलूख आपल्या ताब्यांत घेतला. इतिहासकाळांतील ह्या पहिल्या हिंदु सम्राटाचें राज्य बंगालच्या उपसागरापासून अरबी समुद्रापर्यंत पसरलेलें होतें."

ही माहिती इ. स. पूर्वी ३२१ च्या सुमाराची आहे. स्मिथसाहेब आपल्या इतिहासांत एके ठिकाणीं म्हणतातः—

"His (Chandragupta's) adviser in this revolution was a subtle Brahman named Chanakya, by whose aid he succeeded in seizing the vacant throne."

'ह्या राज्यक्रान्तीच्या कामांत चंद्रगुप्ताला सल्लामसलत देणारा चाणक्य नांवाचा एक कावेबाज ब्राह्मण होता, त्याच्याच मदतीनें धनानंदाच्या मृत्युमुळें उघड्या पडलेल्या मगध देशाच्या सिंहासनावर चंद्रगुप्त आरूढ झाला.

स्मिथ साहेब ज्याला 'कावेबाज ब्राह्मण' म्हणतात तो चाणक्यच अर्थशास्त्र ग्रंथाचा कर्ता कौटिल्य अथवा विष्णुगुप्त होय! उपरोक्त इतिहासाला अनुसरून त्यानें लिहिलेला जो श्लोक आम्ही वर एके ठिकाणीं दिला आहे तो येथें पुनः उद्धृत करितों चाणक्य आपण स्वतःसंबंधानें आपल्या ग्रंथाच्या शेवटीं त्या श्लोकांत अभिमानानें ह्मणतोः—

येन शास्त्रं च शस्त्रं च नंदराजगता च भूः
अमर्षेणोद्धृतान्याशु तेन शास्त्रमिदं कृतम्

हा ग्रंथ कौटिल्यानें चंद्रगुप्ताकरितांच तयार केला याबद्दलचा पुरावा, आरंभीं दण्डी वगैरे प्राचीन ग्रंथकारांच्या ग्रंथांतील वाक्यें सारांश रूपानें देऊन आम्हीं आपल्या वाचकांपुढें सादर केलाच आहे दण्डी ह्मणतोः—

अधीष्व तावद्दण्डनीतिम्।
इयमिदानीमाचार्य विष्णुगुप्तेन
मौर्यार्थे षड्भिश्श्लोकसहस्त्रैस्संक्षिप्ता
सैवेयमधीत्य सम्यगनुष्ठीयमाना
यथोक्त कर्मक्षमेति।

यांत दण्डीनें जी या ग्रंथांतील श्लोकांची संख्या सहा हजार ह्मणून दाखल केली आहे तीच आर्य चाणक्यानें आपल्या ग्रंथाच्या पहिल्या अधिकरणांत जी विषयसूचि दिली आहे ती मध्यें नमूद केलेली आहे. प्रस्तुत उपलब्ध ग्रंथांतहि तीच कायम असल्यामुळें ग्रंथरचना जशी झाली तशीच ती आपल्या हातीं आली असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

सुखग्रहणविज्ञेयं तत्त्वार्थपदनिश्चितम्
कौटिल्येन कृतं शास्त्रं विमुक्तग्रंथविस्तरम्

कौटिल्य म्हणतोः—"मी केलेलें हें शास्त्र पाल्हाळिक नाहीं तें ग्रहण करण्यास आणि समजण्यास सुलभ असून त्याची परिभाषा निश्चित झालेली आहे."

कौटिल्याचें हें मत तत्कालिन परिस्थितींत अगदीं यथार्थ असेल पण आजच्या परिस्थितींत मात्र परिभाषेच्या अज्ञानामुळें त्याचा हा ग्रंथ समजणें बरेंच दुरापास्त झालें आहे.

हें शास्त्र कौटिल्यानें चंद्रगुप्ताकरितांच लिहिलें हें इतर ग्रंथकारांच्या पुराव्यानें वर सिद्ध केलेंच आहे यासंबंधानें स्वतः कौटिल्य ह्मणतो:—

सर्वशास्त्राण्यनुक्रम्य प्रयोगमुपलभ्य च
कौटिल्येन नरेंद्रार्थे शासनस्य विधिःकृतः

सर्व शास्त्रांना अनुसरून आणि सर्व प्रयोग ध्यानांत घेऊन नरेंद्र–चंद्रगुप्ताकरितांच–मी हे राजशासनविषयक नियम तयार केले आहेत.

एकंदरीत विचार करितां कौटिल्य अथवा चाणाक्य हा महापुरुष होऊन गेल्यास आज सरासरी २२५० वर्षें झाली. चाणक्य ही कोणी काल्पनिक व्यक्ति नसून इतिहास प्रसिद्ध अशी व्यक्ति होती. त्यानें संपत्ति आणि राज्य संपादन करून त्याचें संरक्षण करण्याच्या कामीं अत्यंत उपयुक्त असा **अर्थशास्त्र** नांवाचा ग्रंथ चंद्रगुप्त मौर्याकरितां इ. स. पूर्वी निदान ३२० वर्षांच्या काळांत लिहिला. त्यानें तो जसा लिहिला तसाच आज आपणांस मिळालेला आहे. परकीय लोकांस आर्यावर्तापार हाकून लावून हिंदभूमीला स्वराज्याचा लाभ करून देण्याच्या आणि धनानंदासारख्या जुलमी राजाच्या जाचांतून मगध देशांतील प्रजाजनांची सुटका करण्याच्या कामीं कौटिल्याची सल्लामसलत चंद्रगुप्ताच्या फार उपयोगी पडली इतक्या गोष्टी ह्या विषयप्रवेशाच्या द्वारें वाचकांच्या लक्ष्यांत आल्या असतील अशी आशा करून आणि ह्या प्रदीपाच्या प्रकाशानें अर्थशास्त्र ग्रंथाकडे वाचकांचें थोडें तरी लक्ष्य वेधेल अशी उमेद बाळगून आतां त्याच कार्यास लागतों.

कौटिलीय अर्थशास्त्र-प्रदीप.

प्रकरण १ लें.

कौटिल्यानें आपल्या ग्रंथारंभीं 'ॐ नमश्शुक्र बृहस्पतिभ्याम्' असें ह्मणून शुक्र, ह्मणजे अर्थात् '**कवीनामुशना कविः**' असें श्रीकृष्णानें गीतेच्या विभूति योगांत ज्याचें वर्णन केलें आहे तो दैत्यांचा गुरु उशनाचार्य अथवा शुक्राचार्यच होय. त्याला आणि त्याच ठिकाणीं, '**पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम्**' अथवा—

जो स्वर्गसिंहासना सावावो। सर्वज्ञते आदिचा ठावो
तो पुरोहितांमाजि रावो। बृहस्पती मी॥

ज्ञानेश्वरी, १०–२२८.

असें श्रीकृष्णानें ज्याचें वर्णन केलें आहे त्या देवाच्या सचिवाला, सर्वज्ञतेच्या आधारस्तंभाला, पुरोहितांच्या चूडामणीला, इंद्रगुरु **बृहस्पतीला** नमन केलें आहे. ग्रंथांत जेथें जेथें मतभेदाचा प्रश्न आला आहे तेथें तेथें ह्या दोघांचीं मतें प्रथम देऊन आणि अवश्य वाटलें तेथें यांच्याशिवाय मनु, भारद्वाज, विशालाक्ष, पाराशर, पिशुन, कौणपदन्त, वातव्याधि इत्यादि आपणांपूर्वी होऊन गेलेल्या राजनीतिज्ञांचीं मतेंहि विचारांत घेऊन कौटिल्यानें आपल्या मताप्रमाणें त्या प्रश्नाचा निकाल दिला आहे. ह्या ग्रंथांत असा विचार केला असल्यामुळेंच त्यानें '**सर्वशास्त्राण्यनुक्रम्य प्रयोगमुपलभ्य च**' इत्यादि विषयप्रवेशांत उद्धृत केलेले उद्गार त्यासंबंधानें प्रदर्शित केले आहेत. असो, आतां आपण प्रत्यक्ष ह्या ग्रंथाकडेच वळूं.

कौटिल्य ह्मणतो, राजानें चार विद्यांचा अथवा शास्त्रांचा अभ्यास करणें अवश्य आहे. ह्या चार विद्या खालीं दिल्याप्रमाणें आहेतः—

आन्वीक्षकी त्रयी वार्ता दण्डनीतिश्चेति विद्याः

मनूनें ह्या विद्यांत **आन्वीक्षकीचा** समावेश केला नाहीं. बृहस्पति फक्त **वार्ता** आणि **दण्डनीति** ह्या दोहोंसच विशेष महत्व देतो आणि शुक्राचार्य फक्त दंडनीतीच काय ती अवश्य समजतो.

प्रसिद्ध बखरकार **मल्हार रामराव चिटणीस** यांनीं राजनीतीवर एक सप्तप्रकरणात्मक ग्रंथ लिहिला असून तो रा. ब. साने यांनीं स. १८८७ सालीं स्वतंत्र पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध केला आहे. ह्या ग्रंथाच्या ' राजगुण ' नामक तिसऱ्या प्रकरणांत मल्हार रामराव ह्मणतात राजानें:—

" गुरूची कृपा संपादन करून गुरुपासून विद्या चार शिकाव्या. त्या कोण-कोणत्या ह्मणाल तर तेंहि सांगतों. प्रथम ' **अन्वीक्षिकी** ' ह्मणजे आत्मानात्म विचार केला असतां त्याचें फळ सुखदुःख याची बाधा होत नाहीं. दुसरी **त्रयी** विद्या. त्रयी ह्मणजे धर्माधर्म व्यवस्थासूचक वेद ! ऋग्वेद, यजुर्वेद, साम हे वेद. त्रयीचें फल उभय लोक प्राप्त करिते. तिसरी **वार्ता** ह्मणजे अर्थानर्थ विचारयुक्त त्यास वार्ता असें बोलतात. याचें फल पशुपालन, कृषिकर्म, वणिक-व्यवहार ह्मणजे सावकारी करीत असतां जीविकेची चिंता कदापि घडत नाहीं. **दण्डनीति** ह्मणजे न्याय अन्याय विचारयुक्त याचें नांव दंडविद्या होय. याचें फल न्याय अन्याय पाहून शासन केलें असतां अधोगतीप्रति न जातां उत्तम गतीतें राजा पावतो. ऐसे प्रकारें चार विद्या गुरुपासून शिकोन घेऊन अभ्यास करावा. "

प्रथम ह्या चार विद्यांच्या व्याख्या थोडक्यांत देऊन कौटिल्यानें पुढें त्याचें सविस्तर विवेचन केलें आहे. संक्षेपरूप व्याख्या अशा आहेतः—

१ साङ्ख्यं योगो लोकायतं चेत्यान्वीक्षकी
२ धर्माधर्मौ त्रय्याम्
३ अर्थानर्थौ वार्तायाम्
४ नयानयौ दण्डनीत्यां बलाबले चैतासां

ह्या व्याख्या आणि यानंतरचें ह्या चार विद्यासंबंधाचें कौटिल्यानें केलेलें विस्तृत विवेचन मल्हाररावांच्या उपरोक्त व्याख्यांशीं आणि त्यांनीं याच संबंधांत केलेल्या विस्ताराशीं ताडून पाहिलें तर कौटिल्याचा हा ग्रंथ त्यांच्या अवलोकनांत आला होता इतकेंच नाहीं तर त्यांनीं त्या ग्रंथांत त्यांना अवश्य आणि महत्त्वाचा असा जितका भाग वाटला तितका स्वतःच्या (मराठी) भाषेंत आणण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट अगदीं निस्संदिग्धपणें सिद्ध होते. वर उद्धृत केलेल्या रकान्यांत मल्हाररावानें कौटिल्याची शब्दयोजनाहि जशीच्या तशीच ठेविलेली दिसते. अशा रीतीनें सत्राव्या शतकाच्या अखेरीस ...च्या विद्वान् लेखकानें ज्या ग्रंथाचें

अध्ययन आणि अध्यापन केलें तोच ग्रंथ विसाव्या शतकाच्या आरंभीं आम्हाला आमच्या मद्रदेशस्थ बंधूच्या द्वारें उपलब्ध झाल्याबद्दल मोठें कौतुक वाटावें ह्यापेक्षां काळाचा महिमा तो आणखी काय असणार !

कृषिपाशुपाल्ये वणिज्या च वार्ता

ह्या वार्तेच्या व्याख्येशीं चिटणीसांची उपरोक्त व्याख्या अवश्य ताडून पहाण्यासारखी आहे. विद्यांच्या विस्तृत विवेचनांत कौटिल्यानें फक्त चार वर्णांचाच उल्लेख केला आहे. जातींचा उल्लेख मुळींच केला नाहीं. ही गोष्ट वाचकांनीं जरूर लक्ष्य पुरविण्यासारखी आहे.

मल्हार रामरावाच्या ह्या राजनीतिपूर्वी म्हणजे इ. स. १७१६ मध्यें रामचंद्रपंत अमात्य यांनीं छत्रपति शिवाजी महाराजांपासून तीन कारकीर्दींत मिळालेल्या स्वतःच्या अनुभवावरून मराठेशाहींतील राजनीतिवर एक अत्यंत सरस ग्रंथ लिहिला आहे पण तो अगदींच स्वतंत्र असल्यामुळें त्याविषयीं येथें अधिक विस्तार करण्याचें प्रयोजन नाहीं. ह्या ग्रंथाची तिसरी आवृत्ति विविधज्ञान-विस्तारानें गेल्या मार्च महिन्यांत प्रसिद्ध केली, हे खरोखरच महाराष्ट्रावर त्यांचे फार उपकार आहेत.

राजानें आपल्या राजदण्डाचा अथवा शासनाधिकाराचा उपयोग सुष्टांचें पालन आणि दुष्टांचें दण्डन करण्याच्या कामीं केला पाहिजे. असें न होईल तर मात्स्य-न्यायानें दुर्जन लोक सज्जनांना पीडा करतील आणि जिकडे तिकडे बळी तो कान पिळी असा प्रकार होऊन अनवस्था माजेल असें सांगून कौटिल्य ह्मणतोः— '**तस्माल्लोकयात्रार्थी नित्यमुद्यतदण्डस्स्यात्**' लोकयात्रा सुरळीत चालावी असें इच्छिणाऱ्या राजानें दुष्टांचें शासन करण्याकरितां आपला राजदण्ड नेहमीं सिद्ध ठेविला पाहिजे. पहिल्या तीन विद्या, चौथ्या दण्डनीतिवर अवलंबून आहेत. आणि '**विनयमूलो दण्डः प्राणभृतां योगक्षेमावहः**' जनतेच्या स्वास्थ्यार्थ अवश्य असलेला राजदण्ड विनयमूल (शिस्तप्रधान) आहे. शिस्त दोन प्रकारची असते एक कृतक (Artificial) आणि दुसरी स्वाभाविक (natural) शिस्त फक्त शुश्रूषा, श्रवण, ग्रहण, धारणादि गुण अंगीं असतील त्यानांच लावितां येते. अर्थात त्यानांच ह्या विद्येचा लाभ होतो इतरांस होत नाहीं. हा लाभ त्यांनीं तज्ञ गुरुकडूनच करून घ्यावा. मुलाचें चौलकर्म होतांच त्याला अक्षर

ओळख करून देऊन गणित शिकवावें आणि उपनयनानंतर शिष्टांकरवीं ह्मणजे योग्य गुरुकडून त्याला तीन वेद म्हणजे त्रयी व **अन्वीक्षकी** ह्या विद्या तसेंच **'वार्तामध्यक्षेभ्यः'** सरकारी अधिकाऱ्याकडून **'वार्ता** आणि **दण्डनीति वक्तृ-प्रयोक्तृभ्यः'** ज्ञात्या व कर्त्या मुत्सद्यांकडून दण्डनीति अशा विद्या शिकवाव्या. ब्रह्मचर्य फक्त सोळा वर्षांचें वय होईपर्यंतच पाळावें असें कौटिल्याचें मत आहे. तो ह्मणतोः—'ब्रह्मचर्यं चाषोडशाद्वर्षात् । अतो गोदानं दारकर्म च। आमच्या देशांत पुढें प्रचलित झालेल्या बालविवाहाचें हें पूर्वचिन्हच होय !

राजपुत्रानें दिवसाच्या पूर्व भागांत हत्ती, घोडे, रथ आणि शस्त्रें यांचा उपयोग कसा करावयाचा याचें ज्ञान करून घ्यावें आणि उत्तर भागांत इतिहास ह्मणजे पुराणें, इतिवृत्तें, आख्यायिका, प्रत्यक्ष घडत असलेल्या गोष्टी, धर्मशास्त्र आणि अर्थशास्त्र यांची माहिती घ्यावी. पुराणादि ह्या सर्व गोष्टींचा समावेश चाणक्यानें ' इतिहास ' शब्दांत केला आहे. इतर वेळांत केवळ नवी माहिती मिळविण्यानेंच संतुष्ट न होतां शंकांचें समाधान करून घ्यावें आणि मिळालेली माहिती आपलीशी करावी. इंद्रियजय हेंच सर्व विद्यांचें ध्येय आहे असें सांगून कौटिल्य म्हणतोः—

तद्विरुद्धवृत्तिरवश्येंद्रियश्चातुरन्तोऽपि राजा सद्यो विनश्यति

ह्या विरुद्ध वागणारा ह्मणजे इंद्रियें आपल्या ताब्यांत न ठेवणारा राजा चारहि दिशांचा स्वामी असला तरी नाश पावतो. आपलें पावित्र्य न दवडितां त्यानें आपल्या इच्छा पूर्ण करून घ्याव्या त्यानें केव्हांहि सुखावाचून रहाण्याचें कारण नाहीं पण ह्याकरितां त्याजपाशीं संपत्ति असली पाहिजे ' **अर्थ एव प्रधानः ।** ' पण ती मिळवितांना राजानें केव्हांहि मर्यादेचें उल्लंघन करूं नये ह्मणून त्याच्या आचार्यांनीं आणि अमात्यांनीं प्रत्येक घंटेस त्याला सावध करीत असावे. ह्यावेळीं सावलीवरून वेळ समजण्याचें जें एक यंत्र होतें त्याला **'छाया नलिका प्रतोद'** असें म्हणत असत !

राजा ह्या एकच चाकावर राजशकट, चालणें अशक्य असल्यामुळें राजानें सचीव नेमून त्यांच्या मतानें तो चालवावा, असें सांगून आणि निरनिराळ्य ग्रंथकारांचीं मतें देऊन अमात्य कोणाला नेमावे याची कौटिल्यानें बरीच चर्चा केली आहे; शेवटीं तो म्हणतोः—

'कार्यसामर्थ्याद्धि पुरुषसामर्थ्यं कल्प्यते'

मनुष्याची योग्यता त्यानें केलेल्या कामावरूनच ठरविली पाहिजे. अशी पारख करून फक्त अमात्याची नेमणूक करावी. मंत्र्याची नेमणूक इतक्याच कसोटीवर करून भागणार नाहीं. अमात्याची नेमणूक केल्यावर त्यानें कोणतें काम कोठें आणि केव्हां करावयाचें तें ठरवून द्यावें. इतकें सांगितल्यावर कौटिल्य, मन्त्री आणि पुरोहित यांच्या योजनेकडे वळला आहे. पुढें त्यांची राजनिष्ठा कसाला लावण्याची जी पद्धत त्यानें सांगीतली आहे ती आज तरी फार चमत्कारिक वाटण्यासारखी आहे तो म्हणतोः—

आपला पुरोहित बहिष्कृतांना वेद शिकविण्याविषयींची आणि त्यांजकडे यज्ञादि कर्में करण्या विषयींची आपली आज्ञा अमान्य करितो अशा खोट्याच सबबीवर राजानें बाह्यतः त्याला कामावरून दूर करावा नंतर अशा पुरोहितानें अमात्यादिकांकडें जाऊन आपल्या राजाची निंदा करावी आणि राजाच्या नातेवाई-कांपैकीं कोणाला, अथवा दुसऱ्या जवळपासच्या एखाद्या राजाला गादीवर बसवि-ण्याची मसलत काढावी जे ह्या मसलतींत सामील होणार नाहींत ते मंत्री आणि अमात्य वगैरे अधिकारी राजनिष्ठ आहेत असें मानण्यास हरकत नाहीं. ह्या प्रकाराला **'धर्मोपधा'** असें म्हणतात.

ह्या प्रयत्नाप्रमाणेंच सेनापति द्वारा जी परीक्षा पहावयाची तिला **'अर्थोपधा'** असें म्हणतात. जनानखान्यांतील एखाद्या चांगल्या दासीकडेहि ही कामगिरी सोंपविण्यांत येत असें. तिनें जोगीणीच्या वेशानें अमात्यादिकांकडे जाऊन त्यांना राणीसाहेब तुमच्यावर फिदा आहेत, त्यांनीं रंगमहालांत तुमच्या स्वागताची उत्कृष्ट, तयारी केली असून प्रेमाच्या स्मरणार्थ त्या तुम्हाला पुष्कळ द्रव्य देणार आहेत अशा गोड गोड भुलथापा माराव्या जो ह्या थापांना भाळणार नाहीं तो चांगला. ह्या परिक्षेला ' **कामोपधा**' असें म्हणतात.

व्यापारी जहाजांत बसून परदेशीं जाण्याची मसलत एका अमात्यानें बाकी-च्यांस द्यावी. हा कट उघडकीस आला अशा निमित्तानें राजानें आपल्या सर्व मंत्र्यांस आणि अमात्यांस कैद करावें आणि त्यांची सर्व मालमत्ता जप्त करावी ! ते सर्व ह्या विपन्नावस्थेंत असतां एका गुप्त हेरानें येऊन राजाला ठार मारण्याची मसलत त्यांना सुचवावी. जे ह्या मसलतीस अनुकूल होणार नाहींत ते चांगले! ह्या परीक्षेला ' **भयोपधा** ' असें नांव दिलें आहे.

ह्या सर्व उपधा ह्मणजे त्या बिचाऱ्यांच्या पाठीस लागलेल्या एक प्रकारच्या उपाधीच होत्या ! जो ह्या सर्व उपाधींतून तावूनसुलाखून पार पडे त्याची नेमणूक मंत्रीपदावर करण्यांत येई. ह्या परीक्षेंत राजानें आपला किंवा आपल्या राणीचा संबंध येऊं देणें चांगलें नाहीं तसेंच असल्या परीक्षांमुळें अधिकारी लतकोडगे होतात असें कौटिल्याचें मत असल्यामुळें तो म्हणतोः—

तस्माद्बाह्यमधिष्ठानं कृत्वा कार्ये चतुर्विधे
शौचाशौचममात्यानां राजा मार्गेत सत्रिभिः

निरनिराळ्या चार प्रकारच्या परीक्षेकरितां दुसरींच कांहीं निरनिराळीं आमिषें दाखवून राजानें आपल्या गुप्त हेरांच्या द्वारें (सत्रिभिः) अमात्यांचा खरेखोटेपणा कसोटीस लावून पहावा.

चंद्रगुप्तानें परक्या ग्रीक लोकांच्या सैन्याची कत्तल उडवून त्यांच्यापैकीं कांहीं लोकांस त्यांच्या देशांत हाकलून लावले, शिकंदराच्या ह्मणजे अलेक्झांडराच्या स्वारीवर ताण करून अखिल आर्यावर्त पादाक्रान्त करण्याच्या महत्त्वाकांक्षेनें आलेल्या सीरियाच्या बादशहाला,–सेल्यूकसला–दातीं तृण धरावयास लावून आपल्या इच्छेप्रमाणें तह करावयास भाग पाडिलें व आपल्या राज्याचा विस्तार काबूल कंदहारापर्यंत वाढविला. ह्या गोष्टी केल्याबद्दल जनता जरी त्याला धन्यवाद देत असली तरी नंदवंशाचा त्यानें समूळ नाश केला ही गोष्ट पुष्कळांना पसंत पडली नाहीं; तसेंच त्याच्या हीनकुळामुळेंहि पुष्कळ लोक त्याला तुच्छ मानीत होते. आसपासचे राजे जरी त्याचे मांडलिक ह्मणवीत होते तरी त्याचें ऐश्वर्य त्यांना अगदीं असह्य होऊन ते त्याच्या अपकर्षाची सारखी मार्गप्रतीक्षा करीत होते. अशा स्थितींत वरील प्रमाणें त्याला आपल्या अधिकाऱ्यांची परीक्षा पहाण्याचे प्रसंग आले असल्यास नवल नाहीं. चाणक्याच्या दण्डनीतीवरून पहातां त्याची कारकीर्द पुष्कळांना फार जाचक वाटली असावी पण त्याचे कारण देखील त्याच्या भोंवती पसरलेलें त्याच्या द्वेष्ट्यांचें जाळेंच होय ! चंद्रगुप्ताच्या गुप्त हेरांचें खातें फार विलक्षण दिसतें त्यांची नियमबद्ध रचना आणि त्यांजकडे सोंपविण्यात येत असलेल्या कामांची माहिती वाचली म्हणजे गेल्या महायुद्धांतील गुप्त हेरांच्या कामाचें स्मरण झाल्यावांचून रहात नाहीं.

हेरांनीं सामान्यतः खालीं दिल्याप्रमाणें वेश घ्यावेत असें चाणक्य म्हणतोः—

कापटिकोदास्थितगृहपतिक वैदेहकतापस व्यञ्जनान्
सत्रितीक्ष्ण रसद्भिक्षुकीश्च

कापटिक म्हणजे दुसऱ्याचें हृद्गत जाणण्यांत कुशल असा प्रौढ विद्यार्थी. अशा कापटिकाला द्रव्यादि बक्षीस देऊन आणि त्याचा सन्मान करून, जो जो दुष्टावा कळेल त्याची त्याची माहिती आपणास देण्याविषयीं मंत्र्यानें त्याजकडून आपली व राजाची शपथ घेववावी.

शुद्धवर्तनाच्या दूरदृष्टि संन्याशाला '**उदास्थित**' ह्मणतात याच्या ताब्यांत लागेल तितका पैसा आणि शिष्य म्हणून त्याला हवीं असतील तीं आणि तितकी माणसें देऊन त्याला ज्या भागांतील गुन्ह्याचा तपास करणें असेल तिकडे रवाना करीत असत. तो तिकडे जाऊन शेती, गारक्षण व्यापार वगैरे करी आणि दूरदूर अंतरावर आपले शिष्य पाठवून बातमी आणवी. वार्षिक वेतन घेण्याच्या वेळीं सर्वांनीं एकत्र जमावे आणि आपआपल्या कामाचा अहवाल आपल्या महंताला द्यावा. असे पुष्कळ उदास्थित हेर सर्व राष्ट्रभर पसरलेले असत; पण त्यांची परस्परांस मुळींच माहिती नसे.

गृहपतिक म्हणजे शेतींत फसलेला आणि **वैदेहक** म्हणजे व्यापारांत फसलेला. असे लोक जर चांगले चाणाक्ष असतील तर त्यांची ह्या गुप्त हेरांच्या खात्यांत नेमणूक होऊन ते प्रांतोप्रांतीं पाठविले जात आणि तेथें शेतीचा आणि व्यापाराचा धंदा करून मिळेल तितकी बातमी मिळवून ती सरकारांत सादर करीत.

तापस व्यंजन नामक गुप्त हेरांचा वर्ग मोठा विलक्षण दिसतो. ह्यांच्यापैकीं कांहीं मुंडन करीत तर कांहीं जटामुकुट बांधीत त्यांच्याबरोबर शिष्यसमुदायहि मोठा असे. गुरुजी मुंडन केलेले तर शिष्य मंडळीहि मुंडन केलेली आणि गुरुजी जटाधारी तर शिष्यहि जटाधारी. अशा ह्या गुरुशिष्यांच्या टोळ्या गुप्त बातम्या काढण्याकरितां राज्यांत प्रांतोप्रांतीं फिरत. टोळीचा मुक्काम शहरापासून नजीक असणाऱ्या एखाद्या खेडेगावींच बहुधा पडत असे. आमचे गुरुजी—'**शाकं यवसमुष्टिं वा मासद्विमासान्तरं प्रकाशमश्नीयात्**' महिन्या दोन महिन्यांनीं केव्हां तरी थोडी शाकभाजी अथवा मुठभर धान्य खातात अशा गप्पा, ही शिष्य मंडळी आपल्या गुरुबद्दल सर्वत्र पसरीत. गुरुजी, '**गूढमिष्टमाहरम्**' आवडेल तें अन्न गुप्तपणें यथेच्छ चापीत ! आपल्या गुरुच्या अंगीं अलौकिक सामर्थ्य वसत आहे अशाहि गप्पा

शिष्यवर्ग सर्वत्र पसरवीत असे. अर्थात अन्न न खाणाऱ्या आणि अंगीं अलौकिक सामर्थ्य वसत असलेल्या त्या बोकेसंन्याशाकडे आपलें भविष्य समजावून घेण्याकरितां हजारो लोक जमा होत. यांची माहिती शिष्य मंडळी अगाऊच मिळवून ठेवीत आणि **'शिष्यसंज्ञाभिश्च'** खुणांच्या योगानें ती आपल्या गुरूला सुचवीत. **'इदमद्य श्वोवा भविष्यतीदं वा राजा करिष्यतीति'** अमूक गोष्ट आज होईल, अमूक उद्यां होईल, राजा असें करील इत्यादि भविष्य कथन करण्यांत येई आणि आपल्या हेरांवर लोकांचा विश्वास बसून त्यांनीं आपल्या अगदीं मनांतल्या गोष्टी हेरानां सांगाव्या म्हणून हीं त्यांची भविष्यें राजा आणि त्याचे अमात्य खरीं करून दाखवीत.

सात्रि म्हणून जो गुप्त हेरांचा वर्ग असे, त्यांत बहुधा ज्याला कोणी पालनकर्ता नसल्यामुळें ज्याचें योगक्षेम आणि शिक्षण यांची जबाबदारी राजावर पडे अशा तरुणांचा समावेश करण्यांत येई. हे तरुण सामुद्रिक, ऐंद्रजाल, भविष्यकथनादि विद्या शिकून तयार झाले म्हणजे त्यांची नेमणूक गुप्त हेर म्हणून करण्यांत येत असून **तीक्ष्ण** नामक हेरांनीं मिळविलेली बातमी गुप्त हेर खात्याच्या प्रमुखाकडे पोंचविणें हें त्यांचें काम होतें.

पैशाकरितां हत्तीशी किंवा वाघाशी बेधडक धडका घेण्यास तयार असणाऱ्या गुप्त हेरांना **'तीक्ष्ण'** अशी संज्ञा होती आणि **'येबन्धुषु निस्नेहाः क्रूराश्चालसाश्च ते रसदाः'** ज्यांना बंधुप्रेमाची नुसती ओळखहि नसे आणि जे निष्ठुर व आळशी असत त्यांना **'रसद'** असें म्हणत. राजाचीं छत्रचामरें धरून नेहमीं त्याच्या बरोबर असावयाचे आणि अधिकाऱ्याच्या सार्वजनिक आचरणावर लक्ष्य ठेवावयाचें हें तीक्ष्णांचें आणि राजाच्या आचारी पाणक्यांवर; त्याच्या बिछाने करणारावर वगैरे लक्ष्य ठेवावयाचें हें रसदांचें काम होतें.

आतां उपरोक्त हेरांपैकीं फक्त भिक्षुकीबद्दल विचार करणें राहिले **'परिव्राजिका वृत्तिकामा दरिद्रा विधवा प्रगल्भा ब्राम्हण्यन्तःपुरे कृत सत्कारा महामात्रकुलान्यधिगच्छत्'** ब्राम्हण जातीच्या गरींब पण हुशार आणि स्वतःच्या कमाईवर चरितार्थ चालविण्याची इच्छा करणाऱ्या विधवेचा समावेश ह्या वर्गांत होत असून अधिकारी लोकांच्या वाड्यांत प्रवेश करून तेथील बातमी काढण्याचें काम त्यांजवर सोपविण्यांत येत होतें. केशवपन केलेल्या ब्राम्हण विधवा

ह्या कामाकरितां अधीक पसंत करीत. शूद्र स्त्रियांचाहि कधीं कधीं उपयोग करून घेण्यांत येत होता.

गुप्त हेरांची परस्परांस ओळख नसे. निरनिराळ्या तीन ठिकाणाहून जेव्हां एकच बातमी येई तेव्हांच ती भरंशालायक अशी मानण्यांत येत असें, परंतु **तेषाम भीक्ष्ण विनिपाते तूष्णीं दण्डः प्रतिषेधो वा**' तीन ठिकाणांहून आलेल्या बातम्यांत अंतर पडल्यास ज्या हेरांची कसूर दिसून येईल त्याला गुप्तपणें दण्ड कारण्यात येई अथवा कामावरून काढून टाकण्यांत येई.

शहरांतील व खेडयांतील प्रजेची राजनिष्ठा कसोटीस लावण्याकरितां यात्रा चतुष्पथ वगैरे ज्या ठिकाणीं लोकांचा मोठा समुदाय जमा होतो अशा ठिकाणीं गुप्त हेरांपैकीं एकानें राजाची स्तुति करावी तर दुसऱ्यानें त्याच्या उलट राजाची निंदा करावी आणि लोकांपैकीं कोण, कोणाचा पक्ष धरितात हें सूक्ष्म दृष्टीनें पहावे. प्रजेपैकीं जे लोक संतुष्ट आहेत, असें दिसून येईल ' **तुष्टान् भूयः पूजयेत्** ' त्यांचा सत्कार करावा आणि असंतुष्ट असतील त्यांस सामोपचारानें देणग्या देऊन अथवा जरूरीप्रमाणें त्यांना शिक्षा करून चांगले ताळ्यावर आणावे. आपली प्रजा असंतुष्ट ठेवणें म्हणजे शत्रूला आपल्यावर विजय मिळविण्याचा मार्गच मोकळा करून देणें आहे.

आपल्या प्रजेप्रमाणेंच दुसऱ्या राष्ट्रांतील प्रजेच्या परिस्थितीचें मोठ्या बारकाईनें अवलोकन केलें पाहिजे. ह्या कामावर नेमलेल्या गुप्त हेरांनीं, कोणत्या तरी कारणानें त्या राजाची जी प्रजा राजावर असंतुष्ट झाली असेल तिला गोड गोड भाषणांनीं आपल्या बाजूस वळविण्याचें कार्य करावें.

मंत्री मंडळाचें काम फारच गुप्त रीतीनें चाललें पाहिजे. तें काम चालू असतां तेथें पक्षीहि असू नयेत. पोपटाकडून गुप्त मसलती बाहेर फुटल्याचीं कित्येक उदाहरणें आहेत. अशा बंदोबस्तांत चाललेल्या मंत्रिमंडळाच्या कामाची माहिती बाहेर फोडणारास देहांत शिक्षा द्यावी असें कौटिल्याचें मत आहे. कर्झन साहेबांचा Oficial secret Act ह्यापेक्षां कडक, असें म्हणतां येणार नाहीं. मंत्रीमंडळांत, ' **प्रमादमदसुप्तप्रलापकामादिरुत्सेकः** ' निःकाळजी, व्यसनी, झोंपेंत बडबड करणारे, कामातुर इत्यादि, दुर्गुणांनीं पच्छाडलेलीं माणसें नसावींत. मंत्रिपरिषदेंत किती मंत्री असावे याबद्दल भारद्वाज, विशालाक्ष, पराशर इत्यादिकांच्या मतांची चर्चा करून, ' **मंत्रिभिस्त्रिभिश्चतुर्भिर्वा सह मंत्रयेत्** ' तीन

चारच मंत्री असावे किंवा कार्याच्या महत्त्वाप्रमाणें जितक्या लोकांची सल्लामसलत घेणें राजाला अवश्य वाटेल तितके लोक त्यानें मंत्रिपरिषदेंत घ्यावे असें कौटिल्यानें आपलें मत दिलें आहे.

इन्द्रस्यहि मंत्रिपरिषदृषीणां सहस्रम् । तच्चक्षुः ।
तस्मादिमं द्व्यक्षं सहस्राक्षमाहुः

इंद्राच्या मंत्रिपरिषदेंत एक हजार ऋषी होते. ते त्याचे नेत्रच म्हटलें असतां चालेल यामुळेंच वस्तुतः त्याला दोनच नेत्र असतां, तो सहस्राक्ष ह्मणून प्रसिद्ध आहे. इंद्राच्या हजार डोळयांची कौटिल्यानें केलेली ही मीमांसा भक्तिभावानें **पुराणें वाचून तीं अक्षरशः खरीं मानणारांनीं जरूर लक्ष्यांत बाळगावी. मंत्रिपरिषदेंत बहुमतानें जो निकाल होईल तो राजानें देखील मान्य करावा असा नियम होता.**

परराष्ट्राशीं वकिली करण्याकरितां जो मनुष्य पाठवावयाचा तो अमात्यपदाच्या लायकीचा असला पाहिजे. राजानें त्याच्याबरोबर चांगलीं वहानें भरपूर अन्न सामुग्री आणि बराच मोठा नोकरांचा लवाजमा दिला पाहिजे. आपला निरोप कसा कळवावयाचा, त्यावर कोणते प्रश्न पुढें येण्याचा संभव आहे, ते उपस्थित झाले असतां त्यांचीं उत्तरें कशीं द्यावयाचीं इत्यादि गोष्टींचा अभ्यास त्या वकिलानें चांगल्या प्रकारें केलेला असावा. परराष्ट्रांत गेल्यावर तेथल्या प्रत्येक गोष्टीची तुलनात्मक माहिती त्यानें मिळवावी. तापसादि हेरांच्या द्वारें तेथल्या प्रजाजनांतील निरनिराळे पक्षभेद, त्यांत आपल्या राजाच्या बाजूचे कोण आहेत राजनिष्ठ कोण आहेत, अराजक कोण आहेत इत्यादि गोष्टींचें ज्ञान त्यानें करून घ्यावें. अशा रीतीनें हेरांकडून माहिती मिळण्याचा संभव नसेल तर, '**याचक मत्तोन्मत्तसुप्तप्रलापैः पुण्यस्थान देवगृहचित्र लेख्यसंज्ञाभिर्वा चारमुपलभेत्**' भिकारी, दारूबाज, वेडसर आणि झोंपेंत बरळणारे यांच्या बडबडीवरून, यात्रेचीं ठिकाणें आणि देवळें वगैरेवर लिहिलेल्या लेखांवरून आणि चित्रांवरून ती काळजीपूर्वक मिळवावी आणि जी माहिती मिळेल ती त्यापेक्षांहि जास्त काळजीनें पडताळून पहावी. त्यानें आपला निरोप कळवितांना स्वतःच्या प्राणाची सुद्धां पर्वा करूं नये. '**उद्धृतेष्वपि शस्त्रेषु यथोक्तं वक्तारस्तेषामन्तावसायिनोऽप्यवध्याः**' वकिलाचा, विशेषतः ब्राह्मण वकिलाचा, वध तर

होऊंच नये. वकिलानें परकीय राजाच्या आदर-सत्काराला भाळून आपल्या कार्यांत अंतर पडूं देऊं नये तसेच त्या राजाच्या वैभवाला पाहून गांगरूनहि जाऊं नये. आलेल्या वकिलाला मद्य पाजून अथवा स्त्रियांच्या मोहपाशांत आडकवून त्याचें समजून घेण्याची वहिवाट आहे असें सांगून कौटिल्य म्हणतो कीं; '**स्त्रियःपानंच वर्जयेत् ! एकःशयीतं** शयीत' वकीलानें स्त्रिया आणि मद्यपान ह्यांचा त्याग करून एकट्यानेंच निद्रा केली पाहिजे. आपल्या राजाच्या बळाबळाविषयीं त्या राजानें जो अंदाज केला असेल तो दुरुस्त करण्याच्या भानगडींत न पडतां वकीलानें त्याला फक्त '**सर्वं वेद भवानिति ब्रूयात्**' आपणाला सर्व माहितच आहे; असें मोघम म्हणावें. कारणपेक्षां तो राजा आपणांस जास्त दिवस राहून घेतो असें लक्ष्यांत येतांच, वकिलानें काय काय तर्क करावे हें सांगून त्यानें आपल्या कामाचा लौकर निकाल करण्या विषयीं राजाच्या मागे तगादा लवावा अथवा जरूरी प्रमाणें त्याचा निरोप घेऊन निघून जावें; फार तर काय अवश्य दिसेल तर निरोपा वाचूनहि निघून जावें असें चाणक्य म्हणतो.

'**राज्य म्हणजे सुळावरची पोळी,**' ह्या म्हणीची सत्यता सध्यांच्या काळांत अगदीं क्वचित प्रसंगीं, कांहीं संस्थानांतून अनुभवास येत असली तरी चाणक्याच्या पूर्व काळापासून ती पदोपदीं प्रत्ययास येत असावी असें 'राजपुत्ररक्षणम्' नामक अर्थशास्त्राच्या १६ व्या प्रकरणावरून दिसून येतें. 'कर्कटकसधर्माणोहि जनकभक्षाः राजपुत्राः' राजपुत्राच्या जन्मापासूनच राजानें त्यापासून आपलें संरक्षण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण राजपुत्र हा उपजतांच जन्मदात्याला खाऊन टाकणाऱ्या खेंकड्या सारखा आहे; असें सांगून ग्रंथकारानें आपल्यापूर्वी होऊन गेलेल्या राजनीतीवरील लेखकांचीं मतें आपल्या प्रस्तुत ग्रंथांत उद्धृत केलीं आहेत.

भारद्वाज म्हणतो राजपुत्राच्या ठिकाणीं जर पितृप्रेम दिसून येणार नाहीं तर राजानें त्याला गुप्तपणें शिक्षा करावी. **विशालाक्ष** म्हणतो राजपुत्राला राजानें ठार करणें म्हणजे क्षत्रियवर्णाचा समूल उच्छेद करणेंच आहे, याकरितां राजानें त्याला एकाद्या ठिकाणीं बंदीवासांत ठेवावें. **पाराशर** ह्मणतो '**अहिभयमेतत्**' राजपुत्र ह्मणजे सर्पासारखा तो साध्या बंदीवासाबद्दल डूक धरून केव्हां दंश करील याचा नेम नाहीं, म्हणून त्याला एखाद्या किल्ल्यांत मोठ्या कडक

पहाऱ्यांत ठेवावा हें उत्तम ! **पिशुनाचें** समाधान इतक्यानेंच होत नाहीं. तो म्हणतो राजपुत्र, बंदीवासाचें कारण समजतांच पहारेकऱ्यांना फितवील, करितां त्याला दूर अंतरावर एखाद्या परक्या राजाच्या किल्ल्यांत बंदींत ठेवावे. **कौणपदन्ताला** ही मसलत पसंत नाहीं तो म्हणतो '**वत्सस्थानमेतत्**' वासराचा उपयोग करून जसें गाईचें दूध काढतात त्याप्रमाणें तो परका राजा ह्या राजपुत्राचा उपयोग करून राजाचें सर्वस्व नष्ट करील, करितां राजपुत्राला त्याच्या मामाकडेच ठेवावे. कौटिल्याला यांपैकीं कोणतेंच मत मान्य नाहीं. इतकेंच नव्हे तर **आम्भीय** नामक राजनीति विशारद म्हणतो त्याप्रमाणें एका गुप्त हेरानें त्याचें मन, मृगया, द्यूत, मद्यादि व्यसनाकडे वळवून '**पितरि विक्रम्य राज्यं गृहाण**' राजावर हल्ला करून राज्य घेण्याची मसलत द्यावी आणि दुसऱ्यानें त्याला व्यसनांपासून अलिप्त रहाण्यास व राजावर प्रेम करण्यास शिकवावें, ही गोष्टहि त्याला पसंत नाहीं. तो ह्मणतो राजानें पुत्रापासून आपलें संरक्षण करण्याचा उत्तम मार्ग ह्मणजे त्याला योग्य गुरूकडून उत्तम शिक्षण देवविणें हाच होय ! त्याच्या निर्मळ मनावर व्यसनादिकाचा पगडा बसवूं पहाणें किंवा परीक्षेकरितां कां होईना पण त्याला राजावर हल्ला करण्याची मसलत देवविणें ह्मणजे मोठीच चूक आहे '**महादोषमबुद्धबोधनमिति**' त्याच्या ठिकाणीं सद्धर्म आणि सदभिरुचि उत्पन्न करण्याचेच प्रयत्न राजानें केले पाहिजेत. तारुण्यामुळें परस्त्रियांकडे तो वाकड्यानजरेनें पहातो असें आढळून आल्यास कुटिल स्त्रियांकडून घरंदाज स्त्रियांच्या वेशांत त्याला भीति दाखवून तो वाईट मार्ग सोडण्याकडे त्याची प्रवृत्ति करावी. '**मद्यकामंयोगपानेनोद्वेजयेयुः**' जास्त विषारी मद्य पाजून त्याला मद्यपानाचा वीट आणावा. द्यूतामध्यें कपटी लोकांच्या जाळ्यांत पाडून त्याला ताळ्यावर आणावे. त्याचा मृगयेचा नाद वाटमाऱ्याच्या रूपांत गुप्तहेर पाठवून घालवावा. **अप्रार्थनीयो राजा विपन्ने घातस्सम्पन्ने नरकपातः** राजपद कांहीं, केवळ इच्छेनें प्राप्त होत नाहीं. राजाला मारण्याचें तुझें कारस्थान फसलें तर तुझा घात होईल आणि साधलें तर राजा आणि पिता त्यांच्या हत्येबद्दल म्हणून तुला नरकवास भोगावा लागेल असें सांगून राजाविरुद्ध झालेली त्याची मनोवृत्ति बदलून टाकावी.' अशा प्रयत्नानीं राजपुत्र जर सद्वर्तनीं निपजला तर राजानें त्याला '**सैनापत्ये यौवराज्ये वा स्थापयेत्**' आपला सेनापत्ति नेमावा अथवा युवराज्याभिषेक करावा. एकच पुत्र असेल आणि तो जर दुर्गुणीच राहील तर त्याला राज्याधिकार न देतां वृद्ध अथवा व्याधिग्रस्त

राजानें '**मातृबन्धुतुल्य गुणवत्सामन्तानामन्यतमेन क्षेत्रे बीजमुत्पादयेत्**' आपल्या मातुल कुलांतील नातेवाइकाकडून अथवा नजीकच्या गुणसंपन्न राजाकडून आपल्या पत्नीच्या ठिकाणीं पुत्रोत्पत्ति करून घ्यावी; असेंहि कौटिल्यानें आपलें मत दिलें आहे. अर्थात् कौटिल्याच्या वेळीं तरी नियोगपद्धति खास प्रचारांत होती.

राजा आपल्या एखाद्या पुत्राला जर वाईट रीतीनें वागवील तर प्राणावर बेतेपर्यंत तरी राजपुत्रानें आपल्या पित्याच्या आज्ञेबाहेर वागूं नये. राजानें जर एखाद्या चांगल्या कामावर त्याची नेमणूक केली असेल तर त्या कामावरील अधिकाऱ्याची मर्जी संपादन करून त्या कामांत जो फायदा होईल तो मोठ्या संतोषानें राजाला द्यावा. इतकें करूनहि राजा प्रसन्न न होईल, तो जर दुसऱ्या राजपुत्रावर किंवा दुसऱ्याच राण्यांवर विशेष प्रेम दाखवीत राहील, तर ह्या राजपुत्रानें अरण्यांत रहाण्याविषयीं त्याची परवानगी मागावी. याउप्पर मृत्यूची अथवा प्रतिबंधाची भीति जर राजा घालील तर त्यानें खुशाल दुसऱ्या एखाद्या अतिथिसत्कार करणाऱ्या सच्छील राजाच्या आश्रयाला जाऊन रहावें, पुष्कळ द्रव्यबल आणि मनुष्यबल संपादन करावें, तेथल्या वजनदार गृहस्थांच्या मुलीशीं विवाह करावा आणि जमल्यास आपल्या पित्याच्या राज्यांतील एखाद्या पक्षाशीं स्नेहसंबंधहि जोडावा. हें नच साधेल तर त्यानें सोन्याच्या किंवा रत्नांच्या खाणींचा किंवा दुसरा कसला तरी व्यापार करावा. हेंहि नच साधेल तर पाखंडी लोक, देवस्थानाचे वेदशास्त्रशून्य व्यवस्थापक, श्रीमंत विधवा आणि जलमार्गानें व्यापार करणारे श्रीमंत यांची मैत्री संपादन करून त्यांचें द्रव्य '**मदनरसयोगेनातिसंधायापहरेत्**' त्यांना विषप्रयोग करून खुशाल लुटावें अथवा परकीय राजाचा कांहीं मुलूख युक्तिप्रयुक्तीनें जिंकावा किंवा आईच्या चाकर नोकरांच्या मदतीनें बापाविरुद्ध एखादें कारस्थान रचावें.

राजपुत्राला इतकेच उपाय सुचवून कौटिल्याचें समाधान होत नाहीं. तो पुढें म्हणतो—त्यानें स्वतः चितारी, सुतार, भाट, वैद्य, खुषमस्कऱ्या इत्यादिकांच्या वेशांत आपल्या सहाय्यकर्त्यांसह बरोबर हत्यारें आणि विष घेऊन राजासमोर ह्मणजे अर्थात् आपल्या बापासमोर, जावें आणि त्याला म्हणावें:— '**अहमसौ कुमारः, सहभोग्यमिदं राज्यमेको नार्हति भोक्तुम्**' मी ह्या राज्याचा हक्कदार असल्यामुळें हें यापुढें तुम्हीं एकट्यानें न उपभोगितां त्याचा

उपभोग तुम्हीं आणि मी उभयतांनीं घेतला पाहिजे. माझ्यावांचून आणखी कोणी राजपुत्र जर ह्या राज्याचे वारस असतील तर त्यांनीं राज्यांत रहावें आणि मीच मात्र कांहीं तरी वेतन घेऊन हद्दपार असावें ही गोष्ट मला पसंत नाहीं. " कौटिल्य राजपुत्राला जशी ही मसलत देतो तशी राजाला पण एक मसलत देतो. गुप्त हेरांकडून किंवा त्याच्या आईकडून अथवा दाईकडून राजानें प्रथम त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करावा. पण त्यांत यश नच आलें तर **त्यक्तं गूढपुरुषाः शस्त्ररसाभ्यां हन्युः'** त्या सोडलेल्या राजपुत्राला गुप्तहेरांच्या द्वारें राजानें शस्त्राच्या किंवा विषाच्या प्रयोगानें खुशाल ठार मारावें. राजपुत्राचा जर पूर्वी त्याग केला नसेल तर स्त्रिया, मद्य, शिकार वगैरे व्यसनाच्या साधनांनीं त्याला पकडून आणावा आणि आपल्या पश्चात् राज्य देण्याचें वचन देऊन त्याला:—

एकस्थमथ संरुन्ध्यात् पुत्रवान्वा प्रवासयेत्

एखाद्या विशेष ठिकाणीं पहाऱ्यांत आडवून ठेवावे. एकापेक्षां अधिक पुत्र असतील तर त्यांपैकीं आपल्या आज्ञेंत न वागणाऱ्यास राजानें हद्दपार करावें. केवळ संपत्ति आणि अधिकार यांजविषयींच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेनें, पिता-पुत्रामधील नैसर्गिक प्रेमाचा, ह्या आर्यावर्तांत सुमारें अडीच तीन हजार वर्षांपूर्वी कसा बळी घेतला होता; हें उपरोक्त विवेचनावरून आमच्या वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. अशा काळांतील ह्या दुर्दैवी प्राण्यांकडे पाहून '**राज्य हें नरकाचें साधन आहे**' हा वाक्प्रचार कोणी पाडला असल्यास त्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहींच नसून '**राज्य ह्मणजे प्रत्यक्ष नरकच आहे**' असा प्रचार कसा रूढ झाला नाहीं याचेंच आश्चर्य वाटतें. अशा काळांत बुद्धाचा **त्याग** आणि शंकराचार्यांचा '**अर्थमनर्थं भावय नित्यं**' इत्यादि उपदेश गळीं उतरून हिंदुस्थान देश मायावादी आणि ऐहिक सुखाविषयीं विरक्त बनला असला आणि कोणीहि राजा असो त्याविषयीं केवळ औदासिन्य पतकरून राजनिष्ठा हेंच आपलें कर्तव्य असें समजण्याकडे त्याची प्रवृत्ति झाली असली तर त्यांत नवल नाहीं असें आम्हांला वाटतें.

प्रकरण २ रें.

राजाचें शिक्षण कसें असावें आणि त्यानें आपल्या अमात्य, मंत्री वगैरे अधिकाऱ्यांची निवड कशी करावी, गुप्त हेर कसे नेमावे, त्यांनीं कोणत्या वेशांत कोणतीं कामें कशाप्रकारें करावीं, राजानें राजपुत्राशीं आणि याच्या उलट राजपुत्रानें राजाशीं कसें वागावें इत्यादि संबंधानें कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत प्रगट केलेले विचार आह्मीं प्रदीपाच्या दुसऱ्या प्रकरणांत दिले आहेत. आतां ह्या प्रकरणांत तो राजाच्या वर्तनाविषयीं, त्याच्या नित्यक्रमाविषयीं, त्याच्या प्रजाविषयक व इतर कर्तव्याविषयीं काय म्हणतो याचा विचार प्रथम करूं.

प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम्
नात्मप्रियं हितं राज्ञः प्रजानां तु प्रियं हितम्

अर्थ—प्रजेचें जें सुख तेंच राजाचें सुख आणि तिचें जें कल्याण तेंच राजाचें कल्याण. केवळ स्वतःला सुखदायक वाटणाऱ्या गोष्टी आपल्या खऱ्या सुखाच्या आहेत असें राजानें केव्हांहि समजूं नये. प्रजेला सुखदायक असतील अशाच गोष्टींत त्याचें खरें सुख असतें.

राजाच्या सुखाची ही कल्पना किती उदात्त आहे ! पण ही कल्पना श्रीरामासारख्या एखाद्याच पौराणिक राजानें आपल्या प्रत्यक्ष आचरणांत आणून दाखविलेली दिसते. कौटिल्यानें ह्या कामीं राजाला काय उपदेश केला आहे तो आपण आतां पाहूं.

राजा जर उत्साहपूर्वक कार्यव्यापृत असेल तरच त्याचे नोकर उत्साही आणि कार्यमग्न रहातील आणि तो जर आपल्या कामाविषयीं बेफिकीर राहील तर त्याचे नोकर नुसते बेगुमान वागतील इतकेंच नव्हे तर प्रसंगीं त्याच्या कार्याचाच काय पण त्याचाहि नाश करतील. कर्तव्याची पर्वा न करणारा राजा शत्रूच्या तावडींत सांपडलाच पाहिजे. याकरितां राजानें नेहमीं कर्तव्यपरायण असावें.

कौटिल्याच्या वेळीं छायेवरून दिनमान पहात असत. सूर्योदयापासून मध्याह्नापर्यंत कमी होणाऱ्या आणि पुढें सूर्यास्तापर्यंत वाढत जाणाऱ्या सावलीच्या

लांबीवर प्रमाण बसवून सरासरी दीड तासाचा एक ह्याप्रमाणें दिवसाचे जे आठ भाग कल्पिलेले असत त्या प्रत्येकाला **नलिका** अशी संज्ञा होती. दिवसाच्या पहिल्या नलिकेंत राजानें पहारेकऱ्यांच्या नेमणुका करून जमाखर्चाची तपासणी करावी '**द्वितीये पौरजानपदानां कार्याणि पश्येत्**' दुसरींत प्रजाजनांच्या कामांचा निकाल करावा, तिसरींत स्नान भोजनादि आटोपून '**स्वाध्यायंच कुर्वीत**' कांहीं वेळ आपल्या कर्तव्याला अवश्य अशा गोष्टींचें अध्ययन करण्यांत घालवावा, चवथींत प्रथम आलेला वसूल घेऊन अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नेमणुका-संबंधाचें काम पहावें. पांचवींत मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानें महत्त्वाचा पत्रव्यवहार करून गुप्तहेरांकडून आलेल्या बातम्या ऐकून घ्याव्या. सहावी नलिका, राजाला विश्रांति, करमणूक किंवा स्वतःशीं विचार करण्याकरितां ह्मणून राखून ठेविलेली होती. '**सप्तमे हस्त्यश्वरथायुधीयान् पश्येत्**' सातवींत सैन्याची पहाणी आणि आठवींत मुख्य सेनापतीबरोबर मसलत हीं कामें राजानें करावींत. रात्रीच्या वेळाचेहि असेच भाग कल्पून सायंकाळबरोबर राजानें संध्या अथवा ईशप्रार्थना करावी, पहिल्या भागांत गुप्त हेरांवरील अधिकाऱ्यांच्या भेटी, दुसऱ्यांत स्नान भोजन आणि अध्ययन, तिसऱ्या भागाच्या आरंभीं मधुर वाजंत्री वाजत असतां राजानें शयनगृहांत जाऊन तीन तासपर्यंत स्वस्थ झोंप घ्यावी आणि रात्रीच्या सहाव्या भागांत पूर्वीप्रमाणेंच वाद्याचा मधुर ध्वनि चालू असतांच जागें होऊन उजाडल्यानंतर कोणतीं कामें कशीं करावयाचीं याचा विचार आपल्या मनाशींच करावा. सातव्या भागांत जरूरीप्रमाणें गुप्त हेर रवाना करावे आणि रात्रीच्या शेवटच्या भागांत गुरु पुरोहितादिकांचे आशीर्वाद घेऊन वैद्याला प्रकृति दाखवून, पाकशाळेवरील अधिकाऱ्याला आवश्यकतेप्रमाणें हुकूम देऊन, ज्योतिषाजवळ मुहूर्ताची चर्चा करून आणि सवत्स धेनुला आणि वृषभाला प्रदक्षिणा घालून राजानें नित्याप्रमाणें पुढील कार्याकरितां सूर्योदयाबरोबर राजसभेंत हजर रहावें.

राजाच्या कार्यक्रमांत कांहींतरी नियमितपणा असावा, आमच्या हल्लींच्या संस्थानिकांप्रमाणें किंवा ब्रिटिश हिंदुस्थानांतील कित्येक बड्या अधिकाऱ्यांप्रमाणें त्याचा कारभार केवळ लहरीप्रमाणें चालूं नये, असाच राजाचें हें वेळापत्रक आंखून देण्यांत कौटिल्याचा मुख्य हेतु दिसतो; कारण जरूरीप्रमाणें राजानें त्यांत फेरफार करून आपलीं कामें करावींत असा अखेरचा शेरा त्यानें मारला आहे.

तो पुढें ह्मणतो—"अर्जदारांना फार वेळपर्यंत दाराशीं कुचंबत ठेवणें, त्यांची भेट न घेणें, सर्व कामें नोकरांवर सोंपवून आपण नुसत्या सह्या ठोकण्याचें काम करणें हे राजाचे दुर्गुण आहेत. यामुळें सर्व कामाचा घोंटाळा माजतो, लोकांमध्यें असंतोष उत्पन्न होतो आणि शत्रूंचा डाव साधतो." कौटिल्याचा हा उपदेश आजच्या राजयंत्र चालविणारांनींहि आपल्या हृत्पटलावर खोदून ठेवण्यासारखा आहे असें आह्मांला वाटतें.

कामें जेव्हांचीं तेव्हां व्हावींत, निकडीचीं कामें लांबणीवर पडल्यास निकालाला जड जातात किंवा केव्हांच निकालांत निघत नाहींत. कौटिल्य ह्मणतो

राज्ञो हि व्रतमुत्थानं यज्ञः कार्यानुशासनम्
दक्षिणा वृत्तिसाम्यं च दीक्षितस्याभिषेचनम्

"सदासर्वदा कार्यतत्पर असणें हेंच राजाचें व्रत आहे, स्वतःचें कर्तव्य समाधानकारक रीतीनें बजावणें हाच त्याचा यज्ञ आहे, सर्वांकडे समदृष्टीनें पहाणें हेंच त्याचें दान आणि हेंच त्याचें यज्ञीय स्नान आहे." हल्लीं असल्या उपदेशाची सर्वत्र अवश्यकता दिसून येतें यांत शंका नाहीं.

भद्रसेन राजाच्या भात्रानें त्याच्या राणीच्या महालांत छपून राहून त्याचा खून केला, **कारुश** राजाच्या मुलानें आपल्या मातेच्या पलंगाखालीं दडून बापाला ठार मारिलें, सोजी करितां तांदूळ भाजतांना त्यांना, वरून मधाप्रमाणें दिसणारें विष लावून **काशीराजाच्या** राणीनें आपल्या पतीला ठार केलें. **वैरत्याच्या** राणीनें पतीच्या तोंडयाला विषाचें पुट देऊन त्याचा घात केला. **सौविराच्या** राणीनें कमरपट्यांतील रत्नाला विषाचा लेप देऊन नवऱ्याचा प्राण घेतला. आरशाला विष फासून **जालुथाला** त्याच्या पत्नीनें आणि वेणींत लपाविलेल्या शस्त्राच्या मदतीनें **विदूरथाला** त्याच्या पत्नीनें स्वर्गांत रवाना केलें. असा पूर्वेतिहास सांगून राजाला जसें त्याच्या दायादांपासून आणि स्वतःच्या मुलांपासून भय असतें तसेंच त्याला त्याच्या राण्यांपासूनहि भय असतें म्हणून राजमहाल बांधण्यापासून त्यानें अत्यंत सावधगिरी बाळगली पाहिजे; असें कौटिल्याचें म्हणणें आहे. कौटिल्यानें दिलेलीं हीं राजांचीं नावें आणि त्यांच्या मृत्यूचा इतिहास यांचा मेळ घालण्याचा आम्हीं जो थोडाफार प्रयत्न केला त्यांत आम्हांला यश आलें नाहीं. इ. सनाच्या पूर्वीं चारशें

किंवा त्याहून अधीक वर्षांच्या पूर्वी उपरोक्त राजे हिंदुस्थानच्या कोणत्यातरी भागांत होऊन गेले, ही गोष्ट उघड आहे. ह्या संबंधाची विशेष माहिती आर्यावर्ताचा प्राचीन इतिहास जाणणारे वाचक साधार आणि सविस्तर प्रसिद्ध करतील तर मराठी वाचकांवर त्यांचे फार उपकार होतील.

राजाच्या प्राणावर बेतणाऱ्या ह्या सर्व संकटांचा विचार करूनच अन्तःपुर, रंगमहाल, राजमहाल, राजसभा वगैरे इमारतींची बांधणी कशी असावी याविषयींची माहिती कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत दिली आहे. तो ह्मणतोः—

वास्तुकप्रशस्ते देशे सप्राकारपरिखाद्वारमनेक
कक्ष्यापरिगतमन्तपुरं कारयेत् ।

अन्तःपुरादि खासगी उपयोगाच्या इमारती बांधण्याकरितां वास्तुशास्त्राप्रमाणें योग्य अशा जागेची निवड करावी. इमारतींच्या भोंवती मजबूत तटबंदी करून, तटबंदीभोंवतीं खंदक खणावा. तटबंदीच्या आंत प्रवेश करण्यास एकच दरवाजा असावा. अंतःपुराला एकामध्यें एक अशीं अनेक दालनें करावीं. राजानें आपणां स्वतःकरितां जो दिवाणखाना तयार करावयाचा तो कोशगृहाप्रमाणें मजबूत करावा अथवा त्याला 'गूढभित्तिसंचारम्' भिंतीमधून मार्ग ठेवून त्याची रचना पांडवांच्या मयसभेप्रमाणें मोह उत्पन्न करणारी करावी. किंवा त्यानें आपलें निवासस्थान एका तळघरांत करून त्याच्या दरवाजावर देवतादिकांच्या मूर्ति खोदाव्या. तळघरांतून बाहेर पडण्यास '**अनेक सुरुङ्गासञ्चारं**' भुयारांतून जाणारे अनेक मार्ग तयार करावे. निवासस्थान तळघरांत न करितां मजल्यावर असावें असें वाटत असेल तर, मजल्यावर चढण्याचा जिना '**गूढभित्तिसोपानं**' भिंतीमध्यें अगदीं गुप्त ठेवावा, आणि त्यांतून बाहेर पडण्याचे मार्ग शोभेकरितां ह्मणून कांहीं पोकळ खांब करून त्यांमधून बांधावे. इतकेंच काय पण, राजानें आपलें '**वासगृहं यंत्रबद्धतलावपातं कारयेत्**' वसतिस्थान मनांत येतांच ताबडतोब पाडतां येईल अशा प्रकारच्या यांत्रिक रचनेनें उभारलें पाहिजे.

अशा रीतीनें बांधिलेल्या इमारतींना आगीपासून भय राहूं नये म्हणून कांहीं उपाय सांगितले आहेत त्यांत '**वैद्युतेन भस्मना मृत्संयुक्तेन करकवारिणाऽवलिप्तंच**' विजेच्या साह्यानें केलेल्या चुन्यांत माती मिसळून गारांच्या

पाण्यांत त्याचा रांधा तयार करून भिंती बांधाव्या असा एक उपाय आहे! सर्पादि विषारी प्राण्यांनीं गृहप्रवेश करूं नये ह्मणून घरावर गुळवेल, बांडगुळ वगैरे वेली लावाव्या आणि शेजारीं पिंपळाचीं झाडें लावून वर त्याच्या छायेचा मंडपच होईल असें करावें. मांजर, मोर आणि मुंगूस हे प्राणी सर्पाला खातात; पोपट, मैना आणि भृङ्गराज ह्या पक्ष्यांना जवळपास हे विषारी प्राणी असल्याचा संशय येतांच ते ओरडून आक्रोश करितात; क्रौंच पक्षी ह्या विषाच्या सान्निध्यांत मूर्छा पावतो; चकोराचे डोळे लाल होऊन त्याला ग्लानि येते आणि कोकिल त्यामुळें मृत्यु पावतो. अर्थात् हे प्राणी घरांत बाळगावे म्हणजे चुकून जरी घरांत सर्पादिकांचा प्रवेश झाला तरी तो तावडतोब उमगल्यावांचून रहात नाहीं. आपणांमध्यें हे प्राणी पाळण्याची चाल फार प्राचीन काळापासून असल्याचें दिसून येतें तिचें कारण हेंच नसेल ह्मणून तरी कशावरून!

अंतःपुराच्या मागच्या आंगास एका बाजूला दुसऱ्या स्त्रियांना रहाण्याकरितां जागा करून तेथें सुइणींच्या कामास लागणारीं व दुसरीं कांहीं औषधें संग्रहित करावीं, तेथें कुंड्यांतून निरनिराळ्या उपयुक्त वनस्पती लावाव्या आणि त्यांना वेळच्या वेळीं पाणी देण्याकरितां पाण्याचा सांठा करावा. ही अन्तःपुराच्या मागच्या भागाची व्यवस्था झाली. राजाच्या मुलामुलींना रहाण्याची व्यवस्था पुढच्या भागांत असावी. तसेंच त्याला लागून अलंकारभूमि (Toilet ground) मंत्रभूमि (Council ground) उपस्थान (The court) आणि युवराजाची कचेरी व अध्यक्षस्थान (Palace Suprintendent's officc) इत्यादि जागा कराव्या. ह्या नजीकच दुसऱ्या चौकांत अन्तःपुराच्या संरक्षणार्थ नेमलेल्या अधिकाऱ्यानें आपल्या सैनिकांसह रहावें.

राण्यांपासून आपल्या जीवावर येणारीं संकटें टाळण्याकरितां राजानें त्यांची आणि ढोंगी संन्यासी, वैरागी आणि जादुगार व वेश्यापण करणाऱ्या स्त्रिया यांचा प्रवेश अंतःपुरांत होऊं देऊं नये. तसेंच.

स्वभूमौ च वसेत्सर्वः परभूमौ न सञ्चरेत् ।
न च बाह्येन संसर्ग कश्चिदाभ्यन्तरो व्रजेत् ॥

अन्तःपुरांतील प्रत्येक माणसानें, त्याला नेमून दिलेल्या जागेंतच असलें पाहिजे. कोणत्याहि सबबीवर दुसऱ्याच्या जागीं जाऊं नये. आणि वाड्यांतील माणसानें

बाहेरच्या माणसाशीं केव्हांहि संबंध ठेवूं नये. योग्य अधिकाऱ्याची मुद्रा असल्या शिवाय कोणतेंहि सामान अंतःपुरांत येतां कामा नये किंवा अंतःपुराबाहेर जातां कामा नये असा सक्त हुकूम देऊन तो पाळला जातो किंवा नाहीं हें वारंवार पहात जावें.

राजा झोंपेंतून उठल्याबरोबर त्याला धनुष्यबाण धारण करणाऱ्या रक्षक स्त्रियांच्या तुकडीनें सामोरें जावें, दुसऱ्या दालनांत राजच्या ठराविक नोकरांपैकीं एकानें त्याला अंगरखा व एकानें पागोटें आणून द्यावें, तिसऱ्या दालनांत वामनमूर्ती कुबड्यांनीं त्याचा सत्कार करावा, चौथ्या दालनांत भाला धारण करणारे द्वारपाळ, राजाचे आप्तेष्ट आणि मंत्री यांनीं त्याला भेटावें असा नेहमींचा क्रम सांगितला आहे. राजानें जे शरीरसंरक्षक नेमावयाचे ते राजनिष्ठ पिढीजात नोकरांपैकीं आणि अत्यंत नजीकच्या नातेवाईकांपैकीं असून चांगले सुशिक्षित व राजकार्यधुरंधर असे असावेत. अंतःपुरसंरक्षक नेमावयाचे ते देखील असेच पाहून नेमावे.

पाकशाळेची जागा चांगली प्रशस्त असून तिच्याभोंवतीं नेहमीं पहारा असावा. आचाऱ्यांवरील अधिकाऱ्यानें आपल्या देखरेखीखालीं राजाकरितां नित्य नवीनवीं रुचकर पक्वान्नें तयार करवावीं आणि राजानें तीं खाण्यापूर्वीं त्यांचा थोडथोडा अंश प्रथम अग्नीला आणि नंतर पक्षांना अर्पण करावा. अन्न जर विषयुक्त असेल तर अग्नींतून कोणत्या अन्नाच्या कशा ज्वाला निघतील आणि असें अन्न खाणाऱ्या पक्षावर त्याचे कसकसे परिणाम होतील याचें विस्तृत विवेचन देऊन व विषप्रयोग करणारा मनुष्य त्याच्या आचरणावरून कसा ओळखावा हें सांगून, विषपरीक्षक आणि विषावर औषधोपचार करणारे वैद्य राजाजवळ नेहमीं असावेत असें कौटिल्यानें आग्रहपूर्वक सुचविलें आहे. अन्नांतील विषाची परीक्षा करण्याकरितां खाण्यापूर्वीं तें अग्नीला आणि पक्ष्यांना अर्पण करण्याचा जो प्रकार वर सांगितला तोच आमच्या वैश्वदेवाच्या आणि काकबलीच्या मुळाशीं असावा असें समजण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

औषध, मद्य किंवा दुसरें कसलेंहि पेय राजाला द्यावयाचें म्हणजे त्याची शुद्धता नुसती प्रयोगशाळेंत ठरूनच भागत नाहीं '**पाचकपोषकाभ्यामात्मना च प्रतिस्वाद्य राज्ञे प्रयच्छेत्**' ज्यानें तें तयार केलें व ज्यानें तें राजाच्या

संग्रहालयाला पुरविलें त्यांच्यासह वैद्यानें तें खाऊन पाहिलें पाहिजे. कित्येक राजघराण्यांत अजूनहि ही पद्धति चालू असल्याचें समजतें.

राजाला जीं वस्त्रें द्यावयाचीं तीं अन्तःपुरांतर्गतवस्त्रागारावरील अधिकाऱ्यानें त्यांवर स्वतःची मुद्रा करून, सुस्नात आणि परीटघडीचे कपडे घातलेल्या नोकरांच्या हस्तें दिलीं पाहिजेत.

' स्नापकसंवाहकास्तरकरजकमालाकारकर्म दास्यः कुर्युः '

राजाला सुगंधपूर्ण उटणीं लावून त्याचें अंग रगडणें, त्याला स्नान घालणें, त्याचा बिछाना पसरणें, त्याचे कपडे धुणें आणि त्याच्याकरितां हार तयार करणें हीं कामें दासींनीं करावीं असें जरी होतें तरी ह्या प्रत्येक कामावर एक स्वतंत्र अधिकारी असे. त्यानें राजाला स्नानाकरितां दिलेलें पाणी सुद्धां प्रथम राजासमक्ष स्वतः स्पर्शून नंतर राजाला द्यावें; असा कौटिल्याचा कटाक्ष असून दुसऱ्याकडून भेट ह्मणून आलेल्या पदार्थांचीहि परीक्षा अशाच प्रकारें झाली पाहिजे असें त्याचें ह्मणणें आहे.

मौलपुरुषाधिष्ठितं यानवाहनमारोहेत्

ज्या रथावर किंवा हत्ती घोडे वगैरे वहानांवर राजाच्या विश्वासांतले नोकर बसून येतील त्यावरच राजानें बसावें. ज्या नौकेवर विश्वासु नावाडी असतील, जी पूर्वीं केव्हांहि वादळानें वगैरे बुडालेली नसेल आणि संरक्षणाकरितां जिच्याजवळ दुसरी नौका असेल, तीमध्येंच राजानें बसावें व नौकानयनप्रसंगीं तीरावर आपले सैनिक जय्यत उभे करावे, इतकेंच नाहीं तर ज्या पाण्यांत मोठमोठे मासे अथवा सुसरी नसतील त्याच पाण्यांत नौका चालवावी. धावत्या जनावरावर अचूक नेम मारण्याचा सराव होण्याकरितां शिकारीला जाणें जरी भाग असलें तरी पारधी लोकांकडून ज्या अरण्यांत दरोडेखोर, शत्रु आणि सर्प वगैरे विषारी प्राणी नाहींत अशी हमी मिळेल, त्याच अरण्यांत शिकारीला जावें. साधु आणि तपस्वी लोकांचें दर्शन घेणें जरी अवश्य असलें तरी बरोबर हत्यारबंद विश्वासु संरक्षक घेतल्यावांचून त्या भानगडींत पडूं नये. आपले मंत्री बरोबर घेतल्यावांचून परराष्ट्रीय वकीलाची भेट घेऊं नये. स्वतःच्या सैन्याची कवायत पहाणें झालें तरी स्वतः लष्करी पोषाक करून आणि रथ, हत्ती अथवा अश्व यावर आरूढ होऊन मगच पहावी. राजधानीच्या बाहेर जातेवेळीं आणि राज-

धानींत प्रवेश करतेवेळीं, रस्त्याच्या दुतर्फा लष्करी लोक उभे करावे तसेंच कोणाहि सशस्त्र माणसास, संन्याशास आणि शरीरव्यंग असलेल्यास रस्त्यावर रहाण्याची बंदी करण्यांत यावी. उत्सव, यात्रा, मिरवणुकी वगैरे पहावयास जावयाचें असल्यास राजानें प्रथम दशवर्गिक नगररक्षकांकडून तेथला योग्य बंदोबस्त करवावा आणि मग जावें.

ह्या प्रकरणाच्या आरंभीं, राजाची दिनचर्या कशी असावी हें सांगून, त्यानें नेहमीं निरलसपणेंच केवळ नव्हे, तर अत्यंत उत्साहानें, राजाच्या नात्यानें आपलें जबाबदारीचें कर्तव्य पार पाडलें पाहिजे. केव्हांहि अनियमितपणा आणि आळस करूं नये. ह्या दुर्गुणांमुळें राजाला प्रसंगीं राज्य गमावण्याचाहि प्रसंग आल्यावांचून रहात नाहीं असा अत्यंत मुत्सद्दीपणाचा आणि कळकळीचा चाणक्यानें केलेला उपदेश अर्थशास्त्रावरून बहुतेक जशाचा तसाच उद्धृत केला आहे. प्रकरणाच्या ह्या पुढील भागांत, राजानें आत्मसंरक्षणाकरितां ज्या तजविजी करावयाच्या त्याचेंच वर्णन आलें आहे; त्यांत आरंभीं अंतःपुरादि खाजगी इमारती कशा असाव्या याचें जें वर्णन आलें आहे तें वाचलें आणि सध्यां दौलताबादच्या किल्ल्यासारखे जे किल्ले बऱ्याच सुस्थितींत आहेत ते पाहिले म्हणजे हें वास्तुशास्त्र आम्हीं कोणापासून केव्हांहि उसनें घेतलेलें आहे; असें म्हणणें वस्तुस्थितीला धरून नाहीं; असें स्पष्ट म्हणावें लागतें. प्रत्येक किल्ल्यावरच काय पण शनवार वाड्यासारख्या भरवसतींत असलेल्या पेशव्यांच्या वाड्यांत, आजच्या निःशेष स्थितींत सुद्धां, कित्येक तळघरें, भुयारें आणि चोरवाटा असल्याच्या खुणा स्पष्टपणें दिसून येतात.

ह्या प्रकरणांत घराला फक्त आगीची आणि विषारी जनावरांची पीडा होऊं नये म्हणून कांहीं उपाय सुचविण्यांत आले आहेत. ह्यापेक्षां अत्यंत उपयुक्त आणि महत्त्वाचे शेंकडों उपाय आणि साधनें कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या ह्यापुढील भागांतून येणार आहेत. तीं समजण्याला मोठी अडचण पारिभाषिक शब्दांची आहे. पंडित शामशास्त्री यांनीं जरी ह्या ग्रंथाचें समग्र भाषांतर इंग्रजीमध्यें प्रसिद्ध केलें आहे तरी ते म्हणतातः—

"As regards my translation, I am conscious of the fact that it is far from being perfect. Beset as the work is with difficulties, it would be sheer presump-

tion on my part to hope that my translation presents a correct interpretation of the text in all cases."

"माझें भाषांतर अपूर्ण असल्याची मला पूर्ण जाणीव आहे. मूळ ग्रंथांत दुर्बोध ठिकाणें पुष्कळच असल्यामुळें त्याचा बरोबर अर्थ भाषांतरांत उतरला आहे असें समजणें म्हणजे उगाच नसती प्रौढी मिरवण्यासारखेंच आहे."

ह्या प्रदीपाच्या सहाय्यानें आह्मीं आपल्या वाचकांना कौटिल्याच्या मूळ अर्थशास्त्राचा केवळ परिचय करून देणार. ज्यांना शक्य असेल त्यांनीं मूळ ग्रंथच वाचावा अशी आमची आमच्या वाचकवर्गास आग्रहाची विनंति आहे. वाचकवर्गापैकीं ज्यांची शास्त्रीय संशोधनाकडे प्रवृत्ति असेल, त्यांना तर कौटिल्यानें यापुढें सांगितलेल्या उपरिनिर्दिष्ट उपायांत आणि साधनांत संशोधनालायक असे महत्त्वाचे अनेक विषय आढळून येतील. ग्रंथ जुना आणि कांहीं विचारबाह्य गोष्टींनीं सजविलेला असला तरी तेवढ्यावरच त्यांनीं तो अंगाबाहेर टाकून त्याची सर्वथैव हेळसांड करूं नये अशी आमची आमच्या वाचकांस विनंति आहे.

ह्यापुढें आत्मसंरक्षणार्थ राजानें काय काय तजविजी कराव्यात याचें विस्तृत वर्णन केलें आहे. त्यावरून सुमारें पंचवीसशें वर्षांपूर्वी राजावर प्रत्यक्ष त्याच्या विवाहित पत्नीकडून, पुत्राकडून, आणि बंधूकडून कशीं प्राणघातक संकटें आणण्यांत येत असत याची कल्पना येऊन 'गेला तो काळ फार चांगला. त्या वेळची नीति काय, तेव्हांचें पातिव्रत्य काय, त्यावेळचे राजे काय, तेव्हांचें पुत्रप्रेम काय, अहो त्यावेळचें सारेंच उत्तम ! हल्लींचें कलियुग यांत सर्वच बिघडलें' असें अगदीं मनापासून ह्मणत हळहळत बसणाऱ्या लोकांची कींव आल्यावांचून रहात नाहीं.

अर्थशास्त्रासारखे प्राचीन ग्रंथ वाचले ह्मणजे आमचें राष्ट्र पहिल्यापासून अध्यात्मवादी असें समजणारांना त्यांची चूक जशी कळून येते तशीच 'प्राचीन काळीं हिंदुस्थानाची प्रगति जर कशांत झाली असेल तर ती फक्त अध्यात्म शास्त्रांत ! भौतिक शास्त्रांचें ज्ञान हिंदू लोकांना मुळींच नव्हतें; फार तर काय, भौतिक शास्त्र आकाशांतील बापानें फक्त आम्हां पाश्चिमात्याकरितांच निर्माण केलें आहे; पौरस्त्य लोकांना त्याचें ज्ञान कधीं झालें नाहीं आणि यापुढेंहि तें केव्हां होणार नाहीं.' असें म्हणणारांचीहि घमेंड जागच्याजागीं जिरून जातें.

धानींत प्रवेश करतेवेळीं, रस्त्याच्या दुतर्फा लष्करी लोक उभे करावे तसेंच कोणाहि सशस्त्र माणसास, संन्याशास आणि शरीरव्यंग असलेल्यास रस्त्यावर रहाण्याची बंदी करण्यांत यावी. उत्सव, यात्रा, मिरवणुकी वगैरे पहावयास जावयाचें असल्यास राजानें प्रथम दशवर्गिक नगररक्षकांकडून तेथला योग्य बंदोबस्त करवावा आणि मग जावें.

ह्या प्रकरणाच्या आरंभीं, राजाची दिनचर्या कशी असावी हें सांगून, त्यानें नेहमीं निरलसपणेंच केवळ नव्हे, तर अत्यंत उत्साहानें, राजाच्या नात्यानें आपलें जबाबदारीचें कर्तव्य पार पाडलें पाहिजे. केव्हांहि अनियमितपणा आणि आळस करूं नये. ह्या दुर्गुणांमुळें राजाला प्रसंगीं राज्य गमावण्याचाहि प्रसंग आल्यावांचून रहात नाहीं असा अत्यंत मुत्सद्दीपणाचा आणि कळकळीचा चाणक्यानें केलेला उपदेश अर्थशास्त्रावरून बहुतेक जशाचा तसाच उद्धृत केला आहे. प्रकरणाच्या ह्या पुढील भागांत, राजानें आत्मसंरक्षणाकरितां ज्या तजविजी करावयाच्या त्याचेंच वर्णन आलें आहे; त्यांत आरंभीं अंतःपुरादि खाजगी इमारती कशा असाव्या याचें जें वर्णन आलें आहे तें वाचलें आणि सध्यां दौलताबादच्या किल्ल्यासारखे जे किल्ले बऱ्याच सुस्थितींत आहेत ते पाहिले म्हणजे हें वास्तुशास्त्र आह्मीं कोणापासून केव्हांहि उसनें घेतलेलें आहे; असें ह्मणणें वस्तुस्थितीला धरून नाहीं; असें स्पष्ट म्हणावें लागतें. प्रत्येक किल्ल्यावरच काय पण शनवार वाड्यासारख्या भरवसतींत असलेल्या पेशव्यांच्या वाड्यांत, आजच्या निःशेष स्थितींत सुद्धां, कित्येक तळघरें, भुयारें आणि चोरवाटा असल्याच्या खुणा स्पष्टपणें दिसून येतात.

ह्या प्रकरणांत घराला फक्त आगीची आणि विषारी जनावरांची पीडा होऊं नये म्हणून कांहीं उपाय सुचविण्यांत आले आहेत. ह्यापेक्षां अत्यंत उपयुक्त आणि महत्त्वाचे शेंकडों उपाय आणि साधनें कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या ह्यापुढील भागांतून येणार आहेत. तीं समजण्याला मोठी अडचण पारिभाषिक शब्दांची आहे. पंडित शामशास्त्री यांनीं जरी ह्या ग्रंथाचें समग्र भाषांतर इंग्रजीमध्यें प्रसिद्ध केलें आहे तरी ते म्हणतातः—

"As regards my translation, I am conscious of the fact that it is far from being perfect. Beset as the work is with difficulties, it would be sheer presump-

tion on my part to hope that my translation presents a correct interpretation of the text in all cases."

" माझें भाषांतर अपूर्ण असल्याची मला पूर्ण जाणीव आहे. मूळ ग्रंथांत दुर्बोध ठिकाणें पुष्कळच असल्यामुळें त्याचा बरोबर अर्थ भाषांतरांत उतरला आहे असें समजणें म्हणजे उगाच नसती प्रौढी मिरवण्यासारखेंच आहे."

ह्या प्रदीपाच्या सहाय्यानें आह्मीं आपल्या वाचकांना कौटिल्याच्या मूळ अर्थशास्त्राचा केवळ परिचय करून देणार. ज्यांना शक्य असेल त्यांनीं मूळ ग्रंथच वाचावा अशी आमची आमच्या वाचकवर्गास आग्रहाची विनंति आहे. वाचकवर्गापैकीं ज्यांची शास्त्रीय संशोधनाकडे प्रवृत्ति असेल, त्यांना तर कौटिल्यानें यापुढें सांगितलेल्या उपरिनिर्दिष्ट उपायांत आणि साधनांत संशोधनालायक असे महत्त्वाचे अनेक विषय आढळून येतील. ग्रंथ जुना आणि कांहीं विचारबाह्य गोष्टींनीं सजविलेला असला तरी तेवढ्यावरच त्यांनीं तो अंगाबाहेर टाकून त्याची सर्वथैव हेळसांड करूं नये अशी आमची आमच्या वाचकांस विनंति आहे.

ह्यापुढें आत्मसंरक्षणार्थ राजानें काय काय तजविजी कराव्यात याचें विस्तृत वर्णन केलें आहे. त्यावरून सुमारें पंचवीसशें वर्षांपूर्वीं राजावर प्रत्यक्ष त्याच्या विवाहित पत्नीकडून, पुत्राकडून, आणि बंधूकडून कशीं प्राणघातक संकटें आणण्यांत येत असत याची कल्पना येऊन 'गेला तो काळ फार चांगला. त्या वेळची नीति काय, तेव्हांचें पातिव्रत्य काय, त्यावेळचे राजे काय, तेव्हांचें पुत्रप्रेम काय, अहो त्यावेळचें सारेंच उत्तम ! हल्लींचें कलियुग यांत सर्वच बिघडलें' असें अगदीं मनापासून ह्मणत हळहळत बसणाऱ्या लोकांची कींव आल्यावांचून रहांत नाहीं.

अर्थशास्त्रासारखे प्राचीन ग्रंथ वाचले ह्मणजे आमचें राष्ट्र पहिल्यापासून अध्यात्मवादी असें समजणारांना त्यांची चूक जशी कळून येते तशीच 'प्राचीन काळीं हिंदुस्थानाची प्रगति जर कशांत झाली असेल तर ती फक्त अध्यात्म शास्त्रांत ! भौतिक शास्त्रांचें ज्ञान हिंदू लोकांना मुळींच नव्हतें; फार तर काय, भौतिक शास्त्र आकाशांतील बापानें फक्त आम्हां पाश्चिमात्याकरितांच निर्माण केलें आहे; पौरस्त्य लोकांना त्याचें ज्ञान कधीं झालें नाहीं आणि यापुढेंहि तें केव्हां होणार नाहीं.' असें म्हणणारांचीहि घमेंड जागच्याजागीं जिरून जातें.

हिंदुस्थानांत आत्मज्ञान, ब्रह्मज्ञान किंवा अध्यात्मविद्या संशोधनाच्या कमाल कोटीपर्यंत जाऊन पोंचली होती. त्या वेळच्या आमच्या आत्मज्ञानाच्या पलीकडे आजच्या सुधारलेल्या जगाला रेंसभर सुद्धां जातां आलें नाहीं ही गोष्ट अगदीं खरी आहे. उपनिषत्कालीं ह्या आर्यावर्तातील पुरुषच काय पण स्त्रियासुद्धां अध्यात्मज्ञानाच्या पराकाष्ठेला जाऊन पोंचल्या होत्या, याची साक्ष पटविणारे ग्रंथ जसे आज सर्व जगापुढें मूर्तरूपानें उभे आहेत, तसेंच भौतिक ज्ञानामध्येंहि हिंदुस्थानांतील आर्य तत्कालिन सर्व जगाच्यापुढें होते असें सिद्ध करून देणारे वैद्यक, ज्योतिष, गणित, रसायन, भूगर्भ, शिल्प, समाज आणि राजनीति ह्या शास्त्रांवरील ग्रंथहि जगाची खात्री पटविण्यास तयार आहेत. सारांश हिंदुस्थानांत असा एक काळ होऊन गेला कीं, त्या वेळीं जगांतला कोणताहि देश त्याच्या अध्यात्मिकच काय पण भौतिक ज्ञानाचीहि बरोबरी करण्यास समर्थ नव्हता. त्यावेळचे हिंदवासी कांहीं अध्यात्मज्ञानांत पारंगत होते तर कांहीं भौतिक ज्ञानांत नवे नवे शोध लावून जगाच्या ऐहिक सुखांत भर घालीत होते. पण जगांत कोणतीहि परिस्थिति मनुष्यप्राण्याच्या स्वाभाविक चंचल प्रवृत्तीमुळें अबाधितपणें टिकाव धरूं शकत नाहीं आणि हिंदुस्थान देश इतर देशांप्रमाणेंच ह्या सत्य नियमाला कांहीं अपवादक नाहीं. त्याचें लक्ष्य अध्यात्मावरून उडत चाललें आणि भौतिक शास्त्रांत होणाऱ्या त्याच्या प्रगतीची वाढ खुंटली. ऐहिक संपत्तीकरितां मात्र हिंदुजन आपसांत भांडूं लागले आणि द्रव्याच्या व अधिकाराच्या लालसेनें बाटतील तीं अनाचाराचीं कृत्यें, धर्माधर्म, नीति, अनीति, प्रेम, सदसद्विचार ह्या सर्वांना दूर झुगारून देऊन उजळ माथ्यानें करण्यास निर्लज्जपणें प्रवृत्त झाले. कौटिल्यानें आपल्या ग्रंथांत दिलेलीं भद्रसेनादि राजांच्या खुनाचीं उदाहरणें याच काळांतील असलीं पाहिजेत. अशी स्थिति ज्या देशांत प्राप्त झाली, जेथें विवाहित पत्नी आपल्या पतीचा, एक भाऊ दुसऱ्या भावाचा, पुत्र आपल्या जनकाचा केवळ अधिकारलालसेनें भरल्या घरांत खून करण्याला प्रवृत्त झाले, तेथें सामान्य लोकांच्या मालमत्तेची आणि जीविताची सुरक्षितता कोठून असणार ? अशा स्थितींत महावीर आणि बुद्ध यांचा उपदेश जगापुढें आला; अर्थातच तो त्यानें मोठ्या तत्परतेनें स्वीकारला यांत कांहीं आश्चर्य नाहीं. असले तात्विक उपदेश तात्पुरते परिणामकारक होतात. ते केव्हांहि फार वेळ टिकून रहात नाहींत. मनुष्याची

राक्षसी वृत्ति असल्या उपदेशांना तेव्हांच थाब्यावर बसविते आणि पुनः आपले फाल्गुनी खेळ जगाच्या रंगभूमीवर निर्धास्तपणें खेळूं लागते. असें झालें आणि म्हणूनच ह्या खेळांना आळा घालण्याकरितां कठोर मन करून कौटिल्याला आपलें अर्थशास्त्र चंद्रगुप्त मौर्याच्या निमित्तानें जगाला उपदेशावें लागलें.

प्रकरण तिसरें.

राजानें आपल्या स्वतःकरितां आणि कुटुंबांतील मंडळीकरितां राजमहाल, अंतःपुरादि मंदिरें कशीं बांधावीं याचा विचार मागील प्रकरणांत केला आहे. ह्या प्रकरणांत किल्ल्यांसंबंधानें कौटिल्याचें ह्मणणें काय आहे तें आपण प्रथम पाहूं. हल्लीं आपण डोंगरी किल्ला, भुयकोट आणि जंजिरा किंवा जलदुर्ग असे तीनच प्रकारचे किल्ले समजतों व ऐतिहासिक काळांतील त्यांचीं अवशिष्टें प्रत्यक्ष पाहतों. प्राचीन काळीं किल्ल्यांचे आणखीहि पुष्कळ प्रकार होते. राष्ट्राच्या संरक्षणार्थ राज्याच्या सीमेवर चार दिशेस चार किल्ले बांधीत त्यांना ' **दुर्ग** ' अशी संज्ञा होती. पाण्यांमध्यें जरूरीच्या ठिकाणीं एखादें बेट अथवा खडक पाहून त्यावर जे किल्ले बांधीत त्यांना ' **औदक** ' असें ह्मणत. हल्लींच्या डोंगरी किल्ल्यांना ' **पार्वत** ' असें नांव होतें. हल्लींचे भुइकोट ' **धान्वन** ' ह्या नांवानें ओळखले जात. खाडी काठच्या अथवा समुद्र काठच्या चिखलाच्या जागेस आपण खांजण असें म्हणतों. हा कौटिल्याच्या **खजन** शब्दाचा अपभ्रंश असावा. अशा जागीं किंवा ओसाड अरण्यांत जे किल्ले बांधीत ते ' **वनदुर्ग** ' म्हणून समजले जात. ह्यांपैकीं औदक आणि पार्वत यांचा उपयोग लोकवसतीच्या संरक्षणार्थ होत असे आणि धान्वन व वनदुर्ग हे अवश्यकतेप्रमाणें तात्पुरत्या राहाण्याच्या कामीं उपयोगी पडत.

गेल्या प्रकरणांत सांगितलेल्या महालांतून कुटुंबासुद्धां पळून जाण्याचा प्रसंग आल्यास रहाण्याच्या सोयीसाठीं राज्याच्या मध्यभागीं वास्तुशास्त्रसंमत अशी एखादी जागा पाहून तेथें एक **समुदयस्थान** बांधावें. हें ठिकाण नद्यांच्या संगमावर अथवा जिवंत पाण्याच्या किंवा साध्या तलावाच्या काठीं असावें. त्याचा आकार वर्तुल, चौकोनी अथवा दीर्घचतुष्कोणी असावा. सभोंवती तटबंदी असून तटाच्या

बाहेर खंदक असावा आणि त्या खंदकांत पाटानें पाणी आणून सोडावें. बाहेर पडण्याला पाण्यांतून आणि जमीनीवरून असे दोनहि प्रकारचे मार्ग बांधावे-ह्या खंदकाच्या आंत चार दण्ड म्हणजे २४ फूट अंतरावर उपरोक्त तटबंदी असावी. तटबंदीची उंची ३६ फूट आणि रुंदी याच्या दुप्पट म्हणजे ७२ फूट. ती खालीं चौकोनी आणि मध्यें अंडाकृति असून तिचें बांधकाम हत्तींकडून आणि बैलांकडून तुडवून शक्य तितकें मजबूत करावें आणि तिच्यावर कांटेरी आणि विषारी वनस्पती लावाव्या. उपरोक्त खंदकाबाहेर चोवीस चोवीस फुटांच्या अंतरावर आणखी दोन खंदक असावे. पहिल्याची रुंदी ५६ फूट, दुसऱ्याची ४८ आणि अगदीं बाहेरच्या तिसऱ्या खंदकाची चाळीस फूट असून खोली याच्या पाऊण पट अथवा कमी म्हणजे निम्यानें करावी. सर्व खंदकांचें बांधकाम दगडांचें अथवा विटांचें करून त्यांतील पाण्यांत सुसरी सोडाव्या व कमळें लावावीं. कमळाचे देठ पाण्यांत पसरले म्हणजे त्या पाण्यांतून पोहून अथवा नौकेंतून जाणें अशक्य होईल.

ह्या समुदायस्थानाला रस्ते कसे असावेत, ते कशाचे करावेत, तटावर चढण्या करितां शिड्या कशा कराव्यात, तटाच्या संरक्षणाकरितां काय योजना करावी, '**प्रयावितिका**' म्हणजे प्रसंग पडल्यास निसटून जाण्याचा मार्ग समुदायस्थानाच्या कोणत्या भागांत असावा तसेंच त्या मार्गाकडे जाण्याचीं '**निष्कुरद्वार**' ह्मणजे चोर दरवाजा कसा बांधावा, हत्यारें ठेवण्याच्या गुप्त जागा कशा तयार कराव्या इत्यादिसंबंधानें अत्यंत सूक्ष्म माहिती कौटिल्यानें आपल्या ह्या ग्रंथांत दिली आहे.

राज्याच्या सरहद्दीवरील किल्ल्यांत शत्रूची टेहळणी करण्याकरितां अथवा शत्रू चालून आल्यास त्याला पहिला प्रतिकार करण्याकरितां जें सैन्य ठेविलेलें असे त्याला '**अंत पालक**' असें म्हणत. राज्याचा मध्य संरक्षण करणें हें, वागुरिक, शबर म्हणजे तिरंदाज, पुलिंद म्हणजे पटाईत शिकारी, चाण्डाळ आणि अरण्यचर म्हणजे रानटी लोक यांच्या सैन्याचें काम होतें.

राजधानीच्या शहराची बाह्य रचना-म्हणजे त्याच्या भोंवतालचा कोट, खंदक वगैरे-समुदायस्थानाप्रमाणेंच करावी; मात्र ह्या तटबंदीला बारा मोठमोठाले दरवाजे आणि शहरांतून बाहेर पडण्यास कांहीं गुप्त मार्ग ठेवावे. 'शहराला पूर्वपश्चिम तीन आणि दक्षिणोत्तर तीन, असे एकंदर सहा प्रशस्त राजमार्ग आणि

वेगवेगळाल्या ठिकाणीं जाण्यास इतर वेगळे वेगळे मार्ग तयार करावे. रस्त्याची रुंदी २४ पासून ४८ फूटपर्यंत ठेवावी. शहराच्या उत्तर भागांत मध्यवसतींत पूर्वाभिमुख अथवा उत्तराभिमुख राजवाडा बांधावा. त्याची रचना सामान्यतः मागील प्रकरणांत अन्तःपुरादि इमारतींची जी रचना सांगितली आहे तिच्या प्रमाणेंच असावी. एकंदर शहराच्या नवव्या हिश्शाइतकी जागा राजवाड्याकडे राखून ठेवावी. नगराच्या कोणत्या भागांत कोणाची वसति असावी हें सांगतांना पाकशाला, पीलखाना (हस्तिशाला) कोष्ठागार (Store house) ह्या इमारती अग्नेयेस; सुगंधी, माळी, धान्याचा आणि पातळ पदार्थांचा (रस) व्यापार करणारे आणि कुशल कारागीर यांचीं दुकानें व क्षत्रियांचीं घरें पूर्वेस; शिलेखाना अथवा आयुधागार नैर्ऋत्येस; दक्षिणेकडे ज्यांची वसति असावी म्हणून सांगितलें आहे त्यांत '**पक्वान्नसुरामांसपण्या**' नाना प्रकारचीं शिजवलेलीं अन्नें दारू आणि मांस यांच्या दुकानदारांचा आणि '**रूपाजीवा-स्तालापचाराः**' म्हणजे वेश्या आणि गायन वादनपटुबरोबरच '**वैश्याश्च**' असें म्हणून वैश्यवर्गाचाहि अंतर्भाव केला आहे. तबेल्यासंबंधाच्या वर्णनांत गाढवांचे तबेले आहेत ही गोष्टहि ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. वायव्येकडे '**भैषज्यगृह**' दवाखाने, उत्तरेकडे ब्राह्मणांबरोबरच लोहार आणि पच्चीकाम करणारे यांचीं घरें असावीं असें सांगून शहराच्या निरनिराळ्या कोंपऱ्यांमध्यें '**श्रेणी प्रवहणो निकाया आवसेयुः**' निरनिराळ्या धंदेवाल्यांचे संघ आणि समिती यांचीं स्थानें असावीं असें सांगितलें आहे. यावरून उपहारगृहें, दारूचे गुत्ते, वेश्यांच्या बावनखण्या, दवाखाने आणि कामगारांचे संघ ह्या बऱ्यावाईट संस्था इंग्रजी राज्याबरोबर इकडे आल्या असें समजणें उघड उघड चुकीचें ठरतें.

शहराच्या मध्यभागीं ज्या देवांचीं मंदिरें बांधावीं ह्मणून सांगितलें आहे, त्यांत शिवावाचून दुसरा पौराणिक देव नाहीं आणि विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, याच ठिकाणीं, '**श्री मदिरागृहं च पुरमध्ये कारयेत्**' ह्मणजे शहराच्या मध्यभागीं, **श्री मदिरा** देवीचें मंदिर ह्मणजे **दारूचा प्रसिद्ध पिठा** असावा असें सांगितलें आहे. यावरून दोन हजार वर्षांपूर्वी आमच्या आर्यावर्तांत ह्या मदिरादेवीचें महात्म्य मोठेंच होतें असें दिसतें.

श्रेष्ठ वर्णीयांची दहनभूमि शहराच्या दक्षिणेस आणि इतर वर्णीयांची उत्तरेस अथवा पूर्वेस असावी असा नियम होता. हा नियम मोडणारांस दण्ड करण्यांत

येत असे. नास्तिक आणि चांडाळ यांनीं ह्या स्मशानभूमीच्या पलीकडे रहावें. प्रत्येक दहा घरांकरितां एक सार्वजनिक विहीर बांधलेली असे.

न च बाहिरिकान्कुर्यात्पुरराष्ट्रोपघातकान्
क्षिपेज्जनपदे चैतान् सर्वान्वा दापयेत्करान्

परकीय राज्यांतील लोक राष्ट्रघातक असतात म्हणून त्यांना राजधानींत रहाण्याची सक्त मनाई करावी. इतर गांवांत रहाण्याला त्यांना बंदी नसावी, पण त्यांजवर जबरदस्त कर बसवावा. दक्षिण आफ्रिका, केनिया, कानडा वगैरे प्रदेशांतले लोक आज हें कौटिल्याचें शासन अमलांत आणीत असावे आणि आम्हांला त्याचा शेंकडों वर्षांपूर्वींच विसर पडला असावा असें दिसतें.

चंद्रगुप्तानें नंदवंशाचा समूळ उच्छेद करून मगधदेशाचें राज्य घेतलें आणि त्या देशाची राजधानी जें पाटलीपुत्र (हल्लींचें पाटणा आणि बँकीपुर) तेंच आपल्या विस्तीर्ण राज्याच्या राजधानीचें शहर केलें. सिरीयाचा राजा सेल्युकस याचा हिंदुस्थान जिंकण्याचा प्रयत्न फुकट जाऊन, त्याला मुठींत नाक धरून चंद्रगुप्ताशीं इ. स. पूर्वीं ३०३ वर्षीं तह करावा लागला आणि आपला गाशा गुंडाळून आल्यावाटेनें स्वदेशीं परत जावें लागलें. **मेगास्थिनीस** नांवाचा त्याचा वकील चंद्रगुप्ताच्या अंतकाळापर्यंत (स. पू. २९७) हिंदुस्थानांत होता. त्यानें आपल्या त्रोटक इतिहासांत पाटलीपुत्र राजधानीचें वर्णन खालीं दिल्याप्रमाणें लिहिलें आहे.

“ पाटलीपुत्रनगर गंगा आणि शोण **नद्यांच्या संगमावर** वसविलेलें असून त्याची लांबी नऊ मैल आणि रुंदी दीड मैल होती. त्याच्या भोंवतीं **मजबूत तटबंदी** असून तटाला ६४ दरवाजे आणि ५७० बुरूज होते. **तटाभोंवतीं रुंद आणि खोल** असा **खंदक** असून त्यांत **शोणनदाचें पाणी** आणून सोडिलें होतें. राजवाडा जरी मुख्यत्वेंकरून लांकडांचाच बांधलेला होता तरी तो **सूसा** वगैरे ठिकाणच्या तत्कालीन राजवाड्यांपेक्षां फारच उत्कृष्ट होता. त्याच्या खांबांवर सोनेरी मुलामा असून त्यावर सुवर्णाच्या द्राक्षवेली आणि चांदीचे पक्षी कोरलेले होते. ह्या राजमंदिराच्या भव्य प्राङ्गणांत एक विस्तीर्ण बगीचा असून त्यांत कित्येक कारंजीं आणि पुष्करणी बांधलेल्या होत्या व त्यांत नानातऱ्हेचे मासे सोडिलेले होते. ”

ह्यापुढें मेगॉस्थिनीसनें तेथल्या अचाट संपत्तीचें वर्णन दिलें आहे. हिंदुस्थान देश आज संपन्न झाला आहे कीं दरिद्री झाला आहे ? असा जो कित्येकांस प्रश्न पडतो तो तें वर्णन वाचून तावडतोब सुटेल असें आम्हांला वाटतें. हें वर्णन जरी अत्यंत हृदयंगम आहे तरी विस्तारभयास्तव तें येथें देतां येत नाहीं. ज्यांना इंग्रजी येत असेल त्यांनीं मूळांत अथवा व्हिन्सेंट स्मिथच्या इतिहासांतच तें वाचावें. मराठी वाचकांस त्याचा थोडा मासला रा. मनोहर विष्णु काथवटे यांच्या ' भरतखंडाचा प्राचीन इतिहास ' ह्या पुस्तकांत पहावयास मिळेल. मेगास्थिनीसचा जो उतारा आह्मीं वर दिला आहे त्यावरून पाटलीपुत्राची प्रत्यक्ष रचना आणि कौटिल्यानें सांगितलेली राजधानीची रचना यामधील साम्य वाचकांच्या लक्ष्यांत आल्यावांचून रहाणार नाहीं.

राजधानींत उत्तम व्यवस्था असली, तिची रचना पद्धतशीर असली ह्मणजे झालें, इतर शहरांचें आणि खेड्यांचें कसें कां असेना असें मानण्याचा तो काळ नव्हता; असें त्यासंबंधानें अर्थशास्त्रांत ज्या सूचना केल्या आहेत त्यांवरून स्पष्ट दिसतें.

पूर्वीचीं खेडीं कांहीं कारणानें मोडलीं असतील तर त्यांचें जागीं किंवा गांवठणाला योग्य अशा नव्या जागा ठरवून तेथें, राज्यांतील दाट वसतीच्या ठिकाणचें अथवा '**परदेशापवाहनेन**' परकी राज्यांतील लोक आणून नव्या खेड्यांची वसाहत करावी. खेड्याचा शीव एक किंवा दोन क्रोश (१ क्रोश–२२५० यार्ड) विस्ताराची असून विस्ताराप्रमाणें त्यांत शंभरपासून पांचशें पर्यंत कुटुंबें रहावीं. प्रत्येक खेड्याची हद्द कांहीं तरी नैसर्गिक खुणेनें स्पष्ट झालेली असून प्रसंग पडल्यास एक खेडें दुसऱ्या खेड्याच्या संरक्षणार्थ धावून जाईल इतक्याच अंतरावर तीं बसविण्यांत यावीं; दोन खेड्यांमध्यें यापेक्षां अधिक अंतर असूं नये. खेड्यांच्या रक्षणाकारितां दहा खेड्यांकरितां एक, ह्या प्रमाणें जे सरकारी किल्ले बांधण्यांत येत, त्यांना त्यांच्या रक्षणाखालील खेड्यांच्या संख्येप्रमाणें संग्रहण, खार्वाटिक, द्रोणमुख वगैरे निरनिराळीं नांवें असत.

ऋत्विज, आचार्य, पुरोहित आणि वेदज्ञ ब्राह्मण ह्यांस त्यांच्या चरितार्थापुरत्या जमीनी इनाम करून दिलेल्या असत. अध्यक्ष, (देशमुख, देशपांडे) संख्यायक (कुळकर्णी) गोप (पाटील), पशुचिकित्सक, वैद्य, चाबुकस्वार आणि जङ्घारिक (messenger) यांस पांच पासून दहा खेड्यांचें काम

सांगून त्याच्या मोबदल्यांत त्यांस इनाम जमिनी देत; पण त्या जमिनी गहाण अगर खरेदी देण्याचा अधिकार मात्र त्यांस देत नसत. लागवडीस येण्यासारख्या जमिनी त्यांवर कर देण्यास कबूल असेल त्यास एका पिढीपर्यंत देण्यांत येत. अशा माणसाला करद (कर देणारा. यावरूनच जुना कर्दा=कूळ हा मराठी शब्द निघाला असावा) ह्मणत. जे लोक नव्या जमिनी लागवडीस आणून त्यावरील कर भरीत त्यांजकडून जमिनी काढण्यांत येत नसत. जे लोक जमिनीची लागवड करीत नसत त्यांजकडून जमिनी काढून त्या तितकाच कर देण्यास कबूल असतील त्यांस लागवडीला देत; किंवा त्यांची लागवड सरकारमार्फत करीत. वेळच्यावेळीं जमीनमहसूल देणारांस त्यांच्या गरजेप्रमाणें धान्य, गुरें अथवा द्रव्य यांची मदत सरकारांतून देण्यांत येत असे. **तगाई** कांहीं आमच्या देशांत नवीन नाहीं. ही गोष्ट यावरून उघडच झाली.

अल्पकोशो हि राजा पौरजानपदानेव ग्रसते

ज्या राजाचा खजिना क्षीण झाला आहे तो आपल्या नगरांतल्या आणि खेड्यांतल्या, साऱ्याच प्रजेला, खाऊन टाकतो हें जरी खरें, तरी निकडीच्या आपत्प्रसंगीं आणि नवीन वसाहती चालू करण्यासारख्या आनंदाच्या प्रसंगीं **राजे आपल्या प्रजेला कराची सूट देत असत.** शेतीच्या अथवा दुसऱ्या जरूरीच्या कामाकरितां सर्व राज्यांत पाण्याचा पुरवठा सरकारी खर्चानें करण्यांत येत असे. खासगी खर्चानें लोक आपल्या इच्छेप्रमाणें तो करून घेण्यास तयार असल्यास ' **भूमिमार्गवृक्षोपकरणानुग्रहं कुर्यात्** ' त्यांस त्या कामाकरितां जमीन, रस्ता, लांकडे वगैरे लागतील त्या सवलती सरकारांतून देण्यांत येत.

बालवृद्धव्याधितव्यसन्यनाथांश्च राजा बिभृयात्

अनाथ बालकें, वयोवृद्ध, पीडाग्रस्त आणि संकटांत सांपडलेलीं निराधार माणसें यांचें पोषण करण्याची जबाबदारी राजावर होती. हल्लीं ह्या गोष्टी त्याच्या कर्तव्यांत मोडत नाहींत असें दिसतें. निराधार गरोदर स्त्रियांचें आणि त्या प्रसूत झाल्यानंतर त्यांच्या अर्भकांचें संगोपन करणें हें देखील तत्कालिन राजांचें एक कर्तव्य समजण्यांत येत होतें. देवांच्या आणि वयांत न आलेल्या पालकरहित मुलांच्या उत्पन्नाची व्यवस्था पहाण्याचें काम गांवातील वृद्ध माणसांकडे सोंपवलेलें असे. सामर्थ्य असलेला पुरुष जर आपल्या पत्नीचें, मुलाबाळांचें, वृद्ध

मातापितरांचें, लहान बहीणभावंडांचें आणि विधवा कन्येचें पालन पोषण करणार नाहीं तसेंच जो कोणी आपल्या स्त्रीपुत्रादिकांच्या योगक्षेमाची योग्य व्यवस्था न लावितां संन्यास घेईल आणि जो कोणी एखाद्या स्त्रीला संन्यासदीक्षा देईल, त्या सर्वांस गुन्हेगार समजून दंड करण्यांत येत असे.

खेडेगांवातील लोकांचें जीवित सर्वस्वी शेतीवर अवलंबून असतें; सबब त्यांचें लक्ष्य नेहमीं त्यांच्या शेतीच्या धंद्यांत गुंतलेलें असावें ह्मणून खेडेगावांत नाटक तमाशे वगैरेकरितां स्वतंत्र गृहें बांधलेलीं नसत व बाहेरच्या नाटकमंडळ्यांस आणि तमासगिरांस खेड्यांतून फिरण्याची बंदी होती.

दण्डविष्टिकराबाधैः रक्षेदुपहतां कृषिम्
स्तेनव्याळविषग्राहैः व्याधिभिश्च पशुव्रजान्

वाजवीपेक्षां जास्त दंडाच्या रकमा भरावयास लावून, उठल्यासुटल्या वेठीला (विष्टि—ह्या शब्दापासूनच मराठी ‘ वेठ ’ ह्मणजे पोटावारी काम करून घेणें) धरून, नानाप्रकारचे कर द्यावयास भाग पाडून राजानें शेतकरी लोकांना पीडा न करितां त्यांनां ममतेनें वागवावें आणि त्यांच्या शेतीच्या जनावरांचें, चोर, सर्पादि विषारी प्राणी आणि रोग यांपासून संरक्षण करावें.

अकृष्यायां भूमौ पशुभ्यो विवीतानि प्रयच्छेत्

खेड्याच्या शीवेंतील ज्या जमिनी लागवडीस येण्यासारख्या नसतील त्या सरकारांतून गुरचरण ह्मणून राखण्यांत याव्या. हल्लीं देखील प्रत्येक खेड्यांत कांहीं गुंठें जमीन गायरान ह्मणून ठेवतात, पण ती गवत रुजण्यासारखी देखील नसते. खेड्यांत एखादा लहानसा खडक दिसला कीं, नकाशा न पहातांच खुशाल तें गायरान ह्मणून ठोकून द्यावें ! सोमवनस्पतीची लागवड करण्याकरितां व धार्मिक शिक्षण देण्यासाठीं आश्रम वगैरे बांधण्याकरितां कांहीं अरण्यें विद्वान् ब्राह्मणांना देऊन त्यांना त्यांच्या गोत्रांचीं नावें देण्यांत येत. कांहीं अरण्यें राजाला शिकार करण्याकरितां ह्मणून राखून ठेवीत. असल्या अरण्यांतील हिंस्र पशूंचे दांत पाडून पंजेहि कापून टाकीत ! हें मोठें चमत्कारिक दिसतें. कांहीं अरण्यें सार्वजनिक शिकारीकरितां आणि कांहीं केवळ जंगलच्या उत्पन्नाकरितां राखून ठेवण्यांत येत. जंगलांत उत्पन्न होणाऱ्या कच्या मालापासून नानाप्रकारचे जिन्नस तयार करण्याचे कारखाने जंगलाशेजारींच बांधीत. रानांतल्या सर्व वाटा,

त्यांतून बाहेर पडण्याचे सर्व मार्ग, त्यांतील तळीं, ओढे, डबकें वगैरे सर्व माहिती वनाध्यक्ष आणि त्याच्या हाताखालीं काम करणारे वनसंरक्षक यांस असावी लागे. हत्तींची शिकार करण्यास मनाई होती. मरण पावलेल्या हत्तींचे सुळे हजर करणारास सरकारांतून बक्षीस देण्यांत येई. हत्तींचा माग काढण्यांत आणि त्यांना धरण्यांत पटाईत तसेच औषधोपचारांनीं हत्तींचे रोग बरे करण्यांत कुशल असे लोक त्यावेळीं पुष्कळ असत; कारण लढाईंत हत्ती हा अत्यंत उपयोगी आणि अवश्य मानण्यांत येत असे. **चंद्रगुप्ताच्या सैन्यांत नऊ हजार हत्ती होते;** असें मेगस्थिनीसनें लिहून ठेविलें आहे.

कलिङ्गाङ्गगजाः श्रेष्ठाःप्राच्याश्चेति करूशजाः
दशार्णाश्चापरान्ताश्च द्विपानां मध्यमा मताः

कलिङ्ग, अङ्ग आणि करूश ह्या देशांतील आणि पूर्वप्रदेशांतील हत्ती उत्तम, दशार्ण प्रांतांतील आणि सामान्यतः पश्चिमेकडील मध्यम, व सौराष्ट्र आणि पांचजन प्रदेशांतील कमी दर्जाचे, असें जरी मानण्यांत येई तरी '**सर्वेषां कर्मणा वीर्यं जवस्तेजश्च वर्धते**' सर्व जातींचे हत्ती योग्य शिक्षणानें वीर्यवान, तेजस्वी आणि विजयी बनवितां येतात असें कौटिल्याचें मत होतें.

यानंतर कोशगृह, पण्यगृह (market) कोष्ठागार (कोठार हा मराठी शब्द याचाच अपभ्रंश आहे) कुप्यगृह म्हणजे जंगली उत्पन्नाची वखार, आयुधागार आणि बंधनागार (jail) ह्या सरकारी इमारती कशा बांधाव्या याची माहिती आहे. तुरुंगाच्या इमारतींत स्त्रियांकरितां स्वतंत्र खोल्या आणि ह्या प्रत्येक इमारतींत एक मोठा दिवाणखाना (शाला), शौचकूप, विहीर आणि स्नानगृह करावें असें सांगितलें आहे.

कोष्ठागारे वर्षमानमरत्निमुखं कुण्डं स्थापयेत्

धान्याच्या कोठारापुढें एक अरत्नि (२४ अंगुळें) रुंदीच्या तोंडाचें पाऊस मोजण्याकरितां एक कुंड बांधावें असें सांगितलें आहे; यावरून त्यावेळच्या आर्यांची शास्त्रीय ज्ञानांत जी प्रगति झालेली होती तिची आमच्या वाचकांस चांगलीच कल्पना होईल. बाजारांत गिऱ्हाइकांना फसविणाऱ्या व्यापाऱ्यांस, त्यांनीं ज्या भारी किंवा हलक्या मालाच्या बाबतींत फसवेगिरी केली असेल त्याच्या मानानें शिक्षा करण्याचा नियम होता.

सराफानें नाणीं तपासून खजीन्यांत भरणा करावींत आणि '**अशुद्धं छेदयेत्**' जीं खोटीं असतील तीं तेथल्यातेथें कापून नाश करावींत. खोटीं नाणीं चालविण्याचा प्रयत्न करणारास जबर शिक्षा करावी. सरकारी वसूलाच्या पोटीं जें धान्य घ्यावयाचें तें पुऱ्या मापानें हाडपून झडपून आणि नवें असें पाहून घ्यावें. नवें आणि स्वच्छ धान्य न आणणारापासून दुप्पट दंड घ्यावा असा नियम असे. व्यापारी माल, कच्चा जंगली माल आणि हत्यारें यांच्या संबंधांत देखील हाच नियम असे. खजीन्यांत तूट दिसून आल्यास ती जर खजिनदाराच्या अज्ञानामुळें असेल तरच मात्र केवळ ताकिदीवर त्याची सुटका होई. लबाडी आढळून आल्यास त्याला आणि त्याच्या मदतगाराला यथेच्छ शिक्षा ठोठावीत. चोरांना इशारा देण्याच्या हेतूनें एखाद्या पहारेकऱ्यानें त्यांना दटावल्याचें सिद्ध झाल्यास त्या पहारेकऱ्याला जाळून ठार मारीत.

जमाखर्ची खात्याच्या मुख्य अधिकाऱ्यास '**समाहर्ता**' असें ह्मणत. पंडित शामशास्त्री यांनीं याचें भाषांतर Collector–General असें केलें आहे. आपण त्याला फडनवीस असें ह्मणूं. उत्पन्नाच्या कांहीं बाबीना '**आयशरीर**' आणि कांहींस '**आयमुख**' अशा संज्ञा असून खर्चाच्या बाबी '**व्ययशरीर**' ह्या नांवाखालीं मोडत.

समाहर्ता दुर्गं राष्ट्रं खनिं सेतुं वनं व्रजं वणिक्पथं चावेक्षेत

ह्या मुख्य उत्पन्नाच्या बाबींत कोणत्या पोट बाबींचा समावेश होतो? दुर्ग ही मुख्य बाब घेतली तर तिच्या पोटांत ज्या अनेक बाबी येत त्या प्रत्येकीवर देखरेख करणारा अध्यक्ष नावाचा एक एक स्वतंत्र अधिकारी असून तो ह्या फडनवीसाला जबाबदार असे. लक्षणाध्यक्ष ह्मणजे टांकसाळीवरील अधिकारी आणि मुद्राध्यक्ष ह्मणजे शिक्केकरी! दुर्गाच्या उत्पन्नांत मद्य आणि वेश्या यांजपासून घेण्यांत येणाऱ्या कराचा समावेश होत असे. राष्ट्राच्या उत्पन्नांत 'बलि' नावाच्या धार्मिक कराचा अंतर्भाव होत होता. सोनें, रुपें, हिरे वगैरे रत्नें, मोतीं, पोंवळीं, शंख, लोखंडादि सर्व धातु, मीठ वगैरे खनिज द्रव्यें यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या करांचा समावेश 'खनि' ह्या मुख्य बाबींमध्यें करण्यांत येई, सर्व प्रकारच्या बागायती जमिनीवरील कर 'सेतु' नांवाच्या बाबींत समाविष्ट होत. 'वन' ह्या बाबींत उपरोक्त सर्व प्रकारच्या जंगली उत्पन्नाचा समावेश होई. गाई, ह्मशी, बकरीं, मेंढरें, गाढवें, ऊंट, घोडीं आणि खेचरें यांचेवरील

कर 'व्रज' सदराखालीं जमा होत आणि स्थलपथ व वारिपथ यांच्या कराचें उत्पन्न 'वणिक्पथ' ह्या मुख्य बाबतींत मोडे.

दप्तरदाराच्या कचेरींत प्रत्येक कारकुनाला बसावयास स्वतंत्र जागा आणि दप्तरें ठेवण्यासाठीं व्यवस्थित कपाटें असावीं. प्रत्येक खात्याला नंबर दिलेले असत आणि त्या नंबरच्या दप्तरांत त्या खात्यासंबंधीं आरंभापासून चालू मितीपर्यंतची सर्व माहिती व्यवस्थित रीतीनें नोंदलेली असे. ज्या ज्या परकीय राष्ट्राशीं संबंध येत असे त्या त्या राष्ट्राची सर्व माहिती त्या राष्ट्राच्या नोंदबुकांत सविस्तर नोंदलेली मिळे. सरकारी रीतीनें जी कामें करण्यांत येत किंवा जे कारखाने चालविण्यांत येत त्यांचीं अशींच नोंदबुकें असत. आषाढ हा जमाखर्ची वर्षाचा अखेरचा महिना समजत; त्यावेळीं सर्व खात्यांनीं आपआपले जमाखर्च फडनाविसाच्या सहिनिशीं दप्तरदार कचेरींत हजर केले पाहिजेत असा निर्बंध होता. ठराविक वेळीं जमाखर्च हजर न करणारास दंड करण्यांत येत असे. थोडें बहुत लिहिणें राहिलें असल्यास तें पुरें करून देण्यास मुदत देण्यांत येत असे.

राज्यांतल्या सर्व सुधारणा राष्ट्राच्या खजीन्यावर अवलंबून असतात म्हणून विशेषतः खजीन्याकडे लक्ष्य ठेविलें पाहिजे. कोणी अधिकारी सरकारी खजीन्यांतला पैसा व्याजी लावून अथवा त्यावर व्यापार करून आपला फायदा करून घेतो; असें पहाण्यांत आल्यास तो त्याचा गुन्हा आहे असें समजून त्याला कडक शासन केलें पाहिजे असें बंधन होतें. योग्य वेळापूर्वीं किंवा ती वेळ निघून गेल्यावर सरकारी वसूल करणें अपराध आहे. नेमल्या वेळींच वसूल केला पाहिजे असा कटाक्ष होता. कोणतीहि सरकारी वस्तु वापरणें किंवा एकाद्या सरकारी वस्तु ऐवजीं दुसरी वस्तु तिजोरींत ठेवणें हे सर्व शिक्षा देण्यास पात्र असे अपराध आहेत असें मानण्यांत येई. कोणीहि अधिकारी सरकारचा गुन्हेगार ह्मणून पुढें आल्यानंतर त्यानें प्रजेपैकीं कोणाचा गुन्हा केला असल्यास ज्याचा गुन्हा केला असेल त्यानें हजर व्हावें म्हणून जाहीरनामा काढावा. हा गुन्हा पुराव्यानिशीं शाबीत झाल्यास गुन्हेगाराला यथास्थित शिक्षा देऊन त्याजकडून झालेली नुकसानी ज्याची त्यास भरून देवविण्यांत आली पाहिजे; असा नियम होता.

चित्तानित्यत्वान्मनुष्याणाम् । अश्वसंधर्माणो हि मनुष्या नियुक्ताः कर्मसु विकुर्वते ।

स्वभावतः मनुष्य हा चंचलवृत्तीचा प्राणी असून कामाला जुंपलेल्या घोड्या-प्रमाणें तो पदोपदीं कामाचा कंटाळा करितो, म्हणून कामावर नेमलेल्या मनुष्यांवर देखरेख ठेवण्याची फार आवश्यकता असते. मनुष्य हा सहवासप्रिय आहे पण त्याला चांगल्या माणसाचा सहवास नसेल तर सहवासानेंच तो बिघडून धन्याशीं बेमान होईल आणि पैसे खाण्याला सोंकावेल. त्याला एकटाच ठेवावें तर तो कामाचा कंटाळा करील. नोकर म्हटला कीं, त्यानें कां कूं न करितां आणि इष्ट मित्रांच्या सल्ल्याची अपेक्षा न धरितां धन्याचा हुकूम एकदम मान्य केला पाहिजे. एकाएकीं उपस्थित झालेल्या संकटावर तात्पुरती उपाय योजना कर-ण्यापलीकडे यजमानाला कळविल्यावांचून केवळ स्वतःच्या जबाबदारीवर त्यानें कोणतेंहि काम करूं नये. कौटिल्याच्या काळापर्यंत नोकराची बढती, त्यानें खजी-न्यांत जमा केलेल्या रकमेवर अवलंबून होती असें दिसतें. पण कौटिल्याला नोकरांच्या परीक्षेची ही पद्धति मान्य नाहीं. तो त्यांची परीक्षा गुप्त हेरांच्या आणि त्या नोकरांवरील प्रमुख अधिकाऱ्यांच्या द्वारें करावी असें म्हणतो. पैसे खाणाऱ्या लहान मोठ्या सर्व नोकरांना त्यांच्या अपराधाप्रमाणें पण कडक असें शासन करावें; इतकेंहि करून, जिभेच्या टोंकावर असलेला मध किंवा विष मनुष्य केव्हां ना केव्हां तरी जसें खातोच तसेंच सरकारी नोकर, सरकारी उत्पन्न केव्हांना केव्हां तरी खातोच ! पण नेहमीच पाण्यांत संचार करणारा मासा पाणी केव्हां पितो हें समजणें अशक्य असतें. तसेंच

युक्तास्तथा कार्यविधौ नियुक्ताः
ज्ञातुं न शक्या धनमाददानाः

सरकारी नोकरीवर असलेले लोक सरकारचा पैसा खातातच, पण ते तो केव्हां आणि कसा खातात हें समजणें अशक्य असतें. आकाशांत उंच भरारी मारणाऱ्या पक्ष्याची गति एकवार सहज समजेल पण उलाढाली नोकरांच्या चळवळी प्रय-त्नानेंहि समजणार नाहींत.

परराष्ट्राशीं होणारे संधि आणि विग्रह अर्थात् तह आणि लढायांसारखे महत्त्वाचे प्रश्न राजशासनावर अवलंबून असल्यामुळें कौटिल्यानें तीं लिहिण्याच्या पद्धतिसंबंधानें पुष्कळच सूक्ष्म विचार आपल्या ग्रंथांत ग्रथित केले आहेत. राजानें ह्या कामाकरितां जो लेखक ह्मणून नेमावयाचा, तो अमात्य पदा-

लाहि योग्य असा असून त्याला सर्व लोकांच्या चालीरीतींची पूर्ण माहिती आणि लेखाची रचना कशी करावयाची या संबंधाचें उत्कृष्ट ज्ञान असावें. त्याचें हस्ताक्षर सुंदर आणि सुवाच्य असून, वाचन जलद, स्पष्ट आणि अर्थ लक्ष्यांत उतरविणारें असें असावें.

सोऽव्यग्रमना राज्ञस्सन्देशं श्रुत्वा निश्चितार्थं लेखं विदध्यात्

त्यानें राजाचा हुकूम नीट लक्ष्य लावून ऐकून घ्यावा. ज्या विषयासंबंधानें तो हुकूम असेल त्याबद्दल पूर्ण विचार करावा आणि राजाज्ञेचा निश्चितार्थ लक्ष्यांत ठसविण्यासारख्या भाषेंत तो हुकूम लिहून काढावा. आपल्या राजापेक्षां अधिक योग्यतेच्या राजाला कसें लिहावें, कमी योग्यतेच्याला कसें लिहावें, ज्याला लिहावयाचें त्याचें ज्ञान, त्याचा वर्ण, त्याचे संबंध, त्याची योग्यता, त्याचें वय, त्याचें वर्तन वगैरे संबंधानें पूर्ण विचार करुन त्याचा मायना कसा ठरवावा हें सांगून कौटिल्य ह्मणतोः—

अर्थक्रमः,सम्बंधः, परिपूर्णता,माधुर्यमौदार्यं, स्पष्टत्वमिति लेखसम्पत्

हे सर्व गुण लेखाच्या संपत्तीच्या ठिकाणीं आहेत. यानंतर ह्यापैकीं प्रत्येक गुणाचें स्पष्टिकरण त्यानें दिलें आहे. यापुढें वर्णविचारापासून वाक्यरचनेपर्यंतची माहिती देऊन राजशासनांचे निरनिराळे आठ प्रकार आणि '**सामोपप्रदानभेददण्डाः**' हे उपायाचे चार प्रकार विस्तारानें सांगितले आहेत. आणि शेवटीं—

अकान्तिर्व्याघातः पुनरुक्तमपशब्दः सम्प्लव इति लेखदोषाः

अकान्ति म्हणजे मळक्या पत्रावर पुसट शाईनें काढलेलें वेडें वाकडें अक्षर, व्याघात म्हणजे मागच्या विधानांविरुद्ध पुढें विधानें करून लिहिलेलें असंबद्ध लिहिणें, पुनरुक्ति, अपशब्द म्हणजे व्याकरणदृष्ट्या चुकीची शब्दयोजना आणि सम्प्लव म्हणजे भलत्याच ठिकाणीं वाक्यें अथवा रकानें तोडणें हे लेखनदोष सांगून हा शासन पद्धतीचा भाग संपविण्यांत आला आहे.

कोशाध्यक्षानें, कोशांत जमा होण्याकरितां आलेली रत्नें तज्ञांसमक्ष पारखून नंतर जमा करावींत. पांडय म्हणजे तंजावराच्या दक्षिणेकडील प्रांत, ह्यांत ताम्रपर्णी नदीमध्यें जीं मोत्यें सांपडत त्यांस **ताम्रपर्णिक** म्हणत. याच प्रांतांत मलयकोटी पर्वतावर जीं सांपडत त्यांस **पाण्डय कवाटक** म्हणत, पाश नदींत मिळणारीं तीं **पाशिक्य**, सिंहलद्वीपांत मयुरनामक गांवाजवळ कुल नदींत सांपडणाऱ्या मोत्यांस **कौलेय** अशी संज्ञा होती, केरल म्हणजे त्रावणकोर

प्रांत ! ह्या प्रांतात, मुरची वाच्या गांवानजीक चूर्णी नदींत जीं मोत्यें मिळत तीं **चौर्णेय** नांवानें प्रसिद्ध होतीं. गंजम प्रांतांत महेंद्र पर्वतावर सांपडणारीं तीं **माहेंद्र**; पार्शियांत कर्दम नदींत सांपडणाऱ्या मोत्यांस **कार्दमिक** म्हणत; ह्याशिवाय, **स्त्रौतसीय, व्हादीय, हैमवत** वगैरे मोत्यांचे आणखीहि प्रकार सांगितले आहेत. आपल्या देशांत पूर्वी मोत्यें कोठें सांपडत हें समजावें म्हणून त्यांचें वर्णन येथें इतक्या विस्तारानें दिलें आहे. हीं मोत्यें, शंख आणि शिंपले किंवा त्यांच्याच जातीचे दुसरे पदार्थ यांच्या पोटीं निपजत.

स्थूलं वृत्तं निस्तलं भ्राजिष्णु श्वेतं गुरु स्निग्धं देशविद्धं च प्रशस्तम्

टपोरें, वाटोळें, बीन तळाचें, तेजस्वी, शुभ्र, जड, मृदु आणि योग्य जागीं वेज पाडलेलें मोतीं उत्तम! चांगलें मोती कोणतें हें जसें सांगितलें आहे तसेंच वाईट कोणतें हें सुद्धां सांगितलें आहे. शीर्षक, उपशीर्षक, इंद्रच्छन्द, विजयच्छन्द इत्यादि मोत्यांच्या माळांचें एकंदर सुमारें एक हजार आणि आठ प्रकार व त्यांची विस्तृत माहिती दिल्यानंतर शेंकडों प्रकारच्या रत्नांची माहिती व त्यांचे गुणावगुण सांगितले आहेत. रत्नांचीं नांवें त्यांच्या उत्पत्तिस्थानावरून, रंगावरून आणि आकारावरून दिल्याचें दिसून येतें. ह्याशिवाय चंदन, अगरु, तैलपर्णिक वगैरे सुगंधी द्रव्यांची, शेंकडों प्रकारच्या कातड्यांची आणि कित्येक प्रकारच्या कांबळ्यांची माहिती देण्यांत आली आहे. कांहीं कांबळीं मृगांच्या केसांचीं करीत, कांहीं पाण्याला दाद न देणारीं तर कांहीं थंडीला न जुमानणारीं असत. ह्यांचे रंग निरनिराळ्या प्रकारचे आणि चित्रविचित्रहि असत, कित्येक अत्यंत मृदु असत. ह्या कांबळ्यांच्या अथवा ऊर्णावस्त्रांच्या कांहींच्या विजारी, कांहींचीं डगलीं तर कांहींची शिरोभूषणेंहि शिवीत.

नागवृक्षो लिकुचो वकुळो वटश्च योनयः

ह्या झाडांच्या तंतुपासून कापड तयार करण्यांत येत होतें. नागवृक्षापासून केलेल्या कापडाचा रंग पिंवळा, लिकुचापासून (ओंट ?) केलेल्याचा गव्हासारखा, वकुळापासूनच्याचा पांढरा आणि वटापासूनच्याचा लोण्यासारखा असे.

कापसाचीं वस्त्रें कोठें चांगलीं तयार होतात हें सांगतांना आज ज्या कोंकणांत कापसाचें एक बोंडहि पिकत नाहीं त्या कोंकणप्रांताचा तत्कालीन 'अपरान्तक' ह्या नांवानें निर्देश करण्यांत आला आहे; ही गोष्ट विशेष विचार करण्यासारखी आहे यांत शंका नाहीं.

प्रकरण चवथें.

खाणीवरील प्रमुख अधिकाऱ्याला ' आकराध्यक्ष ' अशी संज्ञा होती. त्याला धातुशास्त्राचें चांगलें ज्ञान असावें लागे. इतकेंच नाहीं तर पाऱ्यासारख्या कित्येक खनिज द्रव्याचे अर्क आणि भस्में स्वतः करून दाखवावीं लागत आणि तो उत्तम प्रकारचा रत्नपारखी असावा लागे. ह्या आकराध्यक्षानें आपल्या बरोबर खनिज शास्त्रज्ञ, खाणींत काम करण्याची माहिती असलेले मजूर आणि त्या कामास लागणारीं हत्यारें बरोबर घेऊन, बाह्य स्वरूपावरून ज्या खाणींतील द्रव्यें संपल्यासारखें वाटत असेल त्या खाणींची आणि जेथें नव्या खाणी लागण्याचा संभव दिसत असेल त्या जागांची कसून तपासणी करावी आणि अशा जागांतून निघून बाहेर वहाणाऱ्या प्रवाही पदार्थांच्या रंगरूपावरून आणि त्यांच्या आसपासचे जलप्रवाह आणि तेथें उगवणाऱ्या वनस्पति यांवरून व त्या प्रवाही पदार्थांच्या वजनावरून वगैरे त्या जागांत सोनें, रुपें अथवा शिलाजतु यांपैकीं कशाची खाण लागेल तें ठरवावें. खाणींत सांपडणाऱ्या अशोधित धातूंच्या वजनावरून, रंगावरून, त्यांवर दिसणाऱ्या निरनिराळ्या रेषा आणि आकृतिवरून व—

अर्चिष्मन्तस्ताप्यमाना न भिद्यन्ते बहुफेनधूमाश्च सुवर्णधातवः

ते भाजलें असतां त्यांतून निघणाऱ्या ज्वाला, त्यांची होणारी अवस्था, त्यांतून निघणारा ऊत आणि धूर यांवरून ते अशोधित धातु कोणते आहेत हें ओळखावें. अशोधित धातु तापवला असतां तो सोनें आहे, हें ओळखण्याच्या खुणा ज्यांत सांगितल्या आहेत तें मूळांतील संस्कृत वाक्य वर दिलें आहे. धातु अशोधित स्थितींत जितका जड तितकें त्यांत धातूचें प्रमाण अधीक ! अशोधित धातु शुद्ध करण्याच्या ज्या कृति सांगितल्या आहेत त्यांत अनेक प्राण्यांच्या मलमूत्रांचा, कांहीं क्षारांचा आणि केळ, तोंडली (पीलु) वड वगैरे वृक्षांच्या आणि बाजरी, तीळ वगैरे धान्यांच्या राखेचा उपयोग करावा असें ह्मटलें आहे.

कोणताहि ठिसूळ धातु मऊ आणि घनवर्धनीय बनवावयाचा असेल तर त्याला

मधुमधुकमजापयः सतैलं
घृतगुडकिण्वयुतं सकन्दळीकं
यदपि शतसहस्रधा विभिन्नं
भवति मृदु त्रिभिरेव तन्निषेकैः

मध, जेष्टिमध, बकरीचें दूध, तिळाचें तेल, घृतगुडकिण्वयुतम् (दुसरा पाठ-गलचूर्णयुतम् याचा अर्थ—) राळेचें चूर्ण आणि कंदळी ह्म. पावसाळ्यांत अतिशय उगवणारी पांढऱ्या फुलांची एक वनस्पति (हिचा उल्लेख सुश्रुताप्रमाणेंच ऋतुसंहारांतहि आहे.) ह्याच्या मिश्रणाची तीन पुटें द्यावींत. तो धातू कायमचा मृदु करावयाचा असेल तर त्याला गाईचे दांत आणि शिंगें यांचें चूर्ण लावावें.

निरनिराळ्या धातूंपासून निरनिराळ्या जिनसा तयार करण्याचा मक्ता असावा आणि परवान्याशिवाय अशा जिनसा विकणारांस आणि त्यांजकडून त्या विकत घेणारांस शिक्षा ठरविण्यांत यावी. खाणींतील धातू चोरणारांस आणि परवान्या-वांचून खाणी चालविणारांसहि शिक्षा द्यावी. ह्या शिक्षा हल्लींच्या सक्त मजुरीच्या शिक्षेच्या पद्धतीच्या असून हातकड्या घातलेल्या कैद्यांकडून हल्लींप्रमाणें कामें करून घेण्यांत येत होतीं असें ह्या ठिकाणीं केलेल्या ' बद्ध कर्म कारयेत् ' ह्या प्रयोगा-वरून स्पष्ट दिसतें. ज्या खाणी चालविण्यास मोठें भांडवल लागत असेल त्या सहसा सरकार मार्फत न चालवितां उत्पन्नाचा कांहीं भाग देण्याच्या करारानें अथवा मक्त्यानें लोकांस द्याव्या असें कौटिल्याचें मत होतें.

लोहाध्यक्ष नांवाचा एक अधिकारी असून त्याकडे सोनें व चांदी या दोन धातूंवाचून इतर धातूंच्या खाणी आणि त्या धातूंपासून वस्तु तयार करण्याचे कारखाने यांची व्यवस्था सोंपविलेली असे. ह्या धातूंत ' **वृत्त** ' आणि ' **लोध्र**-' अशीं दोन नांवें आलीं आहेत परंतु हे दोन धातू कोणते हें बरोबर समजत नाहीं. लोध्र ह्मणजे लोह अथवा लोखंडच असेल काय ? असा श्री. सोराबजी यांनीं प्रश्न केला आहे.

लक्षणाध्यक्षानें (टांकसाळीवरील अधिकारी) पण, अर्धपण, पादपण आणि अर्ध पादपण (एक अष्टमांश) हीं रुप्याचीं आणि माषक, अर्धमाषक, काकणी (एक चतुर्थांश माषक) आणि अर्धकाकणीं (एक अष्टमांश माषक) अशीं तांब्याचीं नाणीं पाडावीं. रुप्याच्या नाण्यांत चार भाग तांबें अकरा भाग रुपें आणि एक भाग लोखंड, शिसें, कासें इ. पैकीं एखादा धातू असें मिश्रण असावें आणि तांब्याच्या नाण्यांत चार भाग रुपें अकरा भाग तांबें आणि एक भाग इतर धातू असें मिश्रण असावें असा नियम होता.

रूपदर्शक (नाण्यांचा परीक्षक) नांवाचा एक अधिकारी असे, त्यानें लोकांच्या व्यवहाराला अवश्य तितकें नाणें आहे किंवा नाहीं, कोणी खोटीं नाणीं पाडून उपयोगांत आणतात कीं काय, सरकारी खजिन्यांत नाण्याचा अवश्य तितका पुरवठा आहे किंवा नाहीं, हें पहावें; कराच्या रूपानें अथवा सरकारी मालाच्या विक्रीच्या रूपानें जें नाणें खजिन्यांत भरण्याकरितां येईल तें तपासावें; आणि त्यावर झीज, परीक्षा वगैरेबद्दल नियमाप्रमाणें शेंकडावण घ्यावी. खोटीं नाणीं चालविणाऱ्या-पेक्षां पाडणाराला जास्त शिक्षा करण्यांत येत असे.

समुद्रोद्भव पोंवळीं मोत्यें वगैरे मौल्यवान् रत्नें, शंख, शिंपा वगैरे जिन्नस आणि माट ह्यांवर आणि यांपासून तयार करण्यांत येणाऱ्या नानाप्रकारच्या वस्तूंच्या कारखान्यांवर आणि व्यापाऱ्यांवर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यास '**खन्याध्यक्ष**' ह्मणत. शंखांपासून '**पाटन घर्षणादिभिर्वलयक्रिया**' तें कातून बांगड्या, कडीं वगैरे करण्यांत येत. मीठ उत्पन्न करणारास मिठावरील कराप्रमाणेंच (प्रक्रय) उत्पन्न झालेल्या मीठाचा कांहीं भाग द्यावा लागे. राजानें ज्या मापानें असे जिन्नस घ्यावयाचे असत तें माप, व्यवहाराकरितां ठरवून दिलेल्या मापा-पेक्षां शेंकडा पांच भागानें मोठें असे. अशा रीतीनें मिळालेल्या मीठाची विक्री तेथल्या तेथें होई आणि विक्रीच्या पैशावर उपरोक्त झीज वगैरे संबंधाची शेंकडा-वण वसूल करण्यांत येई. हें काम पहाणारा '**लवणाध्यक्ष**' वेगळाच असे. बाहेरून येणाऱ्या मिठावरहि राजपण्य (Royal Monopoly) वगैरे कर, वर प्रमाणेंच घेण्यांत येत असे. परवान्यावांचून मीठ उत्पन्न करण्याची मनाई असे. याशिवाय—

श्रोत्रियास्तपस्विनो विष्टयश्च भक्तलवणं हरेयुः
अतोऽन्यो लवणक्षारवर्गः शुल्कं दद्यात्

वेदज्ञ, तपस्वी आणि मजुरवर्ग यांना मात्र स्वतःच्या उपयोगाकरितां जकाती-वाचून मीठ नेण्याची परवानगी असून इतरांस नियमांप्रमाणें मीठावर जकात (शुल्क) भरावी लागे ती वेगळीच ! अशाप्रकारें खनिजद्रव्यांवर एकंदर निर-निराळ्या दहा प्रकारांनीं सरकारी तिजोरींत पैसा जमा होत होता !

यानंतर कौटिल्यानें आपला मोर्चा सुवर्णाकडे वळविला असून त्याच्या—जांबु-नद, शातकुंभ, हाटक, वैणव, शृंगशुक्तिज अशा निरानिराळ्या पांच जाती त्यांच्या

रंगावरून आणि उत्पतिस्थानावरून कशा झाल्या तें सांगितलें आहे. सोनें, शुद्ध किंवा पारा रुपें इत्यादि इतर पदार्थांशीं मिश्ररूपांत, सांपडतें. अशुद्धावस्थेंत सोन्याचा रंग पांढरट असतो; प्रथम ह्या मिश्रसुवर्णांत अशुद्ध भाग किती आहे याची परीक्षा करून त्यांत अशुद्धभागाच्या चौपट शिसें मिसळावें. शिशाच्या मिश्रणानें तें ठिसूळ झालें म्हणजे रानशेणींमध्यें घालून त्याला खूप आंच द्यावी. कठीणपणामुळें जर ठोकतांच त्याचें तुकडे उडूं लागले तर तें '**तैल गोमये निषेचयेत्**' तेल आणि गाईचें शेण ह्यांच्या मिश्रणांत ठेवावें. यापुढें—'**पाक पत्राणि कृत्वा गण्डिकासु कुट्टयेत्: कन्दलीवज्रकन्दकल्के वा निषेचयेत्**' असा जो विधि सांगितला आहे त्याचें श्री. शामशास्त्र्यांनीं–Shall be heated, wound round with–(येथें श्री. जहांगीर सोराबजी यांनीं '**तन्तुपात्राणि कृत्वा**' असें टीकेंतील अवतरण देऊन Probably it means, in a hot state should be beaten out into thin leaves असें भाषांतर केलें आहे)–cloth and hammered–(येथें फक्त '**कल्के**' याचा टीकाकारांनीं केलेला '**कषाये**' असा अर्थ दिला आहे) –on a wooden anvil–(येथें श्री. जहांगीर यांनीं '**गण्डिका**' ऐवजीं '**गन्धिका**' असा टीकेंतील पाठभेद आणि त्याचें '**काष्ठाधिकरणे काष्ठचुक्तिकया कुट्टयेत्**' हें स्पष्टीकरण दिलें आहे, अर्थ दिला नाहीं.)–or it may be drenched in the mixture made of mushroom and वज्रखंड—Antiquorum असें भाषांतर केलें आहे. परंतु मूळाचा अर्थबोध होत नाहीं. तज्ञांनीं ह्याचा विचार अवश्य करावा.

या पुढें रुप्याच्या निरनिराळ्या जातींची त्यांच्या उत्पत्तिस्थानांवरून वगैरे पडलेली नांवें, चांगलें आणि वाईट रूपें त्याच्या रंगावरून ओळखण्याची माहिती, कसोटीवर आणि तापवून सोन्याची परीक्षा कशी करावी त्याची माहिती, चांगली कसोटी कशी असावी, सोन्यामध्यें निरनिराळ्या धातू कशा मिश्र कराव्या, सुवर्णाला हिरवा, तांबडा, पांढरा, काळा वगैरे रंग कसे आणावें वगैरेची माहिती कृतिसह देण्यांत आली आहे.

जनतेला चांदी, सोनें, मोतीं, पोंवळीं आणि दुसरीं नाना प्रकारचीं किंमतवान रत्नें यांची देवघेव न फसतां बिनधोकपणें करितां यावी म्हणून सरकारतर्फे सुवर्णकारांचीं दुकानें काढण्यांत येत. ह्या दुकानांवर देखरेख करणाऱ्या अधिका-

त्यास **सुवर्णाध्यक्ष**, दुकान चालविणारास **सौवर्णिक** आणि दुकानास ' अक्षशाला ' अशा संज्ञा होत्या. अक्षशाला भर रस्त्यावर असून तिला चार खोल्या पण एकच दरवाजा असे; सौवर्णिक नेमावयाचा तो आपल्या कामांत कुशल, कुलवंत, विश्वासु आणि पुष्कळ अनुभव असलेला असा पाहूनच नेमीत.

अक्षशालायामनायुक्तो नोपगच्छेत् ।

कामगारांवाचून इतरांस अक्षशालेंत जाण्याची मनाई होती. लोकांच्या मागणींप्रमाणें निरनिराळ्या प्रकारचे अलंकार करून देण्याची आणि त्यांच्या जरूरीप्रमाणें त्यांच्यापासून धातू घेऊन त्यांस नाणीं पाडून देण्याचीहि तजवीज ह्या अक्षशालांतून होत असे. अलंकार—भरींव, पोकळ जडावाचे जसे हवे असतील तसे—करून देण्यांत येत. रोज सुटीच्या वेळेस कामगारांची कसून झडती घेतल्यावांचून त्यांस बाहेर सोडीत नसत. अर्धवट झालेले अलंकार, तयार झालेले अलंकार आणि इतर मोलवान वस्तु कुलुपबंद पेटींत ठेवून तिला सौवर्णिक आणि सुवर्णाध्यक्ष याच्या सहीची मोहर करण्याची वहिवाट होती. लोकांचीं कामें त्यांच्या मागणीबरहुकूम आणि ठरलेल्या मुदतींत करून देण्याबद्दल फारच दक्षता घेण्यांत येत होती. ह्या कामीं कामगारांकडून थोडासा हलगर्जीपणा झाल्यास त्यांना ताबडतोब दंड करण्यांत येत असे. नाणीं पाडून घ्यावयाचीं तीं ह्या अक्षशाळेच्या अथवा सरकारी टांकसाळीच्या मार्फतच पाडून घ्यावीं असा सक्त नियम असून तीं इतरत्र पाडून घेणारांस आणि देणारांस जबरदस्त दण्ड करण्यांत येत होता. व्यापाऱ्यांनीं उपयोगांत आणावयाचे ताजवे आणि वजनें हीं सुवर्णाध्यक्षाकडूनच घ्यावीं लागत. व्यापारी लोक वजनाच्या कामीं कसकशा युक्त्या करून गिऱ्हाइकांस फसवितात, सोनार कोणकोणत्या युक्त्या लढवून सोनें चोरतात, ह्या चोऱ्या कशा उमगून काढाव्या इत्यादिकांविषयीं कौटिल्यानें केलेलें वर्णन फारच मार्मिक आहे.

राज्यांतील पुष्कळसें उत्पन्न ऐनजिनसी वसूल होत असल्यामुळें त्याची व्यवस्था पहाण्याकरितां 'कोष्ठागाराध्यक्ष' नांवाचा अधिकारी असे.

पिण्डकरः, षड्भागः, सेनाभक्तं, बलिः, करः, उत्संगः, पार्श्वं पारिहीणकं, औपायनिकं, कौष्टेयकं च राष्ट्रम्

राष्ट्र ह्मणजे साधारणतः खेडेगांवांतील प्रजाजन; यांजपासून हे उपरोक्त कर घेण्यांत येत असत. पिण्डकर ह्मणजे उक्ता जमीनसारा, षड्भाग ह्मणजे जमी-

नीच्या उत्पन्नाचा सहावा भाग, सेनाभक्त म्हणजे लढाईवर सैन्य असेल त्यावेळीं त्याच्या खर्चाकरितां द्यावयाचें धान्य, तेल, मीठ वगैरे, बलिः ह्मणजे राष्ट्रापत्तीच्या प्रसंगीं करावयाच्या विशेष धार्मिक क्रियेकरितां द्यावयाचा नक्त कर, कर ह्मणजे मांडलिक राजांकडून येणारी वार्षिक खंडणी, (ह्याचा अंतर्भाव राष्ट्राकडून येणाऱ्या करांत कसा झाला ?) उत्संग ह्मणजे राजपुत्राच्या जन्मप्रसंगीं देण्याचा कर, (कांहीं ठिकाणीं देणग्या असें ह्मटलें आहे पण देणग्या असाच अर्थ असता तर करांच्या यादींत त्यांचा समावेश झाला नसता). हा कर सर्वांजवळून घेण्यांत येत असे. पौर आणि राष्ट्र असा भेद त्यांत नव्हता ! पार्श्व या करासंबंधानें प्रतिपचंद्रिकाकार ह्मणतो कीं, पार्श्व ह्मणजे '**उचितकरादधिकग्रहणम्**' राजकीय कारणाकरितां योग्य करापेक्षां जें अधिक घ्यावयाचें तें ! '**पारिहीणकम्** ' ह्मणजे एखाद्याच्या गुरांनीं सरकारी जमिनींतील पिकाची नासाडी केली असतां नुकसान भरपाई ह्मणून जें घेण्यांत येतें तें. औपायनिक ह्मणजे राजाला केलेला आहेर अथवा दिलेली देणगी (ही करांत कशी आली ?) आणि कौष्टेयक ह्मणजे सरकारी पाण्याच्या पुरवठ्यावर पिकणाऱ्या जमिनीवरील पाणीपट्टी. असे हे राष्ट्रापासून घेण्याचे कर असत. ते वसूल करणाऱ्यांवर देखरेख ठेवणें आणि आलेल्या वसूलाची सर्व व्यवस्था लावणें हें या कोष्ठागाराध्यक्षाचें एक काम होतें. त्याच्या कामांत भाताचे तांदूळ करणें, द्विदल धान्यांच्या डाळी करणें, बुंदासारखे पदार्थ तळणें, ऊंस वगैरेच्या रसासारखीं पेयें तयार करणें, (शुक्तकर्म) धान्य दळून पीठ तयार करणें आणि उंसाच्या रसाची साखर करणें इत्यादि कामांचा समावेश होत असे. हीं सर्व कामें ' सिंहनिका ' ह्या एकाच सामान्य कार्यांत समाविष्ट होत.

धान्यस्नेहक्षारलवणानां धान्यकल्पम्

तूप, तेल, मांसरस आणि कांहीं वनस्पतींचा मगज व कांहींचा रस ह्या सर्वांना **स्नेह** अशी संज्ञा आहे. अरिष्टें, आसवें, अर्क, काकवी आणि खडीसाखर यांचा समावेश क्षारांत केला आहे. सैंधव, मीठ, बिडलोण, जवखार, संचळखार आणि खारवट जमिनींत उत्पन्न होणारा क्षार यांचा अंतर्भाव लवणामध्यें झाला आहे. मध, द्राक्षासव, जांभळें आणि फणसाचे गरे यांचा रस ह्यांपैकीं कोणत्याही एका पदार्थांत मेढाशिंगी अथवा पिंपळी यापैकीं एका वनस्पतीचा अर्क मिसळावा आणि ह्या मिश्रणांत चिभूड, काकडी, ऊंस, आंबा आणि आवळा यापैकीं अवश्य वाटेल

त्याचा अर्क घालावा. हें मिश्रण वर्षभरसुद्धां टिकतें आणि त्याला शुक्त असें म्हणतात. लिंबें, महाळुंगें वगैरे चवीला आंबट असणाऱ्या फळांना फलाम्ल अशी संज्ञा आहे. हे व यासारखेच इतर पदार्थ तयार करण्याच्या कामावर कोष्ठागाराध्यक्षालाच नजर ठेवावी लागे. कोष्ठागारांत येणाऱ्या आणि तयार होणाऱ्या जिनसांपैकीं प्रजेला संकटसमयीं उपयोगी पडावे ह्मणून निम्मे जिन्नस नेहमीं शिल्लक ठेविले पाहिजेत असा नियम होता.

' **सिंहनिका** ' सदराखालीं कोष्ठागाराध्यक्षाचीं जीं कामें येत त्यांवर बरोबर देखरेख करितां यावी ह्मणून त्याला मार्गदर्शक अशी जी माहिती, अर्थशास्त्रांत देण्यांत आली आहे तिचा उपयोग साधारण आपल्या रोजच्या व्यवहारांत देखील होईल असें वाटल्यावरून ती येथें सविस्तर दिली आहे.

(१) हरीक, व्रीहि (एकप्रकारचें भात), राळे आणि कांग यांचे उत्तम सडीक तांदूळ मूळ धान्याच्या निम्मे होतात.

(२) साळ नांवाच्या भाताचे सडीक तांदूळ आणि मूग व उडीद यांची उत्तम डाळ तीन अष्टमांश उतरते.

(३) मसुराची डाळ एक षष्ठांश उतरते पण शैब्य (हरभरा ?) धान्याची डाळ निम्मे उतरते. वरीच्या तांदुळाचा उतारा मात्र मूळ धान्याच्या एक षष्ठांश असतो.

(४) उडीद आणि मूग यांचें पीठ, धान्याच्या दीडपट व जवाचें दुप्पट होतें.

(५) हरीक, वरी आणि राळे यांचा भात धान्याच्या तिप्पट, व्रीहीच्या तांदुळाचा चौपट आणि शालीच्या तांदुळाचा पांचपट होतो.

(६) धान्याची साधारण भीज दुप्पट आणि मोड आलेली भीज धान्याच्या अडीच पट होते.

(७) भाजलेलें धान्य सामान्यतः एक पंचमांशानें वाढतें, पण त्याच्या भाजून लाह्या केल्या तर मात्र त्या दुप्पट होतात.

(८) आळशीचें (जवस; सं. अतसीचा अपभ्रंश) तेल धान्याच्या एक षष्ठांश, निंबादिकांचें एक पंचमांश, तीळ, करड, मधूक (कोष्ट ?) आणि हिंगणबेट यांचें एक चतुर्थांश.

(९) कापूस आणि लोंकर यांचा धागा एक पंचमांश निघतो.

(१०) शेरभर (प्रस्थ) तांदूळ, पावशेराची आमटी, आमटीच्या धान्याच्या एक षोडशांश मीठ आणि एक चतुर्थांश तेल अथवा तूप हा साधारणपणें पुरुषाचा एक वेळचा आहार. हलक्या वर्णाच्या (अवर) पुरुषाला एक षष्ठांश शेराच्या आमटीवर आणि एक अष्टमांश तेलावरच आपली भूक भागवावी लागे. पुरुषाच्या पाऊणपट बायकांचा आणि निम्मे मुलांचा आहार मानण्यांत येत होता. खाण्यापासूनहि दाखविण्यांत आलेला हा उंचनीचपणा ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

यानंतर कौटिल्यानें पाकशास्त्राची जी माहिती दिली आहे, तींत अग्रस्थान मांसपाकाला दिलें असून त्यानंतर शाकापाक व शेवटीं मत्स्यपाक कसा करावा याची माहिती आहे. ह्या सर्व पाकांत थोड्या प्रमाणांत पण साखर व दहीं घालावें असें सांगितलें आहे. गाढवें, डुकरें, हरणें, गाई, म्हशी घोडे, रेडे वगैरे कुत्र्यापासून हत्तीपर्यंत सर्व जनावरांस आणि हंस, क्रौंच, मोर इत्यादि निरनिराळ्या जातींच्या सर्व पक्ष्यांस कोणतें अन्न किती आणि कसें तयार करून घालावें याची माहिती आहे.

तांदूळ, डाळ, पीठ वगैरे करण्यापासून तों त्याची निरनिराळीं पक्वान्नें तयार करीपर्यंत लागणाऱ्या सर्व साधनांची जी यादी दिली आहे तींत टोपल्या केरसुण्यांपासून चाळणीं सुपें वगैरे पर्यंत सर्व साधनें आलीं आहेत. ह्या साधनांत कुट्टक यंत्र ह्मणजे सडण्याचें यंत्र याचा उल्लेख असून दुसरें दळण्याचें रोचक यंत्र आहे. हें ' मनुष्यप्रावर्तितम्, ' ' बलीवर्दप्रावर्तितम् ' आणि ' सलिलप्रावर्तितम् ' ह्मणजें मनुष्यें, बैल आणि पाणी ह्या तीन शक्तींनीं चालवीत.

खुष्कीच्या आणि पाण्याच्या मार्गानें येणाऱ्या, समुद्रांत आणि जमिनींत उत्पन्न होणाऱ्या जिनसांपैकीं कोणत्या जिनसांस मागणी कशी आहे, त्यांच्या भावांत तेजी मंदी कशी आहे आणि त्यांची खरेदी विक्री करण्यास व सांठा करण्यास योग्य वेळ कोणती इत्यादि गोष्टी पाहून आपल्या राज्याचें हित होईल त्याप्रमाणें ह्या मालाची देव घेव करण्याचें काम 'पण्याध्यक्ष' नांवाच्या अधिकाऱ्याकडे होतें. परंतु त्यानें ' **स्थुलमपि च लाभं प्रजानामौपघातिकं वारयेत** ' मोठ्या फायद्याच्या दृष्टीनें प्रजेला पीडा होण्याइतकी मालाची किंमत केव्हांहि वाढवूं नये असा निर्बंध होता. परदेशचा माल आणून विकणारांस अनेक सवलती देण्यांत येत असत. परदेशचे व्यापारी भागीच्या भांडवलानें व्यापार करणारे

नसतील तर त्यांजवर कर्जाबद्दल दावाहि घालण्यास मनाई होती. कोष्ठागारांतील माल ज्या लोकांकडे विक्रीस दिलेला असे त्यांस सरकारी तागड्या आणि वजनें देण्यांत येत. व्यापाऱ्यांनीं विक्रीचा पैसा, त्यांस एक लहान छिद्र असलेली लाकडी सीलबंद सरकारी पेटी देत, तींत ठेवून सायंकाळीं सर्व हिशेब योग्य कामगाराकडे द्यावा असा नियम होता.

आपल्या कोष्ठागारांतील माल परराष्ट्रांत विक्रीकरितां किंवा मोबदल्याकरितां (प्रतिपण्य–Barter) पाठविणें झाल्यास प्रथम, त्या राज्यांत आपल्या मालावर द्यावी लागणारी जकात, (शुल्क–Toll) दस्तुरी (वर्तनि–Road cess) वहानावरील कर' (आतिवाहिक–conveyance-cess) फौजेच्या ठाण्यावरील कर (गुल्मदेय) तरभाडें (तरदेय) ज्या व्यापाऱ्याबरोबर माल पाठवावयाचा त्याला आणि त्याजबरोबरच्या माणसांना द्यावा लागणारा पोटगी-भत्ता (भक्त–**भत्ता** हा शब्द याच शब्दाचा अपभ्रंश असावा) आणि त्या पर-राष्ट्रांतील राजास द्यावा लागणारा भाग या सर्व खर्चाच्या बाबी विचारांत घेऊन नफा होण्यासारखा असेल तरच पण्याध्यक्षानें परराष्ट्रांत माल पाठवावा. '**अलाभं परिवर्जयेत्**' नफा होण्यासारखा नसेल तर पाठवूं नये.

साग, शिसव वगैरे इमारती लांकडे; उटज, चिमिय, चव वेणु वगैरे बांबू; निरनिराळ्या प्रकारचे वेत; सण, रुई, घायपात वगैरेसारख्या वस्त्रें आणि दोरखंडे वगैरे बनविण्याच्या कामीं उपयोगी पडणाऱ्या धाग्याच्या वनस्पति; ताल आणि भूर्ज यांच्याप्रमाणें लेखनोपयोगी पानांच्या वनस्पति; किंशुकादि पुष्पवृक्ष, औषधी कंदमुळें, विषारी वनस्पति, मडक्यांत बाळगलेले सर्पादि विषारी प्राणी, सुंदर कातड्यांचे, दातांचे, खुराचे आणि पुच्छाचे निरनिराळे पशु; रानांतील खनिजद्रव्यें, जळाऊ लांकडें आणि गवत या सर्वांचा समावेश जंगलाच्या उत्पन्नांत होत असे. आपल्या हाताखालीं काम करणाऱ्या वनपालांच्या आणि इतर नोकरांच्या मदतीनें वेळच्यावेळीं हें उत्पन्न जमवून योग्य किमतीनें त्यांची विक्री करणें, लांकडाचा कोळसा पाडणें, वेतांचे आणि बांबूंचे निरनिराळे पदार्थ विणणें, दुसऱ्या पदार्थांपासून निरनिराळे कारागिरीचे जिन्नस बनविण्याकरितां जंगलाच्या अथवा राजधानीच्या शहरानजीक कारखाने चालविणें आणि जंगलसंबंधीं चोरी वगैरे आगळीक करणारास यथान्याय शासन करणें, हीं कामें 'कुप्याध्यक्ष' नांवाच्या अधिकाऱ्याकडे सोंपविलेलीं असत! साधारणतः शेतकीच्या उपयोगाकरितां झाडांच्या फांद्या व टहाळ वगैरे तोडणारास शिक्षा नव्हती.

शत्रूच्या शहरांचा आणि निरनिराळ्या प्रकारच्या दुर्गांचा नाश करण्याच्या कामीं उपयोगी पडण्यासारखी, स्वतः करितां किल्ले बांधण्यांस आणि त्यांचें संरक्षण करण्यास लागणारीं, युद्ध कर्मास अवश्य अशीं सर्व प्रकारची हत्यारें आणि अन्य साधनें नियमित मुदतींत करून देण्याच्या कामीं घटलेले असे प्रविण कारागीर कायम पगारावर नेमणें, निरनिराळ्या हत्यारांस निरनिराळ्या जागा करून तीं त्या ठिकाणीं ठेवणें, वारंवार तीं घासून पुसून आणि ऊन देऊन साफ राखणें, सर्व हत्यारांची वर्गवारीनें यादी करून त्या यादींत त्यांचा आकार तीं कोणी, कधीं आणि कोठें तयार केलीं अथवा कोठून मिळालीं याची माहिती आणि त्यांची किंमत नमूद करणें, हीं कामें ज्याच्या देखरेखीखालीं होत त्या अधिकाऱ्याचा हुद्दा, 'आयुधागाराध्यक्ष' असा होता.

कौटिल्यानें यापुढें निरनिराळ्या हत्यारांचें आणि युद्धसामुग्रीचें थोडक्यांत वर्णन दिलें आहे, त्यांपैकीं कांहींची माहिती येथें देतोंः—

१ **सर्वतोभद्र**—ही एक प्रकारची शीघ्रगतीनें चालणारी गाडी असून तिला गति दिली म्हणजे ती सर्व बाजूंस धोंड्यांचा मारा करीत असे.

२ **जामदग्न्य**—(टीका-हर्म्यरन्ध्रनिहितमहाशरयन्त्रम्)-ह्या यंत्रानें असंख्य बाणांचा वर्षाव करितां येत होता.

३ **विश्वासघाति**—नगराच्या अथवा किल्ल्याच्या खंदकावर प्रवेशद्वाराच्या वरच्या अंगास, वाटेल तेव्हां पाडतां येईल अशी रचना करून ठेवलेलें एक प्रचंड लोखंडी भाल. हें प्रवेश करणाऱ्या सैन्याच्या आंगावर अचानक पाडून त्याचा चुराडा उडवीत. यानक, अर्धबाहु ऊर्ध्वबाहु, हीं यंत्रे याच उपयोगाची होतीं.

४ **पर्जन्यक**—(टीका-अग्निप्रशमनार्थमुदकयन्त्रम्) आग लावण्याचीं जशी कांहीं यन्त्रें होतीं तसें पाण्याचा मारा करून आग विझविण्याचें हें एक यंत्र होतें.

५ **हस्तिवारक**-हें लढाऊ हत्तींना मागें फिरविण्याचें एक तीन फळांच्या भाल्यासारखें हत्यार असावें असें याच्या वर्णनावरून दिसतें.

६ **उद्धाटिम** आणि **उत्पाटिम**-ह्यांपैकीं पहिलें किल्ल्याचे बुरूज आणि दुसरें इमारतीचे खांब वगैरे ओढून पाडण्याचें हत्यार होतें.

७ **शतघ्नि**—एका स्तंभाला तीक्ष्ण धारेचे हजारों खिळे बसविलेलें एक हत्यार. हें किल्ल्याच्या तटावर ठेवलेलें असे.

८ **कार्मुक, कोंदण्ड, द्रूणा** आणि **धनु**—हीं चार जातींचीं धनुष्यें असून तीं अनुक्रमें ताड, चाप (एक कळकाची जात), दारु (एक जातीचें लांकूड) आणि हाड अथवा शिंग यांचीं केलेलीं असत. धनुष्याच्या दोऱ्या मूर्वा (मोरवेल) अर्क (रुई) सण आणि जनावरांचे स्नायु यांच्या करीत. बाणांचीं टोकें लोखंड, हाड आणि लांकूड यांचीं असत.

९ **निस्त्रिंश, मण्डलाग्र** आणि **असियष्टि**–हीं तरवारींना त्यांच्या आकारावरून ठेवलेलीं नांवें होतीं; तरवारीच्या मुठी, गेंड्याच्या अथवा रेड्याच्या शिंगाच्या अथवा हत्तीच्या दांताच्या करीत; केव्हां केव्हां त्या लांकडाच्या अथवा बांबूच्या मुळाच्याहि करीत असत.

१० **गोष्पण**—यंत्रांनीं आणि हातांनीं जसे दगड मारीत तसेच गोफणीनेंहि मारीत (गोफण हा ' गोष्पण ' चा अपभ्रंश).

११ **लोहजालिका, पट्ट, कवच** आणि **सूत्रकं**—हीं निरनिराळ्या प्रकारचीं चिलखतें होतीं. तीं लोखंडाचीं अथवा देवमासा, गेंडा गव्हा, हत्ती आणि गाई यांच्या कातड्यांचीं करीत. यांपैकीं पहिलें डोक्यापासून पायापर्यंत सर्व शरीर आच्छादण्यासारखें होतें, दुसऱ्यांत हात झांकण्याची व्यवस्था नसे, तिसऱ्याचें डोकें, हात आणि शरीर हीं झांकण्याकरितां निरनिराळे तीन भाग केलेले असत आणि चौथ्यानें फक्त कमरेपासून मांड्यापर्यंतचाच भाग आच्छादण्याची व्यवस्था होती. याशिवाय शरीराचा प्रत्येक भाग स्वतंत्रपणें झांकणारीं शिरस्त्राण, कण्ठत्राण, कूर्पास आणि कंचुक वगैरे निरनिराळ्या नांवाचीं कित्येक चिलखतें होतीं तीं वेगळींच.

हीं आणि येथें ज्यांचें वर्णन दिलें नाहीं अशीं अनेक युद्धसाधनें अवश्यकतेप्रमाणें तयार करविणें व त्यांची नीट व्यवस्था ठेवणें हीं कामें आयुधागाराध्यक्षाकडे सोंपविलेलीं होतीं.

यापुढें एका भागांत वजनामापांची आणि दुसऱ्यांत अंतर आणि काळ मोजण्याची माहिती देण्यांत आली आहे. वजनामापावरील अधिकाऱ्यास '**पौतवाध्यक्ष**' अशी संज्ञा असून, अंतर आणि कालमापनावरील अधिकाऱ्याचा हुद्दा '**मानाध्यक्ष**' असा होता. वजनांचें मापन उडीद, गुंजा आणि तांदुळाचे दाणे यांवर

बसविलेलें होतें. वजनें अर्धमाशापासून (एक द्वितीयांश उडीद) वरचीं असून तीं पाणी शोषून वजन न वाढणाऱ्या अथवा उष्णतेनें सुकून वजन कमी न होणाऱ्या पदार्थांचीं, ह्मणजे लोखंडाची अथवा मगध आणि मेकल ह्मणजे अमरकंटक पर्वतांतील, दगडाचीं केलेलीं असत. लहान मोठ्या निरनिराळ्या आकाराच्या तागड्या, निरनिराळ्या वस्तु वजन करण्याकरितां करीत प्रत्येक जातीच्या तराजूचा दांडा, आणि त्याचीं पारडीं कशा आकाराचीं, किती लांबीचीं अथवा घेराचीं, आणि किती वजनाचीं असावीं हें ठरलेलें होतें. कांहीं जातीच्या ताजव्यांच्या दांड्यांवर वजनाच्या खुणा घातलेल्या होत्या, व त्यांवरून वजन समजण्याची व्यवस्था केली होती. तागडीवर नंदीचें आणि स्वस्तिकाचें चिन्ह खोदण्याची पद्धति होती. वजनामापावर '**पौताध्यक्षाकडून**' सरकारी शिक्का मारून घ्यावा लागे व तो मारून घेण्याबद्दल निरखाप्रमाणें सरकारांत पैसे द्यावे लागत. बिनशिक्याचीं वजनें, मापें वापरणारास दंड करण्याचा अधिकार **पौताध्यक्षाला** होता.

अंतर मोजण्याचें अत्यंत सूक्ष्म प्रमाण परिमाणु धरिलें आहे. आठ परिमाणू ह्मणजे चालत्या रथानें उडणाऱ्या धुळीचा एक कण, असे आठ कण ह्मणजे एक लिक्षा (लीख नावाचा केसांत होणारा एक जंतु) आठ लिक्षा ह्मणजे एक यूका (केसांत होणारा ऊ नावाचा जंतु) आठ यूका ह्मणजे एक यव किंवा बाजरीचा दाणा आणि आठ यव ह्मणजे एक अंगुळ, असें हें प्रमाण पुढें वाढवीत योजनापर्यंत नेलें आहे. वेळाच्या मापनाला त्रुट ह्मणजे निमिषाच्या एक चतुर्थांश भागापासून सुरवात करून तें '**पंचसंवत्सरो युगमिति**' पांच वर्षें ह्मणजे एक युग, येथपर्यंत पोंचविलें आहे. ह्या कालगणनेंत '**पंचत्रिंशदश्ववाहायाः**' **चत्वारिंशद्धस्तिवाहायाः**' इत्यादि जीं वचनें आलीं आहेत आणि टीकाकारानें त्यांचा जो अर्थ केला आहे त्यावरून पहातां निरनिराळ्या खात्यांतील नोकरांच्या पगाराच्या महिन्याच्या दिवसांची संख्या निरनिराळी होती. कोणाचा ३५ दिवसांचा महिना तर कोणाचा ४० दिवसांचा ! हा आमच्या प्राचीन काळचा न्यायच ह्मणावयाचा !

जकातीवरील अधिकाऱ्यास शुल्काध्यक्ष अशी संज्ञा होती. नगराच्या महाद्वारानजीक जकातीचें नाकें असून, त्याच्या उत्तरेस किंवा दक्षिणेस मोठें निशाण रोंविलेलें असे. नाक्यामध्यें नाकेदार व नोकर पुष्कळ असत. व्यापारी आपला माल घेऊन नाक्याजवळ येतांच चार पांच नाकेदार येऊन व्यापाऱ्याचें नांव, त्याचें ठिकाण, मालाचा तपशील, त्याचें माप, वजन अथवा संख्या जें असेल तें व त्या मालावर पहिली अभिज्ञानमुद्रा कोणत्या ठिकाणीं करण्यांत आली, मुद्रा

बरोबर आहे किंवा नाहीं, ती पुसली किंवा फाटली आहे कीं काय, ज्या मालाची मुद्रा त्या मालावर आहे किंवा कसें वगैरे माहिती शोधपूर्वक लिहून घेत. ह्यापैकीं कोणत्याहि गोष्टींत त्या व्यापाऱ्याची कसूर अथवा लबाडी दिसून आल्यास अथवा जकात चुकविण्याकरितां तो निशाणापलीकडे गेल्याचें ठरल्यास त्याला दंड करण्याचा अधिकार शुल्काध्यक्षाला असे. ही व्यवस्था बरोबर झाल्यानंतर व्यापाऱ्यानें आपला सर्व माल निशाणाजवळ उतरून " मजपाशीं अमूक जातीचा माल इतका आहे, त्याचीं किंमत इतकी देण्यास कोण कबूल आहे, " असें तेथें जमून येत असलेल्या व्यापाऱ्यांस विचारावें. व्यापाऱ्यांनीं चढाओढीनें जास्त किंमतीस मागणी केली तर आलेला जास्त पैसा आणि ठराविक जकात सरकारजमा होऊन बाकीचा पैसा माल आणणारास देण्यांत येई. कोणत्याहि धार्मिक संस्काराकरितां अथवा विधिकरितां आणलेल्या मालाला जकात माफ होती. ह्यासंबंधानें माल आणणारा व्यापारी, खरेदी घेणारे, नाक्यावरील नोकर अथवा शुल्काध्यक्ष यापैकीं ज्याची लबाडी आढळून येईल त्यास जबरदस्त दंड करण्यांत येत असे. हत्यारें वगैरे युद्धोपयोगी सामान व्यापाराकरितां आणण्याची सक्त मनाई होती. ह्या जकातीशिवाय दस्तुरी नांवाचा आणखी एक कर राज्याच्या हद्दीवर असणाऱ्या अन्तपाल नांवाच्या अधिकाऱ्यांनीं घ्यावयाचा असे. दस्तुरी व्यापारी मालाच्या गठ्ठयावर आणि मेंढरें, बकरीं, गुरें, घोडे वगैरे सर्व जनावरांवर होती.

बाहेरून येणाऱ्या मालावर साधारणतः जरी किंमतीच्या एक पंचमांश जकात असे तरी फळें, फुलें, भाज्या वगैरे बागायती मालावर आणि सुकविलेलें मांस आणि मासळी यांवर किंमतीच्या एक षष्ठांश जकात घेण्यांत येई; तसेंच सुती, लोंकरी, रेशमी वगैरे सर्व जातींचें कापड, किंवा कापूस, लोंकर वगैरे पदार्थ, औषधें आणि रंग यावर किंमतीच्या एक दशांशापासून एकपंधरांशापर्यंत जकात घेत. निरनिराळीं धान्यें, साखर, मीठ आणि शिजलेला भात यांवर एक विसांश जकात होती. कोणताहि पदार्थ त्याच्या उत्पन्नाच्या जागीं विकण्याची मनाई असे आणि हा नियम मोडणारास दंडहि फारच होत असे. दस्तुरी आणि जकात ह्याशिवाय द्वारदेय म्हणून जकातीच्या एक पंचमांश असा एक कर होता पण तो अवश्यकतेप्रमाणें माफहि करण्यांत येत होता.

या करांची आणि हल्लींच्या करांची तसेंच व्यापारविषयक ह्या काळांतील बंधनें आणि सांप्रत काळच्या सवलती यांची तुलना सूज्ञ वाचक हा लेख वाचतांच केल्यावांचून रहातील असें वाटत नाहीं.

प्रकरण पांचवें.

वीणकामावरील अधिकाऱ्यास 'सूत्राध्यक्ष' अशी संज्ञा असून निरनिराळ्या वनस्पतींचें सूत कातणें, त्या सूताचीं वस्त्रें आणि चिलखतें विणणें, तसेंच कांहीं वनस्पतींच्या तंतूंच्या दोऱ्या वळणें–वांबूपासूनहि दोऱ्या करित असत–इत्यादि कामें तज्ञ कारागिरांच्या मदतीनें त्याला करून घ्यावीं लागत.

लोंकर कांतरणें, झाडांच्या साली, गवत, ताग, घायपाती इत्यादिकांचे तंतू काढणें आणि कापसाचें सूत कातणें ही कामें बहुधा विधवा, दंड देण्याला असमर्थ असलेल्या अपराधी स्त्रिया, जोगिणी, मुरळ्या, वृद्ध झालेल्या राजदासी आणि वेश्या यांच्या कडून करून घेण्यांत येत होतीं. त्यांनीं केलेल्या कामाच्या योग्यते प्रमाणें आणि प्रमाणाप्रमाणें त्यांस वेतन देण्यांत येत असे. ठरलेल्या सुट्यांच्या दिवशीं त्यांचेकडून काम करून घेण्यांत आलें तर त्या कामाबद्दल त्यांस विशेष मोबदला देण्यांत येत होता आणि कामाच्या दिवशीं कमी काम झाल्यास वेतनांत कपात करण्यांत येत होती. वस्त्रें वगैरे विणण्याचें काम ज्या तज्ञ कारागीरांवर सोंपविण्यांत येत असे त्यांस त्यांच्या चलाखीप्रमाणें आणि त्यांनीं केलेल्या कामाच्या सुबकपणाप्रमाणें वेतन देण्यांत येत होतें. ह्या सर्व कामदार वर्गावर सूत्राध्यक्षाची सक्त नजर असे.

ज्या स्त्रियांना उपजीविकेचें कांहीं साधन नसे त्यांस सूत काढण्याचें काम प्रथम देण्यांत येत असे; इतकेंच नाहीं तर त्यांपैकीं ज्यांस कोणत्याहि कारणामुळें कारखान्यांत जातां येत नसे त्यांच्या घरी मोलकरणीमार्फत काम पाठविण्याची तजवीज करण्यांत येई.

स्त्रिया मुखसन्दर्शनेऽन्यकार्यसंभाषायां वा पूर्वस्सा. सदण्डः

कारखान्यांत काम करणाऱ्या स्त्रियांकडे पापदृष्टीनें पहाणाऱ्या आणि त्यांजकडे सोंपविलेल्या कामावांचून त्यांच्याजवळ इतर गोष्टी बोलणाऱ्या अधिकाऱ्यास सणसणीत दंड करण्यांत येत होता. कामकरी वर्गाची मजुरी वेळच्यावेळीं न देणाऱ्याला जसा दंड होई तसाच कामापूर्वीच त्याबद्दलचा मोबदला काम करणाराला दिला असतांहि तो देण्याऱ्या अधिकाऱ्यास दंड करण्यांत येई.

वेतनाच्या प्रमाणांत काम न करणाऱ्या आणि ताब्यांत दिलेल्या कच्च्या मालाची चोरी अथवा त्याचा भलताच उपयोग करणाऱ्या कामकरी बायकांच्या हाताचे आंगठ तोडण्यांत येत. हेतु वेगळा असला तरी ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं इकडील कोष्ट्यांचे जे आंगठे कापले म्हणून म्हणतात ते आमच्या देशांतील ह्या प्राचीन वहिवाटीस धरूनच कापले असतील.

सीताऽध्यक्ष

नांवाच्या अधिकाऱ्यास आणि त्याच्या हाताखालीं काम करणारांस.

कृषितन्त्रगुल्म वृक्षायुर्वेदज्ञ

वृद्ध पराशरादिप्रणीत कृषिशास्त्र आणि दशाशलादिप्रणीत वृक्षायुर्वेद यांचें ज्ञान आणि त्यापासून प्रत्यक्ष घेतलेल्या अनुभवाची माहिती असावी लागे. योग्यवेळीं धान्यादि सर्व वनस्पतींचें बीं जमवून त्याची, समाधानकारक रीतीनें नांगरून तयार केलेल्या सरकारी जमिनींत गुलाम, मजूर आणि कैदी यांच्या मदतीनें पेरणी करणें व योग्य जोपासना करून नाना प्रकारचीं पिकें काढणें हें ह्या सीताऽध्यक्षाचें मुख्य काम होतें.

हल्लीं जसें पावसाचें मापन इंचावर करितात तसें त्यावेळीं तें द्रोणावर करीत असत. वालुकामय प्रदेशांत १६ द्रोण, पाणथळ प्रदेशांत २४ द्रोण, महाराष्ट्रांत साडे तेरा द्रोण पाउस पडतो अशी नोंद ग्रंथकारानें केली असून '**आतितम परान्तानाम्**' कोंकणांत अतिशय पाऊस पडतो असा मोघम शेरा त्यानें मारिला आहे. सध्यांचा इंच आणि पूर्वींचा हा द्रोण यांचें बरोबर प्रमाण जर कोणी पंडित बसवील तर हल्लीं पाऊस कमी झाला कीं जास्त झाला ? ह्या विवादी प्रश्नाचा निस्संदिग्ध निकाल लागेल !

उत्तम पीक येण्यास साधारणतः कोणत्या प्रदेशांत किती पाऊस पाहिजे हें ठरलेलें असतें, त्यापैकीं श्रावण आणि कार्तिक ह्या दोन महिन्यांत एक तृतीयांश आणि पावसाळ्याच्या इतर महिन्यांत दोन तृतीयांश पाऊस पडला असतां पीक चांगलें येतें असें कौटिल्याचें म्हणणें आहे. तो म्हणतोः—

वर्षात्रिभागः पूर्वपश्चिममासयोः द्वौ त्रिभागौ मध्यमयोः

पूर्व आणि पश्चिम मास म्हणजे श्रावण आणि कार्तिक आणि मधले दोन मास म्हणजे भाद्रपद आणि आश्विन असा याचा खुलासा टीकाकारानें केला आहे.

टीकाकाराचें मत बरोबर असेल तर प्रस्तुत पावसाळा एक महिना मागें हटला असल्यामुळें आपण पाऊस कसा पडला हें पहातांना श्रावणाबद्दल आषाढ आणि कार्तिकाबद्दल अश्विन महिना धरणें जरूर आहे.

गुरूची स्थिति, गति आणि गर्भाधान; शुक्राची गति आणि त्याचे उदयास्त व सूर्याचें स्वाभाविक आणि अस्वाभाविक दृश्य यांवरून पावसाचें भविष्य ठरवावें असें अर्थशास्त्रकाराचें मत आहे. तो म्हणतो, सूर्यावरून रोप कसें येईल हें समजतें; गुरुवरून धान्यप्राप्तीचें अनुमान करितां येतें आणि शुक्रावरून पाऊस कसा पडेल हें कळतें.

वाऱ्याचा अडथळा न येतां आणि ऊन नसतां नांगरकीचीं तीन तासें होईपर्यंत सारखा पाऊस लागला तर पीक चांगलें येईल असें समजावें; असें सांगून ग्रंथकारानें कोणतीं धान्यें केव्हां पेरावीं याची माहिती दिली आहे.

तुषारपायनमुष्णशोषणं चासप्तरात्रादिति धान्यबीजानां

भाताचें बीं सात रात्री खारींत ठेवून सात उनें दिलीं आणि उडीद, मूग इत्यादि द्विदल धान्यांचें बीं तीन रात्री खारींत ठेवून तीन उनें दिलीं म्हणजे उत्तम पीक देणाऱ्या पेऱ्यास लायक होतें. उसाला मध, तूप, डुकराची चरबी आणि गोमय यांच्या मिश्रणानें लिंपावें. नानाप्रकारच्या कंदमूळांस मध आणि तूप यांचा लेप द्यावा आणि कपाशीला नुसत्या गोमयांतच भिजवावें म्हणजे त्यांपासून पीक चांगलें येतें. आळीं भाजलींच पाहिजेत असें सांगून त्यांत लावलेल्या झाडांस हाडांचें आणि शेणाचें खत योग्य वेळीं द्यावें. आणि रोप मोठें झाल्यावर त्यांस माशांचें खत घालावें. असें कौटिल्याचें मत आहे.

सरकी आणि सर्पाची कात यांचा धूर केल्याजागीं सर्पाचा उपद्रव होणार नाहीं. शेतांत किंवा धान्य सांठविण्याच्या जागीं काम करणाऱ्या लोकांस लागेल तेवढें पाणी पुरवावें; पण विस्तव मुळींच देऊं नये असें सांगून धान्याच्या उडव्या कशा रचाव्या आणि धान्यें मळण्याचीं खळीं कशीं असावीं हें सांगण्यासहि कौटिल्यानें कसर केली नाहीं; परंतु प्रस्तुत रूढ असलेल्या प्रकारांपेक्षां वेगळें आणि विशेष महत्वाचें असें त्यांत कांहींच नसल्यामुळें आम्हीं येथें त्याचा विस्तार केला नाहीं. मराठींत रूढ असलेला '**खळें**' हा शब्द संस्कृत भाषेंतील **खल** शब्दापासूनच आलेला आहे.

नानाविध कच्चीं द्रव्यें कशीं आंबवावयाचीं आणि भट्टया लावून त्यांपासून मद्य कसें तयार करावयाचें याची माहिती असलेल्या लोकांच्या मदतीनें, किल्ल्यावर, शहरांत अथवा छावणींत दारू गाळण्याचे सरकारी फड चालविणाऱ्या अधिकाऱ्यास–

सुराध्यक्ष

असा हुद्दा होता. दारूची मागणी असेल त्याप्रमाणें राजाच्या हिताकडे लक्ष ठेवून दारूविक्रीचे परवाने कमजास्त सोडण्याचा अधिकार सुराध्यक्षाला दिलेला असे. एका गांवाहून दुसऱ्या गांवास दारू नेण्याची बंदी असून गुत्ते एका नजीक एक उघडतां येत नसत.

दारूमुळें कामकऱ्यांच्या हातांतलें काम बिघडतें, सभ्य लोकांच्या सभ्यतेला आणि सद्गुणाला काळिमा लागते आणि धाडसी लोक अविचाराचीं कृत्यें करण्यास प्रवृत्त होतात म्हणून गिऱ्हाइकाच्या योग्यतेप्रमाणें त्यास कमजास्त दारू विकावी असें ठरविलें होतें. चांगल्या वर्तनाच्या लोकांना मात्र दुकांना-बाहेर दारू नेण्याची परवानगी असे. बाकीच्या गिऱ्हाइकांनीं—

पानागारेषु वा पिबेयुरसञ्चारिणः

दारू दुकानांतच पिऊन टाकली पाहिजे असा नियम होता. एखाद्या दारूबाजाजवळ त्याच्या ऐपतीबाहेर असलेला माल आढळून आल्यास अथवा तो आपल्या मिळकतीपेक्षां अधिक पैसा दारू घेण्यांत खर्चीत आहे असें दिसल्यास दुकाना-बाहेर आणून त्याला एकदम कैद करीत. ताजी दारू केव्हांहि ठरवून दिलेल्या किंमतीपेक्षां कमी दरानें विकतां येत नसे. वाईट दारू दुकानांत विकण्याची बंदी होती. मजुरकरांना मजुरीच्या मोबदल्यांत, अशी वाईट दारू देतां येत असे. वहानाच्या जनावरांस अथवा डुकरांस ही दारू पाजण्याला प्रतिबंध नव्हता.

दारूच्या गुत्त्यांत कित्येक खोल्या असून त्यांत गिऱ्हाइकांच्या निजण्या बसण्याची व्यवस्था केलेली असे; इतकेंच नाहीं तर त्यांतः—

गन्धमाल्योदक वन्त्यृतुसुखानि कारयेत्

ऋतुपरत्वें सुगंधित द्रवें पुष्पहार आणि रुचकर पेयें ग्राहकांच्या सुखार्थ ठेविलेलीं असत. प्रत्येक गुत्त्यावर गुप्त हेर राहून ते, कोणी आपल्या मिळकतीबाहेर खर्च करीत आहे कीं काय, परस्थ ग्राहक कोण आहेत, दारूच्या

धुंदींत देहभान विसरून लोळत पडलेल्या दारूबाजांपैकीं कोणाच्या अंगावर काय कपडे आहेत आणि कोणाजवळ काय जिन्नस आहेत इत्यादि गोष्टींची नोंद करीत. बेभान होऊन दुकानांत पडलेल्या गिऱ्हाइकाचें जें नुकसान होईल तें दुकानदारास भरून द्यावे लागे; इतकेंच नाहीं तर त्याच्या ह्या कसुरीबद्दल त्याला दंडहि करण्यांत येत असे

मेदक, प्रसन्न, आसव, अरिष्ट, मैरेय आणि मधु असे मद्याचे निरनिराळे सहा प्रकार असून बीजबंध, श्वेतसुरा, सहकारसुरा इत्यादि पुष्कळ उपप्रकारहि होते. कच्या द्रव्यापासून हे सर्व प्रकार कसे तयार करावे याची माहिती ग्रंथकारानें दिली आहे. विशेष प्रसंगीं, म्हणजे विवाहादि कार्यांचे वेळीं, स्वतःच्या उपयोगाकरितां श्वेतसुरा आणि औषधीकरितां कांहीं जातींचीं अरिष्टें गाळण्याची परवानगी कुटुंबी गृहस्थांस देण्यांत येत असे.

उत्सव, समाज आणि यात्रा प्रसंगीं चार दिवस खासगी रीतीनें दारू तयार करण्याची परवानगी देत अथवा मद्यपानावरील नियंत्रण शिथिल करीत. अशा प्रसंगीं दारू गाळण्याच्या परवान्याबद्दल सरकारांत भरावयाचा पैसा आणि गुन्हेगारांस होणारा दंड अधिकाऱ्यांनीं जागच्या जागीं वसूल करावयाचा असे. स्त्रिया आणि मुलें यांस दारूची गोडी लागलेली नसते म्हणून दारूच्या फडांत प्रत्यक्ष काम करण्याकडे बहुधा त्यांचीच नेमणूक करण्यांत येत असे.

दारूचें व्यसन मध्यंतरीच्या काळांत बंद पडलें असावें आणि म्हणूनच तें इंग्रजांमुळें इकडे आलें असें म्हणण्याची वहिवाट पडली असावी असें दिसतें. मद्यपानास आळा पडला पाहिजे किंबहुना तें अजिबात नाहींसें झालें पाहिजे असें लोकांप्रमाणेंच सरकारी अधिकाऱ्यांसहि अलिकडे वाटूं लागलें आहे. मद्यपानास आळा कसा घालतां येईल याविषयीं लोकांचे अभिप्राय घेऊन आपलें मत जाहीर करण्याकरितां सरकारांतून एका मंडळाची योजना झाली होती. उपरोक्त चाणाक्यकालीन परिस्थितींत या कामीं उपयोगी पडण्यासारख्या कांहीं गोष्टी सांपडतील असें आम्हांला वाटतें.

कांहीं पशुपक्षी आणि जलचर प्राणी सरकारी संरक्षणाखालीं घेतलेले असत. त्यांची शिकार करणारास दंड करण्याचा अधिकार

सूनाध्यक्ष.

नांवाच्या अधिकाऱ्याला होता. ह्या प्राणी संरक्षणाच्या हेतूनेंच कांहीं जंगलें सरकार आपणांकडे ठेवी. ह्या जंगलास '**अभयवन**' अशी संज्ञा असून त्यांतील

प्राणी मारणारास शिक्षा करण्याचेंहि कार्य सूनाध्यक्षाकडेच सोंपविलेलें असे. मांसभक्षक प्राण्याच्या वधाबद्दल जितकी शिक्षा असे त्याच्या दुप्पट शिक्षा मांस न खाणाऱ्या प्राण्याचा वध केला असतां द्यावी असा नियम होता. फांसे, सांपळे, जाळीं वगैरे साधनांनीं जीवंत प्राणी पकडण्यांत आल्यास त्यांवर एक दशांशपासून एक षष्ठांशपर्यंत जकात असून त्यांतले एक षष्ठांश प्राणी अभयवनांत सोडण्यांत येत. कांहीं जातीचे पशुपक्षी मारण्याची सक्त मनाई होती.

मृगपशूनामनस्थिमांसं सद्योहतं विक्रीणीरन्

खाटिकांनीं मृगादि अहिंस्र पशूंचें ताजें आणि हाडें काढून टाकलेलें मांस कसाईखान्यांत विकावें, अस्थिसुद्धां मांस विकल्यास त्यावर होणाऱ्या नफ्याचा कांहीं भाग सरकारांत द्यावा, तराजू आणि वजनें खरीं वापरावीं. गुरांपैकीं वांसरें, अंडील बैल आणि दुभत्या गाई मारण्याची मनाई होती. कसाईखान्याबाहेर मारलेल्या अथवा कोठेंहि मेलेल्या प्राण्याचें मांस विकण्याचा हुकूम नव्हता. ज्या प्राण्याचें मांस विकावयाचें त्याचें डोकें, तंगड्या आणि हाडें दाखवण्याकरितां राखून ठेवावीं लागत. दुर्गंधियुक्त मांस विक्रीस ठेवतां येत नसे. हे नियम मोडणारांस दंड करणें हें सूनाध्यक्षाचें काम होतें.

तारुण्य, सौंदर्य आणि कला यांनीं संपन्न अशा दोन गणिका, त्यांना चांगलीं वर्षासनें ठरवून दरबारीं ठेवणें आणि त्यांच्या गैरहजेरींत त्यांचीं कामें त्यांच्या बहिणींकडून, मुलींकडून अथवा त्यांनीं नेमून दिलेल्या दुसऱ्या लायक गणिकांकडून करून घेऊन त्यांचा तनखा त्यांस देणें, हीं कामें करणाऱ्या अधिकाऱ्यास

गणिकाध्यक्ष

असा हुद्दा होता. गणिकांचा वारसा मुलाकडे जात नसे. ह्या दोन गणिकांशिवाय राजा सिंहासनारूढ किंवा स्वारींत रथारूढ वगैरे असतां त्यावर छत्रचामरें धरणाऱ्या, पंख वारणाऱ्या, हातीं सुवर्ण कलश घेऊन त्याच्या सन्निध रहाणाऱ्या वगैरे कित्येक गणिका असत त्यांच्या नेमणुका त्यांच्या सौंदर्यावरच ठरविल्या जात.

सौभाग्यभंगे मातृकां कुर्यात्

ह्या गणिकांचें सौंदर्य नष्ट झालें ह्मणजे त्यांची नेमणूक दायांमध्यें करण्यांत येई. गणिकेची मुलगी आठ वर्षांची झाली ह्मणजे तिला राजदरबारीं नाचाला उभें

रहावें लागे. खासगी मनुष्याचा आश्रय करून एखादी गणिका जर दरबारी कामास हजर रहाणार नाहीं तर तिला आश्रय देणारास दंड भरावा लागे.

गणिकाध्यक्षानें सर्व गणिकांच्या मालमत्तेचा आणि उत्पन्नाचा तक्ता ठेवून त्यांच्या फाजील खर्चास आळा घातला पाहिजे. असा नियम असून आपल्या आईवांचून इतरांच्या ताब्यांत आपले दागिनें ठेवणाऱ्या आणि आपली मालमत्ता खरेदी देणाऱ्या अथवा गहाण टाकणाऱ्या गणिकांस दंड करण्याचा अधिकारहि त्याला होता.

वयांत न आलेल्या गणिकेशी तिच्या इच्छेविरुद्ध संबंध ठेवणारास दंड होता इतकेंच काय पण तिची इच्छा असतांहि ह्या वयांत तिच्याशीं संबंध ठेवणारास दंड होता. मात्र हा दुसरा दंड पहिल्याच्या निम्मे होता इतकेंच ! पूर्वीचे राजे गणिकेचा धंदा करणाऱ्या कुमारिकांसंबंधातहि इतकी सावधगिरी घेत हें पाहिलें ह्मणजे संमतिवयाच्या कायद्याला विरोध करणाऱ्या देशभक्तांनीं त्यावेळीं घातलेल्या नंग्या नाचाचा संताप आल्यावांचून रहात नाहीं.

गणिकांना प्रतिबंधांत ठेवणें, त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांस पळवून नेणें, त्यांना विरूप करणें, त्यांच्या आयांना आणि दासींना चोप देणें वगैरे गुन्हे हल्लींप्रमाणेंच त्यावेळींहि घडत आणि गुन्हेगारांस गणिकाध्यक्षाकडून योग्य त्या शिक्षाहि केल्या जात असत.

अमूक मनुष्याच्या आश्रयानें तूं रहा, असा सरकारी हुकूम झाला असतां जी गणिका तो अमान्य करी तिला हजार फटके खाण्याची शिक्षा देण्यांत येत होती.

भोगं गृहीत्वा द्विषत्या भोगद्विगुणो दण्डः

तनुविक्रयाबद्दल योग्य तो मोबदला घेऊन जी गणिका तो करण्याचे नाकारी तिला घेतलेल्या पैशाच्या दुप्पट दंड होत असे. यजमानाचा खून करणाऱ्या गणिकेस जीवंत जाळण्याची अथवा पाण्यांत फेकून देण्याची शिक्षा करण्यांत येत होती. गणिकांच्या यजमानांची नोंद गणिकाध्यक्षाला करावी लागे.

नट, नर्तक, वादक, गायक, वाग्जीवन म्हणजे गोष्टी सांगणारे अथवा खुषमस्करे, कुशीलव, म्हणजे निरनिराळ्या नकला करून दाखविणारे, प्लवक म्हणजे भोरपी, सौभिक म्हणजे गारुडी अथवा जादुगार, चारण, कुंटण आणि व्यभिचारी स्त्रिया यांच्या करितांहि असेच नियम असून परराष्ट्रांतून आलेल्या ह्या लोकांस आपले प्रयोग दाखविण्याबद्दल सरकारांत प्रेक्षावेतन भरावें लागे. नाटकप्रयोगादि

करमणूकींच्या साधनावर आपल्या प्रांतांत सध्यां बसलेला कर म्हणजे एक अगदींच अश्रुतपूर्व जुलूम ! असें ज्यांना वाटतें त्यांना तशा प्रकारचा कर आपणांमध्यें पंचवीसशें वर्षांपूर्वी होता हें वाचून थोडें तरी समाधान वाटेल. वेश्यांना आपली दोन दिवसांची प्राप्ति प्रतिमासिक कराच्या रूपानें सरकारांत भरावी लागे.

गणिका, दासी आणि नटी यांस नृत्य, गान, वाचन लेखन, वादन, अभिनय, चित्रकला, दुसऱ्याचे मनोगत जाणणें, सुवासिक द्रव्यें तयार करणें, निरनिराळ्या प्रकारचें पुष्पहार गुंफणें, चंपी करणें (संवाहन) आणि दुसऱ्याचें अंतःकरण वेधण्याची कला यांचें शिक्षण देणारांस सरकारी मदत मिळत असे. वेश्यांचे मुलगे नटाचा धंदा शिकत. ते आणि त्यांच्या स्त्रिया अनेक भाषा शिकत. आणि ह्या त्यांच्या गुणांमुळें परकीय गुप्तहेर ओळखण्याची महत्त्वाची कामगिरी त्यांच्याकडे देण्यांत येत असे.

समुद्र, नद्या आणि सरोवरें यांमधून फिरणाऱ्या नौकांचे जमाखर्च तपासण्याचें काम करणाऱ्या अधिकाऱ्यांस.

नावध्यक्ष

अशी संज्ञा होती. ह्याशिवाय त्यानें

तद्वेलाकूलग्रामाः क्लृप्तं दद्युः

समुद्र नद्या आणि सरोवरें, यांच्या कांठीं वसलेल्या गांवांवर. जो क्लृप्त म्हणून एक विशेष कर बसविण्यांत येत होता तोहि वसूल करावयाचा असे. सरकारी नावा, नौकहाटक नांवाचा कर घेऊन, मासे मारण्याकरितां देत. बंदराच्या गांवीं माल आणण्यावर आणि तेथून माल नेण्यावरहि जकात बसविलेली होती. सरकारी नौका उतारूंच्या सोयीसाठीं ठेवलेल्या असत. त्यांच्या भाड्याच्या जमाखर्चाचाहि हिशेब नावध्यक्षासच ठेवावा लागे. मोतीं वगैरे काढणारांसहि जरूरीप्रमाणें सरकारी नावा भाड्यानें देण्यांत येत होत्या. वादळांत सांपडलेलें एकादें गलबत जर नावध्यक्षाच्या हद्दींतील बंदरांत लागलें तर त्यावरील लोकांशीं अत्यंत प्रेमानें वागून त्यांस सर्वप्रकारची मदत करणें हें त्याचें कर्तव्य मानण्यांत येई. चांचे लोकांची गलबतें, शत्रूच्या बंदरी जाणारीं गलबतें आणि नावध्यक्षाचे नियम मोडणारीं गलबतें फोडून टाकण्याचा अधिकार नावध्यक्षाला होता.

ज्या नद्यांना हिंवाळ्यांत आणि उन्हाळ्यांत उतार नसे, त्या नद्यांत प्रवाशांच्या सोयीकरितां मोठमोठ्या नौका (महानाव) ठेवण्यांत येत. प्रत्येक नावेवर एक कपतान (शासक) एक सुकाण्या (नियामक) आणि शीड दोऱ्या वगैरे संभाळण्याकरितां कांहीं नोकर असत. लहान नद्यांवर लहान होड्या असत. ह्या उताराच्या ठिकाणीं येऊनच प्रवाशांनीं नदीपार झाले पाहिजे. भलत्याच ठिकाणीं नदी उतरून जाणारांस शिक्षा करण्यांत येत असे. कित्येक धंदेवाले आणि नोकर या नियमाला अपवाद मानण्यांत येत.

ब्राह्मण, संन्यासी, मुलें, ह्मातारी माणसें, आजारी लोक, राजदूत, गर्भिणी स्त्रिया ह्यांना नावध्यक्षाच्या शिक्क्याची मोफत प्रवास करण्याची चिठी देण्यांत येई. तरीचा उतार हल्लींप्रमाणेंच अगदीं नियमांनीं बांधून दिलेला होता.

प्रकरण सहावें.

गुरांचे कळप, त्यांच्या सुव्यवस्थेकरितां, निरनिराळ्या प्रकारानें मानण्यांत येत असत. केवळ दुधातुपाच्या मोबदल्यानें गुरें राखणेला द्यावीं तर राखणदार वासरांचे हाल करून तीं मारून टाकतात म्हणून शंभर जनावरांचा एक कळप करून त्यावर गोपाल (गाईचा गोवारी) अथवा पिण्डारक (म्हशींचा गुराखी) दोहक (गुरे पाजणारा) मन्थक (ताक करणारा) आणि लुब्धक (व्याघ्रादिकांपासून गुरांचें रक्षण करणारा शिकारी) इत्यादि पगारी माणसें नेमण्यांत येत. अशा कळपाला—

वेतनोपग्राहिक

अशी संज्ञा होती. म्हाताऱ्या, दुभत्या आणि गाभण गाई प्रत्येकीं वीस व वासरें आणि कालवडी प्रत्येकीं वीस मिळून शंभर जनावरांचा एक कळप वर्षास कांहीं तूप घेऊन पाळावयास देत अशा कळपाला.

करप्रतिकर

म्हणत. अशाच प्रकरचा पण रोगानें लागलेल्या, लुल्या पांगळ्या, एक हातीं पाजण्याची अथवा अशीच दुसरी कांहीं खोड असलेल्या शंभर गुरांचा कळप, अगदीं थोडा मोबदला घेऊन पाळावयास देत अशा कळपाला—

भग्नोत्सृष्टक

म्हणण्याची वहिवाट होती. चोरांपासून आणि हिंस्रपशूंपासून रक्षण व्हावें म्हणून उत्पन्नाचा दहावा हिस्सा देण्याचें कबूल करून, कित्येक लोक आपलीं गुरें सरकारच्या ताब्यांत देत असत. अशा गुरांच्या कळपाला

भागानुप्रविष्टक

हें नांव होतें. ही सर्व व्यवस्था ज्या सरकारी अधिकाऱ्याकडे सोपविलेली असे त्याला—

गोऽध्यक्ष

असा हुद्दा होता. खासगी आणि सरकारी अशीं जीं गुरें त्याच्या देखरेखी खालीं सोंपविण्यांत येत, त्यांचे जात, वय, परिस्थिति आणि हेतु प्रमाणें निरनिराळे कळप पाडून दोन महिने वयापासूनच्या सर्व गुरांस तप्तमुद्रा ठोकण्याची

वहिवाट होती. सर्व गुरांची त्यांच्या विशेष खुणांसह आणि रंग, वय, शिंगांचा आकार वगैरे माहितीसह जी नोंद ठेवण्यांत येत असे तिला ' व्रजपर्यग्र ' अशी विशेष संज्ञा होती.

स्वयं हन्ता घातयिता हर्ता हारयिता च वध्यः

गाईला स्वतः मारणारास अथवा दुसऱ्याकडून मारविणारास, तसेंच गाईची चोरी करणारास अथवा करविणारास, देहान्तशासन करण्यांत येत होतें. तसेंच कोणाच्या खासगी जनावराला सरकारी खुणेची तप्तमुद्रा मारणाराला दंडाची शिक्षा देत. चोरांच्या वगैरे हातून गाईची सुटका करणारास बक्षीस देण्याची वहिवाट होती.

हिंदुस्थानासारख्या कृषिप्रधान देशाचें सरकार, गायरानें राखून ठेवण्याचे कामीं जो कंजुषपणा दाखवितें, त्याला पृथ्वीच्या पाठीवरहि दुसरी जोड मिळणार नाहीं. खेडेगावाच्या सरहद्दींत अगदीं खडकाळ असे जे जमिनीचे लहान तुकडे असतील ते म्हणजे आमच्या सरकारनीं शेंकडों रुपये जमीनसारा भरणाऱ्या शेतकऱ्यांच्या गुरांकरितां राखून ठेवलेलीं गायरानें! असा प्रकार त्यावेळीं नव्हता. निरनिराळ्या ऋतूंत निरनिराळीं जंगलें गुरांकरितां मोकळीं ठेवण्यांत येत असून, तीं तशीं ठेवण्यापूर्वीं शिकारी लोकांकडून त्यांच्या कुत्र्यांच्या मदतीनें त्यांतील हिंस्र पशू घालवून लावण्यांत येत असत.

गुरें एखाद्या गावीं चरूं लागलीं म्हणजे तेथून सर्पादि सर्व हिंस्र प्राण्यांनीं पळून जावें तसेंच तीं कोठें चरताहेत हें गोवाऱ्यास समजावें, म्हणून त्यांपैकीं भित्र्या गुरांच्या गळ्यांत चांगल्या आवाजाच्या घंटा बांधण्यांत येत. इतकी खबरदारी घेऊनहि एखादें जनावर चोरीस गेलें अथवा कोणा पशूच्या भक्षस्थानीं पडलें तर त्याबद्दलची वर्दी गोवाऱ्यानें गोऽध्यक्षाकडे ताबडतोब दिली पाहिजे; असा नियम होता. ह्या कामीं त्यानें कसूर केल्यास, झालेली नुकसानी त्याजपासून भरून घेण्यांत येई. रोगानें वगैरे मेलेलें जनावर जर गुरांपैकीं असेल तर त्याचें तप्तमुद्रांकित कांतडें, तें जर बकऱ्यांपैकीं असेल तर कानांसुद्धां त्याचें कातडें, आणि तें जर गाढव आणि उंट ह्यांपैकीं असेल तर त्याचें शेंपूट आणि कातडें, रखवालदारानें गोऽध्यक्षाकडे पाठविण्याची तजवीज केली पाहिजे. तसेंच त्या जनावराची चर्बी, पित्ताशय, स्नायु, दांत, खूर, शिंगें आणि हाडेंहि त्यानें हजर करावीं असा नियम होता. अर्थात् मेलेलीं गुरें फाडण्याचें काम म्हणजे ह्या संसारांतलेंच एक

काम मानण्यांत येत असावें असें दिसतें. तें काम करण्यामध्यें हलकेपणा मानण्यांत येत नव्हता आणि तें करणारांची एक स्वतंत्र जात बनून ती हा काळपर्यंत अस्पृश्यहि ठरली नव्हती हें उघड आहे. अशा मृत जनावरांचें ताजें अथवा सुकविलेलें मांस विकण्याची परवानगी गोंवाऱ्याला होती असें ' **मांस मार्द्र शुष्कं वा विक्रीणीयुः** ' ह्या वचनावरून उघड दिसतें.

पावसाळ्याच्या सुरवातीपासून अर्धा हिंवाळा संपेपर्यंत दुभतीं जनावरें दोन्हीं वेळां पाजीत. पण बाकीच्या दिवसांत तीं फक्त सकाळीं एक वेळच पाजलीं पाहिजेत असा नियम होता इतकेंच नाहीं तर ' **द्वितीयकालदोग्धुरङ्गुष्ठच्छेदो दण्डः** ' ह्या दिवसांत कोणी तीं दोनदां पाजल्यास पाजणाराचा आंगठा तोडण्यांत येत होता. गोदोहनाची वेळ चुकूं नये म्हणूनहि अशीच खबरदारी घेण्यांत येत असे.

गाईच्या शेरभर दुधाचें एक छटाक लोणी उतरतें असें सांगितलें आहे. चरण्याकरितां एक रंगी दहा गुरांची एक अशा टोळ्या पाडून त्यांवर एक एक गोंवारी नेमलेला असे. घोडे, गाढवें, उंट आणि डुकरें यांच्याहि अशाच टोळ्या पाडीत. मेंढ्यांची लोंकर दर सहा महिन्यांनीं कातरण्यांत येत असे. कांहीं बैल, घोड्यांच्या बरोबरीनें काम करीत त्यानां जो रतीब देत त्यामध्यें मीठ, मांस, दहीं, दूध, तेल अथवा तूप, साखर अथवा गूळ आणि मद्य इत्यादि पदार्थांचा समावेश केलेला आढळतो. ह्या यादींत सामान्यतः मांसाचें नांव पाहून तर आश्चर्यच वाटतें.

अश्वाध्यक्ष.

गोऽध्यक्षाला ज्याप्रमाणें गुरांची नोंद ठेवावी लागे त्याप्रमाणें अश्वाध्यक्षाला प्रत्येक घोड्याची जात, त्याचें वय, त्याचा रंग आणि त्याचें मूळ ठिकाण यांची नोंद ठेवून, १ विक्रीला काढलेले, २ नुकतेंच विकत घेतलेले, ३ लढाईंत पाडाव करून आणलेलें ४ स्थानिक निपजीचे, ५ मदतीकरितां आलेले इत्यादि भेदपरत्वें घोड्यांची वर्गवारी करावी लागे. एखादा घोडा कुलक्षणी निघाला, अपघातामुळें व्यंग झाला अथवा आजारी पडला तर त्याबद्दलची माहिती सरकारांत जाहीर करण्याचें कामहि अश्वाध्यक्षाकडेच होतें.

यानंतर अश्वशाला कशी असावी वगैरे बद्दलची माहिती देऊन ' **वडवावृष किशोराणां एकान्तेषु** ' ह्मणजे घोड्या, वळु आणि शिंगरें यांच्या जागा

पृथक असाव्या असें सांगितलें आहे. नुकत्याच प्रसवलेल्या घोडीस पहिले तीन दिवस तूप पाजावें, पुढील दहा दिवस तिला खावयास कणिक आणि प्यावयास तेल द्यावें. शिंगराला तें दहा दिवसाचें झाल्यानंतर सहा महिनेपर्यंत दुधांत आणि तुपांत भिजवून कणीक खाण्यास घालावी. पुढें हा आहार वाढवून त्यांत शिंगरूं तीन वर्षांचें होईपर्यंत जव मिसळीत जावे. चवथ्या वर्षीं नुसतेच जव घालावे. शिंगरूं चार किंवा पांच वर्षांचें झाल्यानंतर त्याला कामाला लावण्यास हरकत नाहीं. असें अर्थशास्त्रकाराचें म्हणणें आहे.

उत्तम घोड्याच्या तोंडाची लांबी ३२ अंगुळें असून एकंदर लांबी १६० अंगुळें असते आणि जंघा २० अंगुळें असून उंची ८० अंगुळें आणि घेर १०० अंगुळें असतो. असें सांगून प्रत्येक जातीच्या घोड्यास कोणत्या प्रकारचा आहार किती द्यावा याची माहिती चाणक्यानें दिली आहे. बैलाच्या अन्नाप्रमाणेंच घोड्याच्या अन्नांतहि मांसाचा समावेश केलेला आहे.

कंभोज, सिंधु वगैरे देशांतील घोडे अत्यंत युद्धोपयोगी अशी ख्याती होती. लढाऊ घोड्यांना नियमितपणें शिक्षण देण्यांत येत असे. त्यांना ज्या चाली, गति आणि उड्डाणें शिकविण्यांत येत त्यांची माहिती देऊन कौटिल्य ह्मणतो:— गाडीचा घोडा दररोज सहा पासून बारा योजनें जातो आणि स्वारीचा घोडा एका दिवसांत पांचपासून दहा योजनें चालतो.

घोड्यांना औषधोपचार करणारे स्वतंत्र वैद्य असून त्यांच्या कसुरीमुळें सांथीचा प्रसार झाला किंवा त्यांनीं वेळच्यावेळीं औषधोपचार न केल्यामुळें एखादा घोडा मेला असें आढळून आलें तर त्या वैद्यांना दंड करण्यांत येत असे.

द्विरह्न स्नानमश्वानां गन्धमाल्यं च दापयेत्

दिवसांतून दोन वेळां घोडे धुवून त्यांना गंध आणि माला अर्पण कराव्या. आमावास्येचे दिवशीं त्यांजवरून उंडी ओंवाळून भूतानां द्यावी. पौर्णिमेच्या दिवशीं त्यांच्यावरून शुभ गीतें गावीं वगैरे कांहीं सांगून अश्वाध्यक्षाच्या कामाची यादी पुरी करण्यांत आली आहे.

ज्या जंगलांत हत्ती रहातात त्यांजवर, पीलखान्यावर, हत्तींच्या शिक्षणावर, त्यांच्या रतबिावर, त्यांच्या आलंकारांवर, त्यांना औषधोपचार करणारांवर आणि त्यांच्या महातांवर देखरेख करण्याचें काम—

हस्त्यध्यक्ष

नावाच्या अधिकाऱ्याकडे दिलेलें असे. स्वारीच्या आणि युद्धाच्या कामीं उपयोगीं पडण्यासारखे हत्ती किल्ल्यामध्यें बांधीत आणि अशिक्षित आणि खोडकर हत्ती किल्ल्याबाहेर बांधीत. हत्ती बांधण्याच्या जागा किती लांबीरुंदीच्या व उंचीच्या असाव्या, त्यांना दरवाजे किती असावे, त्यांची जमीन कशी असावी, हत्तीच्या स्नानाच्या, खाण्याच्या, व्यायामाच्या, झोंपण्याच्या आणि विश्रांतीच्या वेळा कोणत्या असाव्या इत्यादि गोष्टींची माहिती देऊन जंगलांतून हत्ती धरून आणावयाचे ते उन्हाळ्यांत आणावे. दंत न फुटलेला आणि वीस वर्षांपेक्षां कमी वयाचा हत्ती धरूं नये चाळीस वर्षें वयाचा मिळाल्यास उत्तम. जो हत्ती धरायचा त्याची उंची १४ विती आणि लांबी १८ विती असून घेर २० विती असावा. अशा हत्तीला रोज कसला आणि किती आहार घालावा तें सांगितलें आहे. हत्तीच्या आहारांत सुद्धां मद्य आणि मांस यांचा समावेश केलेला आढळतो. सध्यां देखील हत्तींना कोंबड्यांचा आहार प्रसंगविशेषीं देण्यांत येतो.

दाताच्या घेराच्या दुप्पट उंचीची जागा बुडापासून मोजून, त्या पुढील दात—हत्ती नदीकाठचा असेल तर—दर अडीच वर्षांनीं आणि तो जर डोंगरी असेल तर—दर पांच वर्षांनीं कापावे असा नियम होता.

रथाध्यक्ष

म्हणून एक अधिकारी असे. निरनिराळ्या आकाराचे आणि निरनिराळ्या कामाचे रथ बांधून घेणें, अश्वाध्यक्षाच्याच पद्धतीनें रथांच्या घोड्यांची व्यवस्था राखणें, धनुष्यधारी, गदाधारी, अशा सर्व प्रकारच्या योद्ध्यांची तयारी, चिलखतें चढविण्याची तत्परता व रथी आणि सारथी यांचें कौशल्य कसें आहे तें पहाणें आणि रथकार लोकांच्या पगाराचा वगैरे हिशेब ठेवून त्यांच्या कौशल्याप्रमाणें त्यांना विशेष बक्षिसें देणें व संतुष्ट राखणें हीं कामें त्याजकडे सोंपविलेली असत.

साधारणतः रथाची उंची १२० अंगुळें आणि रुंदि १४४ अंगुळे ठेवण्याची पद्धति होती.

पत्त्यध्यक्ष

नांवाच्या अधिकाऱ्यानें

मौलभृत श्रेणिमित्रामित्राटवी बलानां सारफल्गुतां विद्यात्

पिढीजात सैन्य, भरती केलेले सैन्य, गारदी पलटणी, मित्रराष्ट्रांकडून आलेलें

सैन्य, शत्रूचें सैन्य आणि जंगली लोकांचे सैन्य अशा सर्व प्रकारच्या सैन्याचें बलाबल कसें आहे तें लक्षपूर्वक पाहिलें पाहिजे तसेंच त्याला सपाट जमीनीवरून, डोंगरावरून कसें लढावें, कपट युद्ध कसें करावें, **खनक युद्ध** म्हणजे खंदकांतून कशी लढाई करावी, रात्री किंवा दिवसा कसे झगडावें या सर्व गोष्टींचें ज्ञान असलें पाहिजे व त्यानें ह्या कामीं सैनिकांची कवायत नेहमीं घेतली पाहिजे. ह्याच्या वरचा अधिकारी म्हणजे

सेनापति !

त्यानें आपलें हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ असें चतुरंग सैन्य सदा जय्यत तयारीनें असतें किंवा नाहीं हें पहाण्याकरितां वाटेल त्यावेळेस त्याला पुढें चालून जाण्याचा अथवा मागे सरण्याचा हुकूम सोडिला पाहिजे. शत्रूशीं लढण्याचा प्रसंग आला असतां त्याला आपल्या सैन्याला योग्य जागा कोणती आहे, हल्ला चढविण्यास अनुकूळ काळ कोणता आहे, शत्रूचें सामर्थ्य कितपत आहे, त्याच्या सैन्यांत फूट कशी पाडावी, आपलें सामर्थ्य कसें एकवटावें, किल्ल्यावर हल्ला कसा चढवावा, पुढें चाल केव्हां कशी करावी इत्यादि गोष्टींचें ज्ञान असलें पाहिजे.

छावणीमध्यें, किंवा कूच चालू असतां सैन्यामध्यें, जी शिस्त असते तीच हात घाईची लढाई चालू असतांहि राहिली पाहिजे म्हणून सेनापतीनें शिंगाचा ध्वनि, फळ्या, निशाणें वगैरे खुणा ठरवून आपल्या सैनिकांना हुकूम सोडण्याची व्यवस्था केली पाहिजे.

राष्ट्रांत प्रवेश करण्यास, राष्ट्रा बाहेर जाण्यास आणि राष्ट्रांतल्याराष्ट्रांत फिरण्यास मुद्रांकित राजपत्राची अवश्यकता असून, असें पत्र एक माष अथवा पांच गुंजाभार सुवर्ण घेऊन देण्याचा अधिकार

मुद्राध्यक्ष

नांवाच्या स्वतंत्र अधिकाऱ्याकडे दिलेला होता. राष्ट्रांतील कोणीहि मनुष्य हें मुद्रांकित पत्र घेतल्यावांचून फिरतांना आढळल्यास त्याला जो दंड करण्यांत येत असे त्यांपेक्षां दुप्पट दंड परराष्ट्रांतल्या मनुष्यास करण्यांत येत असे.

राज्यांत जीं ओसाड जंगलें असत त्या जंगलांत पुष्कळ वेळां टेहळणीच्या वगैरे कामाकरितां शत्रूचे लोक येत, सबब अशा प्रदेशांत जाणाऱ्यास मुद्रांकित राजपत्रें घ्यावीं लागत. ठराविक पैसे घेऊन हीं पत्रें देणाऱ्या अधिकाऱ्यास

विवीताध्यक्ष

ह्मणत. ओसाड प्रदेशांतच जरी विशेषतः शत्रूचे टेहळणीदार आढळत तरी लागवडीस आलेल्या प्रदेशांत ते आढळतच असत असें नाहीं; म्हणून विवीताध्यक्षाला दोनहि प्रकारच्या प्रदेशावर नजर ठेवावी लागे. तळीं, धर्मशाळा, विहिरी आणि बागा तयार करून हा अधिकारी ओसाड प्रदेशाचे एकान्त स्वरूप काढून टाकण्याचा प्रयत्न करी. प्रथम असले प्रदेश शिकारी लोकांकडून हिंस्रपशूंच्या भयापासून सुरक्षित करण्यांत येत. हें काम चालू असतां कोणी चोर, जंगली लुटारू, अथवा शत्रूचे लोक ह्या शिकाऱ्यांच्या दृष्टीस पडल्यास त्यांपासून ते आपलें स्वतःचें संरक्षण करून शंख आणि भेरी वाजवून, खबुतराबरोबर चिठ्या पाठवून अथवा अंतरा-अंतरावर होळ्या पेटवून आपल्या लोकांस आलेल्या संकटाचा इषारा देत.

द्रव्यहस्तिवनाजीवं वर्तिनीं चोररक्षणम्
सार्थातिवाह्यं गोरक्ष्यं व्यवहारं च कारयेत्

विवीताध्यक्षाला उपरोक्त कामाशिवाय इमारती लाकडांच्या आणि हत्तींची निपज होत असलेल्या जंगलांचें संरक्षण करणें, रस्ते दुरुस्त ठेवणें दरोडखोरांना पकडणें, व्यापारी प्रवाशांचें रक्षण करणें, गाईंची जोपासना ठेवणें इत्यादि आणखीहि कांहीं कामें करावीं लागत.

प्रस्तुत '**रेव्हेन्यु कलेक्टर**' नांवानें ओळखल्या जाणाऱ्या अधिकाऱ्यास '**समाहर्ता**' अशी संज्ञा होती असें दिसतें. उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अशा तीन प्रती पाडून **परिहारक** ह्मणजे इनाम गांवें, **आयुधीय** ह्मणजे लढाऊ शिपाई पुरविणारीं गांवें, निरनिराळ्या स्वरूपांत धारा भरणारी गांवें आणि धान्या-ऐवजीं सरकारी कामें करण्यास लोक पुरविणारीं गांवें, अशा चार प्रकारांत गांवांची विभागणी केलेली होती. समाहर्त्याच्या हाताखालीं पांचपासून दहा गांवांचा जमाखर्च ठेवून हल्लींच्या तलाठ्यांप्रमाणें काम करणाऱ्या अधिकाऱ्यास '**गोप**' म्हणत. प्रत्येक खेड्या संबंधानें ह्यावेळीं जी माहिती सरकार दप्तरी ठेवण्यांत येत असे तिच्या संबंधाचें अर्थशास्त्रांतील वर्णन वाचलें म्हणजे खरोखरच आश्चर्य वाटतें आणि ह्या कामीं इंग्रज सरकारची कित्येकांकडून अवास्तव स्तुति होत आहे आणि कित्येक त्यास अवास्तव दोष देत आहेत असें मनांत आल्यावांचून रहात नाहीं.

प्रत्येक खेड्याच्या हद्दी ठरविल्या असून दरएक गावांत लागवडी खालीं असलेली, बीन लागवडीची, माळाची, पाणी पुरवठ्याची, बागायती, जंगलाची वगैरे कोणती जमीन किती आहे, गावठण किती, गांवांत घरें आणि देवळें किती आहेत, स्मशानाच्या जागा किती, पाटाचें पाणी कोणत्या जमिनीस मिळतें, अन्नछत्रें आहेत कीं काय, खासगी आणि सार्वजनिक विहिरी किती व कोठें आहेत, गायरान किती आहे, जत्रा भरतात कीं काय, भरत असल्यास कोणत्या व कधीं भरतात, दळणवळणाचे मार्ग आणि साधनें कशीं आहेत इत्यादि सर्व गोष्टींची उत्तम नोंद ठेवलेली असे. बक्षिसपत्रें, खरेदी खतें, दानपत्रें आणि धाऱ्याची सूट यांची नोंद समाहर्त्याकडे व्हावीच लागे.

प्रत्येक गांवांतील घरपट्टी भरणाऱ्या आणि न भरणाऱ्या सर्व घरांवर गणतीचे अंक घालवून त्यांत रहाणारांची वर्णवार आणि धंदेवार नोंद करीत. जाती त्यावेळीं नव्हत्याच. माणसांबरोबरच प्रत्येक घरांतील पाळीव पशुपक्ष्यांचीहि नोंद होत असे. याच नोंदींत प्रत्येक घरांतील रहिवाशांकडून कोणत्या स्वरूपाचें किती सरकार देणें घ्यावयाचें याचाहि तपशील असे. ही नोंद म्हणजे खेड्यांतील प्रत्येक माणसाचें चरित्रच होतें. त्यांत प्रत्येक कुटुंबाचें वार्षिक उत्पन्न आणि त्याचा वार्षिक खर्चहि नोंदण्यांत येत असे.

गृहस्थ, व्यापारी आणि यति यांच्या रूपानें गुप्त हेर ठेवून समाहर्ता आपल्या हाताखालच्या गोप, स्थानिक (गोपांवरील अधिकारी) आणि प्रदेष्टार (स्थानिकांचा वरिष्ठ अधिकारी) ह्या अधिकाऱ्याकडून प्रत्येक गांवासंबंधानें आलेली माहितीबरोबर आहे किंवा नाहीं तसेंच गांवकरी लोक अधिकाऱ्यांस जी माहिती देतात ती कितपत खरी असते हें पहात असे.

समाहर्त्याच्या बरोबरीचा केवळ राजधानीपुरतें काम करण्यास जो अधिकारी असतो त्याला—

नागरक

असें म्हणतात. याच्या हाताखालच्या गोपाकडे दहापासून चाळीस कुटुंबासंबंधाचें सर्व सरकारी काम सोंपविलेलें असे. शहराच्या चार दिशेस चार स्थानिक नांवाचे, गोपांवर देखरेख करणारे अधिकारी असत. धर्मशाळा, देवळें, अन्नछत्रें वगैरे धर्मादाय संस्थांच्या पंचांनीं त्या त्या ठिकाणीं येणाऱ्या लोकांची माहिती आपल्या भागाच्या गोपाकडे अथवा स्थानिकाकडे दिली पाहिजे. कारागीर

आणि व्यापारी लोकांनीं आपल्या जबाबदारीवर जरूर तर इतर कारागिरांस आणि व्यापाऱ्यांस आपल्या घरीं उतरूं द्यावें तसेंच फराळाचे दुकानदार, खाणावळवाले आणि वैद्य यांनींहि आपल्या ग्राहकांची सोय लावावी पण त्यांच्याविषयीं संशय येतांच सरकारांत वर्दी दिली पाहिजे. वर्दी न दिल्यास त्यांची गणना अपराध्यांत होऊन पाहुणे आणि यजमान दोघेहि सारखेच शिक्षेला पात्र ठरत. घरच्या यजमानानें पाहुणे आल्याची सुद्धां वर्दी देणें भाग होतें.

ग्रीष्म ऋतूंत आगी बद्दल विशेष काळजी घेण्यांत येत होती असें दिसतें. दिवसाचे सारखे चार विभाग करून त्यांपैकीं मधल्या दोन विभागांत घरांत विस्तव पेटविण्याची सक्त मनाई होती. प्रत्येक घरवाल्यानें पांच घागरी आणि एक लांकडी पिंप पाण्यानें भरून ठेविलें पाहिजे. ह्याशिवाय एक शिडी, भालें वगैरे तोडण्याकरितां एक कुऱ्हाड, पाणी बाहेर उडविण्याकरितां एक सूप, जळती लांकडें ओढून काढण्याकरितां एक अंकुश अथवा हूक, गवत काढण्याकरितां एक चिमटा आणि एक दृति ह्मणजे कातड्याची पिशवी [कशा करितां ?] इतकें सामान त्याजपाशीं अगदीं जय्यत तयार पाहिजे असा नियम असून तो मोडणारा दंडास पात्र ठरत असे. उन्हाळ्यांत कोणाच्याहि घरावर केंबळीं राहूं देत नसत. सोनारासारख्या भट्टीनें काम करणाऱ्या सर्व कारागिरांनीं एकाच पेठेंत किंवा आळींत राहिलें पाहिजे असा निर्बंध होता. [**आग्निजीविन एकस्थान वासयेत**] आग कोठेंहि लागली तरी सर्व रहिवाशांनीं ती विझविण्याच्या कामीं मदत करावी, आणि मदत न करणारा दंडाला पात्र ठरावा असा कायदा होता. ज्याच्या निःकाळजीपणानें आग लागली असेल तो जरी दंडावर सुटला तरी मुद्दाम आग लावणारास मात्र जाळून ठार मारीत !

म्युनिसिपल कायद्याप्रमाणें सांप्रत ज्या गोष्टी गुन्ह्यांत गणल्या जातात त्या सर्वांचा नामनिर्देश आणि त्यांपैकीं कोणत्या गुन्ह्यास नागरकादि अधिकाऱ्यांनीं काय शिक्षा द्यावी याची माहिती अर्थशास्त्रांत दिली असून, नेमून दिलेल्या वेशी वाचून इतर वेशींनीं प्रेतें नेणें आणि तीं नेमलेल्या ठिकाणावांचून इतर ठिकाणीं जाळणें किंवा पुरणें ह्या दोनहि गोष्टी गुन्ह्यांत गणलेल्या होत्या. रात्रीं सहकारी नऊ वाजल्या पासून पहाटे चार वाजेपर्यंत रस्त्यांतील रहदारी बंद ठेवण्याकरितां ठराविक वेळीं दररोज शिंग फुकण्यांत येत असून नियम मोडणारास त्याच्या गुन्ह्याच्या मनानें दंड करण्यांत येत होता. सुयीणीच्या कामा-

करितां रोग्याच्या शुश्रूषेकरितां, प्रेतयात्रेकरितां, आग विझविण्याकरितां वगैरे रात्रीं बाहेर जाणारास पकडीत नसत. रात्रीं बाहेर पडणारानें हातांत कंदील घेऊन जावें असा नियम होता. ज्याला प्रतिबंध करावयास पाहिजे त्याला केला नाहीं आणि ज्याला नको त्याला केला तर असें करणाऱ्या पहारेकऱ्यास दंड करीत.

शहरांतील पाण्याच्या पुरवठ्याचीं ठिकाणें, तेथील गुप्त आणि सार्वजनिक रहदारीचे रस्ते, कोट आणि किल्ले वगैरे नगर रक्षणाचीं ठिकाणें ह्यांवर दररोज देखरेख ठेवणें, कोणाच्या कांहीं वस्तु सांपडल्यास त्या सुरक्षित ठेवणें, राजाच्या वाढदिवशीं परराष्ट्रावर विजय संपादन केल्याच्या आनंदानिमित्त राज्यारोहण प्रसंगीं अथवा युवराजाच्या जन्मकाळीं कांहीं कैदी बंधमुक्त करणें आणि रोजच्या हकीकतीचा अहवाल राजाकडे पाठविणें हीं कामेंहि नागरकाकडेच असत.

प्रकरण सातवें.

तीन आमात्य आणि तीन धर्मशास्त्रज्ञ यांचें एक मंडळ न्यायाच्या कामाकरितां नेमावें असें कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत सांगितलें आहे.

एकांतांत, मध्यरात्रीं आणि कपटानें केलेले व्यवहार पोकळ ठरविण्यांत येऊन ते करून घेणारे आणि देणारे व त्याबद्दलची खातरी पटविण्याकरितां साक्षीदार ह्मणून पुढें येणारे ह्या सर्वांस दंड करण्यांत येत असे. कांहीं करार ह्या नियमाला अपवाद ह्मणून सांगितले आहेत.

परावलंबी आणि अनधिकृत व्यक्तींनीं केलेले व्यवहार पोकळ ठरविण्यांत येत इतकेंच नव्हे तर—

क्रुद्धेनार्तेन मत्तेनोन्मत्तेनापगृहीतेन वा कृता व्यवहारा न सिद्ध्येयुः
व्यवहार करणारी व्यक्ति लायक असतांहि तिनें जर तो व्यवहार रागाच्या भरांत, भीतीनें ग्रस्त झाल्यामुळें, अमलाच्या धुंदींत आणि वेडाच्या भ्रमांत वगैरे केलेला असेल तर तो देखील पोकळच मानण्यांत येत होता.

ही व्यवहारपरीक्षा जशी अगदीं आजच्या सुधारलेल्या न्यायपद्धतीला धरून होती तशीच त्यावेळची काम चालविण्याची तऱ्हाहि हल्लींसारखीच होती. वादी, अथवा फिर्यादी ह्याला **वेदक** अशी संज्ञा असून प्रतिवादी किंवा आरोपी **आवेदक** संज्ञेनें ओळखला जात असे. हे दोघेहि अनुक्रमें फिर्यादीला आणि बचावाला योग्य आहेत असें पाहूनच फिर्याद नोंदण्यांत येई. ज्या व्यवहाराबद्दल फिर्याद असेल त्याबद्दलची आणि वेदकावेदकाबद्दलची तपशीलवार माहिती दाखल करून नंतर वादी प्रतिवादींच्या जबान्या घेण्यांत येत. त्या जबान्यांत त्यांचें नांव, गांव, वय, जात, धंदा यांच्याबरोबरच त्यांचें गोत्रहि लिहून घेत असत.

वादी प्रतिवादींपैकीं जो कोणी मुद्याला सोडून प्रश्न विचारील, एकदां सांगितलेल्या मजकुराशीं न जुळणारा मजकूर सांगेल, काम चालू असतां तिसऱ्या माणसाचा सल्ला घेण्याचा आग्रह धरून बसेल, 'पुढें सांग' असें न्यायाधीश सांगत असतां जो आपलें उत्तर मध्येंच थांबवील, दिलेलें उत्तर परत घेण्याचा प्रयत्न करील, स्वतःच्या साक्षीदारानें दिलेल्या जबान्या मान्य कर-

णार नाहीं आणि न्यायाधीशांची नजर चुकवून आपल्या साक्षीदाराशीं गुजगोष्टी करील तो **परोक्त** नांवाचा गुन्हा करतो असें समजून न्यायाधीश त्याला आणि पुराव्यावांचून विधानें करणाराला दंड करीत.

दाव्याचा निकाल ज्या पक्षकाराच्याविरुद्ध होईल, त्यापासून साक्षीदारांस पोटगी भत्ता (**पुरुष भृतिः**) आणि प्रवास खर्च (**पथि भक्तम्**) देववावा असा नियम होता. फिर्यादीची जबानी झाल्यावर आरोपीला जबाव अथवा कैफियत देण्यास तीन दिवसापासून दीड महिन्यापर्यंत न्यायाधीशानें योग्य दिसेल तितकी मुदत द्यावी. मुदतींत जबाब न आल्यास आरोपीला दंड करण्यांत येत होता.

चाणाक्याच्या वेळीं हिंदुसमाज प्रस्तुतप्रमाणें हजारों जातींनीं विभागलेला नव्हता. फक्त चार वर्णच मानण्यांत येत होते. ह्या चार वर्णांच्या आणि ब्रह्मचर्यादि चार आश्रमांच्या आचारांचें संरक्षण करणें हें राजाचें एक महत्त्वाचें कर्तव्य मानण्यांत येत होतें. धर्म (स्मृति) व्यवहार (वहिवाट) इतिहास(चरित्र) आणि राजानें केलेले नियम (राजशासन) हीं न्यायाचीं एकापेक्षां एक महत्त्वाचीं अंगें आहेत. न्यायानें प्रजेचें रक्षण करणारा राजा मरणोत्तर स्वर्गाला जातो; असें न करणारा राजा, राजपदाला योग्यच नाहीं. राजानें न्यायाच्या कामांत पुत्र किंवा शत्रू असा भेदच ठेवतां कामा नये असें कौटिल्याचें मत स्पष्ट आहे.

विवाहासंबंधानें विचार

करीत असतां कौटिल्यानें ब्राह्मादि आठहि प्रकारच्या विवाहाची माहिती देऊन त्यांपैकीं पहिले चार ह्मणजे ब्राह्म, प्राजापत्य, आर्ष आणि दैव हे मुलीच्या पित्यास मान्य असले ह्मणजे न्याय्य ठरतात आणि ' **मातापितृप्रमाणाः शेषाः** ' बाकीचे चार मुलीच्या आईबापांस प्रमाण असल्यास न्याय्य ठरतात; असें सांगितलें आहे. पुढें तो ह्मणतोः—' **सर्वेषां प्रीत्यारोपणमप्रतिषिद्धम्** ' विवाहाचा प्रकार कोणताहि असो त्यांत संबंध असणाऱ्या सर्वांना जर त्यापासून आनंद होत असेल तर तो विवाह खुशाल योग्य समजावा. स्त्रीधनाच्या व्ययादिकासंबंधानें विचार करितांना गांधर्व, असुर, राक्षस आणि पैशाचविधीनें निगडित झालेल्या दांपत्याकरितांहि कौटिल्यानें ज्याअर्थीं कांहीं नियम दिले आहेत त्याअर्थीं पंचवीसशें वर्षांपूर्वीं, विवाहाचे आठहि प्रकार आह्मांमध्यें रूढ होते ही गोष्ट निर्विवादपणें ठरते.

विधवा स्त्रियांना स्वतःच्या अन्नवस्त्राकरितां आपल्या दीरांवर वगैरे दावा घालण्याचा प्रसंग कौटिल्याच्या वेळीं बहुधा येत नसावा असें वाटतें. कारण जी स्त्री वैधव्यांत दिवस कंठण्यास कबूल असेल तिला तिचे अलंकार, अन्नवस्त्र आणि स्त्रीधन तावडतोब दिलें पाहिजे; विलंब लागल्यास त्याचें व्याजहि दिलें पाहिजे असा सक्त नियम होता—

कुटुम्बकामा तु श्वशुरपतिदत्तं निवेशकाले लभेत्

पतिमरणोत्तर पुनर्विवाह करून संसार थाटणाऱ्या स्त्रीनें जर आपल्या सासऱ्याच्या पसंतीच्या वराशीं पुनर्विवाह केला तर सासऱ्यानें अथवा मृत पतीनें तिजकरितां जें स्त्रीधन ठेविलेलें असेल तें तिला ह्या पुनर्विवाहाच्या वेळींच देण्यांत येत असे. मात्र तिनें जर केवळ आपल्याच इच्छेनें पति पसंत करून त्याच्याशीं पुनर्विवाह केला तर ह्या स्त्रीधनावरील तिचा सर्व हक्क नष्ट होत असे. ह्या व यापुढील विवेचनावरून कौटिल्याच्या वेळीं स्त्रियांना पुनर्विवाह करण्यास मुळींच प्रतिबंध नसून त्यांच्या मालकीचें असें कांहीं तरी स्त्रीधन होतें; आजच्या प्रमाणें पतीच्या पश्चात त्यांना सर्वस्वी परावलंबी व्हावें लागत नव्हतें ह्या गोष्टी उघड आहेत.

जीवति भर्तरि मृतायाः पुत्रा दुहितरश्च स्त्रीधनं विभजेरन्
अपुत्राया दुहितरः । तदभावे भर्ता ।

पति पूर्वीं मृत्यु पावलेल्या स्त्रीचें हें धन तिच्या मुलांनीं आणि मुलींनीं आपसांत वाटून घ्यावें. तिला मुलगे नसतील तर तें मुलींनींच आपणांत विभागून घ्यावें आणि त्यांच्या अभावीं मात्र तें तिच्या पतीला मिळावें असा तियम कौटिल्यानें घालून दिला आहे.

पुत्रार्था हि स्त्रियः

पुरुष संतति करितांच परमेश्वरानें स्त्री जात निर्माण केली आहे. अशी समजूत असल्यामुळें ज्या स्त्रीला मुलगा होत नसेल तिच्या पतीनें विवाहानंतर बारा वर्षें वाट पाहून अनेक पत्न्यांशीं विवाह करावे असें कौटिल्यानें सांगितलें आहे. अशा स्थितींत पूर्वीच्या पत्न्यांना अन्नवस्त्र आणि त्यांचें स्त्रीधन बिनतक्रार मिळालेंच पाहिजे असा कटाक्ष होता.

एकादा मनुष्य वाईट वर्तनाचा असेल, घरादाराचा त्याग करून जर कोणी फार दिवस परक्या देशांत जाऊन राहील अथवा राजद्रोह करील किंवा आपल्या

पत्नीचा खून करण्याचा प्रयत्न करील, धर्मत्याग करील किंवा पौरुष्यानें कमी असेल तर त्याच्या विवाहित स्त्रीनें त्याचा त्याग करावा असें चाणक्याचें मत होतें.

एकाद्या अविनीत पत्नीला चांगलें वळण लावावयाचें असल्यास तिच्या पतीनें '**नग्ने, विनग्ने न्यङ्गेऽपितृकेऽमातृके**' इतक्या शिव्या आणि जरूरच तर काठीचे दोरीचे किंवा तळहाताचे तीन फटके तिला लगवावे असा नियम असून यापेक्षां आपल्या पत्नीस जास्त शासन करणारा पति आणि पतीशीं दुष्टाव्यानें आणि निर्दयपणानें वागणारी पत्नी कायद्यानें गुन्हेगार ठरत असत. प्रत्यक्ष पुराव्यावांचून आपल्या पत्नीस जारिणी ह्मणणारा पतिहि गुन्हेगारच मानण्यांत येत होता. एकमेकांच्या संमतीनें पतिपत्नीला एकमेकांस काडी मोडून देतां येत होती. आपल्याला आपल्या बायकोपासून भीति आहे असें समजून जर नवरा तिचा घटस्फोट करील तर तसें करण्यापूर्वी, लग्नाच्या वेळीं तिला दिलेली सर्व मालमत्ता त्यानें तिच्या स्वाधीन केली पाहिजे. मात्र ह्याच कारणानें पत्नी जर आपल्या पतीचा घटस्फोट करील तर तिला ह्यापैकीं कांहींच मागतां येणार नाहीं. ब्राह्म, प्राजापत्य, आर्ष आणि दैव ह्यापैकीं कोणत्याहि एका पद्धतीनें झालेल्या विवाहाची काडमोड करितां येत नाहीं असें कौटिल्य ह्मणतो. कामेच्छेनें एकमेकांस खुणा करणाऱ्या, एकमेकाशीं संभाषण करणाऱ्या अथवा एकमेकांस एकांतांत भेटणाऱ्या स्त्रीपुरुषांस दंडाची किंवा पुष्कळ वेळां फटक्यांची शिक्षा देण्यांत येत होती. भीतीच्या कारणावांचून जर एखादी स्त्री आपल्या पतीचें घर सोडून दुसऱ्याच्या घरीं जाईल किंवा आपल्या घरांत परक्या स्त्रीपुरुषास घेईल तर तिला जो दंड करण्यांत येत असे त्याच्या दुप्पट दंड जर तिनें ती गोष्ट आपल्या पतीची आज्ञा उल्लंघन करून केली तर करण्यांत येत असे. तिची इच्छा नसतां जर कोणी बळजबरीनें तिच्या घरांत शिरले तर मात्र तिला गुन्हेगार समजण्यांत येत नव्हतें. नट, गवई, बजवय्ये, मत्स्यमार, पारधी, गोपाळ वगैरे आपल्या बायकांसह प्रवास करणाऱ्याबरोबर जर एखादी स्त्री आपला गांव सोडून दुसऱ्या गांवीं जातांना आढळली तर मात्र तिची गणना गुन्हेगारांत होत नसे. इतर परिस्थितींत ती गुन्हेगार ठरून तिला दंड करण्यांत येत असे.

चाणक्याच्या काळीं स्त्रियांना जी पुनर्विवाहाची मोकळीक होती, ती ब्राम्हणादि चारहि वर्णांच्या स्त्रियांस होती; इतकेंच नाहीं तर पुनर्विवाह करूं इच्छि-

णाऱ्या स्त्रियांचा पहिला पति मृतच असला पाहिजे असाहि निर्बंध नव्हता. पति नष्ट झाला, विद्या शिकण्याकरितां कोठें राहिला अथवा परदेशी गेला तर ह्या निरनिराळ्या परिस्थितींत नियमित वर्षेपर्यंत पतीची मार्गप्रतीक्षा करून त्यांनीं पुनर्विवाह करावा असें कौटिल्याचें मत होतें. तो ह्मणतोः—' **तीर्थोपरोधो हि धर्मवधः** ' ऋतुकाळीं पत्नीची हेळसांड करणें ह्मणजे स्वधर्म पराङ्मुख होणेंच आहे. तरुण स्त्रीनें तिला जर तिचें स्त्रीधन सर्व मिळालेलें असेल तर ज्याची खुशाली कळत असेल त्या पतीची फार तर दहा ऋतुकाळापर्यंत वाट पहावी आणि मग न्यायाधिकाऱ्यांच्या परवानगीनें '**यथेष्टं विन्देत**' योग्य वाटेल त्या पुरुषाशीं पुर्नविवाह लावावा. कांहीं प्रसंगीं तिनें आपल्या दिराशीं लग्न लावावें आणि दीर नसेल तर आपल्या गोत्रांतील दुसऱ्या पुरुषाशीं लावावें असेंहि चाणक्यानें सांगितलें आहे.

चाणक्याचे वेळीं आठहि पद्धतींचे विवाह, पुनर्विवाह आणि नियोगादि प्रकार रूढ असल्यामुळें अर्थातच दाय विभागासंबंधीं नियम करितांना ह्या सर्व गोष्टींकडे लक्ष पुरवावें लागलें आणि त्यामुळें त्यावेळचा दायक्रम सांप्रतच्या क्रमापेक्षां भिन्न झाला. आईबापांच्या हयातींत मुलाला पूर्वजांच्या मालमत्तेंतील आपला हिस्सा मागतां येत नव्हता. अनेक मुलांपैकीं जो मुलगा आपल्या चातुर्यानें आणि परिश्रमानें वाडिलार्जित मिळकत वाढवील त्याला त्याच्या योग्य भागाशिवाय त्यानें संपादन केलेल्या मिळकतींतील अर्धी मिळकत मिळत असे. हल्लीं प्रमाणेंच मुलगे हे बापाच्या मालमत्तेचे जरी समविभागी मानले जात तरी एखाद्यास नुसत्या मुलीच असून त्या जर पहिल्या चार म्हणजे ब्राह्मादि विवाह पद्धतींपैकीं कोणत्या तरी एका पद्धतीनें वरलेल्या स्त्रीयांपासून झालेल्या असतील तर त्याहि मुलाप्रमाणेंच बापाच्या मालमत्तेच्या समविभागी मानीत. मात्र त्या जर गांधर्वादि विवाहविधीनें वरलेल्या पत्नीपासून झालेल्या असल्या तर फक्त स्थावर मिळकतीच्या मध्येंच त्यांनां हिस्सा मिळे आणि जंगम मिळकतीचा वारसा मृताच्या भावाकडे जाई. बापाला आपल्या मिळकतीवरील कोणाहि मुलाचा वारसा योग्य कारणावांचून दूर करितां येत नव्हता.

सामान्यतः सर्व वारसदार सज्ञान झाल्यांवाचून जरी मिळकतीची वाटणी होत नसे तरी तशी वाटणी करण्याचा प्रसंग आल्यास अज्ञानाच्या हिश्यावर कर्जाचा बोजा ठेवण्यांत येत नव्हता. तो सज्ञान होईपर्यंत त्याचा विभाग त्याच्या आजो-

ळच्या मंडळीच्या अथवा गांवातील वृद्ध पंचांच्या ताब्यांत देण्यांत येत असे. वाटणीच्यावेळीं हजर नसणाराच्या वाट्याचीहि अशीच व्यवस्था करण्यांत येई. अविवाहित मुलाच्या विवाहखर्चाकरितां विवाहित मुलाच्या लग्नांत जितकी रक्कम खर्च झाली असेल तितकी निराळी द्यावी लागे. अविवाहित मुलीच्या हुंड्याची रक्कमहि वाटणीच्या वेळीं निराळी काढावी लागे. हुंड्यावर विवाहानंतरहि मुलीचीच मालकी राही आणि त्याला **प्रदानिक** असें म्हणत असत. वाटप बरोबर झालें नाहीं, कपटानें झाले वगैरे तक्रार झाल्यास तें पुन्हां करण्यांत येत असे.

अदायकंराजा हरेत्

निवारसी मिळकत हल्लींप्रमाणेंच सरकारजमा होत असे. पण ती मिळकत जर कोणा विद्वानाची असेल तर ती सरकारजमा होऊन तिचा उपयोग विद्येला उत्तेजन देण्यांतच करण्यांत यावा; असा नियम होता.

एखादा मनुष्य धर्मभ्रष्ट होण्यापूर्वीच जर विवाहित असेल आणि पुढें त्याचें वंशखंडन होण्याचा संभव असेल तर—

सृजेयुः बांधवाः पुत्रांस्तेषामंशं प्रकल्पयेत्

त्याच्या नातेवाइकांपैकीं कोणीतरी त्याच्या पत्नीच्या ठिकाणीं पुत्रोत्पत्ती करून त्याच्या मिळकतीचा वारसा त्या पुत्राकडे द्यावा; असा नियम होता.

सर्वांत वडील मुलाला कोणत्या मालमत्तेंत विशेष भाग द्यावा हें सांगतांना कौटिल्य, शुक्राचार्यांचें मत देतो कीं,:—' **ब्राह्मणानामजाः** ' **ब्राह्मणाच्या थोरल्या मुलाला घरांतल्या सर्व बकऱ्या द्याव्या.** मृत पित्याच्या वाहनावर आणि अलंकारावरहि थोरल्या मुलाचा, त्याचा बिछाना, आसन आणि त्याची जेवण्याची काशाची भांडीं (**भुक्त कांस्यं**) ह्यांवर मधल्या मुलाचा आणि त्याचीं इतर भांडीं बैलगाडी इत्यादिकांवर धाकट्याचा विशेष हक्क होता. पण हा हक्क त्या मुलांच्या वर्तनावरच अवलंबून असे. मुलीला आईच्या जेवणाचीं कांस्य पात्रें आणि तिचे अलंकार वगैरे देण्यांत येत.

कौटिल्याच्या वेळीं मिश्रविवाहाची चाल आपल्या समाजांत रूढ असल्यामुळें, त्यानें एका पुरुषाला निरनिराळ्या वर्णाच्या स्त्रियांपासून पुत्र झालेले असल्यास बापाच्या मालमत्तेची वाटणी त्यांमध्यें कशी करावी याचा विचार केलेला आहे. ' **तुल्यातुल्ययोरेकपुत्रस्सर्वं हरेत्** ' निरनिराळ्या दोन वर्णांच्या स्त्रियांपैकीं

फक्त एकीला एकच पुत्र असेल तर बापाची सर्व मालमत्ता त्याला एकट्यालाच द्यावी असा नियम होता.

नियोगाची चाल ह्यावेळीं रूढ असल्यामुळें नियोगजन्य संततीच्या वारशासंबंधानें निरनिराळ्या ग्रंथकारांचे निरनिराळे अभिप्राय दिसून येतात. कोणी ह्मणतो ज्याच्या पत्नीच्या ठिकाणीं संतति उत्पन्न करण्यांत आली त्याचीच ती समजावी आणि कोणी ह्मणतो, ज्यानें ती उत्पन्न केली त्याचीच ती मानावी ! कौटिल्य ह्मणतो '**विद्यमानमुभयम्**' संततीच्या जन्मकाळीं जे आईबाप हयात असतील त्यांची ती समजावी.

ह्या नंतर कौटिल्यानें औरस, पुत्रिकापुत्र, क्षेत्रज, गूढज, अपविद्ध, कानीन, सहोढ (सगर्भोढायाः—विवाहसमयीं गर्भवती असलेल्या पत्नी पासून झालेला पुत्र) आणि पौनर्भव अशा आठ प्रकारच्या पुत्रांची आणि दत्त, उपगत, कृतक आणि क्रीत अशा चार प्रकारांनीं पुत्रसम असणारांची माहिती देऊन त्यांचा दायक्रम आणि त्यांचे अंशविभाग वर्णन केले आहेत.

ह्यावेळीं मिश्रविवाह रूढ होता हें वर सांगितलेंच आहे. '**ब्राम्हण क्षत्रिययोरनन्तरापुत्रास्सवर्णाः**' ब्राम्हण आणि क्षत्रिय पुरुषांस अनुक्रमें क्षत्रिय आणि वैश्य पत्नीपासून झालेले पुत्र सवर्णच समजण्यांत येत होते; पण ब्राम्हणास वैश्य आणि क्षत्रियास शूद्र पत्नीपासून झालेल्या पुत्रांची गणना असवर्णांत करण्यांत येत होती. ह्यांपैकीं पहिल्यास **अम्बष्ठ** आणि दुसऱ्यास **उग्र** अशा संज्ञा होत्या. ब्राम्हणाला शूद्र पत्नीपासून झालेल्या पुत्राला **निषाद** अथवा **पारशव** म्हणत असत. हे सर्व अनुलोम पुत्र झाले. खालच्या वर्णाच्या पुरुषाला वरच्या वर्णाच्या स्त्रीपासून होणाऱ्या चाण्डाल, वैदेहक, सूत आणि मागधादि पुत्रांची गणना प्रातिलोमांत करण्यांत येत होती. पुराणांत कांहीं सूत आणि मागध आले आहेत पण कौटिल्य म्हणतो ते '**ब्रह्मक्षत्राद्विशेषतः**' ब्राम्हण आणि क्षत्रिय वर्णाच्या पुष्कळ लोकांपेक्षां श्रेष्ठ दर्जाचे होते. यापुढें अनुलोम आणि प्रतिलोम संततीचे विवाह होऊन त्यांपासून होणाऱ्या प्रजेची नांवें आणि त्यांनीं करावयाचे धंदे यांचें जें वर्णन अर्थशास्त्रांत दिलेलें आहे त्यावरून हल्लींच्या आह्मांमधील हजारों जाती मूळ कशा उत्पन्न झाल्या असतील याची थोडी तरी कल्पना आल्यावांचून रहात नाहीं.

प्रकरण आठवें.

इमारती

आपल्या देशांतील इमारतीचीं छपरें पूर्वीं केवळ आढ्यावर बसविलीं जात होतीं, असा जर कोणाचा समज असेल तर तो चुकीचा आहे. कैचीवर छपरें बसवीत आणि अशा कामाला '**सेतु**' अशी विशेष संज्ञा होती; ही गोष्ट अर्थशास्त्राच्या ६१ व्या प्रकरणावरून उघड दिसते:—

लोकांना निदान रहाण्याला तरी आरोग्यकारक ठिकाण मिळावें म्हणून मोठमोठ्या शहरांतून म्युनिसिपालिट्या, नगररचना मंडळें (Town planning committees) आणि नगरसुधारणा मंडळें (City improvement trusts) असलीं मोठमोठीं नांवें धारण करणाऱ्या संस्था धडपड करीत असतां आज त्यांकडून जें कार्य होत नाहीं तें कार्य कौटिल्याच्या वेळीं केवळ कायद्याच्या कदरीनें होत होतें असें दिसतें.

नवें घर बांधणाराला, आपण कोणाहि शेजाऱ्याच्या जमीन जुमल्याचें आतिक्रमण करीत नाहीं अशी अधिकाऱ्याची खात्री करून द्यावी लागे. **अवस्कर** म्हणजे केरकचरा टाकण्याचें ठिकाण, **भ्रम** म्हणजे नेहमीचें व विशेष प्रसंगीचें सांड पाणी शहराच्या गटाराला वाहून नेण्यासारख्या मोऱ्या, पाण्याचा पुरवठा करणारी विहीर, शौच्यकूप, पाण्याच्या टाक्या, **अग्नीच्या पूजेची जागा** आणि दळणाकांडणाची व्यवस्था, इतक्या सोयी, प्रत्येक पक्की इमारत बांधणारानें आपल्या इमारतींत केल्याच पाहिजेत असा कायदा असून त्या न करणारा शिक्षेला पात्र ठरत होता.

दोन घरांमध्यें किती अंतर असावें याबद्दल नियम असून घराच्या मुख्य दरवाजाची रुंदी किती असावी हेंहि ठरलेलें होतें. मुख्य दरवाजा सहज उघडतां आला पाहिजे, उजेडाकरितां अमूक उंचीच्या खिडक्या पाहिजेत, पावसाचा उपद्रव होऊं नये म्हणून घराच्या आढ्यावर वाऱ्यानें उडून न जाण्यासारखी व रुंद अशी हांतारी घातली पाहिजे आणि दुसऱ्याच्या हक्काला, सुखाला अथवा एकांताला बाध न येईल अशा प्रकारानें घराच्या खिडक्या वगैरे ठेवल्या पाहिजेत. अशा प्रकारचे नियम असून ते मोडणारास दंड करण्यांत येत होता.

घराच्या कोणत्याहि भागामुळें दुसऱ्याला पीडा झाली अथवा शेजारच्या इमारतीला धोका येण्याचा संभव दिसला तर घरवाल्याला जितका दंड करण्यांत येई त्याच्या दुप्पट जर ती पीडा मळमूत्रादि घाणीपासून होत असेल तर करण्यांत येई. '**मूत्रपुरीषोपघाते द्विगुणः**' घराला भाडेकरी असत. गुन्ह्याप्रमाणें उपरोक्त अपराधांबद्दल ते देखील दंडाला पात्र होत. भाडें वर्षाचें ठरे आणि कोणीहि भाडेकरी स्वतः होऊन जर वर्ष भरण्यापूर्वी घर सोडून जाईल तर त्यास वर्षाचें भाडें मालकास द्यावें लागे.

इमारतींचा विक्रय.

विक्रयाच्या किंमतीवर सरकारचा कर असल्यामुळें विक्रीचें काम बहुधा सरकारमार्फत आणि लीलावाच्या पद्धतीनें होत असावें असें दिसतें. शेतें, बागा, इमारती वगैरे विकत घेण्याचा पहिला हक्क तीं विकणाराच्या भाऊबंदांस आणि दुसरा त्याच्या शेजाऱ्यास असे. गांवांतील चाळीस-प्रतिष्ठित पंचांनीं विक्रीच्या ठिकाणाजवळ जमून त्याच्या चतुःसीमा आणि मालकाच्या संमतीनें त्याची किंमत सर्वांस जाहीर करावी. '**अनेनार्घेण कः क्रेता**' अमूक चतुःसीमेमधलें अमकें ठिकाण अमूक किंमतीस विकत घेण्याला कोण तयार आहे ? असा त्रिवार प्रश्न केल्यानंतर बिन हरकत विक्री झाल्यास ठीकच, पण चढाओढीनें किंमत वाढल्यास वाढलेली किंमत आणि तीवरील सरकारी कर, खरेदी घेणाऱ्यानें प्रथम सरकारी तिजोरींत भरणा केला पाहिजे. मालकाच्या गैरहजेरींत लीलांव घेणारा जरी दंडास पात्र ठरत असे तरी लीलावाच्या तारखेपासून सात दिवसांत जर मालक आपली तक्रार सांगण्यास समक्ष हजर रहाणार नाहीं तर झालेली विक्री कायम ठरून मिळकतीचा कबजा लीलांवदारास देण्यांत देई.

दोन गांवांच्या सीमेबद्दल तंटा

उत्पन्न झाल्यास शेजारच्या पांच दहा गांवच्या प्रातिष्ठित लोकांनीं एकत्र जमून, सृष्टिनिर्मित स्थावर अथवा मनुष्यनिर्मित जंगम खुणाच्या पुराव्यावर त्यांस जो योग्य दिसेल तो निर्णय त्यांनीं द्यावा. दुसऱ्याच्या हद्दींत अतिक्रमण करणारास आणि हद्दीच्या खुणा नष्ट करणारास दंड करण्यांत येत होता. खुणाच्या अथवा इतर पुराव्याच्या अभावीं पंचाना जर निर्णय देता येत नसेल तर तंट्याची जमीन ज्यांना फायदेशीर होईल असें राजाला वाटेल त्यास त्यानें

ती द्यावी असें कौटिल्याप्रमाणेंच मनूचेंहि मत आहे (म. ८–२६५) शेताच्या वगैरे मालकीसंबंधानें तंटा उपस्थित झाल्यास वरील पद्धतिप्रमाणेंच त्याचा निकाल करावा असें कौटिल्यानें सांगितलें आहे. हद्दीच्या निशाण्यांचा नाश करणारास दंड करण्यांत येत होता. हेंच नियम अरण्यांतील आश्रम, गुरचरणें सार्वजनिक रस्ते, स्मशानें, देवळें, यज्ञभूमि आणि यात्रेचीं ठिकाणें यांस लागू केले होते.

विहिरीवर, तळ्यावर अथवा शेतावर जावयाचें म्हणून जर कोणी मनुष्य, सार्वजनिक रस्त्यावांचून इतर रस्त्यानें जाईल आणि आपल्या जाण्यामुळें त्या रस्त्यावर पेरलेल्या पिकाची नासाडी करील तर त्यास पिकाची नुकसानी भरून द्यावी लागे. ज्या शेताला जिकडून पाणी मिळत असेल तिकडूनच तें मिळालें पाहिजे. पाणी बंद करून शेताची नासाडी करणें हा मोठाच गुन्हा मानण्यांत येई.

पाण्याचीं धरणें वगैरे बांधून नवी शेती तयार करणारास पांच वर्षें आणि अशा धरणांची दुरुस्ती वगैरे करून शेती सुधारणारास चार वर्षें शेतसारा माफ करण्यांत येत होता. पण नव्या जमिनी लागवडीस आणणाराला फक्त दोनच वर्षांचा सारा माफ केला जात होता; हें आश्चर्य आहे. पाटाच्या पाण्यावर जशी शेती करीत तशीच ती वाऱ्याच्या (पवनचक्की) आणि बैलाच्या (मोट, रहाट, वगैरे) शक्तीनें पाणी आणून त्यावरहि करीत. शेताची आणि पाण्याच्या पुरवठ्याची दुरुस्ती राखण्याची जबाबदारी शेत करणारावर असे. धान्याच्या रूपानें द्यावयाचा शेतसारा–'**यथोपकारं दद्युः**' असें म्हटलें आहे–त्यावरून शेत करणारास विशेष जाचक नव्हता ही गोष्ट उघड दिसते.

भोळ्या भाबड्या यात्रेकरूंना फसविण्याकरितां, दुसऱ्याच्या जमीनींत नवी देवळें बांधणारे आणि चैत्य स्थापन करणारे लोक जसें दंडार्ह समजले जात तसेच अशाच उद्देशानें जुनीं प्रसिद्ध देवळें वगैरे असलेल्या जमिनी गहाण अथवा खरेदी देणारे, घेणारे आणि त्यांच्या ह्या व्यवहारावर साक्षी घालणारे लोकहि दंड्य मानण्यांत येत. जुनीं देवळें वगैरे जीर्णोद्धार करण्याच्या हेतूनें कोणी असा व्यवहार केला तर मात्र त्याची गणना गुन्ह्यामध्यें होत नसे इतकेंच नव्हे तर, '**स्वाम्यभावे ग्रामाः पुण्यशीला वा प्रतिकुर्युः**' ज्या देवळांस कोणी मालक नसेल

त्यांचा जीर्णोद्धार सबंध गांवानें किंवा त्यांतील कोणाहि पुण्यात्म्यानें करावा असें चाणक्यानें आपलें मत दिलें आहे.

मनुष्यें आणि हत्तीपासून बकऱ्यापर्यंतचीं लहान मोठीं जनावरें यांचे जाण्याचे मार्ग आणि किल्ले, स्मशानें, गायरानें वगैरेंच्या वाटा आडविणारास त्यांच्या गुन्ह्याप्रमाणें दंडाची शिक्षा होत असे.

कर देणारानें आपली जमीन गहाण अगर खरेदी देणें असल्यास ती दुसऱ्या कर देणारालाच दिली पाहिजे तसेंच कर देणारानें दुसरे कर देणारे रहात असतील त्याच गांवीं राहिलें पाहिजे आणि **'ब्रह्मदेयिका ब्रह्मदेयिकेषु'** म्हणजे ब्राह्मणानें आपली इनाम जमीन तसलेंच इनाम असणाऱ्या ब्राह्मणाला दिली पाहिजे वगैरे सारखे प्रस्तुत चमत्कारिक भासणारे कांहीं कानू होते.

खेड्यांतील प्रमुख गृहस्थ जेव्हां जेव्हां त्या खेड्याच्याच कामाकरितां प्रवासाला जाईल तेव्हां तेव्हां खेड्यांतील लोकांनीं पाळीनें त्याच्या बरोबर गेलें पाहिजे. शेतकाम अथवा एखादें धार्मिक कृत्य करण्याच्या करारानें एखाद्या माणसास कांहीं पैसा अगाऊ देऊन आणिलें असतां, जर तो मनुष्य करार प्रमाणें काम करणार नाहीं तर, गांवकरी लोकांनीं त्याला दिलेल्या अगाऊ रकमेच्या आणि त्याच्या भोजनादि खर्चास लागलेल्या रकमेच्या दुप्पट दंड त्याला करावा. गांवकऱ्याचा म्हणून जेव्हां एखादा सार्वजनिक तमाशा अथवा खेळ व्हावयाचा असेल तेव्हां त्याची पूर्व तयारी करण्याच्या कामीं सर्व गांवकऱ्यांनीं यथाशक्ति मदत केली पाहिजे. मदत न करणाराच्या कुटुंबापैकीं कोणाहि माणसास तो खेळ पहाण्याची अथवा ऐकण्याची बंदी होती; इतकेंच नाहीं पण जर तो चोरून खेळ पहाण्याचा प्रयत्न करील तर त्यास आणि गांवाच्या कल्याणार्थ गांवकरी एखादें काम करीत असतां त्या कामाला वर्गणी वगैरेची मदत न देणारास दंड करण्याचा अधिकार गांवकऱ्यासच होता. सर्वांच्या कल्याणाकरितां प्रसंगविशेषीं एका माणसाला देखील सर्व गांवकऱ्यास एखादा हुकूम करण्याचा अधिकार होता आणि तो हुकूम अमान्य करणारांस दंड करण्यांत येत होता. अशा रीतीनें गांवाच्या फायद्याकरितां हुकूम करणारास संप करून जर कोणी मारतील अथवा इजा करतील तर त्यास असल्या गुन्ह्यांस नेहमीं जो दंड करण्याची वहिवाट होती त्याच्या दुप्पट दंड करीत. **उपहन्तृषु विशिष्टः ब्राह्मणतश्चैषां ज्येष्ठं नियम्येत,** आपल्या हितकर्त्यास मारणाऱ्या ह्या संपवाल्यांत जर कोणी ब्राह्मण

अथवा त्याहिपेक्षां श्रेष्ठ (?) असेल तर त्याला प्रथम शिक्षा व्हावी; तसेंच आपल्या गावांकारतां सार्वजनिक रस्ते आणि धर्मशाळा वगैरे सारख्या सार्वजनिक इमारती स्वतःच्या मेहनतीनें बांधणारांस, आपलीं खेडीं सुंदर ठेवून त्यांचें संरक्षण करणारांस राजासें '**तेषां प्रियहितं चरेत्**' त्यांच्या हिताच्या अशा कांहीं देणग्या द्याव्या असें चाणक्य म्हणतो. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांतील ग्रामव्यवस्थे संबंधाचे हे नियम वाचले म्हणजे त्यावेळचीं खेडीं हल्लींपेक्षा अधिक सुखी आणि एकोप्यानें आनंदांत काळ घालविणारीं होतीं असें दिसतें आणि 'तेऽपि नो दिवसा गताः' असे निश्वासपूर्ण सहजोद्गार निघतात!

ह्या पुढें कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत गावकीच्या गुरांच्या संबंधानें कांहीं नियम दिले आहेत. आज ठिकठिकाणीं निघालेल्या शेंकडों 'गोरक्षण' संस्थांपैकीं कांहीं जरी हे नियम कांहीं खेडेगावांत अमलांत आणण्याचा प्रयत्न करून पहातील तर त्यांचें गोरक्षणाचें कार्य सध्यांपेक्षां अधीक यशस्वी होईल; असें आम्हांला वाटतें.

प्रत्येक गांवा सभोवतीं–,**स्तम्भेस्समन्ततो ग्रामाद्धनुश्शतापकृष्टमुपशालं (सालं) कारयेत्**' गांवठणापासून शंभर धनुष्याच्या (६०० फूट) अंतरावर एक खांबांचें चांगलें मजबूत कुंपण घालावें असें कौटिल्याप्रमाणेंच मनूनेंहि म्हटलें असून मनुस्मृतीवरील टीकाकारानें त्याचा हेतु–'**गाई इत्यादिक पशूंना संचार करण्याकरितां**–असा स्पष्ट दिला आहे. गुरें चारावयाची तीं अशा रीतीनें अथवा अन्यप्रकारें राखून ठेवलेल्या गुरचरणांत आणि जंगलांतच चारलीं पाहिजेत. पोट भरल्यानंतर त्यांना कुरणांत भटकूं दिल्यास तसें करणारास दंड करण्यांत येई. मात्र—

ग्रामदेववृषा वा अनिर्दशाह वा धेनुरुक्षाणो गोवृषाश्च दण्डाः (दण्ड्याः)

गांवदेवाच्या नांवानें सोडिलेलें बैल, व्यालेली दहा दिवसांच्या आंतली गाय आणि बियाकरितां राखून ठेविलेले वळू यांच्या संबंधांत दंडाची माफी होती. मनुस्मृतींत वृषोत्सर्ग विधानानें सोडिलेल्या वृषभांचा समावेश सदर यादींत केला असल्यामुळें अर्थातच हें विधान मागाहूनचें ठरतें. गुरांनीं जित्रापाचा अथवा पिकाचा नाश केल्यास जनावराचा मालक नुकसानीच्या दुप्पट दण्ड देण्यास पात्र ठरत असे. शेताच्या मालकास अगाऊ सूचना दिल्यावांचून शेतांतून गुरें नेणारा तसेंच तीं मोकाट सोडणारा मालक दण्डार्ह मानण्यांत येई. मालकाच्या

निम्मे दण्ड गोवाऱ्यास करीत. घरांत, खळयावर, अथवा अंगणांत सांठवून ठेवलेलें धान्य गुरांनीं खाल्लें असतां यजमान आणि गोंवारी यांस मालकाची नुकसानी भरून द्यावी लागे.

पशवो रश्मिप्रतोदाभ्यां वारयितव्याः

जेथें चरणें गुन्हा होईल अशा ठिकाणीं चरत असलेलीं जनावरें हांकून काढावयाचीं तीं दोरीच्या अथवा चाबकाच्या फटकाऱ्यानें काढावीं. त्यांस अधीक इजा देणारा शिक्षेस पात्र मानण्यांत येत होता. आपल्या जागेंत पाऊल टाकल्याबद्दल अथवा मालकाच्या हरकतीमुळें अधिकाऱ्याची गाडी ओढण्यास तावडतोब न आल्याबद्दल राकेल तेलानें पशूंची कातडी भाजून टाकणारें नरपशु आजच्यासारखे कौटिल्याच्या वेळींहि असतील म्हणून त्यानें हा नियम आपल्या अर्थशास्त्रांत घातला !

कै. गुरुवर्य आगरकर म्हणतात त्या लाक्षणिक अर्थानें आमचें राष्ट्र, हें '**गुलामांचें राष्ट्र**' आहे; ही गोष्ट जरी आज आमचे पुष्कळ वाचक कबूल करतील तरी येथें खरोखरच गुलामांचा व्यापार चालत होता, माणसें विकलीं जात होतीं आणि त्यांना आपल्या इच्छेविरुद्ध लोकांच्या घरीं काबाडकष्ट करण्यांत मरेपर्यंत दिवस कंठावे लागत होते; ह्या गोष्टी मनु, विष्णु, नारद आणि कात्यायनादिकांच्या स्मृतींवरून जशा उघड दिसतात तशाच त्या कौटिल्याच्या अर्थशास्त्रावरूनहि स्पष्ट होत असल्यामुळें निदान २५ शें वर्षांपूर्वीं तरी आमच्या ह्या पवित्र आर्यभूमींत गुलामांचा अपवित्र व्यापार प्रतिष्ठितपणें चालत होता ही गोष्ट आम्हांला निदान दुःखानें तरी कबूल केलीच पाहिजे.

'**नत्वेवार्यस्य दासभावः**' आर्य वंशांतला मनुष्य केव्हांहि गुलाम असतां कामा नये, असें म्हणून चाणक्यानें जन्मतः गुलाम नसलेल्या शूद्र, वैश्य, क्षत्रिय आणि ब्राह्मण वर्णांतल्या अप्रौढ मुलास गुलाम म्हणून विकणारास, विकत घेणारास आणि ह्या व्यवहारास मदत करणारास गुलाम म्हणून विकल्या गेलेल्या मनुष्याच्या वर्णाच्या प्रमाणांत चढती शिक्षा सांगितली आहे. म्लेंच्छांनीं आपली संतति गुलाम म्हणून विकणें हा कांहीं अपराध नाहीं, असें त्याचें मत आहे. कांहीं आपत्ति टाळण्याकरितां आर्यकुलोत्पन्न मुलाला गहाण टाकण्यास हरकत नाहीं पण त्याच्या कुटुंबांतील लोकांनीं त्याला शक्य तितक्या लौकर सोडवावें. '**मूल्येन चार्यत्वं गच्छेत्**' अशा

गुलामानें आपल्या खरेदीदाराचे खरेदीचे पैसे देऊन टाकून आपली सुटका करून घेतली म्हणजे त्याची गणना पुनः आर्यांत होत होती.

कोणाहि गुलामाला त्याच्या मालकानें प्रेतवाहकाचें, भंग्याचें आणि उष्टीं काढण्याचें काम सांगणें, त्याला कपडे न देतां नग्नावस्थेंत ठेवणें, त्याला मारणें आणि शिवीगाळी करणें किंवा गुलाम जर स्त्री असेल तर तिचें पावित्र्य भ्रष्ट करणें ह्या गोष्टी गुन्ह्यांत गणल्या जाऊन मालकाचे पैसे बुडविण्यांत येत आणि गुलामांची सुटका करीत. आपलें पावित्र्य भंग होण्याचा संभव दिसतांच कित्येक प्रसंगीं तर स्त्रियांना पळून जाण्याची मोकळीक ठेवण्यांत आलेली होती. असलें पापाचरण करणाऱ्या मालकानें स्त्री गुलामाच्या खरेदी करितां दिलेली किंमतच केवळ बुडविण्यांत येत नसून त्याला निराळा दंडहि करण्यांत येत असे.

गरोदर स्त्रीला गुलाम म्हणून विकणें झाल्यास विकणाऱ्या आणि विकत घेणाऱ्या माणसांनीं तिच्या बाळंतपणाच्या खर्चाबद्दल योग्य तजवीज ठरवून ठेवावी लागे, अशी कांहीं व्यवस्था न करणारे दंडार्ह समजण्यांत येत. गुलामाची मालमत्ता त्याच्या वारसाच्या अभावी मात्र मालकाला मिळत असे. एकंदरींत विचार करितां कौटिलीय अर्थशास्त्रांत स्त्रिया, गुलाम आणि कनिष्ठ मानिलेले वर्ण यांच्या संबंधानें जे नियम आहेत; ते मनुस्मृतींतील नियमांपेक्षां फारच औदार्यपूर्ण आहेत. मनू तर—

भार्या पुत्रश्च दासश्च त्रय एवाधनाः स्मृताः
यत्ते समधिगच्छन्ति यस्य ते तस्य तद्धनम्

भार्या, पुत्र आणि दास हे कायमचे निर्धन समजावे असें सांगून त्यांच्या मिळकतीवर पतीची, पित्याची आणि मालकाची कायमची सत्ता प्रस्थापित करितो. शूद्रांविषयीं तर तो म्हणतो–"मजुरी द्यावी अथवा न द्यावी पण ब्राह्मणानें शूद्राकडून आपलें दास्य करून घ्यावें कारणः—

दास्यायैव हि सृष्टोऽसौ ब्राह्मणस्य स्वयंभुवा

" ब्राह्मणाचें दास्य करण्याकरितांच ब्रह्मदेवानें शूद्राला निर्माण केलें आहे.' कलियुगांत ब्राह्मण आणि शूद्र अशा दोनच जाती अस्तित्वांत आहेत हें म्हणणें खरें मानिलें तर हिंदुस्थानांतील प्रत्येक ब्राह्मणाची तैनात, एखाद्या अधिराजापेक्षांहि

जास्त रीतीनें उठविण्याला हजारों फुकटचे चाकर निर्माण करून ठेवल्याबद्दल भूदेवानें ब्रह्मदेवाचे अहोरात्र आभार मानावे दुसरें काय ! हीं असलीं वचनें पाहिली ह्मणजे मनुस्मृति ही ब्राह्मणाच्या वर्चस्वाकरितां बऱ्याच अलीकडच्या काळा-पर्यंत लिहिली जात होती आणि अर्थशास्त्राच्या काळीं असलीं मत्सराचीं बीजें पेरलीं गेलीं नव्हतीं ह्या गोष्टी उघड होतात.

धनी आणि चाकर

यांच्यामध्यें चाकराच्या वेतनाचा ठराव व्हावा आणि तो जवळपासच्या लोकांस माहीत असावा '**यथासम्भाषितं वेतनं लभेत**' नोकराला त्याचा ठरलेला पगार धन्यानें दिलाच पाहिजे. जेथें वेतनाचा करार पूर्वी झाला नसेल तेथें काम आणि तें करण्याकरितां खर्च झालेला वेळ यांचा विचार करून अथवा शेतकऱ्याला पिकाचा, गुराख्याला तुपाचा आणि व्यापाऱ्याला फायद्याचा दहावा हिस्सा वेतन म्हणून देण्याची वहिवाट होती. इतर प्रकारच्या नोकरांना गावांतील वहिवाटी-प्रमाणें अथवा तज्ञांच्या शिफारसीप्रमाणें वेतन देत. वेतनाचा तंटा न्यायाधीशा-समोर गेल्यास पक्षकारांच्या जबान्या आणि दुसरा साक्षीपुरावा पाहून वेतनाची रक्कम ठरविण्यांत येई. वेतन बुडवूं पहाणाऱ्या धन्यास वेतनाच्या दसपट दंड करीत.

एखादा मनुष्य एकाएकीं अगदीं प्राणांतिक संकटांत सांपडून त्यांतून आपली सुटका करणारास, आपलेंच काय पण आपल्या बायकामुलांचेहि सर्वस्व देण्याचें कबूल करतो अशा वेळीं कौटिल्य म्हणतो, '**कुशलप्रदिष्टं वेतनं दद्यात्**' संकटाचें स्वरूप आणि त्यांतून सुटका करण्याकरितां करावी लागणारी मेहनत यांविषयीं ज्यांस योग्य कल्पना असेल ते, जें सांगतील तें वेतन, मुक्तता करणारास देववावें पणः—

अतियाच्ञा तु जीयेत दौर्मत्याविनयेन वा

सुटका करणारा जर अविचारानें फाजील हाव धरून अयोग्य मोबदला मागेल तर तो केव्हांहि देवऊं नये.

एखादा मनुष्य मजुरीचे पैसे अगाऊ घेऊन एखादें काम खंडून घेईल आणि पुढें कामाची हयगय करील अथवा विनाकारण काम लांबवील तर त्याला दण्ड करून काम कराराप्रमाणें पुरे होईपर्यंत मालकाच्या स्वाधीन करण्यांत यावें असा जरी सामान्य नियम होता तरी खंडून घेतलेलें काम पुरें करून देण्यास कोण-

त्याहि कारणानें जर तो असमर्थ आहे असें दिसून येईल तर त्याला बदली देण्याची अथवा दुसऱ्याकडून आणि उशिरा काम झाल्यानें मालकाचें जें नुकसान होईल तें भरून देण्याची सवलत देण्यांत येत असे. मात्र ह्या सवलतीच्या प्रकारास कामकरी आणि मालक ह्या दोघांचीहि संमति असावी लागे.

मजुराकडून ठरलेलें काम न करून घेणारा मालक आणि ठरावाप्रमाणें मालकाचें काम न करणारा मजूर हे दोघेहि सारखेच गुन्हेगार ठरून दंडाला पात्र मानण्यांत येत. अगाऊ पैसा घेतला असल्यास खंडून घेतलेलें काम पुरें करून दिल्यावांचून मजुराला दुसऱ्या कामावर जाण्याची कायद्यानें मनाई होती. उरलेलें काम पुरें करून देण्यास कामदार तयार असतां मालक जर तें त्याजकडून पुरें करून घेणार नाहीं तर तें काम कायद्याच्या दृष्टीनें पुरें झालें, हें आपल्या आचार्यांचें मत आपणांस मान्य नाहीं असें सांगून कौटिल्य म्हणतो:—

कृतस्य वेतनं, नाकृतस्यास्ति

" वेतन, केलेल्या कामाबद्दल द्यावयाचें, न केलेल्याबद्दल नाहीं ! आतां एखादा कामदार ठरलेल्या मुदतींत आणि ठरलेल्या पद्धतीप्रमाणें काम पुरें करून देण्यास तयार असतां, मालक जर त्याला अर्धवट कामावरून दूर करण्याचा प्रयत्न करील तर तें काम पुरें झालें आहे, असें समजून जो मुशाहिरा द्यावयाचा तोच मालकाला द्यावा लागेल. कामदाराचें काम त्याच्या अडाणीपणामुळें चांगलें होत नसेल किंवा त्याच्या आळशीपणामुळें मुदतशीर होत नसेल आणि ह्या त्याच्या दोषामुळें जर मालकाचें नुकसान होण्याचा संभव असेल तर झाल्या कामाचा पैसा त्याला देऊन मालकानें त्यास कामावरून दूर करण्यास हरकत नाहीं. "

एका कारागिराला जसे हे नियम लागू होते तसेच संघानें काम करणाऱ्या कारागिरांच्या सबंध संघालाहि लागू होते. संघाला, मुदती पलीकडे सात दिवसांची सवलत देत. ह्या सात दिवसांत त्यांनीं जरूरीप्रमाणें अधिक लोक कामावर घेऊन काम पुरें करून द्यावें. 'मालकाच्या मंजूरीवांचून कामाचा कोणताहि भाग अपुरा टाकणें ' हा संघाच्या संबंधांत गुन्हा मानण्यांत येत असून संघाला ह्या गुन्ह्याबद्दल दण्ड करण्यांत येत असे.

सहकारी तत्त्वावर काम करणाऱ्या कामदारांच्या संघांतील लोकांनीं, मिळालेली मजुरी विशेष करार नसेल त्या ठिकाणीं आपआपसांत समभागानें वांटून

घ्यावी. करार असेल तेथें अर्थातच कराराप्रमाणें वाटणी व्हावी असा नियम होता. शेतकरी आणि कारखानदार यांचीं कामें करणाऱ्या मजूरांस मात्र त्यांच्या कामाच्या प्रमाणांत, सहामाही मजुरी देत. ! सामान्यतः यज्ञयागादि धार्मिक कृत्यांत कामें करणाऱ्या भिक्षुकांनांहि त्यांच्या दक्षिणादि देणग्यासंबंधानें हेंच नियम लागू केल्याचें दिसतें

दारूबाज, शूद्रस्त्रीशीं विवाहित, ब्रह्महत्या करणारा, गुरुपत्नीला भ्रष्ट करणारा, निंद्य वस्तूंचें दान घेणारा, चोर आणि अयोग्य प्रकारें यजन करणारा ब्राह्मण नेमून त्याच्या द्वारें केलेलीं यज्ञयागादि कृत्यें पुण्यप्रद घडत नाहींत; करितां हीं कर्में, असा ब्राह्मण करीत आहे असें दिसून येतांच, त्यास हाकून लावणें हा गुन्हा समजला जात नसे.

———

प्रकरण नववें.

दरमहा दरशेंकडा सवा टक्याचें व्याज जरी सामान्यतः न्याय्य म्हणून मानण्यांत येत असे तरी व्यावहारिक अथवा व्यापारी व्याज पांच टक्के, जंगली लोकांमध्यें दहा टक्के, आणि समुद्रावर सफरी करणारांमध्यें वीस टक्के पर्यंत व्याजाचे व्यवहार होत असून ते कायदेशीर समजले जात. ह्यापेक्षां जास्त व्याजाचे व्यवहार करणारांसच काय पण असे व्यवहार चाललेले माहित असतांहि त्यांबद्दल सरकारांत न कळविणारांस गुन्हेगार समजून दण्ड करण्यांत येत होता. राष्ट्राच्या हितानहितावर ज्या देवघेवींचे परिणाम घडतात त्यांचें निरीक्षण सरकारी अधिकारी मोठ्या दक्षतेनें करीत.

हल्लीं कित्येक ठिकाणीं, धान्य वाढीनें देण्याची जी वहिवाट आहे ती निदान कौटिल्याच्या काळाइतकी तरी खास पुरातन आहे ! पण चांगल्या पिकाच्या हंगामांत वाढीसुद्धां जें धान्य सावकारास मिळावयाचें त्याची किंमत मुदलाच्या दीडपटीपेक्षां अधीक होऊं नये अशी खबरदारी त्यावेळीं घेण्यांत येत होती असें दिसतें. भागानें भांडवल उभारून मोठमोठाले धंदे हल्लींप्रमाणें २५०० वर्षांपूर्वींहि करीत पण दरवर्षाच्या अखेरीस भागीदाराला नफ्याचा अर्धाभाग, व्याज म्हणून वांटून द्यावा असा नियम होता. कांहीं कारणामुळें व्याज तुंबून राहिलें तरी तें दाम दुपटीपेक्षां अधीक रहात नव्हतें.

खाजगी व्यवहारांत भलत्याच वेळीं व्याजाची मागणी करणाऱ्या, चक्रवाढ व्याज आकारणाऱ्या आणि कूळ कर्जाची फेड करित असतां फेडीचा पैसा नाकारणाऱ्या सावकारास दण्ड करावा असा कायदा होता. दिलेल्या कर्जाची रक्कम नाकारण्यास योग्य कारण असलें तरी जर कूळ फेडीचा पैसा तिन्हाइताकडे जमा करून ठेवील, तर ज्या मितीस पैसा जमा केला असेल त्या मितीपासून पुढलें व्याज पैसा नाकारणाऱ्या सावकारास देऊं नये आणि महत्त्वाच्या कारणावांचून जर तो ही रक्कम दहा वर्षांपेक्षां अधीक काळ पावेतों तशीच राहूं देईल तर ती मागण्याचा त्याचा हक्कच नष्ट करावा (**'दशवर्षोपेक्षितमृणमप्रतिग्राह्यम्'**) असें सांगून कौटिल्यानें मृत कुळाच्या कर्जाची जबाबदारी कोणावर पडेत याचें जें विवेचन केलें आहे तें बहुधा प्रस्तुत कायद्याला धरूनच असल्यामुळें आम्हांस येथें त्याचें विशेष विवेचन करण्याचें कारण दिसत नाहीं.

एखाद्या मनुष्याला अनेक सावकारांचें देणें असेल आणि जर तो आपलें गांव सोडून दूरदेशीं जात असेल तरच मात्र त्या सर्व सावकारांस त्याजकडे येणें असलेल्या कर्जाबद्दल त्यावर फिर्यादी लावितां येत. निवाडे झाले तरी ज्या अनुक्रमानें कर्ज काढलें असेल त्याच अनुक्रमानें त्याला त्या कर्जाची फेड करावी लागे. इतर परिस्थितींत सावकारांस आपल्या अनुक्रमानेंच फिर्यादी करून कर्ज वसूल करून घेणें भाग होतें. कर्जासंबंधाचे हे नियम विशेष मननीय आहेत!

दंपत्योः पितापुत्रयोः भ्रातॄणां चाविभक्तानां परस्परकृतमृणमसाध्यम्

पतिपत्नी, बापलेक, अविभक्त कुटुंबांतील बंधु यांनीं परस्परांपासून घेतलेलें कर्ज कायद्याच्या आश्रयानें वसूल करितां येत नव्हतें. शेतकरी आणि सरकारी नोकर आपलें काम करीत असतां कर्जाच्या फेडीकरितां कोणालाहि त्यांना पकडतां येत नसे. पतीनें काढिलेल्या कर्जाकरितां पत्नीला पकडण्यासंबंधांत जरी कांहीं अटी होत्या, तरी पत्नीच्या कर्जाबद्दल पतीला पकडण्यासंबंधांत कांहींच अट नव्हती; उलट हें कर्ज देण्याच्या कामीं टाळाटाळ करणारा पति गुन्हेगार ठरून दंडाला पात्र होत असे. एखादा मनुष्य ज्यावेळीं कर्ज घेतल्याचें नाकबूल करील त्यावेळीं ती गोष्ट पुराव्यानें शाबीत करावी लागे. कर्जाच्या शाबितीस एक—

साक्षीदार

केव्हांहि चालत नव्हता. विश्वासू, प्रामाणिक आणि सन्मान्य असे तीन–निदान दोनहि पक्षास कबूल असे दोन तरी–साक्षीदार अवश्य मानीत. प्रस्तुत, साक्षीदाराच्या गुणाकडे जरी न्यायाधिशांचें दुर्लक्ष दिसलें तरी संख्येकडे विशेष लक्ष्य असतें असें दिसतें! साक्षी ह्मणून स्वीकारण्यास लायक आणि नालायक कोण, कोणत्या व्यवहारांत आणि कशा प्रकारच्या गुन्ह्यांत कोणाची साक्षी घ्यावी इत्यादि गोष्टींची विस्तृत चर्चा करून कौटिल्यानें

शपथक्रिया

हा विषय आपल्या विवेचनास घेतला आहे. जबान्या घेणें त्या ब्राह्मण, जलपूर्ण घट आणि अग्नि यांच्या समक्ष घ्याव्या. साक्षीदार ब्राह्मण असला तर न्यायाधिशानें त्याला नुसतें ' खरें सांग ' येवढेंच म्हणावें; तो जर क्षत्रिय किंवा वैश्य असला तर त्याला-'तूं जर खोटें बोलशील तर केलेल्या धर्मकृत्यांचें फळ

तुला मिळणार नाहीं, इतकेंच काय पण तूं जरी शत्रूची फळी फोडून जाणारा पराक्रमी वीर असलास तरी तुला कपालपाणी होऊन भिक्षांदेही करावी लागेल!' असें बोलावें आणि साक्षीदार जर शूद्र असला तर त्याला—" तूं जर खोटी साक्ष देशील तर मागल्या आणि ह्या जन्मांतल्या तुझ्या सर्व पुण्यकृत्यांचें फळ राजाला मिळून राजानें केलेलीं सर्व पातकें तुझ्या माथीं बसतील. खरें केव्हां तरी बाहेर पडेल आणि खोटें सांगितल्याबद्दल तुला दण्ड भरावा लागेल " असें म्हणावें.

वर्णभेदाप्रमाणें शपथक्रियाभेद सांगितल्यानंतर न्यायाधिशानें जो निकाल द्यावयाचा तो कोणत्या धोरणानें द्यावा, साक्षीदारांचा खोडसाळपणा आढळून आला असतां त्यांना काय शासन करावें वगैरेचें विवेचन करून पुढें

ठेवीसंबंधानें महत्त्वाचे विचार

अर्थशास्त्रकर्त्यानें प्रदर्शित केले आहेत. त्यांवरून पहातां सध्यांप्रमाणें ज्यानें उठावें त्यानें आपलें दिवाळें वाजवावें, बाया बापड्यांच्या ठेवी खुशालपणें गिळंकृत कराव्या आणि चार दोन वर्षांच्या आंतच आपल्या आप्तेष्टांपैकीं कोणाच्या तरी नांवानें पुनः पहिल्यापेक्षां दुप्पट जोरानें नवा धंदा राजरोसपणें आरंभावा अशा प्रकारचा सभ्य बेरडपणा त्यावेळीं तरी खास चालत नव्हता असें दिसतें. ठेव स्वीकारणाराचें ठिकाण शत्रूंनीं हल्ला करून अगदीं बेचिराख केलें, अग्नीनें अथवा पुरानें त्याच्या सर्वस्वाची राखरांगोळी उडविली अथवा तें सर्व समुद्रार्पण केलें आणि मालाची ने आण करीत असतां त्याचीं गलबतें बुडालीं अथवा चांचे लोकांनीं तीं लुटून फस्त केलीं तरच मात्र ठेवी ठेवणारास त्याजवर आपल्या ठेवी परत मागण्याचा दावा करितां येत नव्हता. इतर प्रसंगीं लोकांच्या ठेवी त्याला भरून द्याव्या लागत इतकेंच नव्हे तर लबाडीनें त्यांस फसविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्याला जबर शासन करण्यांत येत होतें.

ठेवी ह्या नेहमींच पैशाच्या स्वरूपांत असतात असें नाहीं; कोणतीहि जंगम अथवा स्थावर मालमत्ता ठेव म्हणून एखाद्याकडे ठेवण्याची वहिवाट आज जशी आहे तशीच कौटिल्याच्या वेळींहि होती. ठेवीची वस्तु स्वतःच्या सुखार्थ वापरणाऱ्या पेढीवाल्यानें केवळ भोगवेतन दिलें किंवा नुकसानी भरून दिली तरी भागत नसे; ह्या शिवाय त्याला अशी वस्तु वापरण्याच्या गुन्ह्याबद्दल दण्डहि द्यावा लागे. ठेवीची वस्तु जर त्यानें गहाण टाकिली, विकली अथवा हरवली तर,

त्याला पंच सांगतील ती वस्तूची किंमत मान्य करून, मालकास त्या किंमतीच्या चौपट मोबदला आणि सरकारांत ह्या किंमतीच्या पांचपट दण्ड भरावा लागे. अर्थ-शास्त्रांत यापुढें—

गहाणाचा व्यवहार

वर्णन केला आहे. गहाण जर उत्पन्न देणारें असेल तर गहाणाच्या रकमेवर व्याजाची आकारणी होऊं नये. 'निरुपकार' अथवा अनुत्पादक गहाण असल्यास कर्ज घेणारावर व्याज वाढत असतें; अशा परिस्थितींत तो जर आपल्या सावकारास उत्पादक गहाण देण्यास कबूल असेल तर सावकारानें तें घेतलेंच पाहिजे; न घेणें हा कायद्यानें गुन्हा ठरविलेला होता. गहाण वस्तूची किंमत वाढली असतां किंवा ती कमी होण्याचा रंग दिसला असतां, न्यायाधीशाच्या परवानगीनें गहाणदारास गहाण ठेवणारासमक्ष अथवा तज्ञासमक्ष ती वस्तु विकण्याची मुभा होती.

एखादी वस्तु एखाद्या दलालामार्फत कोणाला तरी देण्यासाठीं आपण त्या दलालाच्या नोकराच्या स्वाधीन केली पण वस्तु घेऊन जाणारा मनुष्य जर ठिकाणावर सुखरूप पोंचला नाहीं किंवा चोरांनीं ती वस्तु त्याजपासून जर जबरीनें घेतली तर दलाल किंवा तो नोकर अथवा त्याचे नातेवाईक त्या वस्तूची किंमत भरून देण्यास जबाबदार समजले जात नसत.

उसन्या किंवा भाड्यानें आणिलेल्या वस्तु ज्या स्थितींत आणिल्या असतील त्याच स्थितींत त्या मालकास परत केल्या पाहिजेत असा जरी अगदीं सक्तीचा नियम होता तरी काळाचें दीर्घत्व, स्थळाचें अंतर, वस्तूच्या अंगचा उपजत दोष अथवा कल्पनातीत अपघात यांपैकीं एखाद्या कारणानें जर त्या वस्तु सांडल्या अथवा नाश पावल्या तर मालकाचें नुकसान भरून द्यावें लागत नव्हतें. एखाद्या किरकोळ माल विकणारानें घाऊक मालाच्या व्यापाऱ्याकडून कांहीं माल विक्रीकरितां आणिला आणि पुढें जरी त्या मालाची किंमत चढली अगर उतरली, तरी ज्या दिवशीं माल विक्रीकरितां आणिला त्या दिवशीं त्यानें इतरांपासून जो भाव घेतला असेल तोच भाव ह्या किरकोळ विक्री करणारानें त्याला दिला पाहिजे. घाऊक व्यापाऱ्यांच्या नोकरांना हा नियम लागू नव्हता. धन्यानें सांगितलेल्या किंमतीस माल विकावयाचा आणि विक्रीचा पैसा धन्याकडे द्यावयाचा ! भाव उतरला तर उतर-

लेल्या भावानें माल विकून पैसा मालकाकडे जमा करावयाचा येवढेंच त्यांचें काम. ठेवीसंबंधानें कौटिल्य एके ठिकाणीं म्हणतो—

अशुचयो हि कारवः

कारागिर लोकांचें वर्तन निसर्गतःच निंद्य असतें! ठेव स्वीकारणारावर कांहीं तरी तोहमत आणण्याच्या हेतूनेंच बहुधा हे कारागीर सीलबंद ठेवी ठेवितात. कौटिल्यानें हा सर्रास मारलेला शेरा सध्यां जरी आम्हांला विचित्र वाटतो तरी तो तत्कालिन स्थितीचा निदर्शक म्हणून कौतुकास्पद आहे यांत शंका नाहीं. क्रयविक्रयासंबंधाच्या एका भागांतच कौटिल्यानें

विवाहविषयक कांहीं विचार

प्रदर्शित केले आहेत. ब्राम्हणादि पहिल्या तीन वर्णांच्या विवाहांत पाणिग्रहणाचा विधि होईपर्यंत आणि शूद्रवर्णीय विवाहांत, विवाहविषयक कोणताहि धार्मिक विधि होईपर्यंत, वधू नाकारण्याचा अधिकार वराला आहे; पण वधूचें कौमार्य भ्रष्ट झालेलें आहे असें जर खात्रीनें कळेल तर पाणिग्रहणविधि झाल्यानंतरहि कोणत्याहि वर्णाच्या वराला ती भ्रष्ट वधू नाकारण्यास प्रतिबंध नव्हता. '**न त्वेवाभिप्रजातयोः**' सच्छील आणि अभिजात वधुवरांच्या संबंधांत मात्र असें करितां येत नव्हतें. आपल्या मुलीचें कौमार्य भ्रष्ट झालेलें असल्यास तसें लग्नापूर्वी तिच्या पित्यानें जाहीर केलें पाहिजे. जाहीर न करणारा पिता दण्डाला पात्र तर ठरेच पण त्याला '**शुल्कस्त्री-धनप्रतिदानं च**' घेतलेलें शुल्क आणि स्त्रीधन परत करावें लागे. वधूच्या संबंधात जशी ही अट होती तशींच वराच्या संबधानेंहि—

' वरदोषमनाख्याय विन्दतो द्विगुणः । शुल्कस्त्रीधननाशश्च ।

होती. वराच्या दोषांचा उच्चार केल्यावांचून, जर वधूचा स्वीकार करण्यांत येईल तर तसें करणारा दुप्पट दंडास पात्र ठरून शुल्क आणि स्त्रीधनाच्या रूपानें त्यानें दिलेलें द्रव्य त्याला परत मिळत नसे. लग्नासंबंधीच्या ह्या अल्प विवेचना वरून तत्कालिन अनेक चालीरीतींचें ज्ञान होण्यासारखें आहे.

चतुष्पाद पशु आणि मनुष्यादि द्विपाद प्राणी यांचा क्रय विक्रय करावयाचा म्हणजे ते चांगले मजबूत, निरोगी आणि निर्मळ असावे लागत. ते असे नाहींत असें आढळून आल्यास पशूची विक्री तीन पंधरवड्यांनीं आणि माणसांची एक वर्षानें रद्द होऊन विकणाराला शासन करण्यांत येत असे.

उपरोक्त आणि यापुढें सांगण्यांत येणाऱ्या सर्व प्रकारच्या देव घेवींचा अखेर निकाल सांगण्याकरितां कांहीं पंच नेमलेले असत आणि त्यांनीं:—

दाता प्रतिग्रहीता च स्यातां नोपहतौ यथा

देणारा आणि घेणारा ह्यांपैकीं कोणाचेंहि विनाकारण नुकसान होणार नाहीं अशा प्रकारें निकाल दिला पाहिजे; असा अगदीं सक्त नियम होता. आपलें, आपल्या पत्नीचें आणि आपल्या संततीचें जर कोणी दान केलें असेल तर त्याचा आणि अपात्रीं केलेल्या दानाचा अखेर निकाल ह्या पंचांनींच करावयाचा असें ठरलेलें होतें. एखाद्या भित्र्या माणसाला नाना प्रकारांनीं भीति दाखवून जर कोणी मनुष्य त्याजपासून मदत म्हणून कांहीं उपटील तर अशी मदत मिळविणारास दरोडेखोर समजून कडक शिक्षा करावी आणि मदत देणारालाहि शासन करावें असा नियम होता!

मृताच्या मिळकतीवर, वारसा सांगणारा त्याचा मुलगा असो, किंवा दुसरा कोणीहि असो, मृताच्या जामीनकीचें, त्यानें पतकरलेल्या हुंडा, स्त्रीधन वगैरेंच्या बाकीचें, जुगारांत त्यानें लावलेल्या पणाचें आणि स्त्री व मद्य यांच्या मोहांत गुंतून त्यानें देऊं केलेल्या देणग्यांचें जोखीम त्याजवर त्याच्या इच्छेविरुद्ध केव्हांहि लादिलें जात नव्हतें.

नाहींशी झालेली आपली वस्तु, कोणा मनुष्याजवळ आढळून आल्यास वस्तूच्या मालकानें न्यायाधिशाकडे वर्दी देऊन त्याच्या द्वारें, ज्याच्या ताब्यांत ती वस्तु आढळली असेल त्यास पकडण्याची तजवीज करावी पण इतकें करण्यास वेळाची अगर स्थळाची अडचण असेल, तर मालकानें स्वतःच त्याला पकडून न्यायाधिशासमोर हजर करावें. न्यायाधिशानें ती वस्तु त्याजपाशीं कशी आली याचा खुलासा त्यालाच करण्यास सांगावें. खरेदीनें आली असेल, पण खरेदी देणारा कोण वगैरे बद्दलची माहिती जर त्याला सांगतां येत नसेल, तर ती वस्तु, मालकानें आपली तीवरील मालकी योग्यप्रकारें सिद्ध केल्यास मालकाला देववून अथवा मालकी सिद्ध झाली नाहीं तर सरकारजमा करवून खोटीच मालकी सांगितल्याबद्दल त्याला दंड करून, ज्यापाशीं वस्तु मिळाली त्याची सुटका करावी पण जर खरेदी देणारा सांपडेल तर त्याजपासून त्यानें घेतलेली किंमत परत घेऊन शिवाय चोरीच्या गुन्ह्याबद्दल त्याला दंड करण्यांत यावा. चोरी

पुराव्यानें सिद्ध झाली आणि चोरीचा माल चोरानें नाहींसा केला असें ठरलें म्हणजे चोराला माळाची किंमत भरून द्यावी लागे इतकेंच नव्हे तर चोरीच्या गुन्ह्याबद्दल शिक्षाहि भोगावी लागे. हल्लीं प्रमाणें नुसत्या शिक्षेवर भागत नसल्यामुळें त्यावेळीं चोऱ्या कमी होत असतील असें वाटतें.

चोरीचा आणि बिनवारसी म्हणून सांपडलेला माल, प्राणी वगैरे हीं सर्व दीड महिनापर्यंत एखाद्या नाक्यावर सर्वांस पाहण्याकरितां ठेवीत, त्यांवर आपली मालकी सिद्ध करणारापासून ' **निष्क्रय** ' म्हणून ठरावाप्रमाणें थोडें द्रव्य घेऊन ज्याची वस्तु त्याला परत करण्यांत येई. मालकावांचून राहिलेल्या वस्तु सरकारजमा होत.

शत्रूच्या ताब्यांतून आणलेला प्रजेचा माल ज्याचा त्यास पावता करणें आणि:—

चोरहृतमविद्यमानं स्वद्रव्येभ्यः प्रयच्छेत्

चोरांनीं नेलेला प्रजेचा माल, चोरांपासून मिळवितां आला नाहीं तर तो राजानें आपल्या खासगीमधून भरून देणें ह्या ज्या दोन गोष्टी कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत सांगितल्या आहेत त्या ह्या सुधारलेल्या काळांत स्वातंत्र्याचा उपभोग घेत असलेल्या राष्ट्रांत देखील प्रचारांत आढळणार नाहींत. ह्यांत राजा आणि प्रजा यांचा केवळ आर्यावर्तांतच दिसून येणारा पितापुत्रासारखा परस्पर प्रेमसंबंध आणि आर्यांचाच एक विशिष्ट स्वभाव स्पष्टपणें निदर्शनास येतो.

हल्लींचा वहिवाटीचा कायदा पुष्कळ लोकांना मोठा विचित्र वाटतो, पण व्यवहारांत तशा प्रकारच्या कांहीं तरी बंधारणाची आवश्यकता असल्यामुळें चंद्रगुप्तमौर्याच्या काळींहि तो होता वहिवाटीनें मालकी हक्क प्राप्त होण्याची मुदत, सध्यां बारा वर्षांची आहे तर त्यावेळीं कित्येक बाबतींत ती दहा वर्षांची आणि कित्येक बाबतींत वीस वर्षांची होती.

दरोडा आणि चोरी

असे हल्लींप्रमाणेंच चोरीचे दोन प्रकार कौटिल्यानें मानिले आहेत. समक्ष लुबाडणें म्हणजे दरोडा अथवा ' **साहस** ' आणि न कळत घेणें ह्मणजे चोरी अथवा ' **स्तेय** ' होय. 'दोनहि प्रकारनें चोरी करणारास चोरीच्या मालाच्या किंमतीच्या मानानें दंड करण्यांत यावा;' हें कौटिल्याचें मत अगदींच चमत्कारिक वाटतें.

प्रत्यक्ष साहस अथवा चौर्य करणाराच्या दुप्पट दंड त्यांच्या सहाय्यकर्त्यास करण्यांत येत होता. यापुढें अर्थशास्त्रकारांनीं–

अपशब्द

शिवीगाळ आणि निंदा यांजबद्दलचे नियम दिले आहेत. एखाद्या अंधाला 'कायरे अंधळ्या' किंवा पंगूला 'कायरे पांगळ्या' असें म्हणणारास जो दंड करण्यांत येत असे त्याच्या दुप्पट अंधळा नसणारास अंधळा म्हणणाराला आणि चौपट, अंधळ्याला डोळस म्हणून चिडविणाराला करण्यांत येत होता. ज्याला शिवीगाळ केली त्याचा दर्जा शिवीगाळी करणारापेक्षां वरचा असेल तर जो दंड करण्यांत येई त्याच्या निम्मे दंड याच्या उलट स्थिति असतां करीत. '**परस्त्री द्विगुणः**' परक्याच्या स्त्रीला अपशब्द बोलल्यास दुप्पट दंड करण्यांत येत होता; मात्र '**प्रमादमोहादिभिरर्धदण्डः**' कोणालाहि अपशब्द बोलणारा मनुष्य जर ते बोलते वेळीं केवळ निःकाळजीपणानें, व्यसनाच्या धुंदीत, अथवा माथें फिरल्यामुळें बोलला असेल तर त्याला नेहमींच्या निम्यानें दंड करावा असा नियम होता. कोणी कोणाला क्लीब म्हटलें तर त्याला आपलें म्हणणें ज्याला तसें म्हटलें असेल त्याच्या

स्त्रीयः मूत्रफेनं अप्सु विष्ठ भिमज्जनं च

(विष्ठा पाण्यांत बुडणें) मूत्र आणि विष्टादिकांच्या ह्या परीक्षेनें सिद्ध करावें लागे. क्लीबाची ही परीक्षा पुष्कळांना नवी वाटेल यांत शंका नाहीं !

ब्राह्मणापासून अतिशूद्रापर्यंत कोणी कोणाच्या चालीरीतींची निंदा केल्यास निंदा करणारा दंडार्ह ठरत असे. तसेंच कुत्सितपणानें कोणी कोणाच्या वर्णाची, शिक्षणाची, धंद्याची आणि देशाची निंदा करणें म्हणजे गुन्हाच करणें असें मानण्यांत येई. धमकीचा समावेशहि हल्लींप्रमाणेंच गुन्ह्यांत होत असून जर कोणी मनुष्य शत्रुत्वानें दुसऱ्या कोणास दिलेल्या धमकीप्रमाणें मारील असें न्यायाधीशास आढळून आलें तर धमकी देणारापासून आमरण शांतता राखण्याबद्दल जामीन घेण्यांत येत होता.

स्वदेशग्रामयोः पूर्वं मध्यमं जातिसङ्घयोः
आक्रोशाद्देवचैत्यानां उत्तमं दण्डमर्हति

स्वदेशाची किंवा स्वतःच्या गावाची, स्वज्ञातीची किंवा ज्ञातीच्या सभेची आणि देवांची अथवा देवळांची निंदा करणें हे एकापेक्षां एक जास्त दर्जाचे गुन्हे समजले जाऊन त्यास त्याच मानानें चढत्या प्रमाणांत दंड करण्यांत येत असे.

पङ्क, भस्म, पांसु

म्हणजे चिखल, राख आणि धूळ अंगावर फेंकणें हा गुन्हा मानण्यांत येत होता. हे पदार्थ नाभीपासून शरीराच्या खालच्या भागावर फेंकले असतां जितका दंड करण्यांत येत असे त्याच्या दुप्पट ते नाभीच्यावरच्या अंगावर फेकलें असतां आणि चौपट ते डोक्यावर फेंकले असतां करण्यांत येत असे. फेंकलेले पदार्थ थुंकी, मूत्र, विष्टा इत्यादिकांसारखे घाणेरडे असल्यास दंडाची रक्कम ह्याच्या दुप्पट असे. हा गुन्हा उच्च वर्णाच्या मनुष्यानें नीच वर्णाच्या माणसाविरुद्ध केल्यास त्याला जो दंड करण्यांत येत असे त्याच्या दुप्पट ह्याच्या उलट परिस्थितींत करण्यांत येत असे. गुन्हेगार, गुन्हा करतेवेळीं बेशुद्ध वगैरे असल्यास अर्धा दंड करीत. ह्यापुढें एखाद्याला धरणें, त्याच्याशीं धक्काबुक्की करणें, त्याची ओढाताण करणें, त्याला पाडून त्याच्या छातीवर वगैरे बसणें, इत्यादि गुन्ह्यांचा विचार करून कौटिल्य म्हणतोः—

शूद्रो येनाङ्गेन ब्राह्मणमभिहन्यात्तदस्य छेदयेत्

'शूद्रानें आपल्या ज्या अवयवानें ब्राह्मणाला दुखापत केली असेल तो त्याचा अवयव छाटून टाकावा'

गुन्ह्याच्या मानानें शिक्षेचें प्रमाण असावें आणि 'एखाद्याचे डोळे काढणाऱ्या माणसाचे डोळे विषारी अंजनानें फोडावे किंवा त्याला आठशेंपट दंड करावा' असें सांगून अवयवछेदनाची शिक्षा टाळावी. असें सांगणारा कौटिल्य मारामारी सारख्या क्षुल्लक गुन्ह्याबद्दल अवयवछेदनासारखी भयंकर शिक्षा सांगेल ही गोष्ट असंभाव्य दिसतें आणि म्हणूनच पंडित शामशास्त्र्यांप्रमाणें आह्मांलाहि **शूद्रो येनाङ्गेन** हें वचन अर्थशास्त्रांत कोणीतरी मागाहून घुसडून दिलें असावें असें वाटतें. श्री. शामशास्त्री, ह्या वचनावरील टीपेंत ह्मणतात;—

"This interpolation is, perhaps, due to the hand who in a similar context (II, 218) in the yaynyaval-

kyasmrti has formed a scale of punishments under the baneful influence of caste distinctions and undue partiality to Brahmans, which are assigned no prominence in the Arthasastra."

" याज्ञवल्क्य स्मृतींत अशाच प्रकारचा विषय चालू असतां (अ. २ श्लो. २१८) जातिभेदाचें निंद्य वारें अंगांत संचारून आणि ब्राह्मणांविषयीं अयोग्य पक्षपात जागृत होऊन ज्या हातानें शिक्षेचें प्रमाण ठरविलें त्याच हातानें, जातिविषयक पक्षपाताला मुळींच महत्त्व न देणाऱ्या अर्थशास्त्रांत उपरोक्त वाक्य प्रक्षिप्त केलें असावें."

यानंतर मारामारी व साधी आणि विशेष प्रकारची दुखापत यांचा विचार करीत असतां 'फार दिवसांपूर्वी घडलेल्या गुन्ह्याबद्दल फिर्याद चालूं नये.' ह्या स्वतःच्या आचार्यांच्या मताचा निषेध करून कौटिल्य म्हणतो '**नास्त्यपकारिणो मोक्षः**' कोणीहि अपराधी, शिक्षेवांचून राहूं नये. अपराध्याला शिक्षा ही झालीच पाहिजे. 'ज्याची फिर्याद प्रथम येईल त्याचा पक्ष न्यायाचा असावा' ह्या मताचा इनकार करून कौटिल्य म्हणतोः–'**पूर्वं पश्चाद्वाऽऽगतस्य साक्षिणः प्रमाणम्**' फिर्याद प्रथम येवो किंवा मागाहून येवो, पुरावा असेल त्याप्रमाणें न्याय दिला पाहिजे.

आरोपीनें गुन्हा केला असें न्यायाधीशानें आपलें मत जाहीर करितांच जरूर तर त्याच वेळीं आरोपीनें आपला गुन्हा–रद्दीचा पुरावा हजर करावा. तो जर असें ताबडतोब करणार नाहीं, तर न्यायाधीशानें एकदम शिक्षा सांगावी.

आणखीं कांहीं गुन्ह्यांबद्दल काय शिक्षा द्यावी हें सांगून कौटिल्यानें कोणी कोणाच्या गुराढोरांस वगैरे मारलें तसेंच कोणाची लहानमोठीं झाडें वगैरे तोडिलीं तर त्याला काय शिक्षा करावी हें सांगितलें आहे. सींवेवरचीं, वट पिंपळादिकांसारखीं पूजेचीं, यात्रा, स्मशान, तपोवन वगैरे सारख्या ठिकाणचीं झाडें तोडणारांस अधीक शिक्षा असावी असें त्याचें म्हणणें आहे.

जुगार

खेळण्याची वहिवाट ह्या काळांत बरीच असावी असें दिसते. जुगारासंबंधाचें एक स्वतंत्र खातेंच असून त्यावरील अधिकाऱ्यास '**द्यूताध्यक्ष**' अशी संज्ञा होती. शत्रूचे हेर आणि तस्कर सहज पकडतां यावे म्हणून जुगाराचे अड्डे

द्यूताध्यक्षाच्या परवानगीनें कांहीं ठरावीक ठिकाणचि उघडण्यांत येत आणि ते उघडण्याचा परवाना काढण्याबद्दल कांहीं द्रव्य सरकारांत द्यावें लागे इतर ठिकाणीं जुगार खेळणें हा गुन्हा समजून खेळणारांस दंड करण्यांत येत असे.

'प्रायशो हि कितवाः कूटदेविनः' जुगारी लोक बहुधा खेळांत लबाडी करीत असतात. असें कौटिल्याचें मत असल्यामुळें जुगाराच्या अड्ड्यांना जसा सरकारी परवाना पाहिजे, असें त्याचें म्हणणें आहे, त्याप्रमाणेंच ज्या फाशांनीं जुगार खेळावयाचें ते फांसे देखील द्यूताध्यक्षापासून ठराविक भाडें देऊन घेतलेले असले पाहिजेत. लबाडी करून दुसऱ्या फाशांनीं खेळणारांस दंड झाला पाहिजे असेंहि तो म्हणतो. जुगारांत जिंकणारांपासून ह्या शिवाय शेंकडा पांच टक्के कर घेण्यांत येत होता. गहाण खरेदीचे व्यवहार पहाण्याचें काम ह्या द्यूताध्यक्षाकडेच सोंपविलेलें असे. यापुढें—

कांहीं किरकोळ गुन्हे

सांगितले आहेत, त्यांत 'संकटांत पडलेल्या मनुष्याच्या मदतीला न धांवणें, विनाकारण पळून जाणें आणि देव किंवा पितर यांच्याकरितां तयार केलेल्या अन्नानें बौद्ध, अजीवक, वृषल (शूद्र ?) आणि प्रव्राजित (Exiled persons ?) यांस मेजवानी देणें यांचा समावेश आहे. औषध देऊन (दास्या गर्भमौषधेन पातयतश्च) गर्भपात करणें हा गुन्हा यांत आला असल्यामुळें याचें प्राचीनत्व स्पष्ट होतें.

प्रकरण दहावें.

सज्जनांचें संरक्षण, आणि दुर्जनांचें शासन करणें, हें परमेश्वराप्रमाणेंच राजाचेंहि कर्तव्य असल्यामुळें राज्यांत शांतता राखण्याकरितां कौटिलीय काळीं तिघां अमात्यांची नेमणूक केलेली असून त्यांना प्रदेष्टे अशी संज्ञा होती. प्रजेवर आलेल्या संकटाचें निवारण करणें, कारागीर लोकांस शिक्षण देऊन नमुन्याबरहुकूम माल त्यांजकडून तयार करविणें, कारागीर संघांच्या ठेवी ठेवणें आणि जरूरीच्या वेळीं त्यांस पैशाचा पुरवठा करणें इत्यादि गोष्टींचा समावेश ह्या अमात्यांच्या कर्तव्यांत केलेला होता.

सर्व प्रकारच्या कारागिरांनीं गिऱ्हाइकांस ठरलेल्या मुदतींत आणि ठरलेल्या नमुन्याप्रमाणें माल तयार करून दिलाच पाहिजे अशी शिस्त असल्यामुळें ती मोडणारास दंड करण्याचा अधिकार ह्या अमात्याचा होता. कारागिराच्या निष्काळजीपणामुळें गिऱ्हाइकाचें नुकसान झाल्यास तें कारागिराकडून भरून देण्यांत येत असे.

निरनिराळ्या जातींचें रेशीम, ताग, लोंकर आणि कापूस यांचीं वस्त्रें जसा नमूना असेल तशीं विणून देणारे कारागीर होते. वस्त्रांना खळ वगैरे देण्याचें कामहि हे कारागीर करीत. दहा तोळे वजनाच्या धाग्यापासून असें खळ वगैरे लावून तयार केलेलें वस्त्र, ११ पासून १२ तोळे वजनापर्यंत तयार झालें पाहिजे. असें असतां वस्त्र वजनांत अथवा ठरलेल्या लांबीं रुंदींत कमी भरेल अथवा धाग्यांची अदलाबदल होईल तर त्या कारागिराला अमात्याकडून शासन करण्यांत येई.

रजकाः काष्ठफलकश्लक्ष्णशिलासु वस्त्राणि नेनिज्युः

परटानें धुवावयास आणलेले कपडे लांकडी फळीवर अथवा दगडाच्या माठीव शिळेवरच धुतले पाहिजेत. असें न करणाऱ्या परिटास दंड होऊन कपड्यांचें नुकसान झाल्यास तेंहि त्याला भरून द्यावें लागे. हल्लींप्रमाणेंच गिऱ्हाइकांचें कपडे वापरण्याची खोड त्या वेळच्या धोब्यांना होती म्हणून त्यांच्या खासगी कपड्यांवर सरकारी खूण करण्यांत येत असून बीन खुणेचा कपडा वापरणाऱ्या, गिऱ्हाइकांचें कपडे लोकांकडे गहाण टाकणाऱ्या अथवा भाड्यानें वगैरे देणाऱ्या, कपडे

बदलणाऱ्या आणि जास्त मुदत ठेवणाऱ्या धोब्यास दंड करण्यांत येत असे. कपड्यांना निरनिराळे रंग देण्याचें काम परीटच करीत असावे आणि खळ, इस्तरी वगैरेच्या योगानें कपड्याला हवी तितकी तकाकी देण्यांत ते मोठे निपुण असावे असें दिसतें. कशा धुलाईला किती मुदत आणि किती मजुरी ह्या गोष्टीहि सरकारी नियमानें ठरविलेल्या होत्या.

सोनाराचा धंदा करणारानें सोनें विकत घ्यावयाचें झाल्यास सरकारी अधिकाऱ्यास कळवून त्याच्या समक्ष घेतलें पाहिजे असें न करितां तो जर तें त्याच्या मूळ स्वरूपांत विकत घेईल तर त्यास जितका दण्ड करण्यांत येई त्याच्या दुप्पट दण्ड त्यानें जर तें त्याच्या बदललेल्या स्वरूपांत घेतलें तर करण्यांत येई. चोरीचा माल विकत घेण्याची सक्त मनाई होती. गुप्त रीतीनें गाळून सोनें चांगलें आहे अशी खातरी पटल्यानंतर तें '**प्रच्छन्नविरूपं मूल्यहीनक्रयेषु स्तेयदण्डः**' कमी दरानें विकत घेणारास चोरी करणारा गुन्हेगार समजून शिक्षा करण्यांत येत होती. गिऱ्हाइकानें कांहीं दागिना घडविण्याकरितां सोनें दिलें असतां अपसारण पद्धतीनें त्यांतील उत्कृष्ट सुवर्ण काढून घेऊन त्यांत अन्य धातूचा योग करणाराहि शिक्षेस पात्र ठरत असे. घडण्याच्या कामीं कोणती धातु किती घटते याचें प्रमाण ठरविलेलें होतें. जास्त घट दाखविणाऱ्या कारागिरास लबाड समजून शिक्षा करीत. कोणत्या धातूचा कोणता जिन्नस करण्याबद्दल किती मजुरी द्यावयाची हें देखील ठरलेलें होतें.

झरकपांसुधावकाः सारात्रिभागं लभेरन्

झारी आणि झाडू यांस जर रस्त्यावर किंमतवान वस्तु सांपडल्या तर त्यांनीं त्या सरकारांत हजर कराव्या म्हणजे त्यांना त्यांच्या किंमतीचा तिसरा भाग इनाम देण्यांत येईल. मात्र सांपडलेली वस्तु जर रत्नांत मोडणारी असेल तर तीवर केवळ सरकारचीच मालकी राहील असा नियम होता. सांपडलेलें रत्न मधल्यामध्यें दडपणारास जबरदस्त दंड करीत, खाणी आणि जमीनींत पुरलेलें द्रव्य ज्याला आढळेल त्यानें सरकारांत वर्दी दिली म्हणजे वर्दी देणारा जर सरकारी नोकर असेल तर त्याला सांपडलेल्या मिळकतीचा बारावा आणि इतर असेल तर सहावा भाग देण्याचा नियम होता. मात्र ही वाटणी एक लाखाच्या आंतली '**शतसहस्राद्ध्वं राजगामी निधिः**, लाखाच्या वरच्या मिळकतीचा

मालक सर्वस्वी राजा ! सांपडलेला द्रव्यनिधि आपला वाडिलोपार्जित ठेवा आहे, असें जर कोणी सद्वर्तनी मनुष्य सप्रमाण सिद्ध करील तर मात्र ती मिळकत बिनहरकत त्याच्या स्वाधीन करण्यांत येत असे.

दु:साध्य रोग्यास औषध सुरू करण्यापूर्वी वैद्यानें सरकारांत कळविलें पाहिजे. तसें न करणाऱ्या वैद्याच्या हातून जर रोगी मेला तर वैद्याला दण्ड करण्यांत येत होता.

वाद्यें वाजविणारे, नाचणारे, गाणारे, तमाशे करणारे वगैरे जे लोक असतील त्यांनीं पावसाळ्यांत एकाच गावीं रहावें. लोकांची करमणूक करीत गांवोगांव भटकूं नये. जेथें ते राहिले असतील तेथें त्यांनीं आपल्या नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें खेळ करण्यास हरकत नाहीं. पण कोणाहि माणसाला त्यांनीं आपल्या फाजील नादीं लावूं नये किंवा कोणाहि व्यक्तीच्या द्रव्याचा फाजील अपहार करूं नये; असा नियम होता व तो मोडणारास शिक्षाहि जबर होती. हा नियम आज असता तर मालक बनण्याच्या फाजील हावेनें नव्या नाटक मंडळ्या काढण्यास प्रवृत्त होणाऱ्या कित्येक उच्छृंखल नटांची मोठीच अडचण झाली असती.

एवं चोरानचोराख्यान् वणिक्कारुकुशीलवान्
भिक्षुकान् कुहकांश्चान्यान्वारयेद्देशपीडनात्.

व्यापारी, कारागीर, तमासगीर, भिक्षेकरी, जादूचे खेळ करणारे ह्या सर्वांना जरी चोर अशी संज्ञा नसली तरी कौटिल्य म्हणतो कीं हे सारे चोर आहेत आणि यांच्या त्रासापासून राजानें प्रजेचें संरक्षण केलें पाहिजे.

व्यापारावर देखरेख करण्याकरितां तर एक '**संस्थाध्यक्ष**' नांवाचा अधिकारी नेमावा असें कौटिल्याचें म्हणणें आहे. ह्या अधिकाऱ्यानें वजनें आणि मापें, ताजवे आणि तागड्या यांची तपासणी करावी आणि खोटीं वजनें वगैरे वापरणारांस त्यांच्या अपराधाप्रमाणें शिक्षा सांगावी, कोणताहि वाईट माल चांगला आहे असें भासवून तो गहाण अथवा खरेदी म्हणून एकाद्याच्या पदरीं बांधावयाचा; भलत्याच ठिकाणीं तयार झालेल्या वस्तु; त्या वस्तुंकरितां प्रसिद्ध असलेल्या ठिकाणच्या आहेत असें सांगून गिऱ्हाइकांस फसवावयाचें; मिसळीचा माल चांगला म्हणून त्याना द्यावयाचा, चांगली वस्तु दाखवून ग्राहकाची नजर चुकवून दिसण्यांत तशीच पण हलक्या किमतीची वस्तु देऊन त्यांना फसवावयाचें इत्यादि

लबाड्या आजच्या प्रमाणें २५०० वर्षांपूर्वीचे दुकानदार करीत होते. कौटिल्यानें त्यांचे गुन्हे चव्हाट्यावर आणून त्यांस शासन करण्याचें काम ह्या संस्थाध्यक्षाकडे सोंपविलें आहे.

कारागीर लोक माल तयार करून तो विक्रीकरितां प्रस्तुत जसा दुकानदारांकडे नेतात तसा त्या वेळींही नेत असावे. अशा वेळीं त्यांनीं आणलेल्या मालास उगाच नांवें ठेवून त्यांचा माल केवळ मातीच्या मोलानें पदरीं पाडून घेण्याकरितां दुकानदार लोक संप करीत असतात; असले संप राज्याच्या औद्योगिक प्रगतीस अडथळा आणणारे आहेत असें समजून त्यांत सामील होणाऱ्या दुकानदारास पुष्कळ दंड करावा अशी कौटिल्याची शिफारस आहे. दलाल लोकांनीं कोणत्या मालावर किती दलाली घ्यावी, दुकानदारांनीं देशी मालावर शेंकडा पांच आणि परदेशी मालावर शेंकडा दहाच नफा घ्यावा, अधिक घेऊं नये वगैरे नियम घालून ते मोडणारास काय शिक्षा करावी हेंहि त्यानें सांगितलें असून या संबंधाचा अम्मल करण्याचें काम संस्थाध्यक्षानें करावें असें त्याचें म्हणणें आहे. पेठेचा रंग पाहून आणि मालावर झालेला खर्चाचा बोजा ध्यानांत घेऊन भावांत कमजास्त फरक करण्याचा आणि व्यापाराला अडथळा होतो असें दिसून आल्यास कमजास्त सवलती देण्याचा अधिकार संस्थाध्यक्षाला होता.

अग्नि, जलप्रलय, सांथीचे रोग, दुष्काळ, उंदीर, वाघ, सर्प आणि राक्षस यांच्या धाडी ह्या आठ महाभयांपासून राजानें प्रजेचें संरक्षण कसें करावें तें कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्राच्या एका स्वतंत्र प्रकरणांत सांगितलें आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत शक्य असेल तर खेड्यांतल्या लोकांनीं आपला स्वयंपाक गांवाबाहेर करावा. ज्यांना हें साधणार नाहीं त्या घरच्या माणसांनीं पूर्वी एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें आपल्या घरांत पाण्यानें भरलेलीं पिंपें, शिड्या, कुऱ्हाडी, पाणी फेंकण्याकरितां सुपें, घराचें सामान खेंचण्याकरितां लोखंडी आंकडे आणि पाणी आणण्याकरितां पखाली इतकें सामान नेहमीं जवळ बाळगलेंच पाहिजे. अग्निभय निवारणार्थ खेड्यांतील लोकांनीं बलिदान आणि होमहवनाशिवाय पर्वणीचे दिवशीं अग्निपूजनहि करावें असें कौटिल्याचें सांगणें आहे. हा दुसरा उपाय आज जरी आम्हांप्रमाणेंच पुष्कळांना पटला नाहीं तरी खेडेगांवीं वारंवार होणारे अग्निप्रलय पाहून कौटिल्यानें सांगितलेलीं आगविझविण्याचीं साधनें सरकार आणि लोकलबोर्डें यांनीं प्रत्येक गांवाला पुरविणें

आजसुद्धां किती जरूरीचें आहे हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल. गांवकीच्या पैशांनं गांव भोजनाकरिता भांडीं खरेदी करणारे गांवकरी आपल्या गांवीं जळून जाणारें शेंकडों खंडी धान्य वांचविण्याकरितां हें सामान खरेदी करण्याच्या कामीं कांहीं द्रव्य खर्च करतील असें आम्हांला वाटतें.

ज्या गांवाना पुराचा त्रास होत असेल त्या गांवच्या लोकांनीं साधल्यास पर्जन्यकाळीं उंच ठिकाणीं जाऊन रहावें. तसें करितां येत नसेल तर प्रत्येक घर-वाल्यानें आपल्या संग्रहीं एखादी लहान मोठी होडी, मोठाले फळे, भोंपळ्याच्या सांगडी, कळकाच्या कांठ्या आणि लांकडाचे ओंडे ठेवून जलप्रलयाचे वेळीं एक-मेकांस तारण्याचा प्रयत्न करावा. संग्रहीं होडी असून दुसऱ्यास वांचविण्याचा प्रयत्न न करितां स्वस्थ बसणारा मनुष्य गुन्हेगार समजून त्याला दण्ड करण्यांत येत असे. पर्वकाळीं नदीपूजन करावें वगैरे कर्मकाण्डहि कौटिल्यानें सांगितलें आहे.

सांथीच्या रोगांना अर्थशास्त्रांत '**मरक**' अशी संज्ञा दिलेली आहे. मराठींतील, **मरी** अथवा **मरकी** हा शब्द ह्या **मरक** शब्दावरूनच निघालेला दिसतो. ह्यावर वैद्यांच्या औषधोपचाराप्रमाणें कित्येक धार्मिक सदराखालीं मोडणारे उपचारहि दिलेले आहेत. देवळांत बसून जागरण करण्याचा अर्थशास्त्रांत सांगितलेला उपाय आजहि खेड्यांतील लोक सांथीच्या प्रसंगीं उपयोगांत आणीत असलेले दिसतात. गुरांचा रोग आला असतां गोठ्यांत निरंजन लावून ओंवाळावें आणि कुळदेवाची पूजा करावी असें सांगितलें आहे.

" दुर्भिक्षे राजा बीजभक्तोपग्रहं कृत्वानुग्रहं कुर्यात् "

दुष्काळ पडला असतां राजानें आपल्या प्रजेच्या पोटाला देऊन पुढील उत्पन्नाकरितां धान्याचें वगैरे बीं दिलें पाहिजे. त्यानें इमारत दुरुस्तीचीं अथवा दुसरीं दुष्कळ कामें काढून मजुरीच्या रूपानें प्रजेच्या पोटापाण्याची सोय लावावी अथवा आपल्या संग्रहीं असेल तें धान्य प्रजेला वाटावें. तें पुरण्यासारखें नसेल तर राज्यांत ज्याच्या संग्रहीं धान्य असेल त्याजपासून तें '**कर्शनं वमनं वा कुर्यात्**' कराच्या रूपानें अथवा जबरीनें घेऊन दुष्काळग्रस्तांस द्यावें. तेंहि जमण्यासारखें नसेल तर आपल्या मित्र असलेल्या दुसऱ्या राजांच्या मदतीनें प्रजेवर गुजरलेली दुष्काळाची आपत्ति टाळण्याचा प्रयत्न करावा अथवा ज्या राज्यांत सुकाळ असेल त्या राज्यांत अथवा उदकसंचयाचे जागीं आपल्या प्रजेसह

राहून शेती, शिकार वगैरेवर कांहीं दिसत निर्वाह करावा; असें अर्थशास्त्रकारांचें मत आहे.

उंदीर—धाड आली असतां मांजरें आणि मुंगूस यांस हवेंतसें वावरूं द्यावें. अशा वेळीं त्यांना धरणें किंवा मारणें हा गुन्हा समजून गुन्हेगाराला दण्ड करण्यांत यावा. कुत्र्यांपासून मांजरें आणि मुंगूस ह्यांस पीडा होते म्हणून अरण्यवासी लोकांवांचून कोणीहि आपले कुत्रे मोकळे सोडूं नयेत. शेर, निवडुंग वगैरे सारख्या वनस्पतींच्या चिकांत धान्य भिजवून तें उंदीर खातील अशा ठिकाणीं टाकावें म्हणजे तें खाऊन उंदीर मरून जातील. उंदरांची पूजा करावी वगैरे सारखे कांहीं खुळसट विधीहि सांगितले आहेत. असेच उपाय टोळ, पक्षी आणि किडी यांची धाड आली असतां करावे.

सर्पांचा उपद्रव औषधी, मंत्र, अथर्ववेदज्ञपुरोहिताकरवीं केलेले विधी आणि सर्पपूजनादि प्रकारांनीं कमी करावा, असें अर्थशास्त्रकार सांगतात.

व्यालभये मदनरसयुक्तानि पशुशवानि प्रसृजेत्

वाघांचा उपद्रव झाला असतां गुरांच्या प्रेतांना मदन (खैर, बकुल अथवा धुतरा) वनस्पतीचा रस फासून तीं प्रेतें त्यांच्या खाण्यांत येतील असें करावें; किंवा ढोरांच्या मासाला हा रस अथवा हरकाचें पाणी देऊन तें मांस त्यांच्या वाटेवर टाकून ठेवावें. हें रसयुक्त मांस खातांच वाघ मरतात. शिकारी लोकांनीं त्यांना सांपळयांत पकडावें, आपल्या कुत्र्यांकडून त्यांच्यावर हल्ला करवावा अथवा स्वतःचें रक्षण चिलखतानें करून हत्यारांनीं त्यांना ठार करावें. वाघ मारणाराला बक्षीसें द्यावीं आणि केवळ हयगयीमुळें जे वाघाच्या हल्ल्यांतून दुसऱ्यांना सोडविणार नाहींत त्यांना अपराधी ठरवून दंड करावा. पर्वत—पूजन हा एक व्याघ्रनाशावर धार्मिक उपाय सांगण्यांत आला आहे.

राक्षसांचा उपद्रव टाळण्याकरितां जे उपाय सुचविण्यांत आले आहेत ते सर्व 'धार्मिक' ह्या खोट्या व बड्या नांवाखालीं मोडणारे असल्यामुळें आणि विशेषतः राक्षस ह्या प्राण्याची आज कांहींच कल्पना येत नसल्याकारणानें त्याबद्दल येथें कांहीं अधिक लिहून जागा अडविण्याचें कारण दिसत नाहीं.

आरब्धारस्तु हिंसायां गूढाजीवास्त्रयोदश
प्रवास्या निष्क्रयार्थं वा दद्युर्दोषविशेषतः

लांच खाणारे निरनिराळया खात्यांतील सरकारी नोकर, पाटील, कुळकर्णी आणि गांवकीचे पंच, पैसे घेऊन खोटया साक्षी देणारे लोक, खोटीं नाणीं पाडणारे

कारागीर, मंत्र, तंत्र औषधादि क्रियांनीं कोणा तरी स्त्रीचें कोणा तरी पुरुषावर प्रेम बसवून देण्याचा धंदा करणारे कुटणे, पैशाच्या आशेनें विषप्रयोग करणारे मारेकरी, सोन्यामध्यें भेसळ करून फसविणारे सराफ वगैरे, चांगल्या लोकांस सतावून आपला चरितार्थ चालविणारे, एकंदर तेरा प्रकारचे नीच लोक प्रजेच्या शांततेचा भंग करून तींमध्यें असंतोष उत्पन्न करितात, म्हणून गुप्त हेरांच्या द्वारें त्यांचीं कृष्णकृत्यें चव्हाट्यावर आणून त्यांचें शासन करावें आणि अवश्य तर त्यांना हद्दपार करावें असें कौटिल्याचें मत आहे.

दरोडेखोरांच्या टोळ्या, त्यांना आपणाला बंद केलेले दरवाजे मंत्र सामर्थ्यानें कसे उघडतां येतात, मंत्रांच्या प्रभावानेंच आपण घरांतील माणसांना निद्रावश कसे करून टाकतों वगैरे गोष्टी सांगून व आपल्या मंत्रांचा त्या दरोडेखोरांना अनुभव दाखवून अगाऊ व खूण करून ठेवलेल्या वस्तूंची चोरी त्यांजकडून करवून गुप्त हेरांनीं कशा पकडाव्या यासंबंधाची माहिती अर्थशास्त्राच्या एका लहानशा प्रकरणांत दिली आहे.

हेरांनीं दिलेल्या माहितीवरच पूर्ण भरंवसा ठेविल्यानें अन्याय होण्याचा संभव आहे असें जाणून संशयित आचरणाचे लोक गुन्हा ताजाच आहे तों पर्यंत सामान्यतः कसे वागत असतात याची माहिती अर्थशास्त्रांत दिली असल्यामुळें न्यायाधीशाला त्यांच्या वागणुकीवरून आपणांस हेराकडून मिळालेली माहिती कितपत खरी आहे तें पहातां येत असे. चोरीच्या मालासह चोराला पकडतां यावा म्हणून कांहीं नियम केलेले असत, त्यावरूनहि पुष्कळ वेळां चोरांच्या मालाची विक्री करीत असतां चोर नेमका सांपडत असे. चेहरा, संगति, जवळ अथवा घरांत असलेल्या जिनसा, चाकर नोकर, शरीरावरच्या खुणा आणि पावलें वगैरे वरूनहि चोराचा नक्की शोध लावला जात असे.

तैलाभ्यक्तमाशुमृतकं परीक्षेत

कोणी मनुष्य एकाएकीं मृत्यु पावल्याची खबर आल्यास प्रेताला तेल चोपडून त्याची परीक्षा करावी. ह्या परीक्षेची माहिती जर आज आमच्या पोलिसांस असती तर पुष्कळ वेळां प्रेतांची विनाकारण होणारी विटंबना टळली असती !

प्रेताच्या अंगावर हगामुताचे डाग आढळले, त्याचे अवयव वायूनें फुगलेले दिसले, हातापायांवर सूज आली असली, डोळे उघडे असले, मानेवर बंदाच्या खुणा दिसल्या तर त्या माणसाचा गळा दाबून किंवा अन्यतऱ्हेनें त्याचा श्वास कोंडून त्याला मारलें आहे असें समजावें.

प्रेताचे हात पाय आंखडले, हातापायांप्रमाणेंच त्याच्या पोटावरहि सूज चढली असली, त्याचे डोळे खोंडाळले असले, आणि त्याची बेंबी फुगली असली तर त्याला फांसावर चढवून मारलें आहे असें समजावें.

प्रेताचें गुदद्वार आणि नेत्र थिजलेले दिसले, त्याची जीभ दातांमध्यें सांपडलेली असली आणि त्याचें पोट फुगलें असलें तर त्याला जलसमाधि देऊन मारलें असावें,

प्रेतावर रक्ताचे डाग असून त्याच्या अवयवांवर जखमा दिसतील किंवा अवयवांचीं हाडें मोडिलीं असतील तर त्या माणसाला काठीनें अथवा दोरीनें बडवून मारलें असलें पाहिजे. नुसतीं हाडेंच मोडलीं असलीं तर बहुधा त्याला उंचावरून फेंकून मारला असावा.

प्रेताचे हातपाय, दांत आणि नखें काळीं पडून त्याचीं कातडी सैल पडली असेल, केंसात ताठपणा नसेल आणि तोंड, फेंसानें आणि लाळेनें लिडबिडलें असेल तर त्याला विषप्रयोग करून मारलें असावें. इतर चिन्हें अशीच असतां जर कोठें रक्तबंबाळ अशी दांतांची खूण असेल तर त्याला सर्पादि विषारी जनावर चावून तो मेला असावा. प्रेताजवळ ओकारीचीं चिन्हें दिसत असून त्याचे कपडे अस्ताव्यस्त फेंकून दिलेले दिसतील तर त्याला धुतऱ्याचें विष घातलें असावें.

वरीलपैकीं कोणत्याही साधनानें केलेला खून उघडकीस येऊं नये ह्मणून प्रेताच्या मानेवर बंदाच्या खुणा करून त्यानें स्वतःच गळफांस घेतला असावा अशी लोकांची समजूत करण्यांत येत होती असें दिसतें.

विषप्रयोगानें मृत झालेल्याच्या पोटांतून पचन न झालेल्या अन्नाचा भाग काढून तो पक्ष्यांकडून खाववावा. पक्षी मेले ह्मणजे अर्थातच विषप्रयोग ! हें बाहेर काढलेलें अन्न अग्नींत टाकतांच जर चिट्‌चिट्‌ असा आवाज होईल अथवा त्यांत इंद्रधनुष्यासारखे रंग दिसतील तर विषप्रयोग खास असें समजण्यास कांहींच हरकत नाहीं.

असा खून, कसा हुडकून काढावा आणि गुन्हेगारास काय शासन करावें यासंबंधाचे अर्थशास्त्रांतील विचार जरी महत्वाचे नाहींत ह्मणून सोडून दिले तरी वर जी प्रेतपरीक्षा आणि तीवरून ठरवावयाचें निदान याची माहिती दिलेली आहे ती कितपत बरोबर आहे यासंबंधानें तज्ञांनीं आपले विचार अवश्य प्रसिद्ध केले पाहिजेत. आज जसे निरनिराळया उपायांनीं खून करण्यांत येतात तसेच ते २५०० वर्षांपूर्वींहि येत होते इतकें मात्र ह्या विवेचनावरून स्पष्ट होतें.

प्रकरण अकरावें.

एकानें दुसऱ्यावर चोरीची फिर्याद केली असतां आरोपी गुन्हारद्दीचे म्हणून जे साक्षीदार आणीत त्यांस आरोपीचें नांव, गांव, जात, धंदा मित्र आणि मिळकत ह्या विषयींचे प्रश्न करावेत आणि त्यानीं स्वतःच्या जबानींत ह्यासंबंधानें जी माहिती दिली असेल तिच्याशीं साक्षिदारांनीं दिलेलीं उत्तरें कितपत मिळतीं आहेत हें ताडून पहावें. तसेंच आरोपीला गुन्ह्याचे आधले दिवशीं तो कोठें काय काम करीत होता; इतकेंच नव्हे तर ज्या रात्रीं त्याला पकडलें त्या रात्रीं पकडण्यापूर्वी त्यानें कोठें काय केलें याची माहिती विचारावी आणि साक्षीदारांनाही तत्संबंधींच प्रश्न करून जर दोहोंचा मेळ बसला तर किंवा आरोपीनें फिर्यादी आपणांशीं शत्रुप्रमाणें वागून आपला द्वेष करितो असें सप्रमाण सिद्ध केलें तर त्यास सोडून द्यावें. एखाद्या निरपराधी मनुष्यावर चोरीचा अपराध लादून खऱ्या चोराला छपविणारे कित्येक लोक असतात अशा लोकांना खुशाल ते चोर आहेत असें शाबीत धरून शिक्षा ठोठवावी. चोरीच्या कामीं उपयोगांत आणिलेलीं हत्यारें, चौरकर्मांतील चोराचे साथीदार चोरीचा माल आणि तो विकण्याकरितां त्यानें योजिलेले मध्यस्त इतका पुरावा असला तरी चोरीची जागा आणि चोरीचा माल ह्यांच्या प्रत्यंतर पुराव्याच्या कसोटीवर त्याची छाननी केल्यावांचून आरोपीला शिक्षा करण्यांत येत नव्हती. अर्थात हल्लींच्या कायद्याच्या तत्वाप्रमाणें त्यावेळींहि संशयाचा फायदा आरोपीला देण्यांत येत होता आणि एखादेवेळीं गुन्हेगार सुटला तरी निरपराध्याला शिक्षा होत नव्हती असें दिसतें.

आरोपीच्या साक्षीवरून तो गुन्हेगार ठरत असतां जर तो कबुली जबाब देत नसेल तर हल्लींप्रमाणें पोलीससमज देऊन तसा जबाब मिळविण्याचा प्रयत्न करावा असें जरी कौटिल्याचें मत होतें तरी लहान मुलें, वयोवृद्ध, अजारी, झिंगलेले, वेडे, प्रवासामुळें थकलेले आणि तहानभुकेनें पीडिलेले असतील त्यांस आणि अशक्त माणसांस त्याचप्रमाणें गरोदर व महिन्याच्या आंतील बाळंत स्त्रियांस कबुली जबाबाकरितां बिलकूल छळूं नये असें त्यानें स्पष्टपणें सांगितलें आहे. सामान्यतः या संबंधांत स्त्रियांचा जो छळ व्हावयाचा तो पुरुषांच्या निम्यानें असावा; मात्र ब्राह्मणाना-विशेषतः वेदविद्ब्राह्मणांना–मुळींच छळूं नये, त्यांची कबूली त्यांचा छळ न करितां

शक्य असल्यास गुप्त हेराच्या द्वारें घ्यावी असें चाणक्य ह्मणतो. एकंदरींत ब्राह्मण ब्राह्मणेतर हा भेद २५०० वर्षांपूर्वींच्या एका ब्राह्मण राजकारणपटूनेंहि करावयास सोडलें नाहीं! असो, छळामुळें आरोपी मेल्यास छळ करणाराला शासन करावें असा नियम होता पण त्याची अम्मल बजावणी आरोपी छळानेंच मेला असें ठरेल तर होणार!

ही पोलीससमज देण्याचे किंवा कबूलजबाबाकरितां आरोपीस छळण्याचे निरनिराळे वीस प्रकार कौटिल्यानें सांगितले असून

' दिवसान्तरमेकैकं च कर्म कारयेत् '

ते रोज एक एक नवा प्रकार ह्याप्रमाणें अमलांत आणावे, असेंहि सुचविलें आहे. कांहीं गुन्ह्यांच्या प्रसंगीं राजाच्या परवानगीनें सर्व प्रकारचा छळ एक दिवसांतहि करण्यास हरकत नाहीं असें तो सांगतो. ह्या वीस प्रकारांत **' स्नेहपीतस्य प्रतापनमेकमहः '** ह्मणजे आरोपीला तेल पाजून एक दिवस चांगला शेक द्यावा असा एक विलक्षण प्रकार आहे.

ब्राह्मणानें पंच महापातकांपैकीं जें केल्याचें पुराव्यानें शाबीत होईल त्याची निदर्शक अशी खूण त्याच्या शरीरावर तप्त मुद्रेनें उठविण्यांत यावी आणि त्याला हद्दपारीची अथवा जन्मठेप खाणीवर रहाण्याची शिक्षा द्यावी असें अर्थशास्त्रकार सांगतात.

बहुमोल वस्तु आणि रत्नें चोरणारांस जरी देहान्त प्रायश्चित मिळत असे तरी सामान्य वस्तूंच्या चोरीबद्दल चोरलेल्या वस्तूंच्या किंमतीच्या मानानें कमजास्त दण्डाचीच फक्त शिक्षा करण्यांत येत होती. खाजगी लोकांच्या चोरीबद्दल जो दंड करण्यांत येत असे, त्याच्या दुप्पट दण्ड सरकारी मालाच्या चोरीबद्दल करण्यांत येत असे. कांहीं चोऱ्यांच्या संबधांत दण्डाशिवाय चोराच्या सर्वांगाला राख, शेण वगैरे फासून आणि त्याच्या कंबरेला जळती शेगडी बांधून तसेंच कित्येकवेळीं त्याचें मुंडन करून त्याची धींड काढण्यांत येत असे.

एखादा अधिकारी राजाच्या आज्ञेवांचून राजाज्ञापत्र काढील अथवा राजमुद्रेचा उपयोग करील तर त्याच्या गुन्ह्याच्या स्वरूपाप्रमाणें त्याला दण्डापासून देहान्त शिक्षेपर्यंत कोणतीहि शिक्षा करण्यांत येत होती. मनूनेंहि ह्या गुन्ह्याबद्दल वधाची शिक्षा सांगितली आहे.

जेव्हां एखादा न्यायाधीश त्याजपुढें आलेल्या पक्षकारांस धमकी देईल, दटावील, बाहेर घालवील अथवा अन्यायानें गप्प करील तेव्हां त्याला (न्यायाधीशाला) जितका दण्ड करावयाचा त्याच्या दुप्पट दण्ड जर तो त्यांची निंदा करील अथवा त्यांस शिवीगाळ करील तर करावा; तसेंच त्यानें पक्षकारांस करावयाचे ते प्रश्न केले नाहींत अथवा करूं नयेत ते केले, त्यांना शिकविलें, एखाद्या गोष्टीचें मुद्दाम स्मरण दिलें, न्याय देण्याच्या कामांत दिरंगाई केली, साक्षीदारांना सूचक प्रश्न विचारले, तडजोडीला मदत केली नाहीं किंवा अशाच प्रकारें अन्यायाचें वर्तन केलें तर एकवार दंडाची आणि पुढें अधिकारावरून काढून टाकण्याची शिक्षा करावी असें कौटिल्याचें मत आहे. असा कायदा आजहि असता तर बरें झालें असतें असें आजच्या कांहीं न्यायाधीशांचें त्यांच्या न्यायासनांवरून होणारें वर्तन पाहिल्यावर वाटल्यावांचून रहात नाहीं. म्हणून हल्लींच्या काळीं देखील हेड कारकुनापासून जिल्हा न्यायाधिकाऱ्यापर्यंत पुष्कळ न्यायाधीशांनीं कौटिल्याच्या ह्या मतापासून बोध घेण्यासारखा आहे ! काळ कोणताहि असो स्वार्थासाठीं अन्यायाचरण करणारीं माणसें त्या काळांत असावयाचींच ! कायद्यानें कमालीचा म्हणून जो दण्ड अथवा कमालीची ह्मणून जी शिक्षा सांगितली असेल त्यापेक्षां अधीक दण्ड अथवा अधिक शिक्षा आरोपीस देणाऱ्या न्यायाधीशाला दुप्पट शासन करण्यांत येत होतें.

न्यायाधीशाजवळ बसून जबान्या घेण्याचें काम करणारास हल्लीं शिरस्तेदार म्हणतात; त्यावेळीं त्याला केवळ '**लेखक**' असेंच म्हणत असत; त्यानें जशी जबानी झाली असेल तशीच अक्षरशः लिहून घेतली पाहिजे असा कटाक्ष असून तींत बदल करणाऱ्या कारकुनास त्याच्या अपराधाप्रमाणें दण्ड करण्यांत येई.

कैद्याला तुरुंगातून पळून जाण्याची संधि देणाऱ्या किंवा कैद्याच्या झोंप, जेवण वगैरे नित्य कृत्यांत व्यत्यय आणणाऱ्या, तसेंच त्याला पुरेसें अन्नपाणी न देणाऱ्या आणि स्त्रीबंदीवानाशीं अनीतीनें वागणाऱ्या अधिकाऱ्यासहि योग्य शासन केलें जात असे. दिवाणी तुरुंगांतील कैद्यास पळून जाण्याची संधि देणाऱ्या अधिकाऱ्यास गुन्हेगार म्हणून दण्ड करण्यांत येतच असे पण कैद्याचें कर्जहि त्याजकडून सावकारास देण्यांत येत होतें.

उत्तमावरमध्यत्वं प्रदेष्टा दण्डकर्माणि
राज्ञश्च प्रकृतीनां च कल्पयेदन्तरान्वितः

कौटिल्याच्या काळीं न्यायदेवतेच्या मन्दिरांत प्रथम आर्य आणि अनार्य नंतर—तो काळ केवळ चातुर्वर्ण्याचा असतांहि ब्राह्मण ब्राह्मणेतर आणि शेवटीं शास्त्याच्या घराण्यांतील आणि शासित असा भेद बुद्धि पुरस्सर पाळला जात असे. उतरोक्त श्लोकांत हा शेवटचा भेद पाळण्याविषयीं कौटिल्यानें न्यायाधीशाला सक्त सूचना केली आहे.

लहान सहान गुन्ह्याला सुद्धां कौटिल्यानें जरी अवयवछेदनाची शिक्षा सांगितली आहे तरी तिच्या ऐवजीं दंड घेण्याचीहि सवलत त्यानें ठेविली आहे.

जेव्हां एखादा शूद्र आपण ब्राह्मण आहों असें खोटेंच सांगेल, आणि कोणीहि मनुष्य जेव्हां देवाची मालमत्ता चोरील, राजाविरुद्ध कट करील अथवा एखाद्याचे डोळे फोडील तेव्हां ह्या सर्वांचे डोळे विषारी अंजन घालून फोडावे असें जरी सांगितलें असलें तरी हें शासन दंडानें रद्द होत होतें. **'मानुषमांसविक्रये वध.'** मनुष्याचें मांस विकणारास मात्र मृत्यूची शिक्षा सांगितली असून ती दंडानें रद्द होण्यासारखी नव्हती.

भांडण होऊन एकानें दुसऱ्यास मारलें, ज्याला मारलें तो मनुष्य एका आठवड्यांत केव्हांहि मेला तर मारणाराला मृत्यूची शिक्षा देण्यांत येई पण जसा जसा तो जास्त दिवस जगेल तसतसे मारणारास द्यावयाच्या शिक्षेचें मान कमी होऊन कधीं कधीं तर केवळ दंडावर सुद्धां त्याची सुटका होत असे.

राज्य घेण्याच्या इच्छेनें, जो रानटी लोकांस अथवा राजाच्या शत्रूंस राजाच्या विरुद्ध चेतवील किंवा राज्यांतील किल्ल्यावर असणाऱ्या लोकांत राजाविरुद्ध असंतोष माजवील त्याला जाळून मारण्याची शिक्षा अर्थशास्त्रकार सांगतात. मात्र हा गुन्हेगार जर ब्राह्मण असेल तर त्याला **'अप: प्रवेशयेत्'** जलसमाधि द्यावी असें त्यांचें म्हणणें आहे.

पाण्यानें भरलेल्या तळ्याचा बांद फोडून पाणी वाहवीणारास त्याच तळ्यांत बुडवून ठार मारण्याची शिक्षा दिली जात असे. विषप्रयोग करणाऱ्या स्त्रीपुरुष गुन्हेगारांसही जलसमाधीचीच शिक्षा होती. भ्रूणहत्या, पतिवध, गुरुघात, आग लावणें आणि विषप्रयोगादि गुन्हे करणारी स्त्री, गरोदर असो किंवा नुकतीच प्रसूत झालेली असो तिला **' गोभिः पाटयेत् '** बैलांकडून फाडवून ठार करावी,

राजाच्या ब्राह्मणाधिष्ठित पाकशालेचें सोंवळें विटाळणाराची जांभ कापावी इत्यादि क्रूर शिक्षा जरी पूर्व ऋषींनीं सांगितल्या आहेत तरी कौटिल्य म्हणतोः—

अक्लिष्टानां तु पापानां धर्म्यश्शुद्धवधस्स्मृतः

स्वभावतः क्रूर नसणाऱ्या गुन्हेगारांच्या हातून हे अपराध झाल्यास त्यांना नुसती देहान्त शिक्षा द्यावी; भाजून फाडवून वगैरे त्यांचे हाल करूं नयेत.

ह्या पुढील प्रकरणांत, ' **न च प्राकाम्यमकामायां लभेत** ' हें वचन कौटिल्यानें अनेक वेळां उपयोगांत आणून, **कोणाहि स्त्रीवर तिच्या इच्छेविरुद्ध संभोगविषयक जुलूम होऊं नये** असें स्पष्ट बजावलें आहे.

ऋतु प्राप्तीपूर्वी अविवाहित कन्येला भ्रष्ट करणारा पुरुष तिच्या वर्णाचा असला तर त्याचा हात तोडून टाकावा पण ऋतुप्राप्तीनंतर जर त्यानें हा गुन्हा केला तर त्याचें फक्त बोटच छाटून टाकावें ! तसेंच त्याच्या ह्या कृत्यामुळें जर ती कन्या मरेल तर त्याला देहान्त शासन करावें. अविवाहित कन्येच्या कबूलीनें जर हा अपराध तो करील तर त्याच्या प्रमाणेंच त्या कन्येलाहि दंड करावा; असें कौटिल्याचें मत आहे.

एखाद्या मुलीचें लग्न जमल्यावर तिला ऋतुप्राप्ति होऊन सात महिने लोटले तरी जर तिचा बाप तिचें लग्न करणार नाहीं तर नियोजित पतीनें तिचा संभोग करणें हा अपराध समजण्यांत येत नव्हता; कारण तिच्या लग्नासंबंधांत बापानें दाखविलेल्या दिरंगाईमुळें बापाची मुलीवरील सत्ता नष्ट झाली असें मानण्यांत येत होतें. ह्यावरून ह्या काळीं प्रौढविवाहच रूढ होता; असें मानण्यास काय हरकत आहे ?

ऋतुप्राप्तीनंतर तीन वर्षांनीं अविवाहित कन्येचा संभोग करणारा सवर्ण आणि त्यापेक्षां (तीन वर्षांपेक्षां) अधिक काळ लोटल्यानंतर तिचा संभोग करणारा असवर्ण पुरुष गुन्हेगार समजला जात नसे; मात्र त्यानें त्या मुलीच्या अंगावर बापाच्या मालकीचे दागिनें असल्यास ते त्यांचे त्यास देऊन टाकले पाहिजेत; नाहीं तर दागिन्याच्या चोरीबद्दल त्याला गुन्हेगार मानण्यांत येत होतें.

हल्लींप्रमाणें लग्नें जमवून देण्याची अडत करणारे भद्रेश्वर दीक्षित आमच्या आर्यावर्तात पंचवीसशें वर्षांपूर्वीहि होते, असें एकाकरितां ठरविलेली मुलगी दुसऱ्याला च देऊन टाकणाऱ्या अडत्यास गुन्हेगार म्हणून दंड करण्यांत येत असे त्यावरून दिसतें प्रथम एक मुलगी दाखवून लग्नाचे वेळीं तिच्या जागीं दुसरीच

उभी करणारास ह्या दुसऱ्या मुलीच्या कमजास्त जातकुळीप्रमाणें कमजास्त दंड करावा असें कौटिल्याचें मत असून अशा लबाडीच्या वेळीं वरानें–' **उभे ते एकशुल्केन वहेदित्यब्रवीन्मनुः** ' एकाच कन्याधनांत दोन्हीहि मुलींशीं लग्न करावें असें मनूचें ह्मणणें आहे. मुलीचें लग्न ठरवून मुलगी देण्याचें नाकारणारास, लग्न व्हावें ह्मणून मुलीची खोटीच स्तुति करणारास आणि हलक्या बीजाची वधू गळ्यांत बांधून वराची फसवणूक करणारास कौटिल्यानें काय शिक्षा करावी तें सांगितलें आहे. अर्थात असले गुन्हे त्या काळीं हल्लींपेक्षां जास्त प्रमाणांत घडत असावे असें दिसतें.

जर कोणी जीवावरच्या संकटांतून एखाद्या स्त्रीची सुटका केली तर त्या स्त्रीनें आपली सोडवणूक करणारास, सुटकेच्या वेळीं कबूल केलें असेल तर, संभोगही दिला पाहिजे. अशी स्त्री उच्च कुळांतील असून अपत्यवती असेल आणि तिला जर संभोगेच्छा नसेल तर सुटका करणारानें तिच्यापासून योग्य तें द्रव्य घेऊन तिला मुक्त करावें. ही पूर्वकाळची आमची भूतदया ! हें आमचें स्त्रीदाक्षिण्य आणि ही आमची नीतिमत्ता ! जुना काळ उत्तम ह्मणणारांनीं मेहरबानी करून जरा ह्या गोष्टींकडे लक्ष्य पुरवावें ! !

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ह्यांपैकीं ज्याला जें अन्न वर्ज्य केलेलें असेल तें त्याजकडून खावविणारास वर्णानुक्रमाप्रमाणें कमजास्त शिक्षा होत असे. त्यानें तें खुषीनें खाल्लें असल्यास त्याला त्याच्या वर्णांतील लोकांनीं बहिष्कार घालावा असा नियम होता.

मध्यरात्रीनंतर स्वतःच्या घरावर चढणाराची आणि गांवाचें कुसूं अथवा शेताचें कुंपण मोडणाराची गणना गुन्हेगारांत होत होती.

व्यापाऱ्याच्या मालाबद्दल ह्या दिवसांत विशेश काळजी घेण्यांत येत होती असें दिसतें. व्यापारी एखाद्या खेडेगांवीं वसतीला गेला म्हणजे त्यानें आपला माल त्या गांवच्या पाटलाला (ग्रामस्वामी) दाखवून मालाची किंमतहि त्याला जाहीर करावी; इतकें केल्यानंतर रात्रीं जर त्यापैकीं कांहीं माल चोरीला गेला तर त्याची किंमत पाटलानें भरून द्यावी. दोन गांवच्या दरम्यान असलेल्या गुरचरणांतून व्यापारी प्रवास करीत असतां जर माल चोरीला गेला तर त्याची किंमत सदर जमीनीवर देखरेख करणाऱ्या '**विवीताध्यक्ष**' नांवाच्या अधिकाऱ्यानें भरावी. जेथें गुरचरण नसे तेथें दोन गांवामधील प्रदेशावर देखरेख ठेवण्याकरितां '**चोर रज्जुक**

अशा हुद्याचे लोक असत त्यांनीं त्या मालाची किंमत द्यावी; जेथें असे लोक नेमलेले नसतील तेथें ज्या दोन गांवाच्या दरम्यान चोरी झाली असेल त्या गांवाच्या लोकांनीं मालाची किंमत भरावी आणि '**असीमावरोधे पंचग्रामी दश-ग्रामी वा**' जेथें हद्दीचा संबंध नसेल अशा ठिकाणीं झालेल्या चोरीची भरपाई शेजारच्या पांच दहा गांवच्या गांवकऱ्यानीं करावी असा कायदा होता.

गाडीवाला ' दूर व्हा दूर व्हा' असें ओरडून रस्त्यानें जाणारा येणारांस सूचना देत असतां जर एखाद्याला गाडीचा धक्का लागला तर गाडीवाल्याला गुन्हेगार मानण्यांत येत नव्हतें.

'**अश्वमेधावभृथस्नानेन तुल्यो हस्तिना वध इति**' आपणच हत्तीला चिडवून त्याजकडून मारलें जाणें, हें अश्वमेध यज्ञ केल्याइतकेंच पुण्यप्रद असल्यामुळें अशा रीतीनें ज्याला हत्तीकडून मरण येईल त्याच्या आप्तांनीं त्या हत्तीकरितां मद्य, पुष्पहार आणि त्याचे दांत पुसण्याकरितां जरूर तेवढें कापड द्यावें असा जरी नियम होता तरी हत्तीला न चिडविणाराच्या अंगावर हत्ती जाऊन जर त्याला इजा करील तर महाताला दंड करण्यांत येत असे. इतर जना-वरांपासून जाणारा येणारास दुखापत झाली तर तीं जनावरें ज्याच्या ताब्यांत असतील त्याला शासन करण्यांत येत असे. देवाच्या नांवानें सोडलेल्या जनाव-रांचा उपयोग करणारांसहि अपराधी समजण्यांत येत होतें.

अभिचार म्हणजे जादूटोणा मंत्रतंत्र इत्यादि क्रिया! यांचा उपयोग बहुधा पुरुष आपली कामेच्छा तृप्त करून घेण्याकरितां स्त्रियांवर करीत. स्त्री जितक्या जवळच्या नात्यांतली तितकी ह्या कामीं टाणेटोणे करणारास जास्त शिक्षा; असा नियम होता.

ब्राह्मण स्त्रीशीं व्यभिचार करणाऱ्या क्षत्रियाला जी शिक्षा होती त्यापेक्षां वैश्याला जास्त आणि शूद्राला तर ' **कटाग्निना दह्यते** ' गवताची होळी पेटवून तींत भाजून मारण्याची शिक्षा होती. याच्या उलट म्हणजे खालच्या वर्णाच्या स्त्रीशीं व्यभिचार करणाऱ्या पुरुषाच्या शरीरावर ठरावीक तप्तमुद्रा देऊन त्याला हद्द-पारीची अथवा ज्या वर्णाच्या स्त्रीशीं त्यानें व्याभिचार केला असेल त्या वर्णांत जाण्या ची शिक्षा होत असे. इतर वर्णाच्या स्त्रीशीं व्यभिचार करणाऱ्या शूद्राला देहांत शिक्षा करून त्या व्यभिचारी स्त्रीचें नाक आणि कान कापण्यांत येत. अनार्तवा

स्त्रीशीं गमन आणि सृष्टिनियमाविरुद्ध कामवासनेची तृप्ति ह्या दोनहि गुन्ह्यांस सारखीच शिक्षा होती. आपण पुराणमताभिमानी आहों असें भासवून बहुजनसमाजाकडून धन्यता मिळविण्याकरितां, ज्याला जन्मस्थानींच चिरडून टाकण्याचा आत्मघातकी प्रयत्न, तीस वर्षांपूर्वी कांहीं गृहस्थांनीं केला तो संमतिवयाचा कायदा पंचवीसशें वर्षांपूर्वी देखील आमच्या देशांत चालूच होता ह्मणावयाचा !

मानव जातींतील पातकांवर वरुण देवतेचा अंमल आहे; अशी समजूत असल्यामुळें, राजानें जर एखाद्या निरपराधी मनुष्यास दंड केला असेल तर दंडाच्या तीसपट रक्कम वरुणाऱ्या नांवानें पाण्यांत सोडून **ब्राह्मणांना** वाटावी म्हणजे—

तेन तत्पूयते पापं राज्ञो दण्डापचारजम्

राजाची ह्या अन्यायजन्य पातकापासून मुक्तता होते; असें कौटिल्य म्हणतो.

प्रकरण बारावें.

तत्त्वज्ञांच्या आणि राजकारणी पुरुषांच्या नीतिविषयक कल्पनांत जमीन अस्मानाचें अंतर कसें असतें, वारांगना ज्याप्रमाणें आपल्या तात्पुरत्या प्रियकरास खूष करण्याकरितां क्षणांत हंसतात तर क्षणांत रडतात, क्षणांत प्रेम करतात तर क्षणांत रोष दाखवितात त्याप्रमाणें राजनीतिहि प्रसंगाप्रमाणें नानारूपें धारण करून राजाचें हित साधण्याकरितां कशी तत्पर असते ह्या गोष्टींचा उलगडा अर्थशास्त्रांतील पुढें दिलेल्या विवेचनावरून सहज होण्यासारखा आहे.

राज्यांतील कांहीं बड्या अधिकाऱ्यांत राजद्रोहाचें वारें संचार करूं लागलें असल्याचें आढळून येतांच राजानें त्यांचेवरील आरोप उघड चौकशीनें सिद्ध होण्यासारखा नसल्यास त्यांस गुप्तपणें वाटेल तें शासन करावें. हेरांच्या द्वारें त्यांच्या बंधूंच्या मनांत त्यांचेविषयीं असूया उत्पन्न करवून गुप्तपणें त्यांना भेटीला बोलवावें आणि अधिकार व संपत्ति यांचें आभिष दाखवून राजद्रोही भावांचा खून करण्यास त्यांना प्रवृत्त करावें. त्यांनीं खून केला कीं तेथल्या तेथें बंधुघातकी म्हणून आपल्या ह्या हस्तकांस पकडून त्यांची उघड चौकशी करावी आणि त्यांस देहांत शासन द्यावें. ' तुझा भाऊ तुला वडिलार्जित मिळकतीचा वाटा देत नाहीं तो त्याजपाशीं माग, असें सांगून हेरानें राजद्रोही अधिकाऱ्याच्या भावाला त्याच्या दाराशीं धरणें धरून बसण्यास सांगावें आणि तशा रीतीनें तो बसला असतां रात्रीच्या वेळीं त्याचा खून करावा व राजानें त्याचा पक्ष घेऊन राजद्रोही भावाचा ' बंधुघातक ' ह्मणून वध करावा. भावाभावांत अथवा बापलेकांत एकमेकांच्या बायकांवर पापी नजर ठेवल्याबद्दल खोट्याच बातम्या पिकवून भांडणें लावून द्यावीं आणि त्यांस एकमेकांचे खून करावयास प्रवृत्त करावे. ' तूं राजपुत्र असून शत्रूपासून तुझें संरक्षण व्हावें ह्मणून राजानें तुला येथें ठेविलें आहे, ' असें हेरांनीं राजद्रोही अधिकाऱ्याच्या मुलाला सांगावें आणि गुप्तपणें राजाशीं त्याची मुलाखत करावी. राजानेंहि त्याला तीच गोष्ट सांगून ' आतां तूं वयांत आल्यामुळें तुला युवराज करावें असें मला वाटतें; पण ह्या अधिकाऱ्याच्या हरकतीमुळें मला तसें करितां येत नाहीं, ' असें म्हणावें. हेरांनीं त्याला बापाचा खून कर-

ण्याची मसलत द्यावी आणि खुनाचें काम पुरें होतांच पितृघातकी म्हणून त्याला पकडून खुशाल शासन करावें.

अशा आणखी किती तरी मसलती कौटिल्यानें राजद्रोहाच्या परिहारार्थ सांगितल्या आहेत; पण आज परतंत्र देशामध्यें देखील सत्ताधारी इतके अनीतीचे प्रकार करीत नसल्यामुळें त्यांचा येथें सविस्तर विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. कालाबरोबर जगाचा कल नीतीकडे वहात आहे कीं अनीतीकडे वहात आहे ? ह्या प्रश्नाचें उत्तर ह्या मसलती वाचल्यानंतर कोणालाहि सहज देतां येईल, असें वाटतें.

सरकारी खजिन्यांत तूट पडली असतां तन्निवारणार्थ राजानें प्रजाजनांकडून द्रव्य मिळविण्याचे जे मार्ग कौटिल्यानें सांगितले आहेत त्यांची माहिती वाचली असतां प्रस्तुत काळांतील सुप्रसिद्ध मुत्सद्दीदेखील आश्चर्यचकित होतील असें आम्हांस वाटतें.

राज्यांतील ज्या प्रदेशांत उत्तम पीक येतें त्या प्रदेशांतील शेतकरी लोकांकडून राजानें त्यांच्या उत्पन्नाचा तिसरा किंवा चवथा हिस्सा आणि जंगलच्या वगैरे उत्पन्नाचा असाच हिस्सा जादा कर म्हणून घ्यावा; व्यापारी लोकांनीं जादा कर द्यावयाचा त्याची रकम उक्तीच ठरविलेली असावी आणि ती व्यापार ज्या मालाचा असेल त्या मालाच्या मानानें असावी. '**कुशीलवा रूपाजीवाश्च वेतनार्धं दद्युः**' नाटकी आणि वेश्या यांजकडून त्यांच्या उत्पन्नांपैकीं अर्धें उत्पन्न घ्यावें. एकंदरींत प्रस्तुतचा करमणुकीवरील कर, लोक समजतात त्याप्रमाणें नवा नाहीं. सोनार आपल्या प्रामाणिकपणाचें स्तोम आपणच माजवून लबाडीनें लोकांस फसवितात, सबब त्यांचें सबंधच उत्पन्न घ्यावें. एकंदरींत ह्या जादा कराच्या तडाख्यांतून प्रजेपैकीं कोणाचीहि सुटका होत नव्हती; मात्र असा कर '**सकृदेव न द्विः प्रयोज्यं**' फक्त एकदांच (?) घ्यावा, पुनः घेऊं नये असें कौटिल्य म्हणतो !

जेव्हां जादा कराची पुनरावृत्ति करण्याचा प्रसंग येईल तेव्हां प्रजेपासून जो पैसा जमवावयाचा तो कर म्हणून न जमवितां 'सरकारांतून एक अमूक काम करावयाचें आहे तरी त्या कामाकरितां देणगी द्या,' असें सांगून जमवावा. अधिकाऱ्याच्या मसलतींत सामील असणाऱ्या लोकांनीं वर्गणीचा मोठा आंकडा घालावा आणि राजानें त्यांचा आंकडा इतरांस दाखवून त्यांजकडून पैसे उकळविण्याची शिकस्त करावी. प्रजाजन म्हणून मिरविणाऱ्या गुप्त हेरांनीं

कमी वर्गणी देणारांची जरूरीप्रमाणें निर्भर्त्सना करून अथवा त्यांना चढवून त्यांजकडून जास्त वर्गणी काढावी. परोपकारार्थ म्हणून जे श्रीमंत लोक आपण होऊन मोठमोठ्या देणग्या देतील त्यांस दरबारचा मान मरातब, छत्रें, पागोटीं किंवा एखादा अलंकार राजानें द्यावा ! हल्लीं प्रमाणें केवळ पदव्यांवर त्यांची बोळवण करावी असें कौटिल्य सांगत नाहीं. धर्मभोळ्या लोकांस फसवून त्यांजकडून खाजगी आणि देवस्थानाचे पैसे उपटण्याचे अनेक मार्ग अर्थशास्त्र-कारांनीं सविस्तर वर्णन केले आहेत ! गुप्त हेरांनीं मोठमोठ्या व्यापाऱ्यांशीं भागीनें व्यापार करून बराचसा पैसा जमल्यावर तो एकदम लुटला गेला असें जाहीर करावें आणि पैसा सरकारी खजिन्यांत पाठवावा; सारांश आपण जशी आपल्या बागेंतील फळें पिकतांच काढून घेतों त्याप्रमाणें राजानें आपल्या प्रजे-जवळ पैसा जमतांच खजीन्यांत भरावा असा कौटिल्याचा अभिप्राय दिसतो. तो म्हणतो.—

पक्कं पक्कमिवारामात् फलं राज्यादवाप्नुयात्

यापुढें कौटिल्यानें नोकरलोकांचे पगार काय असावेत याचा विचार केला असून तो एकंदर उत्पन्नाच्या चतुर्थांशापेक्षां अधीक रक्कम पगाराकरितां खर्च पडूं नये अशा तत्त्वावर केला आहे. ऋत्विज, पुरोहित, राजमाता, राजपत्नी आणि युवराज यांच्यापासून गोपालादि सर्वांपर्यंत कोणाला किती पगार असावा हें सांगितलें आहे. हल्लींच्या आणि त्यावेळच्या पगारांत कितीतरी फरक दिसतो ! हल्लींचे पगार फारच वाढलेले ! हें अंतर, विशेषतः महागाईमुळेंच आहे हें सांगण्याचें कारण नाहीं. पगाराबरोबरच नोकराच्या स्वास्थ्याकडेहि राजानें लक्ष्य पुरविलें पाहिजे; तसेंच शिक्षण आणि कार्यदक्षता पाहून त्यांचें वेतन वाढविलें पाहिजे. तसेंचः—

'कर्मसु मृतानां पुत्रदारा भक्तवेतनं लभेरन्'

नोकरीवर असतां मेलेल्या लोकांच्या बायकामुलांच्या पोटापाण्याची सोय होण्यासारखें वेतन त्यांस चालू ठेविलें पाहिजे. त्यांच्या कुटुंबांतलि लहान मुलें व वृद्ध आणि आजारी माणसें यांची तर्तूद केली पाहिजे; तसेंच नोकराच्या येथें क्रियाकर्म, आजार आणि बाळंतपणासारखे प्रसंग आले असतां त्यांस द्रव्य सहाय्य दिलें पाहिजे.

खजीन्यांत रोकडीचा तुटवडा असल्यास ठराविक दरानें धान्य वगैरे जिन्नस पगाराऐवजीं द्यावें, असा नियम होता.

चतुरङ्ग सैन्याला दररोज प्रातःकाळीं सूर्योदयाबरोबर युद्धकलेचें शिक्षण द्यावें, आणि त्यावेळीं स्वतः राजानें हजर असावें. हत्यारावर राजमुद्रा झाल्यावांचून तें शिलेखान्यांत दाखल करूं नये **'अशस्त्राश्चरेयुरन्यत्र मुद्रानुज्ञातात्'** हत्यारें घेऊन फिरण्यास परवाना असला पाहिजे. प्रवासी हत्यारासह आढळल्यास त्याजपाशीं परवाना आहे किंवा नाहीं हें पहाण्याचें काम अन्तपालाकडे असून परवाना नसेल तर अन्तपालानें त्या प्रवाशाचीं हत्यारें हिसकावून घ्यावीं. एकंदरींत आम्हाला निःशस्त्र आणि त्यामुळें अर्थातच कमकुवत बनविण्याचें काम पंचवीसशें वर्षापूर्वीं जेव्हां आम्हीं स्वराज्याचा उपभोग घेत होतों तेव्हांपासूनच चालू आहे म्हणावयाचें ! शस्त्रागारांतील शस्त्रांचा हिशेब ठेवलेला असून त्यांपैकीं एखादें हत्यार जर हरवलें अथवा खराब झालें तर मूळ किंमतीच्या दुप्पट रक्कम त्यावरील प्रमुख अधिकाऱ्याकडून भरून घेण्यांत येत असे.

यापुढें अधिकारीवर्गानें राजाशीं कसें वागावें, कसें बोलावें वगैरे गोष्टींचें विवेचन कौटिल्यानें केलें आहे. तो म्हणातोः—अग्नीमध्यें रहाणें आणि राजाच्या सान्निध्यांत रहाणें ह्या दोनहि गोष्टी सारख्याच अवघड आहेत, किंबहुना पहिलीपेक्षांहि दुसरी अधीक अवघड आहे. कारण अग्नि फार झालें तर एखाद्या माणसाचा एखादाच अवयव जाळील, पण राजा मनांत आणील तर एखाद्याचा कुळासह उच्छेद करील. उच्छेदाप्रमाणें कुळाची वृद्धि करण्यालाहि राजा समर्थ असतो ही गोष्ट लक्ष्यांत ठेवून जेणेंकरून आपलें रक्षण होईल अशा रीतीनें शहाणे पुरुष वागतात. अर्थात शहाण्या अधिकाऱ्यानें प्रथम आपलें रक्षण करावें, मात्र तें करीत असतां केव्हांहि राजाला बदसल्ला देऊं नये. त्याला प्रिय वाटेल आणि त्याच्या कल्याणाचें असेल तेंच त्याला सांगावें. प्रिय वाटण्याकरितां त्याच्या अकल्याणाची गोष्ट करण्याची मसलत त्याला केव्हांहि देऊं नये. राजे लोक फार लहरी असतात, त्यांच्या हितार्थ अमात्यासारख्या जबाबदार अधिकाऱ्यानें सतत नजर ठेवावी आणि त्यांच्या हर्षामर्षाची लक्षणें ओळखण्यास शिकावें. खुषींत असतां आणि रागांत असतां राजाची वागणूक, त्याची मुद्रा, त्याचें बोलणें, त्याचें चालणें इत्यादि कसें असतें याची माहिती देऊन कौटिल्य ह्मणतो कीं अमात्य, राजाला त्याच्या कल्याणाचा

मार्ग दाखवीत असतांहि राजा जर '**अर्थमानप्रक्षेपे च परित्यागः**' त्याचें पैशाकडून आणि सन्मानाकडून असें दोन्हींकडून नुकसान करण्याला धजेल तर अमात्यानें त्याला सोडून जावें. पण दूर राहून देखील त्याचें वर्तन सुधारण्याचा प्रयत्न करावा. अशा राजाचें वर्तन न सुधारतां जर त्याचें राज्य जाण्याची पाळी आली तर तें राखण्याकरितां अमात्यानें कसकसे प्रयत्न करावे आणि असा राजा जर मृत्यु पावला तर त्याच्या पुत्राला, पुत्र नसेल तर कन्येला आणि कन्याहि नसेल तर राणी गरोदर असल्यास तिला राज्यावर बसवून राज्य कसें चालवावें याबद्दल विवेचन करून कौटिल्य म्हणतो, राणी गरोदर नसेल तर राजघराण्यांतील पुरुषाकडून नियोग पद्धतीनें तिच्या ठिकाणीं पुत्रोत्पत्ति करवावी, पण अमात्यानें राज्याचा अपहार करूं नये.

'स्वाम्यमात्यजनपददुर्गकोशदण्डमित्राणि प्रकृतयः'

राजा, अमात्य, प्रजा, दुर्ग, कोश, सेना आणि मित्रगण हीं सात राष्ट्राचीं प्रधान अंगें आहेत असें सांगून कौटिल्यानें ह्या प्रत्येकाचे गुणावगुण वर्णन केले आहेत. शहाणा राजा ह्या प्रधान अंगांची काळजीपूर्वक वाढ करतो आणि वाईट राजा हीं अंगें सुस्थितींत असतांहि त्यांची दुर्दशा उडवितो. दुर्वर्तनी आणि व्यसनी राजा, महाराजा असला तरी आपल्या प्रजेच्या रोषाला अथवा आपल्या शत्रूच्या द्वेषाला बळी पडल्यावांचून रहात नाहीं. शहाणा आणि राजशासनदक्ष राजा लहानशा प्रदेशाचा स्वामी असला तरी आपल्या उपरोक्त प्रधान अंगांचें सामर्थ्य वाढवून पृथ्वीपति बनतो आणि कोणाच्याही हातून पराभव पावण्याची भीति त्याला नसते.

' संधिविग्रहासनयानसंश्रयद्वैधीभावाः षाड्गुण्यम् '

सन्धि म्हणजे करारी तह, विग्रह म्हणजे चढाई, आसन म्हणजे तटस्थवृत्ति यान म्हणजे युद्धाची पूर्वतयारी, संश्रय म्हणजे आधार किंवा मैत्री आणि द्वैधीभाव म्हणजे एका राष्ट्राशी मैत्री तर एकाशी युद्ध, असे राजकीय कारस्थानाचे कौटिल्याच्या मताप्रमाणें सहा प्रकार असून कमी योग्यतेच्या राजानें आपल्यापेक्षां जास्त योग्यतेच्या राजाशीं सन्धि करावा, जास्त योग्यतेच्या राजानें आपल्यापेक्षां कमी योग्यतेच्या राजावर चढाई करून जावें, 'शत्रूकडून माझें कांहीं वांकडें होणार नाहीं आणि माझ्या हातून शत्रूचें कांहीं शासन होणार नाहीं' असें ज्या राजास वाटत असेल

त्यानें तटस्थ वृत्तीचा अंगिकार करावा, अवश्य गोष्टींची अनुकूलता असेल त्यानें आपल्या शत्रूशीं लढण्याला सिद्ध व्हावें, स्वसंरक्षणाचीं साधनें ज्यापाशीं नसतील त्या राजानें संरक्षणार्थ दुसऱ्या राजाची मैत्री संपादावी आणि मदतीवाचून भागणार नाहीं असें वाटत असेल त्यानें शत्रूची खोड मोडण्याकरितां दुसऱ्याची मदत घ्यावी; अशा रीतीनें ज्या राजाला ह्यांपैकीं जो मार्ग आपल्या नफ्याचा आणि शत्रूच्या विनाशाचा वाटत असेल त्यानें त्याचा स्वीकार करून त्याप्रमाणें वागावें; असें त्याचें सांगणें आहे.

सन्धिविग्रहयोस्तुल्यायां वृद्धौ सन्धिमुपेयात्

तह आणि चढाई ह्या दोहोंपासून होणारें नफा नुकसान जेव्हां सारखेंच असेल तेव्हां चढाई न करितां तहच करावा, कारण लढाईपासून नेहमींच सत्ता आणि संपत्ति यांची हानी होत असते; अशा परिस्थितींत याच कारणाकरितां लढाई आणि तटस्थवृत्ति या दोहोंमध्यें सुद्धां लढाईपेक्षां तटस्थवृत्तीचाच अंगिकार करणें चांगलें. द्वैधीभाव आणि आश्रयप्रदान ह्या दोन राजकारणांत निवड करावयाची झाल्यास द्वैधीभाव पतकरावा; कारण तो लक्ष्मीदायक आहे. दुसऱ्या राजाला आश्रय द्यावयाचा म्हणजे स्वतःचा खजीना खर्च करून त्याचें रक्षण करावयाचें ! अर्थात ह्यापेक्षां उघड द्वैधीभाव चांगला ! दोन बलाढ्य राजांच्या मध्यें सांपडलेल्या राजानें त्या दोघांपैकीं जो अधिक बलाढ्य असेल त्याचा अथवा जो आपणांस अधिक विश्वासू वाटत असेल त्याचा आश्रय करावा, अथवा दोघांहि जवळ सारख्याच अटींवर तह करावा. मैत्री झाली म्हणजे स्वस्थ बसूं नये. जेणें करून त्या दोघांचा परस्परांवरील विश्वास उडून त्यांच्यामध्यें वैर उत्पन्न होईल असें कांहीं तरी करावें आणि त्यांपैकीं एक एकट्याला स्वतंत्रपणें चीत करावें. अशा प्रकारचा उपदेश राजाला करून, कौटिल्यानें, आसन म्हणजे जी तटस्थवृत्ति तिचें, स्थान, आसन आणि उपेक्षण '**स्थानमासनमुपेक्षणं चेत्यासनपर्यायाः**' असे तीन प्रकार व त्या प्रकारांपैकीं कोणत्या प्रकाराचें कशा परीस्थितींत अवलंबन करावें ह्याविषयींची माहिती त्याला दिली आहे. तसेंच त्याचे शत्रू निरनिराळ्या परिस्थितींत आहेत अशी कल्पना करून त्यांपैकीं कोणत्या परिस्थितींतल्या शत्रूवर प्रथम स्वारी करावी हें सकारण रीतीनें त्याला समजावून सांगितलें आहे.

आपल्या प्रजेपैकीं सज्जनांचा धिःकार आणि दुर्जनांचा स्वीकार करणें, कारण नसतां केवळ दुर्मदानें प्रजेची कत्तल उडविणें, जाणून बुजून सदाचरणाचा त्याग करून दुराचरण करण्यास प्रवृत्त होणें, जें केलेंच पाहिजे तें न करितां जें करावयास नको तें मुद्दाम करणें तसेंच प्रजेला जें द्यावयास पाहिजे तें न देतां जें तिजपासून घ्यावयास नको तें बळजवरीनें घेणें, निरपराध्याला कडक शासन करून अपराध्याला मोकळा सोडणें, ज्यांना प्रतिबंधांत ठेवावयास पाहिजे त्यांना हवे तसे वावरूं देऊन जे मोकळे राहणेंच इष्ट त्यांना प्रतिबंध करणें, ज्यांत नुकसान होण्याचा संभव आहे अशी कामें हातीं घेऊन ज्यांच्यापासून प्रत्यक्ष फायदा होत आहे अशीं कार्यें बिघडवून टाकणें, चोरांपासून प्रजेचे संरक्षण न करितां तिची संपत्ति लुबाडणें, कल्याणप्रद धाडसाचीं आणि चांगलीं कामें निंद्य मानणें, लोकनायकांना उपद्रव देणें, मानार्ह व्यक्तींचा अपमान करणें, आपल्या दुर्वर्तनानें आणि असदाचरणानें वृद्धांचा संताप उत्पन्न करणें, संकटकाळीं उपाय योजना न करितां चालू कामाची हेळसांड करणें आणि प्रजेचे जान आणि तिची जिंदगी यांचें संरक्षण करण्याचें आपलें कर्तव्य विसरणें, हे दुर्गुण ज्या राजाच्या वर्तनांत असतात त्याची प्रजाः—

क्षीणाः प्रकृतयो लोभं लुब्धा यान्ति विरागताम्
विरक्ता यान्त्यमित्रं वा भर्तारं घ्नन्ति वा स्वयम्

प्रथम दरिद्री आणि दारिद्र्याला कंटाळून पुढें लोभी आणि लोभामुळें शेवटीं अराजक बनते. अशा रीतीनें अराजक बनलेली प्रजा, राजाच्या शत्रूला सामील होऊन अथवा स्वतःच, राजाचा घात करते; म्हणून **राजानें हे दारिद्र्यादि प्रकार आपल्या प्रजेमध्यें उत्पन्न न होतील अशा प्रकारें आपली राज्यव्यवस्था चालवावी.**

दरिद्री प्रजा राजाच्या जुलमी वर्तनाला आणि त्यानें बसविलेल्या नाना प्रकारच्या करांना अगदीं कंटाळून गेलेली असते आणि दारिद्र्यांतून आपली सुटका करून घेण्याकरितां तिची सारखी तळमळ चाललेली असते. ह्या तळमळीमुळें कधीं कधीं ती राजाच्याविरुद्ध युद्ध पुकारण्याला अथवा त्याचें राज्य सोडून जाण्यालाहि तयार होते. लोभाचें वारें तिच्यांत शिरलें म्हणजे ती सदाच अतृप्त राहून राजाच्या शत्रूला सामील होते आणि एकदां का ती अराजक बनली म्हणजे हरप्रयत्नानें राजाचा घात करणेंच तिला इष्ट वाटूं लागतें.

प्रजेमध्यें दारिद्र्यादि दोषांचा प्रादुर्भाव न होऊं देण्याकरितां राजानें आपली राज्यव्यवस्था सुधारावी असें वर एके ठिकाणीं सांगितलेंच आहे; पण तसें करूनहि जर ते दोष उत्पन्न झाले तर राजानें कोणत्या दोषांचा परिहार कसा करावा हें सांगतांना कौटिल्य म्हणतो कीं.–

विरागः प्रधानावग्रहसाध्यः

राजाविषयीं प्रजेच्या मनांत अप्रीति उत्पन्न झाल्याचें आढळून येतांच राजानें एकदम त्यांच्या पुढाऱ्यांना प्रतिबंधांत टाकावें, कारण ज्यांना पुढारी नाहींत ते लोक हवे तसे आपल्या ताब्यांत ठेवतां येतात. पुढाऱ्यांच्या अभावीं दडपशाहीचा जुलूम असह्य होऊन ते प्रथम इतस्ततः भटकूं लागतात; पण राजानें त्यांना तसें करूं देऊं नये. एकदां ते अशा रीतीनें भटकत राहिले म्हणजे जुलूम त्यांच्या अंगवळणींच पडतो.

यानंतर कौटिल्यानें सन्धीचे आणि युद्धाचे निरनिराळे प्रकार वर्णन करून व कशा परिस्थितींत कोणाशीं कशा प्रकारचा संधि करावा, अथवा प्रकाश, कूट आणि तूष्णि ह्या युद्धाच्या तीन प्रकारांपैकीं कोणाशीं कोणत्या प्रकारचें युद्ध करावें ह्याविषयीं बरीच विस्तृत माहिती देऊन, राजाला द्वैधीभाव केव्हां श्रेयस्कर होतो हें सांगितलें आहे. संधि करितांना राजानें आपल्या मित्राची निवड कोणत्या धोरणानें करावी ? त्यानें कायमचें सैन्य ठेवावें किंवा जरूरीच्या वेळीं सैन्य जमवीत जावें ? तसेंच त्यानें तावडतोब होणाऱ्या थोड्या फायद्याकडे लक्ष द्यावें अथवा कालांतरानें होणारा मोठा फायदा पसंत करावा ? तहामध्यें जमीन घेणें झाल्यास कशा प्रकारची घ्यावी ? सततच्या शत्रूच्या राज्यानजीकची सुपीक जमीन आणि अल्पकालिन शत्रूच्या राज्यानजीकची नापीक जमीन ह्यापैकीं कोणची जमीन स्वीकारावी ? शहाणा आणि वेडा अशा दोन प्रकारच्या शत्रूंपैकीं जमीन घेणें झाल्यास ती कोणापासून घेणें चांगलें ? इत्यादि अनेक प्रश्नांचा विचार कोणत्या दृष्टीनें कसा करावा याची जरी विस्तृत चर्चा कौटिल्यानें केली आहे तरी ती विशेष महत्त्वाची नसल्यामुळें आम्हीं येथें तिचा विचार करीत नाहीं.

प्रकरण तेरावें.

सुमहताऽपि क्षयव्ययेन शत्रुविनाशोऽभ्युपगन्तव्यः

" शत्रू म्हटला की हरप्रयत्नानें त्याचा नाश केलाच पाहिजे, मग तो करण्याकरितां द्रव्याच्या राशीच्या राशि खपोत किंवा हजारों माणसांचे बळी पडोत. " असें आपलें स्पष्ट मत जाहिर करून कौटिल्यानें शत्रु-नाशसमयीं आपलें शक्य तितकें कमी नुकसान व्हावें ह्मणून शत्रूवर केव्हां कोणत्या बाजूनें कसा हल्ला चढवावा याची माहिती दिली आहे. तसेंच लढाईच्या प्रसंगीं आपलीं कारस्थानें अत्यंत गुप्त रीतीनें चालवलीं पाहिजेत असें सांगून तो म्हणतो कीं, " जो आपल्या मसलती गुप्त राखण्याचा प्रयत्न करणार नाहीं त्याचा कांहीं काळ अभ्युदय झाल्यासारखा वाटला तरी, फुटकें होडकें चालव-णारा मनुष्य ज्याप्रमाणें निश्चितपणें समुद्रांत बुडतो त्याप्रमाणें तो नाश पावल्या-वांचून रहात नाहीं.

विजय इच्छिणाऱ्या राजाचे शत्रु संगनमत करून जर त्याजवर चालून गेले तर त्यानें त्यांच्यापैकीं जे प्रमुख असतील त्यांजपाशीं कसकसें बोलणें करावें, कशा प्रकारचें भाषण करून त्यांच्यामध्यें फूट पाडावी, फूट पडल्यानंतर आपण नामानिराळे राहून त्यांचीं आपसांत भांडणें कशीं लावावीं, त्यांपैकीं कोणाला कशाची लालूच दाखवून आपला फायदा कसा करून घ्यावा, शत्रूचें कंदन करून आपलें कल्याण करून घेण्याकरितां सामदामादि प्रकारांची योजना कशी करावी इत्यादि अनेक प्रश्नांची वाटाघाट करून अखेर—

यो वा यथायोगं भजेत तं तथा साधयेत्

ज्याला जें रुचेल त्याच्याकरितां तें करून त्याला आपल्या बाजूला ओढून घ्यावें असा सिद्धांत अर्थशास्त्रकारानें काढिला आहे.

ज्या राजाला योग्यायोग्य कर्तव्याचा निश्चय करण्याचें सामर्थ्य नसेल त्यानें शहाणे लोक आपल्या पदरीं बाळगून विद्वान आणि अनुभवी गृहस्थांच्या सहवा-सांत रहावें. ज्या राजाजवळ खजीना आणि सैन्य यांची कमतरता असेल त्यानें ' **प्रकृतियोगक्षेमसिद्धौ यतेत** त्यानें आपल्या प्रजेचें योगक्षेम उत्तम रीतीनें

चालविण्यांकरितां झटावें तसेंच आपले किल्ले आणि आपल्या राज्यांतील पाट बंधाऱ्यांचीं कामें सुस्थितींत राखावीं. राज्यांतील सडका जशा व्यापाराच्या कामीं उपयोगी पडतात त्याप्रमाणेंच जरूर तेथें सैन्याच्या हालचाली करून शत्रूशीं गांठ घालण्याच्या कामीहि उपयोगी पडतात म्हणून त्या चांगल्या ठेवण्याचा प्रयत्न करावा. युद्धोपयोगी शस्त्रें, चिलखतें, रथ आणि ओझ्याचीं जनावरें यांचा संग्रह वाढवावा. , **खनिःसङ्ग्रामोपकरणानां योनिः** ' राज्यांतील खाणी म्हणजे लढाईच्या कामीं लागणाऱ्या वस्तूंच्या जननीच आहेत. जंगलें म्हणजे किल्ले, वहानें आणि रथ यांस लागणारें सामान पुरविण्याचे साठेच आहेत. हत्तींच्या जंगलापासून युद्धोपयोगी हत्तींचा पुरवठा होतो आणि चराऊ जंगला पासून गाई, घोडे आणि उंट यांचें पोषण होतें; याकरितां खाणीं आणि सर्व प्रकारचीं जंगलें यांचें संरक्षण करावें. आणि अशा रीतीनें राजानें आपल्या शत्रू-पासून आपला नाश न होईल अशी तजवीज ठेवावी. आपणांपेक्षां बलाढ्य शत्रूशीं गांठ पडली असतां त्यापेक्षां बलाढ्य राजाशीं अथवा असा बलाढ्य राजा न मिळेल तर त्याच्या तोलास तोल असलेल्या राजाशीं आणि तेंहि शक्य नसेल तर त्यापेक्षां कमी बलाढ्य अशा अनेक राजांशीं संधि करून त्याची खोड मोडण्याचा प्रयत्न करावा पण आपला पराभव होईल असें निश्चितपणें वाटत असतां दीपपतंग न्यायानें बलाढ्य शत्रूवर चाल करून जाऊन आत्मघात करून घेऊं नये. असा आत्मघात करून घेण्यापेक्षां अशा शत्रूला आपला संरक्षणकर्ता मानून अंतःकरण-पूर्वक त्याची खिजमत उठवणेंहि चांगलें, असें कौटिल्याचें मत आहे.

विजयी राजानें आपल्या शत्रूला जर त्याच्या संरक्षणाचें अभिवचन दिलें असेल, तर पिता जितक्या काळजीनें पुत्राचें रक्षण करितो तितक्यांच काळजीनें त्यानें आपल्या ह्या आश्रिताचें रक्षण केलें पाहिजे. अपराधी शत्रूचा अपराध जाहीर केल्यावांचून त्याला शासन करूं नये. **'न च हतस्य भूमिद्रव्यपुत्र-दारानभिमन्येत'** लढाईमध्यें त्यानें आपल्या शत्रूला जरी कंठस्नान घातलें असलें तरी त्याच्या देशाचा, द्रव्याचा अथवा पुत्रदारादिकांचा लोभ न करितां त्याच्या जागीं त्याच्या योग्य वारसाची स्थापना करुन त्याचें सर्वस्व संरक्षित ठेवीप्रमाणें त्याच्या स्वाधीन करावें म्हणजे हा नवा राजाच काय पण त्याचे सर्व अधिकारी आणि प्रजाजन विजयी राजाचें आणि त्याच्या संततीचें कल्याण सदा चिंतीत रहातात !

'राज्ञां विश्वासोपगमः शमस्सन्धिस्समाधिरिति'

ज्याच्या योगानें दोन राजांमध्यें परस्परांविषयीं विश्वास उत्पन्न होतो त्याला **शम, सन्धि** अथवा **समाधि** असें म्हणतात. भरंसा अथवा शपथ–प्रमाण यांच्या मदतीनें झालेला तह मोडण्यास हरकत नाहीं; पण जामिनकी देऊन अथवा ओलीस पाठवून जर तह ठरला असेल तर तो मात्र मोडतां येत नाहीं असें जें कित्येक ग्रंथकरांचें मत तें कौटिल्याला पसंत नसून पहिल्या प्रकारचा तह इह लोकींच काय पण परलोकींहि बंधनकारक आहे. जामिनकी व ओलीस यांची अवश्यकता असलीच तर ती फक्त तहाच्या इहलोकींच्या बळकटीकरितांच. परलोकीं ह्या साधनांची अवश्यकता नाहीं, असें तो म्हणतो.

कौटिल्य म्हणतोः–पूर्वींचे राजे ' आपला सन्धि झाला ' असें नुसतें म्हणूनच एकमेकांशीं तहाच्या शर्तीप्रमाणें वागत. आपणांपैकीं कोणी तहाच्या अटी मोडील, असा संशय घेण्यासारखें विशेषच कारण जर त्यांना दिसलें तरच बहुधा ते अग्नि, पाणी, नांगर, किल्ल्याच्या भिंतीची वीट, हत्तींचा स्कंध, घोड्याची पाठ, रथाचा पुरोभाग, शस्त्र इत्यादिकांपैकीं कशाची तरी शपथ घेत असत.

कौटिल्याच्या वेळीं देखील तपस्वी अथवा सरदार लोक, ह्यांच्या जामिनकीनें तह घडून येत असें दिसतें. असा जामिनकी घेऊनच तह करावयाचा असेल तर ज्याचें आपल्या शत्रूवर वजन असेल अशाचीच जामिनकी अथवा हमी घ्यावी. ओलीस घेऊन जे तह होत त्यांत बहुधा राजकन्या अथवा राजपुत्र ह्यांना ओलीस घेत, ओलीस घ्यावयाचाच तर राजपुत्राला घ्यावा. राजकन्या ओलीस घेणें, घेणाराला त्रासदायक असतें असें कौटिल्याचें मत होतें. तसेंच तो म्हणतो कीं, राजपुत्र ओलीस द्यावयाचा असेल तर औरस राजपुत्र देऊं नये. हलक्या कुळांतला द्यावा, कारण आपल्या राज्याचा तो वारसा नसतो किंवा त्याच्या संततीलाहि वारसाचा हक्क नसतो. औरस पुत्रच ओलीस देण्याची पाळी आली तर एकुलता एक औरस सहसा देऊं नये आणि जो द्यावयाचा तो मूर्ख आणि गुणहीन असेल तोच द्यावा. एकंदरींत विचार करितां ओलीस देऊनहि तह मोडणें झाल्यास ज्याच्या योगानें कमी नुकसान होईल अशी सावधगिरी पहिल्यापासूनच ठेवावी असा कौटिल्याचा कटाक्ष दिसतो. फार तर काय **' अभ्युच्चीयमानः समाधिमोक्षं कारयेत '** 'उत्कर्ष पावत असलेल्या राजानें तह मोडावा ' असें त्यानें एके ठिकाणीं स्पष्टच म्हटलें आहे. राजपुत्राला ओलीस पाठवितेवेळीं कांहीं गुप्त

हेरांनीं सुतार वगैरे कारागिरांच्या रूपानें आणि कांहींनीं नटनर्तक, खुषमस्करे वगैरेंच्या रूपानें ज्या राजाकडे राजपुत्र ओलीस जाणार त्या राजाच्या पदरीं नोकरीस रहावें आणि पुढें संधि साधून पहिल्या हेरांनीं भुयार खणून राजपुत्राची सुटका करावी अथवा दुसऱ्यांनीं आपला प्रवेश राजपुत्रापर्यंत करून घेऊन कांहीं दिवस त्याची करमणूक करितां करितां संधि साधून एक दिवस आपणांपैकीं एकाचा पोषाक राजपुत्राच्या अंगावर चढवून त्याला आपणांबरोबर आणावें. जरूर वाटल्यास कांहीं हेरांनीं नानाप्रकारचीं ढोंगें करून राजपुत्रावरील पहारेकऱ्यांस गुंगीचें औषध चारावें अथवा त्यांना लांच द्यावा आणि राजपुत्राला सोडवावें. अशा प्रसंगीं राजपुत्राची सुटका करण्याकरितां गुप्त हेरांनीं काय काय करावें याचें लांबलचक वर्णन कौटिल्यानें केलें आहे.

राज्यावर जशीं बाहेरचीं कांहीं संकटें येतात तशींच राज्यांतल्या राज्यांत उद्भवणारींहि कांहीं संकटें असतात आणि तीं पहिल्या प्रकारच्या संकटांपेक्षा जास्त त्रासदायक असतात. अंतर्गत संकटांत दिवाणादि अधिकाऱ्यांच्या वर्तनापासून उत्पन्न होणारीं संकटें विशेष पीडाकारक ! म्हणून राजानें–'**कोशदण्डशक्तिमात्मसंस्थां कुर्वीत**' खजीना आणि सैन्य यावर आपली स्वतःची प्रत्यक्ष सत्ता ठेविली पाहिजे. जे दोन अधिकार मिळावे म्हणून आपली नेटाची मागणी, ते मिळणें जड कां जात आहे याचीं कारणें कौटिल्याच्या ह्या मतावरून आमच्या लक्ष्यांत येण्यास अडचण पडणार नाहीं असें वाटतें

एका देशावर दोन राजांचा अंमल असला म्हणजे आपसांतील द्वेषामुळें आणि चुरशीमुळें दोघेहि पदभ्रष्ट होऊन तो देश स्वतंत्र होतो. अशा देशावर जर परकीय राजाची सत्ता असेल, तर ज्यावर आपण सत्ता गाजवीत आहों तो देश आपला नाहीं, तेव्हां त्यांतून असेल नसेल तेवढी संपत्ति आपल्या देशीं न्यावी आणि देशांतील लोकांना अगदीं भिकार करून सोडावें असा विचार तो करतो आणि त्याप्रमाणें वागतो अथवा तो देश म्हणजे आपली एक व्यापारी पेठ आहे असें मानून चालतो. परकीय राजाच्या अशा वागणुकीमुळें अर्थातच लोकांच्या मनांतील त्याजविषयींची पूज्यबुद्धि नष्ट होते आणि शेवटीं त्याला तो देश सोडणें भाग पडतें.

राजशासन शास्त्राची माहिती नसलेला आणि जाणून बुजून त्या शास्त्राच्या तत्त्वांना न जुमानणारा, रोगग्रस्त आणि नुकताच सिंहासनारूढ झालेला; अशक्त-

आणि उच्च कुळांत जन्मलेला आणि सशक्त परंतु नीच कुळांत जन्म पावलेला ह्या निरनिराळ्या जोड्यांपैकीं प्रत्येकींत चांगला राजा कोणता ! असा प्रश्न घेऊन आणि त्या प्रश्नाची आपल्या गुरुजींनीं दिलेलीं उत्तरें जमेस धरून कौटिल्यानें ह्या प्रत्येक जोडींत पहिल्यानें वर्णिलेलाच राजा पसंत केला आहे.

अविद्या आणि शिस्तीचा अभाव ह्या दोन कारणांनीं मनुष्यावर संकटें येतात. दुर्गुणांचें जनकत्व देखील ह्याच दोन कारणांकडे आहे. अविद्येपासून क्रोध उत्पन्न होतो आणि क्रोधापासून तीन प्रकारचे दुर्गुण उत्पन्न होतात. शिस्तीच्या अभावीं वासना अनावर होतात आणि अनावर वासनांपासून चार प्रकारचे दुर्गुण उत्पन्न होतात ! क्रोधानें पच्छाडलेले राजे, आपल्या प्रजेच्या क्रोधाला बळी पडतात ! त्यांना पुष्कळ शत्रु उत्पन्न होतात आणि त्यांचें जीवित दुःखमय होतें. वासनांच्या भोंवऱ्यांत पडलेले राजे निरनिराळ्या रोगांच्या तावडींत सांपडतात, ते सदा चैनींत गुंग रहातात, लोकांच्या तिरस्काराला पात्र होतात आणि आपल्या संपत्तीची राखरांगोळी उडवितात ! अशा तऱ्हेनें दोन्हीं गोष्टींचा विचार करून '**तस्मात्कोपो गरीयान्**' क्रोध हा सर्वांत वाईट; असा सिद्धांत कौटिल्यानें काढिला आहे.

संतप्त मनुष्य लोकांना शिवीगाळ करितो, पैशाचा दुरुपयोग करितो आणि तावडींत सांपडेल त्यास कडक शासन करतो. क्रोधापासून जे तीन दुर्गुण उत्पन्न होतात; असें वर म्हटलें आहे ते हेच दुर्गुण होत ! ह्या तिहींत जास्त हानिकारक दुर्गुण कोणत ह्याविषयीं चर्चा करीत असतां विशालाक्षपाराशरादिकांचीं मतें नापसंत करून कौटिल्य म्हणतो–' ज्याला शिवीगाळ केली असेल त्याची समजूत पैशानें घालतां येत असल्यामुळें भाषेच्या दुरुपयोगापेक्षां पैशाचा दुरुपयोग अधिक हानीकारक मानिला पाहिजे; परंतु प्राण आणि पैसा यांची तुलना करण्याचा प्रसंग आल्यास कोणीहि मनुष्य पैशापेक्षां प्राणाची किंमत अधीक मानील. आतां रागाच्या भरांत एकानें दुसऱ्यास कडक शासन केलें ! म्हणजे त्याचा खून केला, असें जर मानिलें, तर खुनी मनुष्याला देहांत शिक्षाच भोगावी लागणार; म्हणजे द्रव्यापेक्षां प्रिय असा प्राणच गमावण्याची पाळी त्याजवर येणार, अर्थात क्रोधापासून उत्पन्न होणाऱ्या तीन प्रकारच्या दुर्गुणांत कडक शासन करण्याचा दुर्गुण जास्त हानिकारक आहे."

मृगया द्यूतं स्त्रियःपानमिति चतुर्वर्गः

वासनेपासून चार दुर्गुण उत्पन्न होतात असें वर एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. मृगया, जुगार, स्त्रियांचें व्यसन आणि मद्यपान हेच ते चार दुर्गुण होत. ह्या चौघांत विशेष घातक दुर्गुण कोणता ह्याची चर्चा करीत असतां कौटिल्यानें पूर्वाचार्यांच्या मतांचा आणि साधक बाधक प्रमाणांचा शहानिशा करून अगदीं स्वतंत्रपणें आपलें मत दिलें आहे. त्याच्या मताप्रमाणें मृगया आणि द्यूत ह्या जोडींत द्यूत अधीक घातक! तसेंच द्यूत आणि स्त्रीसंग ह्या जोडींपैकीं स्त्रीसंग जास्त हानिकारक आणि स्त्रीसंग व मद्यपान ह्यांतील मद्यपान विशेष पीडाकारक!

' संज्ञानाशः! अनुन्मत्तस्योन्मत्तत्वम्। अप्रेतस्य प्रेतत्वं!
कौपीनदर्शनम्! श्रुतप्रज्ञाप्राणवित्तमित्रहानिः! सद्भिर्वियोगः!
अनर्थ्यसंयोगः! तंत्रीगीतनैपुण्येषु चार्थघ्नेषु प्रसङ्गः!

दारूबाज बेशुद्ध पडतो, तो शहाणा असला तरी वेडा बनतो, जीवंतपणींच त्याजवर प्रेतकळा चढते, नेसलेल्या वस्त्राचें भान न राहून त्याचा लंगोट उघडा पडतो, त्याचें शिक्षण, त्याची अक्कल, त्याचे प्राण, त्याचें द्रव्य आणि त्याचे मित्र सारींच त्याला सोडून जातात, चांगले लोक त्याची संगति सोडतात आणि दुष्ट लोक त्याची मैत्री जोडतात आणि संपत्तीचा नाश करणारीं नाच तमाशाचीं व्यसनें त्याला लागतात. कौटिल्यानें पंचवीसशें वर्षांपूर्वीं वर्णन केलेली दारूबाजाची ही दुरवस्था आज देखील अगदीं जशीच्या तशीच दृग्गोचर होते.

दैवपीडनमग्निरुदकं व्याधिदुर्भिक्षं मरक इति

अग्निप्रलय, जलप्रलय, रोग, दुष्काळ आणि महामारी सारख्या सांथी ह्या ईश्वरी क्षोभापासून राष्ट्रावर येणाऱ्या आपत्ति आहेत असें सांगून कौटिल्यानें तुलनात्मकदृष्ट्या ह्या सर्वांत अधिक अनर्थावह आपत्ति कोणती हें सांगितलें आहे. तो म्हणतो.— 'अग्निप्रलयानें अर्धा गांव अथवा फार झालें तर सबंध गांव नाश पावतो पण जलप्रलयापासून प्रसंगविशेषीं शेंकडों गांव एकदमच नष्ट होतात; म्हणून अग्निप्रलयापेक्षां जलप्रलय वाईट! " रोगामुळें जिकडे तिकडे माणसें आजारी पडतात आणि मृत्यूच्या भयानें नोकर चाकर पळून जाऊन सर्व व्यवहार बंद पडतात; दुष्काळानें असें होत नाहीं. तो एकप्रकारें धनोत्पादकच असतो; म्हणून दुष्काळ पुरवला पण रोग नको." हें पूर्वीच्या आचार्यांचें मत कौटिल्यानें खोडून टाकिलें आहे; तो म्हणतो–"रोगाची पीडा फार झाली तर जवळ पासच्या चार दोन

गांवांनाच होते आणि उपाययोजना करून त्याचा प्रतिकार पण करितां येतो. दुष्काळाचें पीडाक्षेत्र ह्यापेक्षां फार मोठें असतें आणि दुष्काळांत मनुष्याच्याच केवळ नव्हे तर सर्वच प्राण्यांच्या निर्वाहाचीं साधनें नष्ट झालेलीं असतात, सबब रोगापेक्षां दुष्काळ वाईट !" अशा रीतीनें साधक बाधक प्रमाणें देऊन कौटिल्यानें अनेक प्रश्नांसंबंधानें आपला अभिप्राय व्यक्त केला आहे.

तत्कालिन सैन्याला चांगली कवायत शिकविण्यांत येत असून लढाईवर जतेवेळीं जनानखाना बरोबर बाळगिण्याची सर्वांनांच मनाई होती; असें दिसतें. शत्रूच्या परिस्थितिविषयींचा आपला अंदाज नेहमींच बरोबर असण्याचा संभव नाहीं म्हणून त्यावर चाल करून जावयाचें असतां आपण आपली साधनसामुग्री बरोबर आहे किंवा नाहीं हें पहावें आणि ती जर जय्यत असेल तर खुशाल चाल करावी ! उष्ण हवेमुळें घाम येऊन हत्तींना कुष्ट रोग होतो आणि त्यांना पिण्याला आणि स्नानाला पुरेसें पाणी न मिळाल्यास त्यांच्या अंगचें चापल्य नष्ट होऊन ते हट्टी बनतात म्हणून ज्या देशांत भरपूर पाणी असेल त्या देशावर शक्य असल्यास पर्जन्यकाळीं हत्तीच्या सैन्यानिशीं चाल करावी. पाण्याचा तुटवडा असलेल्या प्रदेशावर स्वारी करावयाची असल्यास आणि विशेषतः ते दिवस उन्हाळ्याचे असल्यास सैन्यामध्यें गाढवें, उंट आणि घोडे यांचाच भरणा असावा; हत्ती सहसा घेऊं नयेत.

वर्षति मरुप्रायं चतुरङ्गबलो यायात्

पावसाळा असला म्हणजे वालुकामय प्रदेशावर सुद्धां चतुरंग सैन्यानिशीं (हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ) हल्ला करावा. आपल्या सैन्यानें रोज किती कूच करावयाचें हें ठरवितानां जो प्रदेश चालून जावयाचा, तो सपाट आहे कीं चढ उताराचा आहे, तसेंच त्यांत कांहीं दरी खोरीं आहेत कीं काय हें पाहूनच ठरवावें.

मौल म्हणजे जहागिरी अथवा वंशपरंपरागत सैन्य, भृतक म्हणजे खडें अथवा पगारी सैन्य, श्रेणी म्हणजे पलटणी अथवा कवायती सैन्य, दोस्त राष्ट्राचें सैन्य, शत्रूकडील सैन्य आणि रानटी जातींचें सैन्य ह्या सर्व प्रकारच्या सैन्यांपैकीं कोणत्या प्रकारचें सैन्य युद्धप्रसंगीं केव्हां कसें उपयोगांत आणावें आणि कोणत्या सैन्यास कशा स्वरूपानें मेहनताना द्यावा याची विस्तृत चर्चा करून ज्या क्रमानें वर त्यांचा उल्लेख केला आहे त्याच क्रमानें त्याचें चांगूलपण आहे, म्हणजे

जहागिरी सैन्य सर्वांत उत्तम आणि रानटी जातींचें सैन्य सर्वांत हलक्या योग्यतेचें, असें कौटिल्यानें आपलें मत दिलें आहे.

ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ह्या वर्णानुक्रमानेंच त्या त्या वर्णाच्या सैन्याचा श्रेष्ठपणा मानण्याची पूर्वाचार्यांची पद्धति कौटिल्याला पसंत नाहीं. तो म्हणतो–शत्रूनें साष्टांग नमस्कार घालतांच ब्राम्हणी सैन्य त्याच्या आधीन होईल म्हणून युद्धकला विशारद क्षात्रियांचें अथवा संख्येनें मोठ असें वैश्य आणि शूद्र-वर्णाचेंच सैन्य त्यापेक्षां चांगलें ! यानंतर चतुरंग सैन्यापैकीं कोणत्या अंगाशीं तोंड देण्यास कोणती तयार असावी याचा विचार करून अर्थशास्त्रकार राष्ट्राच्या अंतर्बाह्य शत्रूसंबंधीं विचांराकडे वळले आहेत. तें म्हणतातः—

" अभ्यन्तरकोपो बाह्यकोपात् पापीयान् "

" राष्ट्राबाहेरच्या पुंडाव्यांपेक्षां राष्ट्रामधील पुंडावे फार वाईट ! हे दोनीहि प्रकारचे पुंडावे कसे मोडावे ह्याविषयीं विशेष महत्त्वाची नाहीं अशी थोडी माहिती सांगून.—

रक्ष्यस्स्वेभ्यः परेभ्यश्च नित्यमात्मा विपश्चिता

" शहाण्या राजानें आपलें आपल्या प्रजेपासून आणि शत्रूंपासून सदोदित संरक्षण करावें, " असें एकाच ओळींत तिचें तात्पर्य ग्रथित केलें आहे.

युद्धोपयोगी सैन्याचा नाश म्हणजे क्षय आणि द्रव्याचा नाश म्हणजे व्यय. ह्या दोनहि प्रकारच्या नाशांपेक्षां होणारा फायदा अधिक असेल तर युद्ध पुकारून शत्रूवर चढाई करावी असें प्रतिपादन करितांना कौटिल्यानें फायद्याचे निरनिराळे प्रकार सांगितलें आहेत. आणि शेवटीं त्यांत येणाऱ्या विघ्नांचें ' लाभविघ्न ' अशा स्वतंत्र मथळ्याखालीं विवेचन केलें आहे. कौटिल्यानें वर्णिलेलीं हीं लाभविघ्नें कामन्दकी नीतिसाराच्या पंधराव्या सर्गांत वर्णिलेल्या विघ्नांशीं बहुतांशीं मिळतीं आहेत. ह्या विघ्नांत कौटिल्यानें, वारंवार फलज्योतिषाकडे जाऊन ग्रहांच्या अनु. कूल प्रतिकूलतेची चौकशी करण्याच्या व्यसनाचा समावेश केला आहे तो म्हणतो—

**नक्षत्रमतिपृच्छन्तं बालमर्थोतिवर्तते
अर्थोह्यर्थस्य नक्षत्रं किं करिष्यन्ति तारकाः
साधनाः प्राप्नुवन्त्यर्थान् नरा यत्नशतैरपि
अर्थैरर्थाः प्रबध्यन्ते गजाः प्रतिगजैरिव.**

संपत्तीचा मार्गदर्शक अथवा तिला खेंचून आणणारा तारा संपत्तीच आहे म्हणून दुसऱ्या ताऱ्यांच्या बलाबलाविषयीं वारंवार चौकशी करणाऱ्या मूर्खांची ती हेळसांड करते. अंगीं सामर्थ्य असलेला मनुष्य हजारों प्रयत्न करून संपत्ति मिळवितो. एक हत्ती दुसऱ्या हत्तीनें जसा बांधला जातो तशी संपत्ति ही संपत्तीला बांधली जाते. पैशाकडे पैसा जातो म्हणतात तो असाच ?

राज्यामध्यें उत्पन्न होणारे बखेडे निरनिराळ्या प्रकारांनीं उत्पन्न होत असतात. केव्हां केव्हां बखेड्याचें उत्पादकत्व राज्याबाहेरील लोकांकडे असून राज्यांतील लोक केवळ त्याला मदत करीत असतात. कधीं कधीं ह्याच्या उलट प्रकार असतो, राज्यांतले लोक बंडाळा उत्पन्न करितात आणि बाहेरचे लोक केवळ त्यांचें सहाय्य करितात केव्हां प्रजेचा पुंडाव्याशीं मुळींच संबंध नसतो तर केव्हां बाहेरच्या लोकांचा संबंध त्याच्याशीं नसतो. हीं निरनिराळ्या प्रकारांनीं उद्भवलेलीं बंडें त्यांचा येथें ज्या अनुक्रमानें उल्लेख केला आहे त्या अनुक्रमानें कमी कमी घातक असतात असें सांगून तीं कशीं मोडावीं ह्याविषयीं सामान्य प्रकारची माहिती कौटिल्यानें दिली आहे. राज्यांतले लोक जेव्हां बंडाला केवळ मदत करीत असतात तेव्हां त्यांची समजूत **सामानें** म्हणजे त्यांच्या पुढाऱ्यांस मोठमोठ्या पदव्या व मानमरातब देऊन आणि **दानानें** ह्मणजे कराची सूट व सरकारी नोकऱ्या देऊन करावी असें कौटिल्य ह्मणतो. एकंदरींत विचार करितां–

दूष्यशुद्धायां पौरेषु जानपदेषु वा दण्डवर्जानुपायान्प्रयुञ्जीत

तो म्हणतो, राजद्रोहापासून प्रजेला अलिप्त राखावयाचें तर राजानें केव्हांहि दडपशाहीचें धोरण स्वीकारूं नये." हिंदी राजनिष्ठ प्रजा आज देखील सरकारी अधिकाऱ्यांना हेंच सांगत आहे.

प्रकरण चवदावें.

एकं हन्यान्न वा हन्यादिषुः क्षिप्तो धनुष्मता
प्राज्ञेन तु मतिः क्षिप्ता हन्याद्गर्भगतानपि

पटाईत धनुर्धरानें सोडलेला बाण नेमका लागून एखाद्याचा घात कदाचित करतो अथवा करितही नाहीं, पण बुद्धिमंतानें योजलेल्या युक्तीनें गर्भावस्थेंत असणाराचासुद्धां घात होतो.

लढाईविषयीं लिहीत असतां कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत महत्त्वाची माहिती अगदीं बारकाईनें दिली आहे. सैन्याच्या छावणीकरितां जागा पसंत करणें ती सेनानायक, वास्तुशास्त्रज्ञ आणि वर्धकी म्हणजे सुतार ह्या तिघांनीं पसंत करून ती जागा असेल त्याप्रमाणें छावणीचा आकार वाटोळा, लांबट किंवा चौकोनी जसा ठेवतां येईल तसा ठेवावा. एकंदर छावणीचे नऊ विभाग व तिच्या आंतल्या भागांत सहा रस्ते करून बाहेर जाण्यायेण्याकरितां चार दरवाजे ठेवावे. छावणींत भलत्याच माणसाचा प्रवेश होऊं नये म्हणून ' **मुद्रारक्षणं च** ' जाणारां येणारांस परवाने देण्यांत यावे.

छावणीचे जे नऊ विभाग करावयाचे ह्मणून वर सांगितलें आहे त्यांपैकीं एक खुद्द राजाकरितां, एक त्याच्या जनानखान्याकरितां, एक जनानखान्याच्या रक्षणार्थ नेमलेल्या सैन्याकरितां, एक देवपूजेकरितां त्याप्रमाणेंच एक जसा मुख्य प्रधानाकरितां तसाच एक उपाध्यायाकरितां असावा असें सांगितलें आहे. यावरून राजेलोक सहकुटुंब सहपरिवार लढाईवर जात असत; इतकेंच नव्हे तर आपल्या कुलदेवतांची संवळी बरोबर बाळगून आपल्या कुलधर्मांतहि ते कधीं अंतर पडूं देत नसत ही गोष्ट देव आणि उपाध्येबुवा यांच्याकरितां छावणींत जी जागेची योजना करावी म्हणून सांगितलें आहे ती वरून उघड दिसते. छावणीमध्यें कोणत्या अधिकाऱ्याचा तळ कोठें असावा, सैन्याचीं चार अंगें कोठें स्थापावीं, अठरा कारखाने कोठें कसकसे रहावे, गुप्त हेरांचें ठिकाण कोणतें ह्या गोष्टीहि अगदीं ठरलेल्या असून छावणीची रचना खंदक, तटबंदी, बुरूज वगैरे मुळें एखाद्या राजधानीच्या शहरासारखी असे. छावणींत राजाच्या संरक्षणार्थ जे पहारेकरी नेमीत त्यांच्या अठरा टोळ्या केलेल्या असून प्रत्येक टोळीस आपल्या

पाळीप्रमाणें पहारा करावा लागे. '**दिवायामं च कारयेदपसर्पज्ञानार्थम्**' हेरांकरितां तर एक स्वतंत्र वेळापत्रक तयार करून छावणींत ठेवलेलें असे. मद्यपान, द्यूतक्रीडा, वादविवाद आणि संमेलनें यांची छावणीमध्यें सक्त मनाई होती. सेनापतीसुद्धां सर्व लोक छावणीचे नियम बरोबर पाळतात किंवा नाहीं हें पहाण्याचें काम '**अन्तपाल**' नांवाच्या एका स्वतंत्र अधिकाऱ्याकडे देण्यांत येत असे. छावणीच्या पुढें, अगाऊ कांहीं कामदारांची एक टोळी पाठविण्यांत येत असून, मागाहून येणाऱ्या सैन्याला पाण्याचा पुरवठा करण्याकरितां जागोजाग विहिरी पाडण्याचें काम ह्या टोळीकडे सोंपविण्यांत येई. ह्या टोळीवरील मुख्य अधिकाऱ्यास '**प्रशास्ता**' अशी संज्ञा असे.

स्वारीचा बेत नक्की ठरला म्हणजे प्रथम आपल्या राजधानीपासून जेथें जावयाचें तेथपर्यंतच्या सर्व ठिकाणांची एक यादी तयार करून तींत, त्या ठिकाणांपैकीं कोणत्या ठिकाणीं पाण्याचा किती पुरवठा आहे, कोणत्या ठिकाणीं किती धान्य, गवत, जळाऊ लांकूड वगैरे मिळूं शकेल इत्यादि माहिती पूर्ण चौकशी करून नोंदावी आणि त्या धोरणानें लहान मोठे मुक्काम मुकरर ठरवावे. '**द्विगुणं भक्तोपकरणं वाहयेत्**, अर्थात आपणाला जरूर वाटत असेल त्याच्या दुप्पट धान्यादि पदार्थ सैन्याबरोबर घ्यावे असें सांगून अर्थशास्त्रकारांनीं सैन्याचें कूच चालू असतां सेनापति, राजा, राजाचा परिवार, पायदळ, घोडेस्वार वगैरेनीं कोठे चालावें ही माहिती दिली आहे. अगदीं भिकार सैन्य रोज एक योजन, मध्यम रोज दीड योजन आणि उत्तम सैन्य रोज दोन योजनें, म्हणजे दहा मैलांपेक्षा थोडें अधीक, कूच करूं शकतें असें कौटिल्याचें म्हणणें आहे. रस्त्यानें मार्गक्रमणास येणाऱ्या अडचणी ध्यानांत घेऊन सेनानायकानें आपल्या सैन्याचे मकर, शकट, वज्र, सूचि वगैरे व्यूह रचावे आणि मग कूच करावें. स्वारीच्या खर्चाची अगाऊच चांगली व्यवस्था करावी आणि ह्या व्यवस्थेच्या, मित्रराष्ट्रांकडून मिळणाऱ्या मदतीच्या, शत्रुसैन्याच्या बलाबलाच्या आणि पावसाच्या धोरणानें कूच सावकाश किंवा जलदीनें करावयाचें तें ठरवावें.

हस्तिस्तम्भसङ्क्रमसेतुबन्धनौकाकाष्ठवेणुसङ्घातैः
अलाबुचर्मकरण्डदृतिप्लवगण्डिकावेणिकाभिश्चोदकानि तारयेत्।

कूच चालू असतां रस्त्यांत नदीसारख्या जलसंचयानें आडविलें असतां, हत्ती, वृक्षांची खोडें, साकू अथवा पूल, नौका, वाशांच्या, बांबूंच्या किंवा भोप-

त्यांच्या सांगडी, कातड्यानें मढविलेल्या टोपल्या, कातड्याच्या पिशव्या गण्डिका (?) आणि वेणिका (?) यांच्या सहाय्यानें पलीकडे जावें असें कौटिल्यानें सांगितलें आहे ! पाण्यांतून तरून जाण्याच्या उपरोक्त शेवटच्या दोन साधनांविषयीं संगति लागण्यासारखा खुलासा जर मिळाला तर त्या वेळच्या शास्त्रीय ज्ञानावर अधिक प्रकाश पडला असता.

धर्मयुद्धाचे गोडवे गाऊन आमच्या रजपूत लढवय्यांनीं बळेंच होऊन आपल्या गळयांत दास्याचें लोढणें अडकवून घेतलें असलें तरी पंचवीसशें वर्षांपूर्वी कौटिल्या-सारखे मुत्सद्दी त्याची खरी किंमत ओळखून होते यांत कांहीं शंका नाहीं. आपणांजवळ असावी तशी सैन्याची बळकटी नसेल, संकटकाळीं योग्य उपाय योजण्याचीं साधनें आपणाजवळ नसतील आणि उघड लढाई देण्यास हवी तशी युद्धभूमीची अनुकूलता आपणांस नसेल तर खुशाल कपटयुद्ध करून शत्रूला पराभूत करावें असें कौटिल्याचें मत आहे. शत्रु संकटांत असतां किंवा त्याची छावणी त्याला प्रतिकूल अशा ठिकाणीं असतां त्याजवर खुशाल चाल करून जावें. शत्रू, त्याला अनुकूल अशा ठिकाणीं असतां, आपणांवर जंगली लोकांनीं अथवा विश्वासघातकी लोकांनीं हल्ला करून आपला पराभव केला असा खोटाच बहाणा करावा म्हणजे तो आपलें तें अनुकूल ठिकाण सोडून आपल्यावर चाल करून येईल असें झालें म्हणजे आपण एकदम त्याजवर तुटून पडावें आणि त्याचा पराभव करावा. एकीकडे हल्ल्याची हूल दाखवून दुसरीकडूनच हल्ला चढवावा. आपली छावणी सावलींत असतां नाना प्रकारच्या युक्त्यांनीं शत्रूच्या सैन्याला रात्रभर जागवून दिवसा विश्रांतीच्या वेळीं भर उन्हांत त्यांना लढण्यास लावावें आणि त्यांचा पराभव करावा. असे कपट युद्धाचे अनेक मासले देऊन धर्मयुद्ध कशाला म्हणावें तें कौटिल्यानें सांगितलें आहे. अशा युद्धाच्या आरंभीं आपले सैनिक एकत्र बोलावून त्यांना उद्देशून राजानें म्हणावें:—**तुल्यवेतनोऽस्मि भवद्भिस्सह भोग्यमिदं राज्यं** " मी तुह्मांप्रमाणेंच एक पगारी नोकर आहे. शत्रूचें हें राज्य जिंकून आपण सर्वजण याचा उपभोग घेणार आहों ह्मणून शत्रूशीं नेटानें लढा आणि त्याचा पराभव करा. " प्रधान आणि पुरोहित यांनीं पुराणादिकांतले आधार देऊन रणांगणावर युद्ध करतां करतां मरणाऱ्याला प्राप्त होणाऱ्या पारलौकिक थोरपणाचें वर्णन त्यांना ऐकवावें. ज्योतिषी लोकांनीं आपल्या

सैन्याला ग्रह कसे अनुकूल आहेत आणि शत्रूला ते कसे प्रतिकूल आहेत याचें वर्णन सैनिकांपुढें करावें.

युद्धारंभाच्या अधले दिवशीं राजानें उपास करावा वगैरे धार्मिक विधि सांगण्यासहि कौटिल्यानें कमी केलें नाहीं, सैन्यामध्यें सूतमागधादि जे भाट असतील त्यांनीं पुनः पुनः **'शूराणां स्वर्गमस्वर्गं भीरूणां'** शूराना स्वर्ग आणि भित्र्यांना नरकप्राप्ति होते असें सांगून सैनिकांच्या जातकुळीची वर्णनें त्यांना ऐकवावींत. गुप्त हेरांनीं स्वतःच्या जयाच्या आणि शत्रूच्या पराजयाच्या बातम्या वारंवार सैन्याला द्याव्यात. सेनापतीनें पराक्रमाच्या कृत्यांची आणि ती करणारास सरकारांतून मिळणाऱ्या बक्षीसांची घोषणा आपल्या सैनिकांपुढें करावी. युद्ध करीत असलेल्या सैन्याच्या मागें शस्त्रवैद्यानीं आपलीं हत्यारें, निरनिराळ्या प्रकारचीं तेलें आणि पट्या बांधण्यास लागणारा कपडा घेऊन व स्त्रियांनीं चांगलीं चांगलीं खाद्यपेयें घेऊन तयार असावें आणि उत्तेजनपर भाषणें करून सैनिकांमध्यें ईर्षा उत्पन्न करावी; असें कौटिल्याचें सांगणें आहे.

शत्रुसैन्याचा एकदां पराभव केला म्हणजे मग त्याला अधिक त्रास देण्याच्या भावगडींत न पडतां विजयी राजानें आपल्या शत्रूशीं शक्य असल्यास ताबडतोब तह करावा कारणः—

पुनरावर्तमानस्य निराशस्य च जीविते
अधार्यो जायते वेगस्तस्माद्भग्नं न पीडयेत्

पराभव पावलेलें सैन्य चिडून एकदां जीवावर उदार झालें म्हणजे त्याला आवरणें मोठें कठीण असतें.

स्वभूमिः पत्त्यश्वरथद्विपानामिष्टा युद्धे निवेशे च ।

छावणीकरितां काय किंवा लढण्याकरितां काय पायदळ, घोडे, रथ आणि हत्ती यांस त्यांच्या परिचयाच्या व स्वभावाच्या योग्य अशी जागा मिळाली पाहिजे असें सांगून अर्थशास्त्रकारांनीं सैन्याच्या ह्या प्रत्येक अंगास कसकशी जागा असावीं याची आणि त्यानंतर ह्या प्रत्येक भागाच्या कार्याची माहिती दिली आहे. ज्या राजाजवळ घोडे कमी असतील त्यानेंः—

कुर्याद्गवाश्वव्यायोगं रथेष्वल्पहयो नृपः

घोड्याबरोबर रथांना बैल जोडावे; तसेंच ज्याच्याजवळ हत्ती कमी असतील त्यानेंः—

खरोष्ट्रशकटानां वा गर्भमल्पगजस्तथा

आपल्या सैन्याच्या मध्यभागीं हत्तीच्या ऐवजीं गाढवें, उंट आणि गाडे ठेवावे असें कौटिल्य सांगतो.

तटबंदी असलेली आपली छावणी आणि युद्धभूमि यांमध्यें निदान पांचशें धनुष्यें म्हणजे एक हजार यार्ड अंतर सोडावें आणि आपल्या सैन्यापैकीं जें सर्वोत्कृष्ट सैन्य असेल तें इतर सैन्यापासून वेगळें करून शत्रूला न दिसेल अशा सुरक्षित जागीं ठेवून नंतर सैन्याचा नायक आणि सेनापति यांनीं बाकीचें सैन्य युद्धाला उभें करावें. पायदळांत, प्रत्येक शिपायामध्यें एक **शम** म्हणजे १४ अंगुळें अथवा एक हात अंतर ठेवावें. प्रत्येक घोडेस्वारांत '**त्रिशमांतरमश्वम्**' तीन हात. '**पंचशमान्तरं रथम्**' प्रत्येक रथामध्यें पांच हात आणि प्रत्येक हत्ती मध्यें ह्याच्या दुप्पट किंवा तिप्पट अंतर राखावें. सारांश कोणाहि सैनिकाला अडचण न वाटतां लढतां आलें पाहिजे.

उपरोक्त अंतर एकाच रांगेतील दोन सैनिकांमधलें आहे, रांगा रांगामधील नव्हे. तीर कमठा घेऊन लढणारांच्या रांगांमध्यें दहा यार्ड, घोडेस्वारांच्या रांगांत सहा यार्ड आणि रथ व हत्ती यांच्या रांगांमध्यें दहा यार्ड ह्याप्रमाणें अंतर सोडून रांगा उभ्या कराव्या.

एका घोडेस्वाराच्या प्रतिकाराला तीन तिरंदाज पादचारी आणि एका रथ्याच्या किंवा गजवाहकाच्या प्रतिकारार्थ पंधरा पायदळ शिपाई किंवा पांच घोडेस्वार असावेत असें कौटिल्याचें म्हणणें आहे. तीन रथांची एक तुकडी ह्या प्रमाणें सैन्याच्या अग्रभागीं आणि दोन बगलांच्या आरंभाच्या व शेवटच्या मिळून चार टोंकांस अशा तीन तीन तुकड्या, म्हणजे एकंदर पंचेचाळीस रथ सज्ज ठेवावे. ह्या व्यूहाला **समव्यूह** असें म्हटलें आहे. केव्हां केव्हां रथांची ही संख्या वाढवावी असेंहि सांगितलें आहे. ह्या रथव्यूहाप्रमाणेंच **अस्तिव्यूह, अश्वव्यूह पतिव्यूह**, आणि चतुरंग सैन्याचा उपयोग करून करावयाचा व्यामिश्र व्यूह, यांच्या रचनेविषयीं सविस्तर माहिती देऊन सैन्याच्या प्रत्येक अंगापैकीं कोणत्या अंगाच्या मदतीनें युद्धाला कसा आरंभ करावा हें सांगितलें आहे.

यापुढील प्रकरणांत, दण्ड, भोग, मण्डल, असंहत प्रदर, दृढक, असह्य, श्येन, चाप, सञ्जय, विजय, स्थूलकर्ण वगैरे व्यूह रचनांची व कोणत्या व्यूहरचनेस कोणत्या व्यूहरचनेनें तोंड द्यावें याबद्दलची माहिती दिली आहे.

हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ ह्या प्रत्येकांतील दहावरील अधिकाऱ्यास पदिक, **पदिकदशकस्यैकः सेनापतिः** पदिकांवरील अधिकाऱ्यास सेनापती आणि दहा सेनापतीवरील अधिकाऱ्यास नायक अशी संज्ञा होती. अशा तुकड्यांपैकीं कोणती तुकडी विवक्षित आहे हें वाद्याचे निरनिराळे ध्वनि, ध्वज, पताका इत्यादिकांवरून आळखण्यांत येत असे.

सङ्घलाभो दण्डमित्रलाभानामुत्तमः

एखाद्या व्यक्तीपासून सैन्याची, मैत्रीची अथवा द्रव्याची मदत मिळण्यापेक्षां एखाद्या संघाची मदत मिळणें जास्त हितावह आहे म्हणून जो संघ आपणांवर थोडेंबहुत प्रेम करीत असून आपल्या शत्रूला न बधण्यासारखा आहे असें वाटत असेल, त्या संघाशीं गोडीगुलाबीनें वागून आणि त्याजकडे देणग्या वगैरे पाठवून त्याची मैत्री संपादन करावी. याच्या उलट प्रकार असल्यास, म्हणजे तो संघ आपल्या विरुद्ध असल्यास त्यांतील एक एका व्यक्तीला गांठून चोप द्यावा आणि वाटतील त्या थापा मारून संघांतील मंडळीमध्यें भांडण्याचें बीज पेरावें.

कांबोज (हा प्रांत तिबेटाला लागून होता) आणि सुराष्ट्र (काठियावाड) येथील क्षत्रिय श्रेणी ह्यावेळीं शेती, व्यापार आणि शिकार वगैरे करून आपलें योगक्षेम चालवीत असून, लिच्छिविक*, वृजिक, मल्लक*, मद्रक म्हणजे मद्रास-कडील अथवा दक्षिण हिंदुस्थानांतील क्षत्रिय, कुकुर म्हणजे यादववंशोय तसेंच कुरु आणि पांचाल हीं सर्व क्षत्रिय कुळें केवळ आपणांस राजे ह्मणविण्यांतच धन्यता मानीत होतीं.

गुप्तहेरांनीं ह्या सर्व क्षत्रिय संघांत आपला शिरकाव करून घेऊन त्यांपैकीं कोणामध्यें चुरस आहे, कोण कोणाचा द्वेष करीत आहे, कोण कोणाचीं भांडणें आहेत याचा छडा काढावा आणि "**असौ त्वा विजलपति**" हा तुझी निंदा करतो असें सांगून त्यांची आपसांत भांडणें लावून द्यावीं. आचार्यांच्या वेशानें शास्त्र, कला द्यूत किंवा इतर खेळ या संबंधानें वादाचे प्रश्न उत्पन्न करून त्यांच्या भांडणांस प्रोत्साहन द्यावें. तीक्ष्ण नामक हेरांनीं वेश्यांचीं घरें आणि दारूचे गुत्ते यांत बसून संघांतील प्रमुख व्यक्तींपैकीं एकाच्या उच्च कुळाची स्तुति तर

* हीं क्षत्रिय कुळें कोणत्या प्रदेशांतील हें कांहीं समजत नाहीं.

एकाच्या नीच कुळाची निंदा करून त्यांचीं आपसांत भांडणें लावावीं. त्यांच्यामध्यें होत असलेला रोटी बेटी व्यवहार असल्या उच्च नीचत्वाच्या खोट्या कल्पना त्यांच्या डोक्यांत भरवून बंद पाडावा. ह्या सर्व भांडणांत राजानें हीन पक्षाला मदत करून त्याचा वरिष्ठ पक्षाशीं जोरानें तंटा लावून द्यावा. त्यांचें भांडण जोरांत आलें म्हणजे पुढें होऊन त्या सर्वांस आपल्या हुकमतीखालीं एकत्र अथवा पांच दहा ह्याप्रमाणें फोडून रहाण्यास भाग पाडावें. राजा नेमण्याची अवश्यकता असेल तेथें त्यांच्यापैकींच पण आपणाला हवा असेल तो राजा नेमावा आणि ज्योतिषाच्या वेशांत असणाऱ्या गुप्त हेरांकडून संघांतील हजारों लोकांपुढें त्याची, त्याच्या कुळाची आणि त्याच्या दैवयोगाची स्तुति करवून संघांतील पुढाऱ्यांच्या मनांत त्याजविषयीं पूज्य भाव उत्पन्न करावा. कधीं कधीं संघांतील प्रमुखांपैकीं एखाद्याच्या मुलाला हेरांनीं '**तूं राजपुत्र** आहेस' असें सांगावें. त्याच्या मनाला ती कल्पना पटली म्हणजे तो संघांतील कित्येक लोक आपल्या पक्षाला ओढील. राजानें त्याच्या पक्षाला मदत देऊन त्याच्या हातून संघांतील अर्ध्या मुर्ध्या लोकांचा बीमोड करावा आणि नंतर '**अवाप्तार्थस्तमपि प्रवासयेत्**' आपला हेतु सफल होतांच त्या पोरालाहि हद्दपार करावें. अशा रीतीनें हेराकडून अगणित आणि भयंकर अत्याचार करवून राजानें आपले हेतू पूर्ण करून घ्यावे असें कौटिल्यानें सांगितलें आहे.

गुप्त हेरांमध्यें ह्या वेळीं विधवा बायकांची योजना करण्यांत येत होती हें पूर्वीं सांगितलेंच आहे. अशा स्त्रियांनीं ठेवींसंबंधानें आपसांत खोटेंच भांडण उपस्थित करून तें संघाच्या मुख्यापर्यंत पोंचवावें आणि अशा रीतीनें त्याच्या दर्शनाचा योग येतांच त्याला आपल्या सौंदर्यानें मोहित करून टाकावें. स्त्रीयांसंबंधानें ह्यापेक्षांहि भयंकर स्वरूपाचे आणखी शेंकडों अत्याचार करावे, पण '**संघेष्वेवमेकराज्ञो वर्तेत**' सर्व संघांचा राजा बनून मिरवावें. ही कौटिलीय नीति ज्या काळीं अमलांत असेल तो पंचवीसशें वर्षांपूर्वींचा काळ आमचे पुराणमतवादी-लोक हें वाचूनहि मोठा नीतिमत्तेचा काळ होता असेंच म्हणणार काय ?

प्रकरण पंधरावें.

एखाद्या दुर्बल राजावर बलिष्ठ राजा चाल करून आला असतां, ' **रक्षेत्स्वदेहं न धनं का ह्यनित्ये धने दया** ' अनित्य अशा द्रव्याच्या लोभांत न पडतां हरप्रयत्नानें त्या दुर्बल राजानें पाण्याच्या ओघांतील वेताप्रमाणें अथवा बोरूप्रमाणें सुरक्षित रहावें. भारद्वाज म्हणतो, " बलिष्ठाला शरण जाणें म्हणजे इंद्राला शरण जाणेंच आहे. " विशालाक्षाचें मत ह्याच्या अगदीं उलट होतें. तो ह्मणतो, " लढणें हा क्षत्रियाचा धर्म आहे ' **पराक्रमो हि व्यसनमपहन्ति** ' पराक्रमानेंच संकटांचें हरण होतें ह्मणून दुर्बल राजानें जयापजयाची पर्वा न करितां आपलें साधनसर्वस्व खर्ची घालून बलिष्ठ राजाशीं लढावें; त्याला शरण जाऊं नये." कौटिल्याला हीं दोनहि मतें पसंत नाहींत; तो "म्हणतो, उठल्या सुटल्या दुसऱ्याला शरण जाणाराचें जीवित केवळ आशा-विहीन ! तसेंच बलहीनानें आपलें सर्वस्व खर्चून बलिष्ठाशीं लढणें म्हणजे होडी वगैरेच्या आधारावांचून समुद्रांत उडी टाकून मरणेंच आहे. म्हणून बलहीनानें बलिष्ठाच्या अथवा एखाद्या मजबूत किल्ल्याच्या आश्रयानें रहावें. "

न्यायी, राक्षसी आणि लोभी असे स्वारी करणारांचे तीन वर्ग करून कौटिल्य म्हणतो, ह्यांपैकीं न्यायी स्वारी करणारा, ज्यावर स्वारी केली असेल तो शरण येतांच संतुष्ट होतो ह्मणून दुर्बल राजानें त्याला शरण जाऊन त्याच्या आश्रयास रहावें. लोभी स्वारी करणारा, जमीन किंवा द्रव्य मिळालें ह्मणजे खुष होतो; सबब अशाशीं गांठ पडली असतां दुर्बलानें त्याला द्रव्य देऊन आपलें संरक्षण करावें. तिसऱ्या म्हणजे राक्षसी स्वारी करणाराची तृप्ति कशानेंहि होत नसते; तो मिळेल तितकें पचनीं पाडून दुर्बलांचेंच काय पण त्यांच्या स्त्रीपुत्रांचेसुद्धां प्राण घेण्याचा प्रयत्न करीत असतो; अशा राक्षसी राजाशीं गांठ पडली असतां, तहाची खटपट करून पहावी आणि तहाचें नच जमलें तर बेधडक मागील प्रकरणांत सांगितलेलें कपट युद्ध त्याच्याशीं करावें. तहामध्यें त्याला सैन्य पाहिजे असेल तर अनावर झालेले हत्ती, घोडे आणि विश्वासघातकी सैनिक त्याला द्यावे. जर त्याला द्रव्य पाहिजे असेल तर अशा मोलवान वस्तु द्याव्या कीं बाजारांत त्यांना कोणी

गिऱ्हाइकच मिळणार नाहीं ! आणि जर त्याला कांहीं प्रदेश पाहिजे असेल तर जो वसाहतीला अवघड, ज्याला संरक्षणाचीं साधनें नाहींत, जो आपल्या दुसऱ्या शत्रूला सहज घेतां येण्यासारखा असेल, असाच प्रदेश द्यावा. वगैरे प्रकार कौटिल्यानें सांगितले आहेत पण त्यांत तहांत मागणी करणारा बलाढ्य राजा अगदींच मूर्ख आहे असें गृहीत धरल्यासारखें दिसतें तें बरोबर नाहीं.

बलाढ्य राजा वरील प्रमाणें तहाला कबूल नसेल तर त्याच्याशीं मंत्रयुद्ध करावें असें सांगून मंत्रयुद्धाची माहिती अर्थशास्त्रकारांनीं एका स्वतंत्र प्रकरणांत दिली आहे. आरंभी, दुर्बल राजानें त्याला कोणत्या राज्याचा कसा नाश झाला हें सांगून त्या राजाच्या मार्गानें तूं जाऊन आपला घात करून घेऊं नको '**धर्ममर्थं चावेक्षस्व**' सद्गुण आणि संपत्ति यांकडे लक्ष्य दे, जे तुला साहस, अधर्म आणि अर्थातिक्रम करण्याचा उपदेश करून तुझे मित्र म्हणवितात, ते मित्र नसून तुझे शत्रु आहेत हें ध्यानांत धर इत्यादि लांबलचक उपदेश करावा; ह्या उपदेशाला जर तो बलाढ्य राजा जुमानणार नाहीं तर मागील प्रकरणाच्या शेवटच्या भागांत वर्णिलेले व त्यापेक्षांहि भयंकर स्वरूपाचे अत्याचार आपल्या निरनिराळ्या गुप्त हेरांकडून आणि वेश्यादि स्त्रियांकडून करवावे. स्त्रीवशीकरणाचें औषध म्हणून आपल्या शत्रूवर त्यांजकडून खुशाल विषप्रयोग करवावा. सामुद्रिकाचें सोंग घेऊन कोणी हेरानें मुख्य प्रधानाला तुमच्या शरीरावर राजचिन्हें आहेत, तुम्हीं राजाच झालें पाहिजे, असें सांगावें आणि स्त्री हेरानें त्याच्या पत्नीला तुझ्या शरीरावर राज्ञीचिन्ह असून तुझ्या पोटीं राजाच जन्मला पाहिजे असें सांगावें आणि त्याच्या अतःकरणांत राजपदाची महत्त्वाकांक्षा उत्पन्न करावी व त्या प्रधानाला राजाविरुद्ध बंड करण्यास उद्युक्त करावें. कोणी हेरानें दारूचा दुकानदार म्हणून त्याजकडे राहून एखाद्या आनंददायक प्रसंगाच्या निमित्तानें शेंकडों घडे दारु प्रथम साधी, नंतर धोतरा घातलेली आणि शेवटीं विष मिसळलेली पाजून त्या राज्यांतील हजारों लोक ठार करावे. ह्या प्रमाणेंच शिजलेलें मांस, भात, पोळ्या वगैरे विकण्याचीं दुकानें काढून गुप्त हेरांनीं आपआपल्या दुकानांतील पदार्थ विषमय करून शत्रूकडील लोक मारून टाकावे. हे सर्व प्रकार मंत्र युद्धाचे आहेत. मंत्रयुद्ध साधण्यासारखें नसेल तेथें गेल्या प्रकरणांतच ज्याची माहिती दिली आहे तें कपट युद्ध करावें. फारतर काय पण—

अन्तःपुरपुरद्वारं द्रव्यधान्यपरिग्रहान्
दहेयुस्तांश्च हन्युर्वा ब्रूयुरस्यार्तवादिनः

हेरांनीं शत्रूचा हल्ला आला अशी खोटीच अफवा उठवून आपल्या शत्रूचा जनानखाना, त्याच्या राजधानीचें प्रवेशद्वार आणि त्याची धान्यादि पदार्थ साठविण्याची कोठारें जाळून त्या ठिकाणाच्या संरक्षणार्थ जे पहारेकरी असतील त्यांस ठार मारून टाकावें. सारांश कांहींहि करावें पण शत्रूवर विजय मिळवावा; हेंच कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत पुनःपुनः सांगितलें आहे.

यात्रेकरितां अथवा पूजेकरितां आपला शत्रु कोणत्या देवळांत जातो तें पाहून त्याच्या वाटेवरील '**शिलाशस्त्रवर्षमुत्तमागारात्**' एखाद्या उंच घरावरून त्याजवर दगडांची आणि शस्त्रांची वृष्टि करावी अथवा कांहीं यंत्रसहाय्यानें मोठाले दगड किंवा एखादें मोठें भाल टांगून ठेवून शत्रु देवळांत शिरतांच त्याचे बंध ढिले करावे व तें भाल त्याच्या नेमकें मस्तकावर पडून किंवा '**कवाटमवपातितं वा**' देवळाच्या दरवाजाची चौकटच डोक्यावर पाडून त्याचा कपाळमोक्ष होईल असें करावें. मूर्तींच्या शरीरांत हत्यारें छपवून ठेवून त्यांनीं देखील आपल्या शत्रूला मारावें असा कौटिल्याचा उपदेश आहे. आपला शत्रु ज्या जागेवर उभा रहात असेल, तो जेथें बसत असेल, तो ज्या जमिनीवर चालत असेल ती जमीन सारवतांना शेणामध्यें विष मिसळून, किंवा देवाचा प्रसाद म्हणून त्याला फुलें देतांना त्यांत भंडारबुक्का वगैरे मध्यें अथवा धूपादिकांच्या धुराच्या मिषानें विषप्रयोग करून त्याला ठार मारावें. चंद्राननेच्या महालांत रामाचा मंचक, भ्रमरांनीं पोखरल्यामुळें मोडला पण आपल्या शत्रूचें आसन कांहींतरी युक्तीनें नुसतें मोडून उपयोगी नाहीं तो त्या आसनाखालीं–'**शूलकूपमवपातनम्**'–खळगा तयार करून त्यांत बसविलेल्या धारेच्या खिळ्यावर पडेल असें करावें; अथवा त्याला फसवून एखाद्या जंगलांत नेऊन तेथें परभारा जंगली लोकांकडून त्याचा प्राण घेववावा. असे आपल्या शत्रूच्या घाताचे अनेक उपाय कौटिल्यानें सुचविले आहेत; ज्या काळीं मनुष्याचे प्राण अशा रीतीनें घेतले जात असतील तो काळ म्हणजे खरोखरच प्रलयकाळ आणि ज्या देशांतील नीतिमत्ता इतक्या कनिष्ट दरजाला पोचली असेल तो देश म्हणजे खरी खरी नरकपुरी असें आज तरी कोणीहि म्हटल्यावांचून रहाणार नाहीं.

सर्वस्वाचा नाश झाल्यामुळें पळ काढण्याची पाळी आली असतां पराजित राजाच्या हेरांनीं प्रेत म्हणून त्याला बाहेर काढावें अथवा–'**स्त्रीवेषधारी वा प्रेतमनुगच्छेत्**' एखाद्या हेरानें प्रेत बनून राजानें स्त्रीवेष घेऊन मृताची पत्नी म्हणून

त्या प्रेत यात्रेबरोबर बाहेर पडावें. हव्याकव्याच्या निमित्तानें होणाऱ्या भोजनप्रसंगीं देखील विषयुक्त अन्न पाणी देऊन शत्रूचा सूड उगवावयास सांगणाऱ्या कौटिल्यानें शत्रूवर विजय मिळविण्याकरितां कोणता अन्याय करूं नका असें सांगण्याचें बाकी ठेविलें असेल !

विजय इच्छिणाऱ्या राजाला जर आपल्या शत्रूचा एखादा गांव घ्यावयाचा असेल तर त्यानें आपल्या लोकांचें उत्साहवर्धन करून शत्रूच्या लोकांच्या अंतःकरणांत भीति उत्पन्न करण्याकरितां आपण सर्वज्ञ असून प्रत्यक्ष देवतांशीं संभाषण करण्याचें सामर्थ्य आपणांमध्यें आहे अशा थापा त्यांस द्याव्या.

जरूर ती माहिती मिळविण्याकरितांच नेमलेल्या गुप्त हेरांकडून ती आणवून किंवा शत्रूच्या दरबारीं असलेल्या आपल्या मदतनीसांकडून खबुतराबरोबर आलेल्या पत्रांच्या द्वारें ती मिळवून, आपणांस ती दुसऱ्यास ऐकूं न जाणाऱ्या ईश्वरी संदेशावरून अथवा दुसऱ्यास न समजणाऱ्या स्वर्गीय खुणांवरून कळली असें शत्रूच्या लोकांत जाहीर करावें आणि आपणांस कळलेली माहिती खरी असल्याबद्दल त्यांची खात्री पटवून द्यावी.

भुयारें खणून त्यांच्या द्वारें आपल्या गुप्त हेरांना, अग्नि, पार बांधलेले पिंपळादि पवित्र वृक्ष, देवतांच्या पोकळ मूर्ति आणि जलसंचय यांच्यामध्यें बसण्यास सांगावें व सर्वांसमक्ष राजानें उपरोक्त अग्नी वगैरेचें पूजन करून त्यांच्याशीं संभाषण करावें. रात्रीच्या प्रहरीं कोणालाहि न समजेल अशा रीतीनें, समुद्र फेंसावर गंधकतेल (Sulfuric Acid) टाकून दीपावलीप्रमाणें पाण्यावर अग्निमाला दाखवून आपल्या आंगीं पाणी जाळण्याचें सामर्थ्य असल्याबद्दल भोळसट आणि बावळट प्रेक्षकांची खातरी करावी. कांतळाच्या आश्रयानें एखादा तराफा दूर अंतरावर कोणालाहि न कळवितां ठेवून त्या तराफ्यावर राजानें आपले मदतगार पाण्यांत रहाणाऱ्या मोठमोठ्या मत्स्यादि प्राण्यांच्या कातीनें अथवा कातड्यानें नखशिखांत झांकून उभे करावे आणि जादुगार ज्याप्रमाणें आपल्या हांडिवागांच्या सहाय्यानें नाना तऱ्हेचे नजरबंदीचे खेळ दाखवितो त्याप्रमाणें आपल्या प्रेक्षकांस आपण पाण्यांत रहाणाऱ्या जलदेवता आणि नागस्त्रिया यांच्यांशीं संभाषण करतों असें त्या खेडवळ लोकांस भासवावें आणि आपल्या साथीदारांच्या नाकाला सुसरी (नक्र) पाणमांजरें (उद्र) पाणडुकर (शिशुमार) इत्यादि जलचर प्राण्यांच्या आंतड्याचें आणि चरबीचें शंभर वेळां कढविलेलें तेल फासावें म्हणजे

त्यांच्या तोंडांतून धुराचे लोटच्या लोट चालले आहेत असें दिसतें. तें दाखवून जलदेवता रागावल्या आहेत असा त्यांचा समज करून द्यावा.

विजय इच्छिणाऱ्या ह्या राजाच्या गुप्त हेरांनीं आणि त्यांच्या हस्तकांनीं ज्योतिषी, भाट, कालज्ञ, गोष्टी सांगणारे आणि भविष्यवादी बनून राजाच्या उपरोक्त दैवी शक्तीचा प्रभाव सर्वत्र पसरावा. आपल्या राजाला देवतांनीं प्रत्यक्ष दर्शन देऊन दीव्य शस्त्रें आणि विपुल संपत्ति अर्पण केली आहे व स्वप्नाचे हेतु आणि पशुपक्ष्यांची भाषा समजण्याचें सामर्थ्यहि दिलें आहे असें सर्वत्र सांगावें आणि राजाच्या शत्रूबद्दल त्याच्या जन्म नक्षत्रावर उल्कापात आणि मेघांचा गडगडाट होतो असें दाखवून तो अभागी आहे अशी त्याच्या प्रजेची समजूत करून द्यावीं-

ह्या राजाच्या कांहीं गुप्त हेरांनीं शत्रूच्या दरबारीं राहून तेथें ह्याची, याच्या सैन्याची आणि याच्या नोकरांवरील प्रेमाची व त्यांस वागविण्याच्या पद्धतीची तारीफ करून शत्रूच्या लोकांच्या मनांत याजविषयीं आदर उत्पन्न करावा. आणि ते अशा आदरानें, विजयेच्छु राजाकडे मानाची आणि द्रव्याची आशा धरून गेले असतां राजानें दोहोंची खैरात करण्यांत बिलकुल कसूर करूं नये. धान्याची जरूर असेल त्यास धान्य द्यावें. पैशाची जरूर असेल त्यांस पैसा द्यावा. ज्याना धान्य अथवा द्रव्य घेण्यांत कमीपणा वाटत असेल त्यांना त्यांच्या बायका मुलांकरितां सन्मानपूर्वक अलंकार अर्पण करावे.

प्रत्यक्ष राजाला पकडण्याचेहि कित्येक उपाय कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत दिले आहेत पण असल्या उपायानें एक राजा दुसऱ्या राजाच्या हातीं सांपडत असे असें मानणें, म्हणजे कौटिल्याची राजनीति फक्त एकाच राजाला अवगत असून बाकीचे सर्व तिच्या विषयींच काय पण जगांतील अगदीं सामान्य व्यवहाराविषयींहि अज्ञान असत असें मानण्यासारखें आहे. तसेंच सृष्टिनियमांस सोडून कित्येक गोष्टी घडतात असें मानून त्या घडवून आणणारासंबंधानें पूज्य भाव बाळगल्यानें तोंडघशी पडणारे हजारों लोक तत्कालिन समाजांत होते असें समजणें व तो समाज केवळ अज्ञानावस्थेंत लोळणारा, विचारशून्य आणि भोळसट वृत्तीनें ग्रस्त असा होता असा ग्रह करून घेणेंच आहे. परंतु पंचवीसशें वर्षांपूर्वींच्या आपल्या समाजाविषयीं अशी समजूत करून घेणें आमच्या मनाला तरी प्रशस्त वाटत नाहीं.

कौटिल्य म्हणतो, गुप्त हेरांपैकीं कोणी एकानें आपल्या शिष्यांसह शत्रूच्या राजधानीसान्निध एखाद्या डोंगराच्या गुहेंत मुंडन केलेल्या संन्याशाच्या अथवा जटिल वैराग्याच्या वेशानें रहावें आणि त्या शिष्यांच्या द्वारें आपले गुरुजी चारशें वर्षें वयाचे आहेत अथवा केव्हां केव्हां त्याना पृथ्वीच्या पोटांत कोठें काय आहे हें समजतें अशा बातम्या सर्वत्र पसराव्या आणि गुरुजींचा प्रसाद म्हणून त्या राजाकडे फलमूलादिकांची भेट पाठवावी. राजा भेटीला आला म्हणजे ह्या गुरूनें त्याला त्याच्या पूर्वजांचा आणि त्याच्या राष्ट्राचा गेल्या चारशें वर्षांचा इतिहास सांगून आपण--' शते शते च वर्षाणां पूर्णोऽहमाग्निं प्रविश्य पुनर्बालो भवामि ' प्रत्येक शंभर वर्षांनी फिनिक्स पक्षाप्रमाणें अग्निप्रवेश करून पुनः बालस्वरूप धारण करतों. आपला चौथा अग्निप्रवेश येथेंच होणार असें सांगावें व समारंभ पहाण्याकरितां राजाला सन्मानपूर्वक सात दिवस सहकुटुंब येण्याविषयीं निमंत्रण द्यावें. त्याला हजर रहाणें जरूर वाटावें म्हणून तूं त्यावेळीं '**त्रीन्वरान्वृणीष्व**' तीन वर माग, मी ते पूर्ण करीन" असें त्यास सांगावें आणि याप्रमाणें तो आला म्हणजे संधि साधून त्याला पकडावें किंवा दुसऱ्या प्रकारच्या गुरूनें ज्यांत सर्प शिरूं आणि राहूं शकेल अशा प्रकारच्या एका पोकळ कळकाच्या नळकंड्याला रक्तानें रंगविलेलें वस्त्र गुंडाळून आणि त्यावर सोन्याचा मुलामा चढवून अथवा असें सोन्याच्या पत्र्याचेंच एखादें नळकांडें करून तें वारुळांत छपवून ठेवावें. जरूर असेल तर आणखीहि थोडें द्रव्य तेथें ठेवून द्यावें; इतकी तयारी झाल्यावर राजा दर्शनाला आला असतां शिष्य मंडळींनीं '**असौ सिद्धः पुष्पितं निधिं जानाति**' हे सिद्ध पुरुष, वर काढण्यासारखें भूमिगत द्रव्य कोठें आहे हें अगदीं बरोबर सांगतात, असें राजाला सांगावें. राजानें ' ही गोष्ट खरी काय?' असें ह्या भोंदु गुरूस विचारलें असतां त्यांनीं नुसतें 'तथा' म्हणजे, 'होय, तसेंच ! ' असें म्हणावें आणि आपल्या म्हणण्याची सत्यता पटवून देण्याकरितां तें नळकांडें बाहेर काढावें आणि राजाला सांगावें कीं:—'**नागरक्षितोऽयं निधिः प्रणिपातसाध्यः**' पहा, द्रव्यनिधि आहे पण त्याच्या रक्षणार्थ भुजंग आहे; हें पहा त्याचें घर. कांहीं होमहवन केलें असतां भुजंग निघून जाईल. राजा त्या हवनाकरितां ह्या सिद्धाच्या गुहेजवळ येऊन राहिला असतां त्याला मारावें. द्रव्य काढणारे गुरुजी डोंगराच्या गुहेंत न रहातां कधीं कधीं वर एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें कृत्रिम अग्निज्वाला करून त्या मधून प्रगट होत असत.

कधीं कधीं ह्या गुरुजींनीं आपणास जारणमारण विद्या येते, आपणांस दिव्यौषधींचें ज्ञान आहे, "तुझ्या राज्याची संरक्षक देवता मला प्रसन्न आहे," वगैरे थापा मारून कांहीं तरी हवनाची तयारी करावी आणि त्याकरितां राजा आला असतां उपरोक्त रीतीनें त्याची वाट लावावी. केव्हां त्याला तुला वरुणाचें अथवा नागराजाचें दर्शन करवितों असें सांगून पूर्वी एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें गुप्त मार्गानें पाण्यांत जाऊन वेषांतरानें त्याला फसवावें आणि मारावें. केव्हां त्याला त्याचे शत्रू प्रत्यक्ष दाखविण्याचें निमित्त करावें तर केव्हां त्याच्या शत्रूचे पुतळे जाळून प्रत्यक्ष त्यांचा नाश करतों असें सांगावें आणि तें पहाण्याकरितां तो आला असतां त्याचा समाचार घ्यावा. केव्हां व्यापाऱ्याच्या मिषानें उत्तम घोडे आणून ते पहाण्यास तो आला असतां त्या घोड्यांकडूनच त्याला तुडवून टाकावें. केव्हां आपल्या राज्यांतील उत्तम हत्ती दाखवून तसल्या हत्तीच्या शिकारीकरितां एखाद्या जंगलांत नेऊन, तर केव्हां रूपवती स्त्री त्याला दाखवून तिच्या अभिलाषानें त्याला तिच्या महालांत नेऊन, त्याचा समाचार घ्यावा. अशाच आणखी कित्येक युक्त्या सांगून कौटिल्य म्हणतो अशा नानाविध मार्गानें राजानें आपल्या शत्रूला धरावें अथवा मारावें.

यानंतर हेरांनीं आणखी कांहीं अत्याचार कसे करावे, शत्रूंच्या गोपालांनां खाण्यापिण्याच्या पदार्थांत धोतऱ्याचा रस मिसळून बेशुद्ध करून त्यांच्या गाई कशा हरण कराव्या वगैरे कौटिल्यानें सांगितलेल्या गोष्टी महत्वाच्या नसल्यामुळें आह्मी हा भाग येथेंच पुरा करितों.

प्रकरण सोळावें.

प्रसारवीवधच्छेदान्मुष्टिसस्य वधादपि
वमनात् गूढघाताश्च जायते प्रकृतिक्षयः

लोकांच्या व्यापाराचा, शेतांतील उभ्या पिकाचा आणि शेतीच्या उत्पन्नाचा नाश केला, त्यांच्या पुढाऱ्यांना गुप्तपणें ठार मारिलें आणि त्यांना पिटाळून लावलें म्हणजे राज्यांतील प्रजेचा क्षय होतो; याकरितां जिंकलेल्या प्रदेशांतील लोकांना निर्भयपणें सुखाचा पूर्ण अनुभव घेतां येईल अशी व्यवस्था विजयी राजानें केली पाहिजे. '**न ह्यजनो जनपदो राज्यं जनपदं वा भवति**' 'निर्जन प्रदेशाला जनपद अथवा राष्ट्र म्हणतां येत नाहीं.' असें कौटिल्याचें मत असल्यामुळें, तो म्हणतो कीं, जेव्हां अशा प्रदेशांत पुंडावा माजेल तेव्हां,-राजाला जर तो प्रदेश सोडून द्यावयाचा नसेल तर-राजानें तेथील लोकांस बक्षिसें देऊन आणि करांची माफी करून तेथें शांतता प्रस्थापित केली पाहिजे; तसेंच त्यानें आपलें युद्धक्षेत्र आपल्या राज्यांतील लोकवसतीपासून दूर, शत्रूच्या राज्यांतच नेलें पाहिजे. अशा रीतीनें प्रजेमध्यें शांतता राखण्याकरितां आणि तिला सुख देण्याकरितां राजा झटत असतां प्रजा जर त्याच्या प्रयत्नाला व्यत्यय आणील तर मात्र त्यानें उपरोक्त श्लोकांत म्हटल्याप्रमाणें प्रजेच्या व्यापारादिकाचा नाश करावा.

आपल्या सैन्यांत धान्य, यंत्रसामुग्री, हत्यारें, कपडालत्ता वगैरे यथास्थित असून किरकोळ कामें करणाऱ्या नोकरांचीहि कमतरता नाहीं आणि शत्रूची स्थिति सर्व बाजूनीं याच्या अगदीं उलट आहे असें दिसून आलें असतां विजयेच्छु राजानें शत्रूला वेढा द्यावा. त्यानें प्रथम आपली सामुग्री आणि आपले दळणवळणाचे रस्ते सुरक्षित करून शत्रूच्या किल्ल्यासभोंवारच्या खंदकांतील पाणी फोडून लावावें अथवा दूषित करून टाकावें. त्यांत जर पाणी नसेल तर इतर ठिकाणचें पाणी आणून त्यांत सोडावें आणि नंतर भुयाराच्या द्वारें सुरुंग लावून किल्ल्याचे कोट आणि त्याचा सज्जा पाडून टाकावा. किल्ल्याचा खंदक खोल असेल तर तो मातीनें भरून काढावा आणि तेथें संरक्षणार्थ असलेल्या सैनिकांस '**यन्त्रैर्घातयेत्**' यंत्रांच्या सहाय्यानें मारून टाकून घोडेस्वारांनीं किल्ल्यांत प्रवेश करावा.

लढाईची धुमश्चक्री चालू असतां मधून मधून सामदायादि प्रकारांनीं युद्ध थांबविण्याचा प्रयत्नहि केल्यावाचून राहूं नये.

शत्रूच्या किल्ल्याला आग लावून देण्याकरितां ससाणा, कावळा, नप्तृ (?) गिधाड, पोपट, मैना आणि कवडा वगैरे किल्ल्याच्या तटांत घरटीं करून राहिलेले पक्षी धरून त्यांच्या शेपटीला ज्वालाग्राही पदार्थ बांधावे आणि त्यांस किल्ल्याकडे सोडून द्यावें, आपले कांहीं गुप्त हेर शत्रूच्या किल्यावर पहारेकरी नेमले जातील अशी योजना करून त्याना मुंगूस, माकडें, मांजरें आणि कुत्रीं यांच्या शेपटांस मुद्दाम तयार केलेल्या ज्वालाग्राही वस्तू बांधून तीं किल्ल्यावरील कुयटारू, ह्मणजे पेंढा, गवत वगैरेसारख्या शीघ्र ज्वालाग्राही पदार्थांनीं शाकारलेल्या घरांवर सोडण्यास सांगावें, आणि सुकलेल्या माशांच्या पोटांत कोलीत ठेवून ते मासे, माकडें अथवा कावळे वगैरे पक्षी उचलून उपरोक्त घरांवर नेतील असें करावें.

या पुढें कौटिल्यानें कांहीं शीघ्रज्वालाग्राही पदार्थ तयार करण्याच्या कृति सांगितल्या आहेत त्या येणेंप्रमाणें:—

१ देवदारू लाकडाचा भुसा, धूप, गवत, गुग्गुळ, टरपेंटाइन, राळ आणि लाख यांचें मिश्रण गाढव, उंट आणि बकरें यांच्या लिदींत घालून त्याच्या केलेल्या गोळ्या.

२ प्रियाल (खिरणी) चें चूर्ण, गोंवारीचा कोळसा आणि मेण हीं एकत्र करून व गर्दभादि उपरोक्त जनावरांच्या लिदींत मिसळून सुकल्यावर त्याचें केलेलें चूर्ण.

३ लोखंड, शिसें, जस्त वगैरे कोणताहि धातू तापवून अगदीं लाल झाल्यावर त्याचें केलेलें चूर्ण किंवा कडूनिंब, पळसाचीं फुलें आणि केश यांची राख टरपेंटाईन, तेल, आणि मेण यांत मिसळून तिचें केलेलें चूर्ण.

४ ताग, शिसव इत्यादिकांच्या सालीवर वरील चूर्ण लावून शत्रूवर सोडण्याकरितां तयार केलेला बाण.

अशा रीतीनें कौटिल्यानें जरी हे अग्नियोग सांगितले आहेत तरी " इतर साधनांनीं जेव्हां शत्रूचा किल्ला घेतां येत नसेल तेव्हांच यांचा उपयोग करून किल्ल्याला आग लावावी; कारण अग्नीचा कांहीं भरंवसा नाहीं ! तो केवळ किल्ल्याचाच नाहीं तर किल्ल्यावरील सर्वस्वाचा आणि तेथील लोकांचा देखील संहार करतो. ' **क्षीणनिचयं चावाप्तमपि राज्यं क्षयायैव भवति** ' अशा

रीतीनें निर्धन आणि निर्मानुष झालेला किल्ला ताब्यांत आला तरी काय उपयोग ? उलट नुकसानच सोसावें लागणार ! " असें तो म्हणतो.

शत्रूच्या छावणींत एकाएकी आग लागली किंवा मुद्दाम लावण्यांत आली, शत्रूचे लोक कांहीं यज्ञयागांत गुंतले असले, सैन्याची कवायत अथवा दुसरें कांहीं दृश्य पहाण्यास मग्न झाले असले, 'सौरिककलहेषु' म्हणजे दारूच्या नादांत एकमेकाशीं भांडत असले, रोजच्या रोज युद्ध करावें लागल्यामुळें थकून गेले असले, अनेक लढायांत पुष्कळ लोक पडल्यामुळें त्यांचें मनुष्यबल कमी झालें असलें अथवा 'जागरणक्लान्तसुप्तजने जागरणामुळें थकवा येऊन ते निद्रेंत मग्न असले तर अथवा दिवस अभ्राच्छादित असला, आणि धुकें अगर दंव पडत असलें तरीहि शत्रूवर एकदम हल्ला चढवावा. विजयेच्छु राजानें रानांत आपल्या लोकांसह गुप्त रूपानें राहून शत्रू तावडींत सांपडतांच त्यावर छापा चढविण्यासहि हरकत नाहीं; असें कौटिल्याचें ह्मणणें आहे.

विजयी राजानें आणि त्याच्या गुप्त हेरांनीं आपल्या शत्रूस आपण त्याचें मित्र, हितकर्तें आणि मदतगार आहोंत असें दाखवून त्याला फसविण्याच्या आणि त्याचा पराभव करून त्याचे किल्ले वगैरे घेण्याच्या यापुढें कौटिल्यानें सांगितलेल्या युक्त्यांचा अवलंब करून पूर्वी कोणी फसले असतील किंवा यापुढें कोणी फसतील असें वाटत नसल्यामुळें त्या युक्त्यांचें वर्णन येथें देऊन मी वाचकांचा वेळ घेऊं इच्छित नाहीं.

विजयी राजा शत्रूचा किल्ला सर करून तेथें राहिल्यावर अथवा आपल्या छावणींत परत आल्यावर शत्रूकडील जे लोक त्याला साष्टांग प्रणिपात करतील, जे त्याला पाठ दाखवून पूर्णपणें पराभूत झालों असें दर्शवितील आणि जे आपल्या केशाचे पाट काढून, आपलीं हत्यारें खालीं ठेवून किंवा आपलें शरीर विरूप करून भयानें कांपत कांपत त्याला बिनशर्त शरण जातील त्यांना त्यानें आश्रय द्यावा. तसेंच शत्रूपक्षाच्या सर्व लोकांस किल्ल्यावरून घालवून दिल्यावर त्यानें किल्ल्याच्या आंतबाहेर आपल्या लोकांचा पहारा ठेवावा आणि नंतर विजयोत्साहपूर्वक त्या किल्ल्यांत प्रवेश करावा.

अशा रीतीनें प्रथम शत्रूचा समाचार घेतल्यावर चक्रवर्ती पदाची इच्छा करणाऱ्या राजानें आपला मोर्चा प्रथम आपल्या आणि आपल्या त्या शत्रूच्या

नजीक असून दोघांसहि न जुमानणाऱ्या अशा मध्यमावस्थेंतील राजाकडे वळवावा. आणि त्याजवर विजय संपादल्यावर शेवटीं तटस्थ अथवा उदासीनावस्थेंतील राजावर चाल करावी. जेथें त्या दोनहि प्रकारचे राजे नसतील त्या ठिकाणीं पृथ्वीपति होऊं इच्छिणाऱ्या राजानें आपल्या आंगच्या गुणांनीं जित शत्रूच्या प्रजेचीं मनें आपणांकडे आकर्षण करून त्यांच्या मदतीनें दूरच्या शत्रूवर हल्ला चढवावा. यानंतर आपल्या मित्रांसहि जिंकावें, आणि अशा रीतीनें एकाला जिंकून त्याच्या मदतीनें दुसऱ्यास, त्या दोघांच्या मदतीनें तिसऱ्यास, ह्याप्रमाणें सर्व पृथ्वी आपल्या ताब्यांत घ्यावी आणि अनेक वर्णांच्या आणि धर्मांच्या लोकांचें यथान्याय पालन करावें.

'द्विविधं विजिगीषोः समुत्थानम्–नटव्यादिकमेकग्रामादिकं च'

विजयेच्छु राजानें जी मुलुखगिरी करावयाची ती शत्रूच्या जंगली मुलुखावर अथवा त्याच्या एकेका गावावर स्वारी करून करावी आणि वंशपरंपरागत चालत आलेला, पूर्वी आपला असतां शत्रूच्या ताब्यांत गेलेला व अगदीं नवा असा प्रांत आपल्या अमलाखालीं घ्यावा.

आपल्या पूर्वजांचा मुलूख जिंकल्यावर पूर्वजांच्या ज्या दोषांमुळें तो शत्रूकडे गेला असेल त्यांपैकीं एकही दोष आपणांमध्यें नसून आपण अनेक सद्गुणांनीं मंडित आहों अशी तेथील प्रजाजनांची खातरी आपल्या वर्तनानें करावी; पूर्वी आपला असतां जो मुलुख आपल्या दोषामुळें शत्रूंनीं घेतला होता, तो पुनः संपादन केल्यावर '**तं प्रकृतिदोषं छादयेत्**' आपले ते दोष झांकून, ज्या गुणांनीं आपण तो पुनः जिंकला त्यांची वृद्धि करावी आणि शत्रूचा जो नवा मुलूख जिंकून घेतला असेल तेथील लोकांची पूर्वीच्या राजाचे दोष आपल्या गुणांनीं झाकून पूर्वीच्या राजाचे गुण आपल्या आंगीं द्विगुणित वसत असल्याबद्दल खातरी पटवून द्यावी. आपलें कर्तव्य चोख रीतीनें बजवावें, कामावर पूर्ण लक्ष्य ठेवावें, तेथील प्रजेपैकीं कोणाला बक्षिसें द्यावी, त्यांच्यावरील कराची माफी करावी, त्यांच्या जीविताच्या आणि मालमत्तेच्या संरक्षणाची हमी घ्यावी, कोणाला देणग्या द्याव्या आणि कोणाला पदव्या द्याव्या. तसेंच त्यांचे जे हितकर्ते पुढारी असतील त्यांच्या धोरणानें वागावें. लढाई चालू असतां शत्रूचा पक्ष सोडून आपणांला येऊन मिळणारांपैकीं ज्याला जितके वेळां बक्षिसाचें अभिवचन दिलें असेल त्याला तितके वेळां त्याच्या मदतीला अनुसरून बक्षिसें द्यावीं. हा राजा वचनभंग कर-

णारा आहे. आपल्या अभिवचनांस हा कवडीचीही किंमत देत नाहीं, अशी कोणाचीही कल्पना होणें चांगलें नाहीं; कारणः–

' अविश्वास्यो हि विसंवादकस्स्वेषां परेषां च भवति '

वचनभंग करणाऱ्या राजावर स्वतः त्याची किंवा शत्रूची प्रजा ह्यांपैकीं कोणीच भरंसा ठेवीत नाहीं; प्रजेच्या इच्छेविरुद्ध आचरण करणाऱ्या राजावर कोणाचा विश्वास नसतो; म्हणून नवीन मुलूख काबीज करणाऱ्या राजानें आपलें वचन पाळण्याविषयीं सदा जागृत रहावें. त्यानें त्या मुलुखांतील लोकांची रहाणी, त्यांचे आचारविचार त्यांचा पोषाख आणि त्यांची भाषा यांचा स्वीकार करावा. तसेंचः—

देशदैवतसमाजोत्सवविहारेषु च भक्तिमनुवर्तेत

त्यांच्या राष्ट्रिक, धार्मिक आणि सामाजिक उत्सवांत व खेळांत श्रद्धापूर्वक सामील व्हावें. त्याच्या गुप्त हेरांनीं पूर्वीचा राजा त्यांना कसा दुःख देत होता आणि प्रस्तुतचा कसा सुख देत आहे, पूर्वीचा राजा त्यांच्या दुःखांत आपलें सुख कसें मानीत होता आणि आतांचा त्यांच्या सुखांतच आपलें सुख कसा मानतो इत्यादि गोष्टी ठिकठिकाणच्या त्यांच्या पुढाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्या. त्या प्रांतांतील विद्वान, वक्ते, दानशूर आणि रणशूर असे जे पुरुष असतील त्यांस विजयी राजानें नक्त रकमेच्या किंवा वतनी जमिनीच्या देणग्या द्याव्या आणि त्यांना कराची माफी करावी. त्याप्रमाणेंच.

सर्वबंधन मोक्षणमनुग्रहं दीनानाथव्याधितानां च '

सर्व कैद्यांना बंधमुक्त करून दीन, अनाथ आणि रोगग्रस्त लोकांना मदत करावी. चातुर्मास्यांत पंधरा दिवस, पूर्णिमांत मासांत चार दिवस आणि राजाच्या जन्म दिवशीं आणि देशाच्या वार्षिकोत्सवप्रसंगीं एक दिवस राज्यांत प्राण्याची हत्या बंद ठेवावी. योनिबालवधं पुंस्त्वोपघातं च प्रतिषेधयेत्' (स्त्रियांचा आणि बालांचा वध व सुंतेचा प्रकार ?) यांना प्रतिबंध करावा. अधर्ममूलक आणि आपल्या उत्पन्नांत तूट आणून सैन्य भरतीस अथडळा आणण्या-सारखे जे प्रघात आणि व्यवसाय असतील ते मोडून काढून धर्ममूलक प्रघात पाडावे; जातिवंत दरोडेखोर आणि म्लेंच्छ यांस केव्हांहि फार दिवस एकाच जागीं मुकाम करून राहूं देऊं नये. त्यांना आपल्या रहाण्याचीं ठिकाणें वारंवार बदल ण्याचा हुकूम द्यावा. आपल्या प्रमुख अधिकाऱ्यांपैकीं जे कोणी शत्रूला सामील अस-

तील असा संशय येईल त्यांसहि अशींच त्यांच्या मुक्कामाची ठिकाणें वारंवार बदलण्यास आणि तीं शत्रूच्या सरदद्दीवरच ठेवण्यास भाग पाडावें. परंतु त्यांच्यापैकीं ज्यांस आपल्या राजाचा घात म्हणजे पर्यायानें आपलाच घात असें वाटत असेल त्यांस एकांतांत बोलावून त्यांची कानउघाडणी करावी. आपल्या लोकांपैकीं जे आज आपल्या बाजूला तर उद्यां शत्रूच्या पक्षाला मिळणारे आहेत असें आढळून येईल त्यांना राज्याच्या अगदीं दूरच्या कोपऱ्यांतच मात्र रहाण्याची परवानगी द्यावी. शत्रूच्या कुटुंबापैकीं जे लोक जंगलाच्या आश्रयानें राहून, आपण जिंकलेला प्रांत आपणांपासून घेण्याच्या खटपटींत असतील व ज्यांच्या अंगीं तसें सामर्थ्य असल्याचें आपणांस आढळून येईल त्यांस निरुपयोगी आणि नापीक असा प्रांत द्यावा. तो त्यांना नको असेल तर त्यांच्या पासून ठराविक खंडणी आणि ठराविक सैन्याची मदत घेऊन त्यांस चौथा हिस्सा चांगला प्रांत द्यावा. असें केलें म्हणजे खंडणीच्या आणि सैन्याच्या भरतीकरितां ते आपल्या प्रजेवर जुलूम करतील आणि त्या जुलमानें त्रस्त झालेली प्रजाच परभारा त्यांचा समाचार घेईल अथवा प्रजेची कळकळ दाखवून तिच्या मदतीनें आपणांसच त्याला कैद करून एखाद्या भयंकर ठिकाणीं ठेवितां येईल.

जिंकलेल्या नवीन मुलखाची व्यवस्था कशी ठेवावी ह्याविषयीं विजयी राजाला कौटिल्यानें वर जो बोध केला आहे त्यावरून तत्कालिन समाजस्थितीचें आणि चालीरीतिचें बरेंच ज्ञान वाचकांस होईल असें आम्हाला वाटतें. ह्या भागाच्या शेवटीं कौटिल्यानें दिलेल्या श्लोकांतील उपदेश प्रजाहिततत्पर राजानें जसा आचरणांत आणण्यासारखा आहे तसाच तो समाजहितार्थ झटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें समाजास पढवून त्याजकडून आचरविण्या सारखा आहे. कौटिल्य म्हणतो:-

चरित्रमकृतं धर्म्यं कृतं चान्यैः प्रवर्तयेत्
प्रवर्तयेन्न चाधर्म्यं कृतं चान्यैर्निवर्तयेत्

इतर राष्ट्रांत चालू असलेल्या ज्या उचित चालीरीति आपल्या राष्ट्रांतील लोकांच्या आचरणांत नसतील त्या त्यांच्या आचरणांत आणण्याचा उपक्रम करावा आणि दुसऱ्या राष्ट्रांत ज्या अन्यायाच्या चाली रूढ असतील त्यांचें अनुकरण आपल्या राज्यांत होणार नाहीं असा बंदोबस्त ठेवावा.

प्रकरण सतरावें.

गुप्त साधनें.

चातुर्वर्ण्याचें संरक्षण करणें हें राजाचें एक प्रमुख कर्तव्य असल्यामुळें आपल्या वर्तनानें जे कोणी तें मोडण्याचा प्रयत्न करतील त्या अधर्माचाऱ्यांस त्यानें गुप्त साधनांनीं शासन केलें पाहिजे.

म्लेंच्छ जातीच्या स्त्रीपुरुषांपैकीं ज्यांना निरनिराळ्या देशाच्या चालीरीति, कलाकौशल्य आणि व्यापारधंदा यांची माहिती असून त्यांची बतावणी करितां येत असेल, तसेंच ज्यांना कुबडा, ठेंगू, रानटी, अंधळा, मुका, बहिरा इत्यादिक सोंगें आणितां येत असतील त्यांच्या द्वारें कालकूटादि विषें,खाण्यापिण्याच्या आणि चैनीनें उपभोगण्याच्या पदार्थांत मिसळून अथवा गुप्त हेरांच्या द्वारें त्यांजवर शस्त्रप्रयोग करून राजानें त्या दुष्ट चातुर्वर्ण्यविघातकांस देहांत शासन करावें आणि त्यांचीं घरें-दारें जाळावीं असें सांगून हीं विषें कशी तयार करावीं याची माहिती कौटिल्यानें दिली आहे ती येथें देतोंः—

चित्र,–म्हणजे 'कांडर' असावा असें मला वाटतें–बेडूक, कौंडिन्यक (?) कृकण म्ह० करढोंक नावाचा पक्षी, पंचकुष्ठ, (?) शतपदी म्ह० घोण यांच्या आणि उच्चिदिङ्ग, (हा शब्द उच्चिटिंग असून याचा अर्थ खेंकडा असावा) कंबली–म्हणजे ' कांबळ्या ' नांवाचा साप असावा–आणि कृकलास म्ह०सरडोका यांच्या सुकवलेल्या शरीरांची आणि शतकन्दाच्या(?) लाकडाची पूड; तसेंच बिबा आणि अवल्गक (हा शब्द अवल्गुली असा असल्यास याचा अर्थ एक विषारी कीटक असा होतो) यांच्या रसांत मिसळून सुकविलेली गृहगौळिक, (हा शब्द गृहगोलक असून याचा अर्थ पाल असा आहे असें दिसतें) अंधाहिक (विषहीन सर्प ?), ककंठक, पूतिकीट म्हणजे रातकीडा आणि गोमारिक यांच्या शरीराची पूड ह्या दोन्ही पुडी किंवा त्यांचा धूर जसा मनुष्याचे प्राण एका क्षणांत हरण करण्यास समर्थ आहे; तसेंच काळासाप, वाघाटी आणि उपरोक्त प्राण्यांपैकीं कोणत्याहि एका प्राण्याचें शरीर एकत्र तापवून त्यांचें केलेलें चूर्णहि पण तसें करण्यास समर्थ आहे.

धामार्गव म्हणजे वाघाटी आणि यातुधान (?) यांचीं मूळें आणि बिब्याचीं फुलें यांचें एकत्र केलेलें चूर्ण ज्या मनुष्याच्या पोटांत जाईल तो तें गेल्यापासून पंधरा दिवसांत हटकून मरेल आणि व्याघाताचें (?) मूळ, बिब्याचीं फुलें व उपरोक्त प्राण्यांपैकीं कोणत्याहि एका प्राण्याचें सुकविलेलें शरीर यांचें चूर्ण ज्याच्या पोटांत जाईल तो तें गेल्यापासून एका महिन्यानें मरेल ! हीं जीं चूर्णें खाण्या पिण्याच्या पदार्थांतून द्यावीं असें कौटिल्यानें सांगितलें आहे त्याचें प्रमाण त्यानें मनुष्याला सहा गुंजा, गाढवाला व घोड्याला बारा गुंजा आणि उंट व हत्ती यांना पाव तोळा याप्रमाणें दिलें आहे. इतकें चूर्ण पोटांत गेलें कीं तें आपला ठराविक परिणाम करतें असें तो सांगतो.

शतकर्दम, (?) उच्चिदिङ्ग (हा शब्द उच्चिटिंग असून याचा अर्थ ' खेंकडा ' असावा, दुसरा एक शब्द उच्चिंगट आहे व त्याचा अर्थ रातकिडा असा आहे) कण्हेर, कडू भोंपळा आणि मासे यांची पूड, मादक हरीक, एरंड अथवा पळस यांच्या विस्तवांत जाळून तिचा धूर; पारवा, बेडूक, मांसभक्षक प्राणी, हत्ती, मनुष्य आणि डुक्कर यांचें मलमूत्र; मोरचूत, हिंग, जव आणि तांदूळ यांचें तूस व पीठ; कापशी, कुडा आणि आघाडा यांचें बीं; गोमूत्रिका ह्मणजे शिंपी–अथवा तांबेटी नावाचें गवत, भाण्डी (?) चें मूळ; निंब, शेवगा, फणर्जका अथवा फणिर्जका (एका प्रकारची तुळस ?) क्षीव पीलुक (?) आणि भांग; सर्प आणि शफरी नावाच्या माशाचें कातडें व हत्तीचीं नखें आणि दांत यांचें चूर्ण; हे पदार्थसंघ वेगळाले घेऊन त्यांपैकीं कोणताहि एक संघ, धोतरा आणि हरीक अथवा एरंड आणि पळस यांच्या अग्नींत जाळला असतां निघणारा धूर, वाऱ्याबरोबर जितक्या प्रदेशावर पसरेल तितक्या प्रदेशांतील माणसें मरतील (**यावच्चरति तावन्मारयति.**

पूतिकीट म्हणजे रातकिडा (?) मासा, कडू भोंपळा आणि इंद्रगोप म्हणजे मृगकिडा यांची अथवा रातकीडा, हलकी राळ (क्षुद्र राला ?) हेमविदारी (?) यांची पूड बोकडाच्या शिंगाच्या व खुराच्या चूर्णांत मिसळून शतकर्दमाच्या (?) विस्तवावर जाळल्यानें निघणारा धूर; तसेंच घाणेऱ्या करंजाचीं पानें, हरताळ, मनशीळ, गुंज आणि तांबडा कापूस यांची काष्ठें, रुईचा चीक, गोमय आणि गोमूत्र हीं सर्व एकच करून जाळलीं असतां त्यापासून निघणारा धूर आणि सापाची कात, गाईचें शेण, घोड्याची लींद आणि अंधाहिक नामक सर्पाचें डोकें

एकत्र जाळल्यानें उत्पन्न होणारा धूर अशा ह्या तीन प्रकारच्या धूरांपैकीं कोणताहि एक धूर ज्याच्या डोळ्यांत शिरतो तो अंधळा होतो.

नीळ, कोष्ठकोळिंजन, बोरू अ णि शतावरी यांच्या मूळांचें अथवा सर्प, मोरपीस, करढोक आणि पंचकुष्ठ यांचें चूर्ण किंवा हीं चूर्णें उपरोक्त काष्ठांच्या अग्नींत जाळून केलेला धूर, ज्यानें आपले डोळे अंजन किंवा दुसऱ्या औषधांनीं सुरक्षित केले असतील त्यानें, वेढ्याच्या अगर लढाईच्या वेळीं शत्रूसैन्यांत केला असतां त्यांतील योद्धे अंध बनतात.

मैना, कवडा, आणि बगळा यांची विष्टा अंकाक्षी (?) ताड आणि शेर यांच्या चोकांत भिजवून तें मिश्रण वाळल्यानंतर त्याचें चूर्ण करावें. हें चूर्ण डोळ्यांत टाकल्यानें डोळे जातात आणि पाण्यांत टाकल्यानें पाणी विषारी होतें.

जवाच्या आणि भाताच्या मुळ्या, धोत्र्याचीं फळें, जाईचीं पानें आणि पिंपरी व विदारी (सालवण, पांढरा भुइकोहळा, कोनफळ, क्षीरकाकोळी, अर्जुनसादडा ह्यांपैकीं काय ?) यांचीं मुळें मनुष्याच्या मूत्रांत एकत्र वाटावीं अथवा मूक (?) उंबर आणि कडवा—म्हणजे धुंदी आणणारा—हरीक, यांच्या, किंवा एरंड आणि पळस यांच्या काढ्यांत एकत्र करावीं; तसेंच ह्या शेवटच्या काढयांत अतिविष, 'गोमेवृक्ष, (पा.भे. गेतवृक्ष परंतु गौतमी असा शब्द कोशांत असून त्याचा अर्थ, हळद असा आहे.) कंटकार, म्हणजे सावरी किंवा रिंगणी आणि मयूरपदी ?—असा शब्द मिळत नाहीं–(मयूर म्हणजे मोरशेंडा अघाडा, ओंवा, तुळस आणि मोरचूद ?) यांचीं अथवा गुंजा, कुहिली, विषमूलिका (?) आणि हिंगणबेट यांची किंवा कण्हेर, शेवगा, पोलुक (?) रुई व मृगमारणी (?) यांचा पूड मिसळावी म्हणजे हीं मिश्रणें गवत आणि पाणी विषारी बनवून तीं खाणाऱ्या व पिणाऱ्या प्राण्यांस ठार मारण्यास समर्थ होतात.

करढोक पक्षी, (कृतषण्डक-पाठभेद-कृतकण्ड ?) सरडा, पाल आणि अंधाहि (विषहीन सर्प ?)यांच्या चूर्णाच्या धुरानें डोळे जातात आणि वेड लागतें.

सरडा आणि पाल यांचें चूर्ण एकत्र करून त्याचा धूर ज्याला द्यावा त्याच्या अंगावर कोड फुटतें. ह्याच चूर्णांत कांडर आणि बेडूक यांचीं अतडीं व मधु (मध ? मद्य?)घालून धूर दिला तर परमा लागतो आणि मनुष्याचें रक्त घालून धूर दिला तर क्षयरोग होतो.

दूषीविष (?) धुतरा आणि हरीक यांच्या चूर्णाच्या भक्षणानें जिव्हा नष्ट होते. '**मातृवाहकाञ्जलिकाप्रचलाकभेकाक्षिपीलकयोगो विषूचिकाकरः**' हा शत्रुसैन्यांत महामारी उत्पन्न करणारा योग कांहींच कळत नाहीं. '**मातृ**' शब्द वेगळा पाडिला असतां त्याचा अर्थ आखुकर्णी म्हणजे उंदिरकानी. इंद्रवारुणी म्हणजे कंवडळ आणि जटामांसी ह्या वनस्पतींपैकीं कोणती तरी एक धरितां येते पण पंडित शामशास्त्री यांनीं '**मातृवाहक**' असा शब्द धरून त्यापुढें नुसतें प्रश्नचिन्ह घातलें आहे. तसा शब्द कोशांत आढळला नाहीं. '**मातृ**' शब्दाप्रमाणें '**वाहक**' शब्द वेगळा काढावा तर त्याचा येथें लागू पडण्यासारखा काहींच अर्थ नाहीं.पंडित शामशास्त्री यांनीं यापुढें '**जलुका**' असा शब्द देऊन '**जळू**' हा त्याचा अर्थ दिला आहे. पण उपरोक्त वाक्यांत '**जलुका**' शब्द कसा निघतो हेंच समजत नाहीं. दुसरे शक्य तितके शब्द पाडून पाहिले तरी संदर्भाला जमेल असा अर्थ मिळत नाहीं. यांपुढें '**प्रचलाक**' शब्द आहे त्याचा 'मोरपीस' असा अर्थ होतो व तो आम्हीं वर एके ठिकाणीं दिलाहि आहे, पण '**एका जातीचा साप**' असाहि ह्या शब्दाचा दुसरा अर्थ आहे व हाच अर्थ येथें लागू होण्याचा ज्यास्त संभव आहे; परंतु पंडितजींनीं 'The tail of a peacock' मोराचा पिसारा हाच अर्थ दिला आहे. यापुढें '**भेकाक्षिपीलक**' असें वचन असून शामशास्त्र्यांनीं त्याचे '**भेकाक्षि**' आणि '**पीलुका**' असे दोन अवयव पाडून पहिल्याचा 'Eyes of a frog' बेडकाचे डोळे असा अर्थ केला आहे. पण ह्यापूर्वी एके ठिकाणीं '**करवीराक्षिपीलुक**' असें वचन जेथें आलें होतें त्या ठिकाणीं त्यांनीं त्याचे **करवीर** आणि **आक्षिपीलुक** असे दोन शब्द पाडून त्यांचें भाषांतर दिलें आहे. आम्हीं तेथें करवीराप्रमाणेंच **अक्षि** शब्द निराळा करून **आक्षि** शब्दाचा अर्थ शेवगा असा केला आहे. पीलुक याचा एकच भुंगी असा अर्थ कोशांत सांपडतो व तोच कदाचित येथें लागू पडेल असें आम्हांला वाटतें; पण पहिल्या ठिकाणीं तो लागू पडण्यासारखा नाहीं. अशा समजुतीनें आम्हीं त्यापुढें फक्त प्रश्न चिन्ह घातलें आहे. असा येथें सर्वच घोंटाळा आहे. हा घोंटाळा केवळ ह्याच योगासंबंधानें आहे असें नसून तो सदर ग्रंथांत ह्यापूर्वी कित्येक ठिकाणीं असून यापुढेंहि आढळणार आहे आणि तो माझ्यामतें अपरिहार्य आहे; सबब हा 'विषूचिकाकर योग' लावण्याचें कार्य तज्ञ वाचकांवर सोडून मी यापुढील योगाकडे वळतो.

पंचकुष्ठक, (?) कौंडिन्यक, (?) राजवृक्ष म्हणजे बहावा किंवा भावा आणि मधुपुष्प (अशोक, बकुली आणि शिरीष पण ह्यापैकीं घ्यावयाचा कोणता ? व मध यांचा योग, ताप उत्पन्न करणारा आहे. भाज, (पाठ भेद **भास** असा असून तोच बरोबर दिसतो आणि याचा अर्थ **कोंबडा** आणि **घुबड** असा आहे, त्यापैकीं कोणता घ्यावा ? इतकाच प्रश्न आहे पण **भाज** असा शब्दच कोशांत मिळत नाहीं.) आणि मुंगूस यांच्या जिभेच्या कांद्याचें चूर्ण गाढवीच्या दुधांत मिसळून दिलें असतां तें घेणारा बहिरा आणि मुका बनतो. ह्या चाटणाचें व उपरोक्त योगांचें प्रमाण, ह्या भागाच्या आरंभीं कांहीं चूर्णांचें जें प्रमाण दिलें आहे त्याप्रमाणेंच समजावें.

ह्या सर्व गुप्त साधनांत, जेथें वनस्पतींचा संबंध आला आहे तेथें त्यांचा अर्क आणि जेथें प्राण्यांचा संबंध आहे तेथें त्यांचें चूर्ण उपयोगांत आणावें; पण दोहोंचाही अर्क उपयोगांत आणिला असतां हीं साधनें अधिक परिणामकारक होतील. असें अर्थशास्त्रकार सांगतात.

सांवर आणि विदारी (?) यांच्या बियांची आणि बचनागाच्या मुळ्याची पूड चिचुंद्रीच्या रक्तांत भिजवून बाणाला त्या मिश्रणाचा लेप करावा. हा बाण ज्या माणसाला लागेल तो मनुष्य दुसऱ्या दहा माणसांना चावतो आणि हीं दहा माणसें प्रत्येकीं आणखी दहा दहा माणसांस चावतात ! बिब्बा, यातुधान (?) आघाडा आणि निळी कोऱ्हांटी यांचीं फुलें; एल (हा शब्द एला असून याचा अर्थ वेलदोडा असावा) काक्षि (हा शब्द काक्षी आणि अर्थ तुरटी व गोपीचंदन असे सांपडतात) गुग्गुळ आणि हालाहल(?) नांवाचें विष यांचा काढा बोकडाच्या किंवा माणसाच्या रक्तांत पिण्यास दिला असतां पिणाराला दुसऱ्यास चावण्याचें वेड लागतें. हें मिश्रण अर्धे धरण म्हणजे सव्वीस पूर्णांक दोन तृतीयांश तोळे घेऊन तें सक्तु (ह्याचा अर्थ एक प्रकारचें विष असाहि सांपडतो) म्हणजे सातूचें पीठ आणि पेंड यांत मिसळून ६०० फूट लांबीच्या (रुंदी आणि खोलीचें प्रमाण नसल्यामुळें याचा कांहीं उपयोग नाहीं) जलाशयांत टाकलें असतां त्यांतील पाणी विषमय होऊन जातें. त्या जलसंचयांतील जे मत्स्य हें औषध खातात अथवा ह्याला नुसता स्पर्श करितात ते विषदग्ध होतात. हें पाणी पिणारीं तर काय पण केवळ याला स्पर्श करणारीं मनुष्येंहि मरतात.

तांबड्या आणि पांढऱ्या मोहऱ्यांत घालून गोधा (याचा अर्थ घोरपड आणि सुसर असा आहे त्यांपैकीं कोणता प्राणी येथ निर्दिष्ट आहे ?) जमीनींत, (' त्री पक्ष मुष्टिकायां भूमौ ' याचें भाषांतर तीन किंवा पांच मुठी खोल असा पं. शामशास्त्री करितात) पुरावी. व ती वध्य माणसास खणायाला सांगावी. ही गोधा दृष्टीस पडतांच खणणारा मरेल !

यापुढें अग्नि सतत प्रज्वलित राहील असें करण्याचीं कांहीं साधनें येथें देतों म्हणजे बाकी राहिलेल्या साधनांची कल्पना वाचकास करितां येईलः-

१ विजेच्या धक्क्यानें बाहेर पडलेल्या, अथवा विजेच्या धक्क्यानें जळालेल्या लांकडाच्या काठीनें धरलेल्या काळसर्पाला सुगंधित द्रव्यें लावून त्याची कृत्तिका किंवा भरणी नक्षत्रावर भयंकर मंत्रांनीं सिद्ध केलेल्या अग्नींत आहुति दिली असतां तो अग्नि अप्रतिहतपणें जळत रहातो.

२ लोहाराकडील अग्नि आणून त्यांत मांसाच्या, कलालाकडील अग्नि आणून त्यांत मद्याच्या आणि अग्निहोत्र्याकडील अग्नि आणून त्यांत तुपाच्या आहुती दिल्या असतां तो अग्नि सतत जळत रहातो.

३ चाण्डालाकडील अग्नि आणून त्यांत मांसाच्या आणि चितेचा अग्नि आणून त्यांत नरमांसाच्या आहूति दिल्या आणि उपरोक्त सर्व प्रकारच्या अग्नींत बोकडाच्या आणि माणसाच्या चरबीच्या आहूति, यज्ञांतील ध्रुवा नामक लांकडी पळीनें दिल्या असतां अग्नि सदोदित पेटलेला असतो.

ह्या शेवटच्या प्रकारावरून २५०० वर्षांपूर्वीं आर्यावर्तांतील लोकांस नरमेधांत कांहीं वाईट आहे असें मुळींच वाटत नसावें असें जर कोणी अनुमान काढलें तर तें चुकीचें मानण्यांत आपलीच चूक होईल असें वाटतें.

यापुढील प्रकरणांत नाना प्रकारचे अद्भुत आणि म्हणूनच मनाला चकित करून सोडणारे अनेक प्रयोग कौटिल्यानें दिले आहेत. त्यांवर ज्यांचा विश्वास बसत असेल त्यांनीं वाटल्यास शोधपूर्वक प्रयत्न करून अनुभव घेऊन पहावा त्यांस यश मिळाल्यास त्यांपैकीं कांहीं साधनांनीं हिंदुस्थानांतीलच काय पण पृथ्वीच्या पाठीवरील आजच्या आणि भावी पिढीचें फारच मोठें कल्याण होणार आहे. कौटिल्य म्हणतो:—

शिरीषोदुम्बरशमीचूर्णं सर्पिषाहृत्यार्धमासिकः क्षुद्योगः

तसेंच:—

कशेरुकोत्पलकन्देक्षुमूलबिसदूर्वा क्षीरघृतमण्डसिद्धा मासिकः क्षुद्योगः

शिरीष, उंबर आणि शमी यांचें चूर्ण तुपांत मिसळून खाल्लें असतां पंधरा दिवस भूक लागत नाहीं; तसेंच कशेरुक, कमळाचा कांदा, ऊंसाच्या मुळ्या, कमळतंतु किंवा कमल देंठ आणि दुर्वा, दुधातुपांत घालून त्यांचें सत्व काढावें. हें सत्व खाणाराला एक महिनाभर भुकेची बाधा होणार नाहीं. महिनाभर उपवास काढण्याचें सामर्थ्य आणणारे आणखीहि कांहीं प्रयोग कौटिल्यानें सांगितले आहेत; तो म्हणतोः—

उडीद, सातू, हुलगे आणि दर्भाच्या मुळ्या यांचें किंवा वल्लीचें (वल्ली ह्म. ओवा आणि मिरवेल असे दोन अर्थ आहेत) चूर्ण दुधातुपांत खावें. दूध व तूप समभाग घेऊन तें सालई आणि पिठवण यांच्या मुळ्या वाटून त्या वाटणांत मिसळावें आणि दुधांत प्यावें; अथवा ह्या वाटणाच्या दुधांत मध आणि तूप मिसळून घ्यावें; हीं तीनहि औषधें महिनाभर उपोषण करण्याचें सामर्थ्य देणारीं आहेत.

पांढऱ्या मोहऱ्या, सात दिवस पांढऱ्या बोकडाच्या मुत्रांत भिजत ठेवून त्यांचें तेल काढावें आणि तें दीड महिना कडू भोपळ्यांत ठेवावें. हें तेल द्विपाद अथवा चतुष्पाद प्राण्याच्या अंगाला चोळलें असतां ज्याच्या अंगाला चोळावें त्याचा रंग पालटतो. पांढऱ्या गाढवाला सात दिवस, ताक आणि सातू यांच्या आहारावर ठेवून नंतर त्याच्या लेंड्यांत पांढऱ्या मोहऱ्या मिसळून काढिलेलें तेलहि वरील तेलाप्रमाणेंच शरीराचा रंग पालटणार आहे.

पांढरें गाढव अथवा पांढरा बोकड यांपैकीं कोणत्याहि एका प्राण्याच्या मलमूत्राच्या काल्यांत पांढऱ्या मोहऱ्या सात दिवस ठेवून त्यांचें तेल काढावें. हें तेल अंगाला चोळलें असतां (**अर्कतूलपतङ्गपूर्ण (चूर्ण) प्रतिवापम् ?**) रुईच्या कापसाप्रमाणें अथवा पाऱ्याप्रमाणें कांति शुभ्र होते. पांढरा कोंबडा आणि अजगर यांच्या मलाचा लेप केल्यानेंहि वर्ण शुभ्र होतो. पांढऱ्या बोकडाच्या मूत्रांत पांढऱ्या मोहऱ्या सात दिवस ठेवून त्यांत रुईचा चीक, ताक, मीठ आणि धान्य (**सतुषं धान्यमुच्यते**) वाटावें. ह्या वाटणाचा लेप पंधरा दिवस केला असतांहि वर्ण पांढरा होतो.

पांढऱ्या मोहऱ्या पंधरा दिवस कडू भोंपळ्यांत ठेवून नंतर त्यांचें पीठ अथवा कडू भोंपळा, रातकीडा आणि पांढरी पाल यांचें पीठ केसांना लावलें असतां केस पांढरे होतात.

टेंभुर्णी आणि अरिष्ट (रिठा, कडुनिंब, लसूण ह्यांपैकीं काय ?) गाईच्या शेणांत मिसळून त्याचा अथवा बिब्याच्या तेलाचा लेप शरीराच्या ज्या भागावर करावा त्यावर एकाच महिन्यांत कोड फुटतें. काळ्या सापाच्या किंवा पालीच्या तोंडांत सात दिवस ठेवलेल्या गुंजा वाटून लावल्यानेंहि कुष्ट रोग होतो. पोपट आणि पिक (पित्त ?) म्हणजे कोकिळ यांच्या अंड्यांतील रसाच्या लेपाचाही असाच परिणाम होतो.

कुष्टस्य प्रियालकल्ककषायः प्रतीकारः

खिरणीचें चाटण किंवा काढा दिल्यानें कुष्टरोग बरा होतो.

कुक्कुट म्हणजे देवडांगरी, कोशातकी म्हणजे पडवळ (घोंसाळी असाहि अर्थ आहे) आणि शतावरी ह्यांचीं मूळें अन्नाबरोबर एक महिनाभर खाल्ली असतां मनुष्य गोरा होतो आणि वडाच्या काढ्यानें स्नान करणारा व पिंवळ्या कोरंटीचें वाटण अथवा शकुन (घुबड ?) आणि राळा किंवा कांग नांवाचें धान्य यांचें तेल हरिताळ आणि मनशीळ यांत मिसळून तें मिश्रण आंगाला लावणारा मनुष्य काळा होतो.

काजव्याची पूड मोहरीच्या तेलांत घालून पेटविल्यानें रात्रीं चांगला प्रकाश पडतो. काजवा आणि गांडूळ यांचें चूर्ण, जलचर प्राण्यांचें चूर्ण, (भृंग कपालानां चूर्णम् ?), खैर आणि पांगारा यांच्या फुलांचें चूर्ण हीं सर्व चूर्णे उपरोक्त शकुन आणि राळा किंवा कांग यांच्या तेलांत जाळल्यानेंहि उत्तम प्रकाश देतात.

पारिभद्रकाच्या (देवदार किंवा कडुलिंब ?) सालीची राख बेडकाच्या चरबींत भिजवून ती, तसेंच ह्याच झाडाची साल आणि तीळ यांचें वाटण हीं अंगाला लावलीं असतां अग्नीची पीडा होत नाहीं.

ताडाच्या सालीच्या कोळशाचा गोळा हातांत धरून खुशाल पेटवून द्यावा; हाताला इजा होणार नाहीं. बेडकाची लस काढून ती अंगाला चोळली असतां आगीपासून त्रास होत नाहीं. तिळाच्या तेलांत बेडकाची आणि खेकड्याची चरबी समभाग मिसळून तें मिश्रण अंगाला चोपडलें असतांहि अग्नीनें अंग भाजत नाहीं. कळकाच्या मुळ्यांचें पीठ आणि शेवाळ यांच्या लेपाचाही प्रभाव असाच आहे.

पारिभद्रक, प्रतिबला (?) वेत, वज्र (गुळवेल, शेर, निवडुंग, आवळा, वावडिंग, वाळा, तालिमखाना आणि पांढरा दर्भ असे अर्थ आहेत ह्यांपैकीं काय ?) आणि कदली (केळ कीं आलें ?) यांच्या मूळांच्या वाटणाचें तेल काढून तें आणि बेडकाची चरबी तळव्याला चोपडावी आणि निखाऱ्यांवरून खुशाल चालत जावें, पाय भाजणार नाहींत. वरील वाटणांत वज्र आणि कदली मिश्र न करितांहि काढलेलें तेल आणि बेडकाची चरबी तळव्याला चोळली असतां फुलांच्या राशि-प्रमाणें निखाऱ्यांच्या राशीवरून चालतां येतें असें कौटिल्यानें पुनः सांगितलें आहे.

हंस, क्रौंच, मोर अथवा यांच्या प्रमाणेंच पाण्यांत पोहण्याच्या कामीं प्रवीण असलेल्या दुसऱ्या मोठ्या पक्षांच्या पिसाऱ्याला कोलीत बांधून रात्रीच्या वेळीं अंतरिक्षांत सोडले असतां उल्कापाताचा भास होतो. **वैद्युतं भस्माग्निशमनम्**' एखाद्या पदार्थावर वीज पडून जें भस्म होतें तें आगींत टाकलें असतां आग शांत होते.

स्त्रीच्या विटाळांत भिजलेले उडीद आणि बेडकाच्या चरबींत कालविलेलें वज्र आणि कदली यांच्या मूळांचें चूर्ण स्वयंपाकाकरितां पेटविलेल्या चुलींत टाकलें असतां तीवर कसलाहि पदार्थ शिजणार नाहीं. सर्व चूल स्वच्छ करून पुनः पेटविणें हाच तीवर अन्न शिजविण्याला उपाय आहे.

ताडाच्या लाकडाच्या पोकळ गोटींत अथवा जंवसाच्या पोकळ गांठींत विस्तव भरून त्यावर सूत किंवा कापूस गुंडाळावा आणि ती गोटी किंवा गांठ तोंडांत धरावी म्हणजे तोंडांतून धुराचे लोटावर लोट निघालेले दिसतील.

कुशाम्रफलतैलसिक्तोऽग्निर्वर्षप्रवातेषु ज्वलति

कुश आणि आंब्याचीं फळें यांचें तेल (?) ज्या अग्नींत टाकावें तो वर्षाकाळांतील वादळासहि न जुमानतां जळत रहातो. समुद्रफेस तेलांत भिजवून पेटवावा आणि पाण्यांत सोडावा; तो तेथें खुशाल जळत रहातो. माकडाचें हाड, काळ्या आणि पांढऱ्या अशा मिश्र रंगाच्या बांबूवर घासून त्यापासून अग्नि उत्पन्न केला तर तो अग्नि पाण्याच्या वर्षावानें न विझतां उलट अधिक जोरानें पेटतो.

शस्त्राघातानें मृत झालेल्या अथवा सुळी दिलेल्या पुरुषाच्या डाव्या अंगच्या मागील बरगडीचें हाड आणि काळ्या पांढऱ्या रंगाचा कळक हीं एकमेकांवर घासून अथवा स्त्री आणि पुरुष यांच्या अस्थिघर्षणापासून उत्पन्न होणारा अग्नि

डावीकडून उजवीकडे ह्याप्रमाणें ज्या जागीं तीन वेळां फिरविला असेल त्या जागीं दुसरा कसलाहि अग्नि जळणार नाहीं.

चिचुंदरी, ताजवा नांवाचा पक्षी आणि खारकीट (?) ह्या प्राण्यांच्या शरीरांचा अश्वमूत्रांत मिलाफ करून तें मिश्रण साखळदंडास लाविलें असतां तो सहज तोडिता येतो. तसेंच कसलाहि कठीण दगड असो, त्याला कुलिंद (कुलिंग असा शब्द आढळत असून त्याचा अर्थ काकाकुवा आणि चिमणी असा आहे; कुलिंद शब्द देश अथवा देशस्वामी वाचक आहे.) वेहूक आणि खारकीट यांच्या चरबीचें मिश्रण लाविलें असतां तो सहज फोडितां येतो.

उलूकगृध्रवसाभ्यामुष्ट्रचर्मोपनाहावभ्यज्य वटपत्रैः
प्रतिच्छाद्य पञ्चाशद्योजनान्यश्रान्तो गच्छति ।

उंटाच्या कातड्याचे जोडे करून त्यावर घुबड आणि गिधाड यांची चरबी लावावी आणि ते जोडे वडाच्या पानानें अच्छादून वापरावे. अशा प्रकारें तयार केलेले जोडे पायांत घालून कोणाहि मनुष्याला पन्नास योजनें प्रवास न दमतां करितां येतो. न थकतां शंभर योजनें प्रवास करावयाचा असल्यास ह्याच जोड्यांना ससाणा, बगळा, कावळा, गिधाड, हंस, करकोचा आणि विचिरल्ल (?) ह्या पक्षांची चरबी लावावी असें सांगितलं आहे.

हे उपरोक्त नाना प्रकारचे अद्भूत चमत्कार करून दाखविण्याचा हेतूहि कौटिल्यानें एका प्रकरणाचे शेवटीं दिला आहे. तो म्हणतो:—

अग्निष्टम्भतोत्पातैः परस्योद्वेगमाचरेत्

असले अद्भुत पराक्रम पाहून शत्रु भयग्रस्त होऊन आपणाला हवा तसा तह आपणांशीं करण्यास कबूल होतो.

प्रकरण अठरावें.

औषधी आणि मंत्र.

मंत्रभैषज्यसंयुक्ता योगमायाकृताश्च ये
उपहन्यादमित्रांस्तैस्स्वजनं चाभिपालयेत्

‘ मंत्र, औषधी आणि माया अथवा नजरबंदी यांच्या प्रयोगांच्या योगानें स्वतःच्या लोकांचें संरक्षण आणि शत्रुपक्षीयांचा नाश करावा ’ ह्या आपल्या नीतीला अनुसरून कौटिल्यानें मागील भागांत वर्णन केलेल्या प्रयोगांशिवाय आणखी जे पुष्कळ प्रयोग दिले आहेत त्यांपैकीं कित्येकांचा समावेश ह्या भागांत करून ग्रंथसमाप्ति करावी असा विचार आहे.

मांजर, उंट, लांडगा, डुक्कर, साळ, वागुली (वल्गुली असा शब्द असून त्याचा अर्थ वडवाघूळ असा आढळतो.) नप्तृक (?) आणि घुबड यांच्यासारखे जे रात्रिंचर प्राणी आहेत त्यांपैकीं एक, दोन किंवा आधिक प्राण्यांचे डोळे काढून डाव्या आणि उजव्या डोळ्यांचें निरनिराळें चूर्ण करावें. डाव्या डोळ्यांचें चूर्ण आपल्या उजव्या आणि उजव्यांचे डाव्या डोळ्यांत घातलें असतां कशाहि अंधारांत दिसूं शकतें. पुष्य नक्षत्रापूर्वीं तीन उपोषणें करून त्या नक्षत्र योगावर कुत्रा, मांजर, घुबड आणि वागुली यांचे डोळे काढून वरीलप्रमाणें त्यांच्या चूर्णाचा उपयोग केला असतां अदृश्य रूपानें व्यवहार करितां येतो.

उपरोक्त रीतीनें गुप्तपणें व्यवहार करण्याला साधनीभूत असे आणखी पुष्कळसे प्रयोग अर्थशास्त्रकारांनीं आपल्या ग्रंथांत ग्रथित केले आहेत त्यांपैकीं कांहीं वर दिलेल्या प्रयोगांच्या स्वरूपाचेच असून कांहीं अत्यंत किळसवाणे आणि स्त्रीपुरुषांच्या प्रेतांची अश्लीलपणें विटंबना करणारे असल्यामुळें ते चिकित्सापूर्व शोध करणाऱ्या अभ्यासी वाचकांकरितां मूळांतच राखून ठेवून आम्हीं पुढील प्रयोगांकडे वळतो.

मनुष्याला आपलें स्वरूप गुप्त ठेवुन जसे व्यवहार करितां येतात तसे आपले पशू गुप्त ठेवून त्यांजकडूनही आपली कार्यें साधतां येतात ! **ब्राह्मणाच्या उत्तरक्रियेच्या प्रसंगीं बळी दिलेल्या गाईच्या** हाडांची आणि चरबीची पूड

सापाच्या कातींत भरून ती कात ज्या प्राण्याच्या पाठीवर ठेवावी तो अदृश्य होतो. ह्या प्रयोगांत, ब्राह्मणाच्या उत्तरक्रियेच्या प्रसंगीं गाईचें बलिदान होत असे ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी असून तीवरून ह्या काळांतील एका आचारावर चांगलाच प्रकाश पडण्यासारखा आहे. मृग आणि पक्षी यांच्या अंगीं गुप्तपणें व्यवहार करण्याचें सामर्थ्य येण्याकरितां स्वतंत्र प्रयोग दिलेले आहेत.

बलिं वैरोचनं वन्दे शतमायं च शम्बरम् ।
भण्डीरपाकं नरकं निकुम्भं कुम्भमेव च ॥
देवलं नारदं वन्दे वन्दे सावर्णिगालवम् ।
एतेषामनुयोगेन कृतं ते स्वापनं महत् ॥
यथा स्वपन्त्यजगरास्स्वपन्त्यपि चमूखलाः ।
तथा स्वपन्तु पुरुषा ये च ग्रामे कुतूहलाः ॥
भण्डकानां सहस्रेण रथनेमिशतेन च ।
इमं गृहं प्रवेक्ष्यामि तूष्णीमासन्तु भाण्डकाः ॥
नमस्कृत्वा च मनवे बध्वा शुनकफेलकाः ।
ये देवा देवलोकेषु मानुषेषु च ब्राम्हणाः ॥
अध्ययनपारगास्सिद्धाः ये च कैलासतापसाः ।
एतेभ्यस्सर्वसिद्धेभ्यः कृतं ते स्वापनं महत् ॥
अतिगच्छति चमर्यपगच्छन्तु संहताः ।
अलिते पलिते मनवे स्वाहा ॥

हे सर्व श्लोक मंत्र म्हणून दिले असून त्यांचा प्रयोग विस्तारपूर्वक वर्णिला आहे. त्याप्रमाणें ह्या मंत्रानें मंतरलेल्या गोळ्या ज्या ज्या प्रदेशांत टाकाव्या त्या त्या प्रदेशांतील सर्व प्राण्याना अजगराप्रमाणें अगदीं गाढ झोंप लागते असें कौटिल्याचें म्हणणें आहे. मंत्रावर भरंसा असणारांनीं जरूर तर ह्या विधानाची सत्यता अनुभवून पहावी. दुसरे कांहीं मंत्र सांगितले असून त्यांचे सप्रयोग उपयोग करून, ज्यांच्या रहाण्याच्या ठिकाणाजवळ खणावें, त्यांस गाढ झोंप लागते अशी त्यांची फलश्रुति दिलेली आहे.

उपैमि शरणं चाग्निं दैवतानि दिशो दश।
अपयान्तु च सर्वाणि वशतां यान्तु मे सदा॥
स्वाहा।

तीन रात्र उपोषण करून पुष्य नक्षत्रावर खडीसाखरेचे एकवीस खडे घ्यावे आणि उपरोक्त मंत्र म्हणून मध आणि तूप ह्याच्या एकवीस आहुती अग्नीमध्यें द्याव्या; नंतर गंधमाल्यादिकांनीं खडीसाखरेच्या त्या खड्यांचें पूजन करून ते जमीनींत पुरून टाकावे आणि दुसऱ्या पुष्य नक्षत्रावर उकरून काढावे. वरील मंत्र म्हणून ह्यांपैकीं एका खड्यानें दारावर मारावें आणि चार खडे घरांत टाकावे म्हणजे दरवाजा आपोआप उघडेल.

चार रात्रीं उपोषण करून कृष्ण चतुर्दशीचे दिवशीं मनुष्याच्या हाडांचा बैल पुजला असतां दोन बैलांची गाडी उत्पन्न होते. ही गाडी आकाशांत भ्रमण करण्यास समर्थ असते. हाडांचा बैल पुजणारानें ह्या गाडींत बसून आकाशांत जावें आणि सूर्यादिग्रहनक्षत्रांची माहिती मिळवून ती आपल्या पृथ्वीवर रहाणाऱ्या बांधवांस द्यावी; हा प्रयोग वाचला म्हणजे पुराणांतल्या दिव्यरथाची आठवण होते आणि आपल्या ग्रंथांत ही उणीव राहूं नये म्हणून कौटिल्यानें ही आकाशांत भ्रमण करणारी बैल गाडी उत्पन्न करण्याचा प्रयोग सांगितला असावा असें वाटतें पण प्रस्तुतच्या शास्त्रीय युगांत हिंदुस्थानांतले लोकसुद्धां ह्यावर भरवसा ठेवतील असें वाटत नाहीं.

चाण्डालीकुम्बीतुम्भकटुकसारौघःसनीरीभगोऽसि स्वाहा

हा मंत्र ज्या घराजवळ जपावा त्या घरांत रहाणाऱ्या सर्वांस गाढ झोंप लागून घराचा दरवाजा आपोआप उघडतो. हा मंत्र म्हणजे चोऱ्या करणारांच्या हातांत कौटिल्यानें दिलेलें एक अमोघ हत्यारच म्हणावयाचें ! मात्र प्रयोग सफल झाला पाहिजे; आम्हाला तर ह्यांत कांहींच अर्थ दिसत नाहीं.

तीन रात्रीं उपोषण करून पुष्यनक्षत्राच्या योगावर, शस्त्रघातानें मृत्यु पावलेल्या किंवा सुळीं दिलेल्या मनुष्याच्या कवटींत माती भरून वल्ली (ओवा कीं सर्जक वृक्ष कीं मिरवेल)चें बीजारोपण करावें आणि दुसऱ्या पुष्य नक्षत्रावर ते रोप काढून त्याचे

दोर वळावे. शत्रु धनुष्यादि नेम मारण्याचें हत्यार सज्ज करून आपणांपुढें उभा राहिला असतां आपण ह्यांपैकीं एक दोर तोडावा म्हणजे शत्रूच्या धनुष्याची प्रत्यंचा तुटते. ह्यापुढें शत्रूच्या अवयवांस सूज आणण्याचा आणि ते वाढविण्याचा असे दोन प्रयोग सांगितल्यानंतर कौटिल्य म्हणतो:—

कृष्णचतुर्दश्यां शस्त्रहताया गोः कपिलायाः पित्तेन
राजवृक्षमयीमामित्रप्रतिमां मज्जयात्। अन्धीकरणम्

बाहव्याच्या लाकडाची, आपल्या शत्रूची प्रतिमा करावी. तिला कृष्ण चतुर्दशीचे दिवशीं **शस्त्रानें मारलेल्या गाईच्या** पित्ताचा लेप केला असतां शत्रूला अंधत्व येतें. चार नक्त उपोषणें करून वद्य चतुर्दशीस बलिदान करावें आणि सुळी दिलेल्या मनुष्याच्या हाडांचे अथवा वीज पडलेल्या झाडाच्या लाकडाचे खिळे करावे. ह्यापैकीं एक खिळा आपल्या शत्रूच्या मलमूत्रांत भिजविला असतां त्या शत्रूचें शरीर वाढतें. तो खिळा जर शत्रूच्या पायाखालीं अथवा त्याच्या आसनाखालीं पुरला तर तो क्षयानें मरतो आणि तोच खिळा जर त्याच्या दुकानांत, शेतांत अगर घरांत पुरला तर तो अन्नवस्त्राला महाग होतो. यापुढें शत्रूचा सहकुटुंब सहपरिवार घात करण्याचें व त्याचें पौरुष्य नष्ट करण्याचे कांहीं प्रयोग सांगून अर्थशास्त्रकार म्हणतात:—

तीन रात्रींच्या उपोषणानंतर पुष्यनक्षत्रावर, शस्त्रघातानें मेलेल्या अथवा सुळावर दिलेल्या माणसाच्या कवटींत, माती भरून तींत गुंजा लावाव्या आणि पाणी देऊन त्यांचे चांगले वेल झाल्यावर पुष्यनक्षत्रयुक्त अमावास्या किंवा पूर्णिमा असेल त्या दिवशीं ते वेल काढावे आणि त्यांचें मण्डलाकार आसन विणावें. ह्या आसनावर ठेवलेल्या भांड्यांतील अन्न केव्हांही संपत नाहीं.

रात्रीच्या वेळीं एखादा समारंभ होत असतां पेटविलेल्या दिवटीवर, मेलेल्या गाईची आंचळे आणून भाजावीं आणि ती राख बैलाच्या मुतांत भिजवून नव्या भांड्याला आंतून त्याचा लेप करावा. नंतर डाव्या बाजूला गांव राखून हें भाण्डें गांवाभोंवती फिरवावें. प्रदक्षिणा पुरी करून भांडें खालीं ठेवितांच, गांवांतील गाईचें सर्व लोणी त्या भांड्यांत येऊन पडतें. गावांतील सर्व फळें आपल्या

टोपलींत जमा करण्याचा असाच एक प्रयोग देऊन अर्थशास्त्रकार विषादिकाच्या उताऱ्याकडे वळले आहेत.

श्लेष्मातक म्हणजे भोंकर, कपित्थ म्हणजे कवठ, दन्तिदन्त (?) म्हणजे हस्तिदंत (?) शठ (धोत्रा आणि तगरमूळ ?) गोजिगी (?) (गोजिव्हा, असा पाठ असेल तर त्याचा अर्थ, पाथरी नांवाची वनस्पति असा होईल.) विष (कमलतंतु आणि रक्त्याबोळ ?) पाटली (भोरवा आणि पाडळी ?) बल म्हणजे पानवेल, स्योनाग (?) पुनर्नवा म्हणजे घेटुळी, श्वेता (दूर्वा, अतिविष-वंश लोचन ?) आणि वरण म्हणजे वायवरणा यांच्या काढ्यांत चंदन आणि सालावृकींचें (सालावृक म्ह० कुत्रा, कोल्हा, लांडगा आणि तरस ?) रक्त मिसळून, त्यानें विषपीडितास स्नान घालावें म्हणजे कसलेंहि विष असो, तें उतरतें.

चितळ किंवा पांढऱ्या ठिपक्याचा हरिण, मुंगूस, मोर आणि गोधा (घोरपड आणि सुसर ?) यांच्या पित्ताच्या कोळशाची पूड, (मर्षाराजिचूर्ण ?) सिन्धुवार म्हणजे निगड (सिंधुवारि ?) तवरण (तगर ?), वारुणी (शतावरी, कंवडळ, दूर्वा ?) तण्डुलीयक, (वावडिंग, तांदुळजा ?) शतपर्व म्हणजे वेळू यांच्या बोरव्या (अग्र) आणि पिण्डीतक म्हणजे गेळा यांचें भिश्रण धोत्र्याच्या विषाचा प्रतिकार करतें. ह्या विषाच्या प्रतिकारार्थ आणखी एक उपाय आहे पण त्याची माहिती देतांना वरीलप्रमाणेंच प्रश्नचिन्हांचा उपयोग करावा लागेल; सबब त्या भानगडींत आम्हीं पडत नाहीं.

उग्र वास येणारें धोत्र्याचें तेल वेडाचा परिहार करतें, वाघाटी आणि करंज यांच्या मिश्रणाचें नस्य कुष्ठाचा नाश करतें, कुष्ट (कोळिंजन, भोंवरी, रुई आणि कडू पडवळ ?) आणि लोध्र यांच्या मिश्रणानें क्षयरोग बरा होतो आणि कटुफल, (कंकोळ, कारलें आणि कडु पडवळ ?) द्रवन्ती म्हणजे उंदीरकानी आणि विलङ्ग (?) यांचें मिश्रण कपाळदुखिवर अत्यंत गुणकारी असतें.

वाघाटी, मंजिष्ठा, तगर, लाक्षारस, ज्येष्ठमध, हळद आणि मध यांचें मिश्रण पोटांत दिलें असतां पाण्यांत पडल्यामुळें, विषप्रयोगामुळें, मारामुळें वगैरे आलेली मूर्च्छा नाहींशी होते. हें मिश्रण मनुष्याला एक अक्ष म्हणजे सोळा उडीद भार द्यावें. बैल, घोडे वगैरे जनांवरांना त्याच्या दुप्पट आणि हत्ती व उंट यांस चौपट द्यावें.

उपरोक्त मिश्रणाच्या गोळ्या करून त्यांच्या गर्भीत सुवर्ण घालावें. ह्या गोळ्यांच्या सेवनानें सर्व प्रकारच्या विषांचा परिहार होतो. हें मिश्रण लावून वाजविलेल्या सनईसारख्या वाद्यांचा सूर कानीं पडतांच किंवा हें मिश्रण लावून तयार केलेल्या वस्त्राचें निशाण पाहतांच सर्व विषांचा अम्मल एकदम उतरतो. पिंपळाचें लाकूड तोडून त्याचे तावडतोब मणी करावे; हे मणी जीवन्ती, (गुळवेल आणि हिरडा ?) श्वेता, (दूर्वा, अतिविषा आणि वंशलोचन ?) मारव्याचें फूल आणि बांडगूळ यांत वेष्टिले असतांहि वरीलप्रमाणेंच सर्व विषांचा परिहार होतो. येथें ह्या मण्यांचें काय करावयाचें तें समजत नाहीं.

एतैःकृत्वा प्रतीकारं स्वसैन्यानामथात्मनः
अमित्रेषु प्रयुञ्जीत विषधूमाम्बु दूषणान्

अर्थशास्त्रकार म्हणतात, उपरोक्त संरक्षक उपाय योजून राजानें आपलें आणि आपल्या सैन्याचें रक्षण करावें आणि विषारी धूर, विषदिग्ध पाणी वगैरे मारक साधनांची योजना करून आपल्या शत्रूचा नाश करावा.

उपसंहार.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्यें कोणकोणत्या बाबी आल्या आहेत, त्यानें निरनिराळ्या कार्यक्षेत्रांमध्यें किंवा परिस्थितींत कशा प्रकारची नीति प्रतिपादिली आहे; त्याच्या काळीं कोणत्या सामाजिक, धार्मिक वगैरे बाबतींत राजकीय, प्रकारच्या समजुती प्रचलित होत्या इत्यादि गोष्टी आतांपर्यंतच्या विवेचनावरून वाचकांच्या लक्ष्यांत आल्याच असतील. अर्थशास्त्राचें शब्दशः भाषांतर देणें हा आमचा हेतु नव्हता आणि तसें केलें असतें तर पुष्कळ वाचकांना तो विषय कंटाळवाणा वाटण्याचाहि संभव होता. ज्यांना विशेष शोधक दृष्टीनें विचार करावयाचा असेल त्यांनीं अर्थांत् मूळ ग्रंथच पाहिला पाहिजे. इतरांना स्थूल मानानें तत्कालीन हिंदी समाजांतील चालीरीती, नीतिविषयक कल्पना, राज्यपद्धति वगैरेंची कल्पना येण्यास पुरेसा गोषवारा आम्ही दिला आहे आणि तसें करतांना तेथल्या तेथें आमचे स्वतःचे टीकापर विचारहि (running comments) आम्हीं प्रदर्शित केले आहेत. या शेवटच्या प्रकरणांत विहंगमदृष्ट्या समालोचन करून प्रस्तुत पुस्तक पूर्ण करावयाचें आहे.

राजकीय घडामोडींची माहिती पुरविणें हेंच कांहीं इतिहासाचें कर्तव्यसर्वस्व नव्हे. तत्कालीन लोकस्थितीवर—संस्कृतीच्या निरनिराळ्या अंगांवर प्रकाश पाडणें हेंच इतिहासाचें सर्वांत महत्त्वाचें काम आहे आणि इतिहासाच्या त्या कामगिरीचाच वर्तमान व भविष्यकालांत उपयोग होत असतो. या दृष्टीनें पाहिल्यास कौटिल्याचें अर्थशास्त्र म्हणजे भारतीय इतिहासांत आर्य-संस्कृतीची प्रगति दाखविणारी एक महत्वाची निशाणी आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. कौटिल्य ऊर्फ चाणक्य याच्या तोडीचा व तशाच प्रकारची राजनीति प्रतिपादणारा पाश्चात्य देशांतला लेखक मॅकिआव्हेली (Nicolo Machiavelli) हा होय, असें साधारणपणें समजलें जातें. मॅकिआव्हेलीचा "The Prince" हा ग्रंथ फार प्रसिद्ध असून, त्या ग्रंथाचा लेखक हा कुटिल राजनीतीचा प्रणेता असें मानण्याची वहिवाट पडली आहे. "Machiavellian policy" म्हणजेच कुटिल राजनीति असा इंग्रजी भाषेंत प्रचार पडून गेला आहे. आणि मॅकिआव्हेलीनें आपल्या सदरील ग्रंथांत तशा प्रकारचीं तत्त्वें प्रतिपादिलीं आहेत

हेंहि खरें आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत कुटिल राजनीति नाहीं असें नाहीं; परंतु ती नीति प्रतिपादण्याकरितांच कौटिल्यानें आपल्या ग्रंथाची रचना केली असल्याचें दिसून येत नाहीं. मॅकिआव्हेलीच्या ग्रंथांत संधि, विग्रह, सैन्य-व्यवस्था, अधिकाऱ्यांच्या नेमणुकी वगैरे राजकीय बाबींचेंच विवेचन केलेलें असून कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्यें राज्यव्यवस्थेच्या इतर निरनिराळ्या अंगांचाहि बऱ्याच बारकाईनें व तपशीलवार विचार केलेला आहे. मॅकिआव्हेलीच्या ग्रंथावरून तत्कालीन लोकस्थितीचें व राज्यपद्धतीचें म्हणण्यासारखें कांहींच ज्ञान होत नाहीं, परंतु अर्थशास्त्रावरून तत्कालीन समजुती, चाली–रीति व राज्य-पद्धति यांची आपल्यास कल्पना येऊं शकते. नुसत्या मुत्सद्दीगिरीच्या दृष्टीनें पाहिल्यास अर्थशास्त्रापेक्षां मॅकिआव्हेलीचा ग्रंथ विशेष विस्तृत व महत्वाचा आहे, परंतु ऐतिहासिक दृष्ट्या कौटिल्याच्या ग्रंथाला विशेष महत्व दिलें पाहिजे. सोळाव्या शतकाच्या पहिल्या चरणांत मॅकिआव्हेली मृत्यु पावला आणि त्या काळाचा बराचसा इतिहास आज मितीस उपलब्ध असून तत्कालीन लोक-स्थितीची माहिती इतर ग्रंथांवरून मिळूं शकते. परंतु चाणक्यानें आपला ग्रंथ इ० सनाच्या पूर्वी तीनशें वर्षे असतां लिहिला व त्या काळचा हिंदुस्थानाचा फारच त्रोटक इतिहास उपलब्ध आहे. त्या काळच्या लोकस्थितीची कल्पना करण्यास तर फारच थोडीं साधनें उपलब्ध आहेत. अर्थात् मॅकिआव्हेलीच्या सुमारें अठराशें वर्षें अगोदर जन्मलेल्या विष्णुगुप्ताच्या ऊर्फ कौटिल्याच्या ग्रंथाचें इतिहासदृष्ट्या महत्व विशेष आहे. इतकेंच नव्हे तर, अर्थशास्त्रावरून आपल्या कित्येक धर्मशास्त्रपुराण-विषयक जुन्या ग्रंथांचा काळ ठरविण्यासहि बरीच मदत होण्यासारखी आहे आणि धार्मिक समजुतींत व चालीरीतींत तेव्हांपासून आतांपर्यंत जे फरक पडत गेले आहेत त्याचा माग काढण्यासहि या ग्रंथामुळें सोपें जाणार आहे. मॅकिआव्हेलीचा 'धी प्रिन्स' हा ग्रंथ काय किंवा कौटिल्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ काय, आज मितीस राजकारणांत मार्गदर्शक म्हणून त्यांचें फारसें महत्व नाहीं. आजचें राजकारण त्या काळच्या राजकारणापेक्षां अगदीं भिन्न व संकीर्ण स्वरूपाचें झालें आहे, हल्लींच्या काळांत राजकारणावर अनेक मोठमोठे ग्रंथ झाले आहेत आणि त्यांमध्यें राजकारणाच्या वेगवेगळ्या अंगांचें सविस्तर विवेचन केलेलें आहे, किंबहुना राजकारणाच्या एकएका अंगावर डझनावारी ग्रंथ निर्माण झाले आहेत. मॅकिआव्हेलीनें रणनीति व लष्करी व्यवस्था यांचें जें विवेचन केलें आहे तें त्या

काळच्या मानानें कितीहि विस्तृत असलें तरी आज मितीस तुटपुंजें वाटल्या-
खेरीज राहत नाहीं. तसेंच कौटिल्यानें ज्या अर्थानें आपल्या ग्रंथाला
' अर्थशास्त्र ' हें नांव दिलें तो अर्थ हल्लींच्या ' अर्थशास्त्र शब्दाच्या
अर्थाहून फारच भिन्न आहे. आजमितीस अर्थशास्त्र या शब्दाचा अर्थ किती
तरी संकुचित झालेला आहे. परंतु त्या संकुचित अर्थीच त्या शास्त्राची
वाढ कल्पनातीत झाली आहे आणि कदाचित्, आज मितीस अर्थ-
शास्त्राला (Political Economy) जें गहन स्वरूप प्राप्त झालें आहे
आणि राजकारणामध्यें त्याची जी वेळोवेळीं गुंतागुंत होते, ती पाहावयास कौटिल्य
पुनः इहलोकीं आला अशी कल्पना केली तर त्याची देखील ती असाधारण व
अकुंठित बुद्धि क्षणभर कुंठित झाल्याखेरीज राहाणार नाहीं. अर्थात्, वर्तमान-
काळीं इतिहासाच्या दृष्टीनेंच या ग्रंथांना महत्व आहे व त्या दृष्टीनें पाहिल्यास,
मॅकिआव्हेलीच्या ग्रंथापेक्षां कौटिल्याच्या ग्रंथाचें महत्व विशेष आहे.

महाभारतांत विदुरनीति, नारदनीति व कणिकनीति, अशा नीति सांगितलेल्या
आहेत. राजकीय दृष्ट्या नारदनीति व कणिकनीति या विशेष महत्वाच्या आहेत.
नारदनीति सरळ, सात्विक राजनीति असून कणिकनीति कुटिल आहे. मॅकिआ-
व्हेलीची राजनीति कौटिल्याच्या अर्थशास्त्रापेक्षां कणिकनीतीशीं विशेष जुळती
आहे. अर्थशास्त्रांत राजनीति असून त्याखेरीज त्या काळची ती एक स्मृतिहि आहे.
मनु, याज्ञवल्क्य, पराशर इत्यादिकांच्या स्मृतींप्रमाणें या कौटिल्यप्रणीत स्मृतीला
धर्मशास्त्रदृष्ट्या महत्व देण्यांत येत नसलें तरी त्या काळीं प्रचलित असलेल्या
आचारविचारांचें तींत इतर स्मृतींप्रमाणेंच प्रतिबिंब पडलेलें आहे. किंबहुना,
इतर स्मृतींचा कालनिर्णय करण्यास अथवा त्यांतील प्रक्षिप्त भाग हुडकून काढ-
ण्यास या चाणक्यस्मृतीचें बरेंचसें साहाय्य होणार आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्राचा
काळ चंद्रगुप्ताच्या इतिहासामुळें बरोबर निश्चित करतां येतो. तशी मनुयाज्ञ-
वल्क्यादि स्मृतींची गोष्ट नाहीं. तसेंच, अर्थशास्त्रामध्यें—आतांपर्यंत त्या ग्रंथाच्या
ज्या प्रती उपलब्ध झाल्या आहेत त्यांमध्यें, एकंदरांत विचार करतां, मागाहून
फारशी घुसडाघुसड झाली असल्याचें दिसून येत नाहीं. प्रक्षिप्त वचनें त्यांत
फारच थोडीं असावीं असें तज्ज्ञांचें मत आहे. मनुयाज्ञवल्क्यादि स्मृतींप्रमाणें
धार्मिक बाबतींत हा ग्रंथ प्रमाणभूत मानला गेला असता तर त्यांची जी दशा
झाली तीच याचीहि झाली असती. परंतु मनु, याज्ञवल्क्य, पराशर ह्या प्राचीन

ऋषींची पदवी चाणक्याला प्राप्त झालेली नसल्यामुळें त्याच्या ग्रंथाला धार्मिक दृष्ट्या महत्व कोणीं दिलें नाहीं व त्यामुळें त्यांच्यांत फिरवाफिरव करण्याची अथवा त्यांत नवीन वचनें घुसडण्याची आवश्यकता वाटली नाहीं हें स्वाभाविकच होय. कौटिल्याचा हा ग्रंथ श्रीयुत श्यामशास्त्री यांनीं प्रकाशांत आणिला तोंपर्यंत आधुनिक विद्वानांना तो माहीत नव्हता; तथापि मल्हार रामराव चिटणीस यांच्या राजनीतीवरील सप्तप्रकरणात्मक ग्रंथामध्यें राजगुणांसंबंधाचें जें विवेचन केलेलें आहे त्यामध्यें, अर्थशास्त्र हा ग्रंथ चिटनिसांच्या काळीं राजनीतीच्या बाबतींत प्रमाणभूत मानला जात होता, असें मानावयास जो पुरावा आढळतो व ज्याचा उल्लेख प्रस्तुत पुस्तकांत पहिल्या प्रकरणामध्यें केलेला आहे, त्यावरून तसेंच अर्थशास्त्राच्या कांहीं भागांवर प्रतिपच्चंद्रिका नांवाची एक संस्कृत टीका उपलब्ध झाली आहे आणि अर्थशास्त्राच्या आणखी हस्तलिखित प्रतीहि सांपडल्या त्यावरून कौटिल्याचा हा ग्रंथ आधुनिक काळीं श्रीयुत श्यामशास्त्री यांनीं प्रसिद्ध करण्याच्या पूर्वी जितका अज्ञात होता तितका तो मध्यंतरींच्या काळीं नसावा असें अनुमान काढणें चुकीचें होणार नाहीं. मात्र मनुयाज्ञवल्क्यादिकांच्या स्मृतींप्रमाणें त्याला धर्मशास्त्रविषयक प्रमाणभूत ग्रंथ म्हणून मान देण्यांत येत नव्हता हें स्पष्ट आहे. म्हणूनच स्मृतिग्रंथांत दिसणारा प्रक्षिप्त वचनांचा सुकाळ या ग्रंथांत दिसून येत नाहीं. उपोद्घातांत म्हटल्याप्रमाणें मनुस्मृति व याज्ञवल्क्यस्मृति हे दोन्ही ग्रंथ, ते आज ज्या स्वरूपांत सांपडतात त्या स्वरूपांत तरी अर्थशास्त्राच्या नंतरचे असावेत असें म्हणण्यास अनेक अंतःप्रमाणें आहेत. सर हेन्री समर मेन यांनीं ' हिंदु लॉ 'वरील आपल्या ग्रंथांत मनुस्मृतीसंबंधानें, तिचें अनेक वेळां संस्करण झालें आहे, श्लोकसंख्येंत पुष्कळच फरक झाला आहे, मूळ ग्रंथाचें निरनिराळीं संस्करणें व प्रक्षेप यांच्या योगानें हल्लीं अतिशय विकृत स्वरूप झालें आहे, असें मत देऊन त्याच्या पुष्ट्यर्थ कांहीं पुरावेहि दिले आहेत, सर हेन्री मेन यांच्या या मताला कौटिल्याच्या अर्थशास्त्रानें विशेष बळकटी येत आहे. मनुस्मृतीप्रमाणेंच इतर स्मृतींमध्येंहि कमीजास्त प्रमाणानें फिरवाफिरव व घुसडाघुसड झाली आहे, ' कलिवर्ज्य ' म्हणून मानलेल्या गोष्टी कौटिल्याच्या वेळीं तरी वर्ज्य समजल्या जात नव्हत्या, हें त्या काळीं नियोग प्रचलित होता (पृ. ८६, ८७ व १३०) यावरून म्हणावें लागतें. ' नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ । पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ' ॥ या वचनाच्या द्वारें, एका काळीं वैदिक धर्मानुयायांमध्यें विधवा-

विवाह व घटस्फोट प्रचलित व शिष्ट संमत असल्याचें जें दिसून येतें त्याचें प्रत्यंतर अर्थशास्त्रामध्यें सांपडतें. विधवाविवाह व घटस्फोट यांच्या बाबतींत मनाई करणारीं स्मृतिवचनें अर्थातच कौटिल्याच्या काळानंतर बनविलेलीं असलीं पाहिजेत हें उघड होय.

स्मृतिग्रंथ, विशेषतः त्यांतील विशिष्ट वचनें यांचा काळ निश्चित करण्यास या ग्रंथाचा जसा उपयोग होण्यासारखा आहे तसाच बुद्धपूर्व व बुद्धोत्तरकालीन चालीरीति व नीतिविषयक कल्पना यांच्यामधील फरक शोधून काढण्यासहि याचा पुष्कल उपयोग होण्यासारखा आहे. अर्थशास्त्राचा काळ म्हणजे चंद्रगुप्त मौर्याचा काळ होय. हा काळ बौद्धधर्माच्या स्थापनेच्या नंतरचा असला तरी, त्या काळीं बुद्धपूर्वकालीन चालीरीति व नीतिविषयक कल्पना यांच्यामध्यें म्हणण्यासारखा फरक पडला नव्हता; राजकीय व सामाजिक दृष्ट्या बौद्धधर्माला म्हणण्यासारखें महत्व प्राप्त झालें नव्हतें; जाणवेल अशा रीतीनें बौद्धमताचा आघात झाला नव्हता; असें अर्थशास्त्रांत बुद्ध व बौद्ध धर्म यांच्यासंबंधानें कांहीं उल्लेख आढळत नाहीं आणि बुद्धपूर्वकालीन चालीरीतींवर व नीतिविषयक कल्पनांवर बौद्धमतांची कांहीं छाप पडली असल्याचें दिसून येत नाहीं त्यावरून म्हणावें लागतें. इ. स. पूर्वी ४७७ सालीं गौतमबुद्धाचें निर्वाण झालें. निर्वाणसमयीं त्याचें वय ऐशीं वर्षांचें होतें आणि धर्मस्थापना केल्यानंतर प्रसाराचें काम त्यानें स्वतः पंचेचाळीस वर्षे केलें. मगध देशाचा राजा बिंबिसार हा त्याचा अनुयायी झाला होता असें म्हणतात. बिंबिसारानंतर त्याचा मुलगा अजातशत्रु सिंहासनारूढ झाला. बिंबिसार बुद्धाचा अनुयायी झाला असें जरी म्हटलेलें असलें तरी त्यावरून बौद्ध धर्माचा अनुयायी झाला होता, स्वतः बौद्ध धर्माचा त्यानें अंगिकार केला होता, असें ठाम मानण्यास आधार नाहीं. गौतमबुद्धाविषयीं त्यानें जाहीर आदर व्यक्त केला होता आणि बौद्धमताच्या प्रसारास त्याजकडून आडकाठी होत नव्हती असें मानणेंच जास्त सयुक्तिक दिसतें. बिंबिसाराचा मुलगा अजातशत्रु ह्याच्याविषयीं, त्यानें आपल्या पित्याचा खून करून गादी बळकाविली असा त्या काळीं प्रवाद असावा, असें कित्येक आधारांवरून दिसतें. त्याला बौद्ध धर्माविषयीं म्हणण्यासारखा आदर वाटत नव्हता; तथापि गौतमबुद्धाचें बहुजनसमाजावर फार वजन असल्यामुळें तो त्याच्याविषयीं बाह्यात्कारीं आदर दाखवीत असे, असाहि कांहीं ठिकाणीं उल्लेख आढळतो. त्यानंतरचे शिशुनाग घराण्यांतले व नंदवंशांतले राजे बौद्धधर्मीय नसावे

असेंच दिसतें. खुद्द चंद्रगुप्त मौर्य व त्याचा मुलगा बिंदुसार हेहि बौद्ध नव्हते. बिंदुसाराचा मुलगा अशोक यानें मात्र बौद्ध धर्माचा स्वीकार करून त्या धर्माच्या प्रसाराला पुष्कळ साहाय्य केलें. अशोकानें बौद्ध धर्माचा स्वीकार केला तोंपर्यंत त्या धर्माचा प्रसार साधारण लोकांतच होता आणि कायदे वगैरे बाबतींत त्याचा म्हणण्यासारखा कांहीं परिणाम झालेला नव्हता असें अर्थशास्त्रावरून तरी उघड सिद्ध होतें. चाणक्य ऊर्फ विष्णुगुप्त हा वैदिक धर्माचाच कट्टा अनुयायी होता. त्याच्या मनावर व नीतिविषयक कल्पनांवर बौद्ध मताचा कांहीं परिणाम झालेला दिसत नाहीं. बौद्धधर्माचा प्रसार अशोकानें तो धर्म स्वीकारीपर्यंत बराच मर्यादित असावा आणि खुद्द मगध देशांतहि ब्राह्मणी धर्माचेंच प्रस्थ असावें असें दिसतें. अर्थात् अर्थशास्त्र हा ग्रंथ जरी बुद्धोत्तरकालीन असला तरी बुद्धपूर्वकालीन आचारविचार व नीतिविषयक कल्पना यांचेंच त्यांत प्रतिबिंब पाहावयास सांपडतें.

चंद्रगुप्त मौर्याच्या काळचे जे आचारविचार व ज्या नीतिविषयक कल्पना अर्थशास्त्रामध्यें ग्रथित झाल्या आहेत त्यांची बौद्धधर्माच्या उत्कर्षाच्या काळांतील आचारविचारांशीं व नीतिविषयक कल्पनांशीं तुलना केली असतां बौद्धधर्मानें कोणकोणत्या महत्त्वाच्या बाबतींत परिवर्तन घडवून आणलें त्याची कल्पना होऊं शकेल. बौद्धधर्माच्या उत्कर्षाचा काल म्हणजे भारतवर्षांत जे दोन सर्वप्रसिद्ध असे बौद्धधर्मीय चक्रवर्ती सम्राट् झाले त्यांच्या दरम्यानचा काळ होय. हे दोन चक्रवर्ती म्हणजे अशोक व हर्षवर्धन हे होत. या दोन्हीं सम्राटांच्या कारकीर्दीचा थोडाबहुत इतिहास व तत्कालीन लोकस्थितीची थोडीबहुत माहिती उपलब्ध झाली आहे तीवरून वरील तुलना करतां येते.

चंद्रगुप्त मौर्याच्या कालीं म्हणजे इसवी सनापूर्वी चौथ्या शतकांत राजधान्यांमध्यें राजरोस मद्यविक्रय होत असे, शहराच्या मध्यभागीं असण्याचा मान 'मदिरागृहा'ला मिळत होता, शिजवून तयार केलेलें मांस विकण्याचींहि दुकानें मोठमोठ्या शहरांत असत (पृष्ठ ३९); सुराध्यक्ष नांवाचा सरकारी अधिकारी (Excise Minister or commissioner) असे (पृष्ठ ६६ व ६७); गुरांपैकीं वांसरें, अंडील बैल व दुभत्या गाई मारण्याची मनाई होती (पृ. ६८) यावरून वांझ गाई व ठेंचलेले बैल मारण्यास हरकत नव्हती असें दिसतें; ब्रह्मणाच्या उत्तरक्रियेच्या प्रसंगीं गाईचा बळी दिला जाई (पृ० १७३); 'मानु-

षमांसविक्रये वधः' (पृष्ठ १२१) असा कायदा करण्यापर्यंत पाळी आली होती, त्याअर्थी मनुष्यमांस भक्षण करण्याचा प्रचार होता असें जरी म्हणतां जरी येत नाहीं तरी जीवंत माणसास मारून अथवा प्रेताचें मांस काढून तें जनावरांचें मांस म्हणून विकण्यापर्यंत कित्येक लोकांची त्या काळीं मजल जात असावी असा संशय येतो; नरमेधहि क्वचित् होत असे (पृ० १६८); अर्थशास्त्रांतील पाकशास्त्राच्या माहितींत कौटिल्यानें मांसपाकाला अग्रस्थान देऊन त्यानंतर शाकपाक व मत्स्यपाक यांचीहि माहिती दिली आहे (पृष्ठ ५७); यावरून चंद्रगुप्ताच्या काळच्या ब्राह्मणांमध्येंहि मांसमत्स्याशनाचा प्रचार चांगलाच असावा असें उघड अनुमान निघतें; कौटिल्याच्या काळीं ब्राह्मणादि त्रैवर्णिकांमध्यें विधवा-विवाह (पृष्ठ ८४) व नियोग (पृ. ८६ व ८७) दोन्ही प्रचलित असून राजघराण्यांतहि दत्तक घेऊन वंश पुढें चालविण्याच्या ऐवजीं विधवा राणीच्या ठिकाणीं नियोगानें संतति उत्पन्न करून राजवंश आस्तित्वांत ठेवण्याची वहिवाट होती, (पृ. १३०) अशा गोष्टी आढळून येतात. त्याचप्रमाणें त्या काळची राजनीति बरीच कुटिल मार्गयुक्त होती (पृ. १२६) असें दिसून येतें. लोकांतहि रजोगुण व तमोगुण यांचेंच विशेष प्राबल्य होतें व नीतिमत्तेचा दर्जा बऱ्याच खालच्या प्रतीचा होता, प्रत्यक्ष स्त्री व पुत्र यांच्यापासून राजाला भीति असे (पृ. २३ व २९) इत्यादि अनुमानें काढण्यास अर्थशास्त्रावरून बराच आधार सांपडतो.

आतां आपण वरील बाबतींत पुढील काळामध्यें कसा फरक झाला तो पाहूं. चंद्रगुप्ताचा नातू अशोक याच्या कारकीर्दीत म्हणजे अर्थशास्त्रानंतर सुमारें शंभर वर्षांनीं—इसवी सनापूर्वी तिसऱ्या शतकांत बौद्ध धर्माचा प्रसार फार वाढला. चक्रवर्ती अशोकानें त्या धर्माचा स्वतः अंगीकार करून बौद्धमताचा प्रसार करण्यास पुष्कळ साहाय्य केलें, स्वतःचा पुत्र व कन्या यांनाहि त्यानें सीलोनसारख्या दूर देशीं धर्मप्रसारार्थ पाठवून दिलें हें प्रसिद्धच आहे. राज्यारोहणानंतर थोड्याच वर्षांनीं अशोकानें बौद्धधर्म स्वीकारला, कलिंग देशाशीं झालेल्या लढाईंतली अपरिमित प्राणहानि पाहून, अहिंसा व प्रेम यांचा उपदेश करणाऱ्या बौद्धधर्मा-कडे त्याचें मन विशेष रीतीनें वळलें. त्यानें शिलांवर कोरविलेले जे आज्ञालेख (edicts) सांपडले आहेत त्यांच्यावरून त्यानें आपल्या राज्यांत पशुपक्ष्यांची हत्त्या करण्यास मनाई केली होती, माणसांप्रमाणें जनावरांसाठींहि औषधोपचाराची व्यवस्था केली होती, धर्मप्रचारक व उपदेशक—नेमले होते,

लोकांची नीतिमत्ता वाढविण्यासाठीं उपदेशक वगैरे नेमून तजवीज केली होती, धार्मिक बाबतींत परमतसहिष्णुता अमलांत आणली होती, असें दिसून येतें आणि अशोक हा अत्यंत धर्मशील असा सम्राट् झाला अशाविषयीं इतरत्रहि आधार सांपडतात. अशोकाचें राज्य सर्व उत्तर हिंदुस्थानांत आणि दक्षिणेस कृष्णा नदीपर्यंत व हिंदुस्थानाच्या बाहेर काबूलकंदाहारपर्यंत पसरलें होतें. बौद्धधर्माचा खरा प्रसार अशोककालींच झाला व त्याच कालापासून बौद्धधर्माची छाप सामाजिक चालीरीतींवर, राज्यव्यवस्थेंतल्या वेगवेगळ्या बाबींवर व राज्यांतल्या कायद्यांवर पडूं लागली असें दिसतें.

कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या काळानंतर सुमारें सातशें वर्षांनीं म्हणजे इ. स. चारशेंच्या सुमारास हिंदुस्थानामध्यें 'फा हिआन' नांवाचा एक चिनी प्रवासी आला होता. तो बौद्धधर्मीय होता. जातांना तो बौद्धधर्माच्या त्रिपिटक नामक ग्रंथत्रयीपैकीं विनयपिटक ग्रंथाच्या कांहीं प्रती बरोबर घेऊन गेला. त्यानें हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत प्रवास केला होता. येतांना तो काबूलच्या बाजूनें आला व तेथून तक्षशिला, पेशावर, मथुरा, राजपुताना, मध्यदेश, कनोज, श्रावस्ती, कपिलवस्तु, कुशीनगर, वैसाली पाटलिपुत्र, राजगृह, गया, काशी इत्यादि ठिकाणीं जाऊन गंगानदीच्या मुखापर्यंत येऊन पोहचला. तेथून एका गलबतांत बसून तो सिंहलद्वीपाला गेला व तेथून चीन देशाला जाण्यास रवाना झाला. फा हिआन हा केवळ धर्मजिज्ञासेनें प्रेरित होऊन इकडे आला होता. तो कनोजला गेला त्या वेळीं तेथें गुप्तांचें राज्य होतें. परंतु त्यानें आपल्या प्रवासवर्णनांत राजकीय स्थितीची म्हणण्यासारखी कांहींच माहिती दिलेली नाहीं. राजकीय गोष्टींकडे त्याचें लक्ष्य नव्हतें. बौद्धांचे संघाराम, त्यांचीं विद्यापीठें, आणि गौतमबुद्धाच्या चरित्राशीं संलग्न झाल्यामुळें पवित्र मानण्यांत आलेलीं स्थळें पाहाणें, विद्वान् बौद्ध भिक्षूंना भेटून बौद्ध धर्मग्रंथ व त्या धर्माची माहिती मिळविणें हाच त्याचा उद्देश होता. तथापि आपल्या यात्रेचें वर्णन करितांना इकडील लोकस्थितीसंबंधानें सहजगत्या जी थोडी माहिती त्यानें लिहून ठेविली आहे तिच्यावरून, कौटिल्याच्या काळानंतर सुमारें सातशें वर्षांनीं, विशेषतः बौद्धधर्माच्या प्रसारामुळें, या देशांतील लोकांच्या आचारविचारांत व नीतिकल्पनांत कशा प्रकारचा फरक पडला होता तें दिसून येतें. सिंधुनदी ओलांडून फा हिआन मथुरेपर्यंत येऊन पोंहचला. मथुरेचें वर्णन करितांना तो म्हणतो कीं, "यमुना नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर

मिळून वीस संघाराम असून त्यांत सुमारें तीन हजार भिक्षु होते; बुद्धाच्या धर्माची पताका या ठिकाणीं जोरानें फडकत होती. वाळवंटाच्या प्रदेशाच्या पलीकडे पश्चिम भारतवर्ष आहे. येथील (राजपुतान्यांतील) राजे पक्के बौद्धधर्मानुयायी आहेत.......येथून दक्षिणेकडे मध्यदेश लागतो. या देशाची हवा समशीतोष्ण असून तेथें बर्फाची वृष्टि कधीं होत नाहीं. लोक सुखी असून त्यांच्यावर डोईपट्टी किंवा अधिकाऱ्यांचा जुलूम नाहीं. राजाच्या मालकीच्या जमिनी कसतात तेच राजाला आपल्या उत्पन्नाचा ठराविक हिस्सा देतात. हे शेतकरी कोणाचे बांधलेले नाहींत. त्यांना आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तिकडे जातां येतें. राजे लोक शारीरिक दंड करीत नाहींत. अपराधाच्या प्रमाणानें अपराध्यांना कमी अधिक दंडाची शिक्षा केली जाते. वरचेवर बंड केलें तरी बंड करणाराला ठार मारीत नाहींत; त्याचा फक्त उजवा हात तोडतात. राजाच्या तैनातींतील लोकांना ठराविक पगार मिळतो. देशांत कोठेंहि जीवहत्या होत नाहीं, कोणी दारू पीत नाहींत किंवा कांदा–लसूणहि खात नाहींत. याला अपवाद फक्त चांडालनामक जातीचा....या देशांत कोंबडीं, डुकरें बाळगण्याचा प्रघात नाहीं, त्याचप्रमाणें गुरें कोणी विकीत नाहींत. इतर वस्तूंच्या विक्रीचीं जशीं दुकानें असतात तशीं दारूच्या विक्रीचीं दुकानें कोठेंच नाहींत. इकडे कवड्यांचा नाण्यासारखा उपयोग करितात. फक्त चांडाल लोक शिकार करितात व मासे विकतात. " या चिनी प्रवाशानें पाटलिपुत्र नगराचें वर्णन करतांना तेथें मोठमोठीं रुग्णालयें असून कोणत्याहि देशांतील गरीब रोग्यांना त्या ठिकाणीं फुकट औषधोपचार करण्यांत येतो, अन्नवस्त्र पुरविलें जातें, पथ्यपाण्याची व्यवस्था करण्यांत येते, अशी माहिती दिली आहे.

इसवी सनाच्या सातव्या शतकांत म्हणजे कौटिल्यानें अर्थशास्त्र लिहिल्यानंतर सुमारें एक हजार वर्षांनीं चक्रवर्ती हर्षवर्धनाची कारकीर्द चालू असतां 'ह्यूएनत्संग' नांवाचा एक बौद्धधर्मीय चिनी प्रवासी हिंदुस्थानांत आला होता. त्यानें हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रदेशांत फिरून इकडील माहिती मिळविली होती. ती माहिती त्यानें लिहून ठेविली व त्यामुळें तत्कालीन भारत वर्षाच्या इतिहासावर पुष्कळ प्रकाश पडलेला आहे. हर्षाच्या राजनीतीचें वर्णन करितांना ह्यूएनत्संग म्हणतो. "...हिंसा करणें हा त्यानें भयंकर अपराध ठरवून त्याबद्दल कडक शिक्षा ठेविली आणि पांची हिंदु प्रांतांत सर्वत्र मांसाहार वर्ज्य करण्याचे हुकूम सोडले.

आपल्या राज्यांत पांथस्थांसाठीं त्यानें सर्व ठिकाणीं धर्मशाळा बांधल्या. शेजारच्या राजांपैकीं ज्यांचा सत्कृत्याकडे ओढा असे त्यांच्याशींच तो सख्य करी; त्याविरुद्ध स्वभावाच्या लोकांशीं तो भाषणहि करीत नसे......... " अर्थशास्त्रामध्यें हत्ती, घोडे, बैल यांनाहि मांस चारावें असें कौटिल्यानें सांगितलें आहे. बौद्धधर्मानें या बाबतींत कशी क्रांति केली तें ह्यूएनत्संगानें माळव्यांतील एका राजाची माहिती दिली आहे त्यावरून दिसून येतें. ह्यूएनत्संग इकडे येण्यापूर्वी साठ वर्षांच्या सुमारास अद्वितीय दयाशील असा शिलादित्य नांवाचा प्रसिद्ध राजा पश्चिम मावळ्यांत राज्य करीत होता. सदहू चिनी प्रवाशानें त्याच्याविषयीं म्हटलें आहे कीं, हा " शिलादित्य माशीची देखील प्राणहिंसा न होईल अशी खबरदारी घेई. हत्तीघोड्यांना पाजावयाचें पाणी, त्यांतील जंतु मरूं नयेत म्हणून, गाळून घेण्यासहि तो सांगत असे. कोणींहि प्राणहत्त्या करूं नये असा तो कळकळीचा उपदेश सर्वांना करी." या देशांतील तत्कालीन चालीरीतींविषयीं लिहितांना ह्यूएनत्संग म्हणतो. "......या (हिंदुस्थानांतील) लोकांत विवाह फक्त जातीजातींमध्येंच होतो. बापाकडून किंवा आईकडून कांहीं पिढ्यांपर्यंत सपिंडसंबंध असलेल्या स्त्रीपुरुषांचा विवाह होत नाहीं, आणि स्त्रिया पुनर्विवाह कधींच करीत नाहींत." तत्कालीन हिंदी लोकांच्या नीतिमत्तेविषयीं सदहू चिनी प्रवासी म्हणतो: " हे लोक उतावळ्या व अनिश्चित स्वभावाचे असूनहि नीतिदृष्ट्या शुद्ध आहेत. ते कोणाची वस्तु अन्यायानें घेत नाहींत व न्यायानें द्यावें लागावयाचें त्याहूनहि अधिक देतात. पापाचें प्रायश्चित्त अन्य जन्मीं भोगलें पाहिजे अशी त्यांची खात्री असल्यामुळें ते पापाला भितात व या जन्मीं नीतीनें वागण्याचा प्रयत्न करितात....... राज्यकारभार प्रामाणिकपणें चालविला जात असून लोक गुण्यागोविंदानें एकत्र राहात असल्यामुळें गुन्हेगारीचें प्रमाण अल्प आहे. " अर्थशास्त्रामध्यें प्रतिबिंबित झालेल्या समाजस्थितीवरून पाहतां हर्षाच्या काळीं ह्यूएनत्संगाला दिसून आलेली लोकांची सात्विकता कौटिल्याच्या काळीं नव्हती असें म्हणावें लागतें. रा. चिंतामणराव वैद्य यांच्या ' मध्ययुगीन भारतांत ' वर्णिलेल्या हर्षकालीन लोकस्थितीची कौटिल्याच्या काळच्या लोकस्थितीशीं वाचकांनीं अवश्य तुलना करून पाहावी म्हणजे चंद्रगुप्त मौर्य आणि बाण व ह्यूएनत्संग यांचा आश्रयदाता हर्षवर्धन यांच्या दरम्यानच्या एक हजार वर्षांच्या कालांत या देशांतील चालीरीतींमध्यें व नीतिविषयक कल्पनांमध्यें किती ठळक फरक पडला होता तें स्पष्टपणें दिसून येईल.

बौद्धधर्माच्या प्रसारामुळें प्राणिहिंसा या देशांत निंद्य मानली गेली आणि बहुजनसमाजांत सात्विक गुणांना विशेष मान मिळून नीतिविषयक कल्पनांत पुष्कळ सुधारणा झाली यांत संशय नाहीं. नियोग व विधवाविवाह यांचा प्रघात नाहींसा होण्यासहि बऱ्याच अंशीं बौद्धधर्मच कारण झालेला असावा. बौद्धधर्मानें प्रत्यक्ष रीत्या विधवाविवाहाचा निषेध केलेला नाहीं बौद्धधर्मीय समाजांमध्यें आजमितीसहि विधवाविवाह रूढ आहे. तथापि हिंदुस्थानामध्यें बौद्धधर्माचा प्रसार झाला त्या वेळीं बौद्धधर्माचा भर विशेषतः इंद्रियनिग्रह, वैराग्य व निवृत्तिमार्ग यांच्यावर होता. पुरुषांना भिक्षु बनविण्याप्रमाणें स्त्रियांना भिक्षुणी बनविण्याचा प्रचार खुद्द गौतमबुद्धाच्या कारकीर्दीत पडला होता, व तो पुढें चालूच राहिला. सधवा स्त्रियाहि विशिष्ट परिस्थितींत त्या काळीं भिक्षुणी होत. अर्थात् विधवा स्त्रियांनीं भिक्षुणी होण्याची 'फॅशन' सर्रहा पडून जावी यांत कांहीं आश्चर्य नाहीं. बौद्धांच्या अहिंसेचें बऱ्याच अंशीं वैदिक धर्मानुयायांनीं अनुकरण केलें, त्याप्रमाणें बौद्धांच्या या निवृत्तिमार्गाचेंहि त्यांनीं अनुकरण केलें असलें पाहिजे या देशांत एक काळ तर असा होता कीं, एकाद्या वैदिक धर्मीय माणसाला सांसारिक आपत्ति, अनुताप वगैरे कारणांमुळें उपरति झाली म्हणजे तो बौद्धधर्माची दिक्षा घेऊन भिक्षु बने. याचें प्रत्यंतर शूद्रकाच्या मृच्छकटिक नाटकांतील संवाहक या पात्रानें वैदिक व बौद्ध धर्मांतील भेदांचा विचार न करतां केवळ उपरतीच्या झटक्याबरोबर बौद्ध यतीची दीक्षा घेतली त्यावरून दिसून येतें. महाभारतादि ग्रंथांवरून वैदिक धर्मानुयायी लोकांत विधवा स्त्रियांनीं फक्त शुभ्र वस्त्रें वापरण्याचाच प्रघात होता असें आढळून येतें, परंतु दाक्षिणेंत शुभ्र रंगाबरोबर विधवा वाण म्हणून तांबडा रंगहि प्रचारांत आला आहे. रा. चिंतामणराव वैद्य यांनीं म्हटल्याप्रमाणें, तो बहुतकरून बौद्ध भिक्षुणींच्या वस्त्राच्या वर्णाची नक्कल आहे कारण, बौद्ध भिक्षुणींच्या वस्त्रांचा वर्ण लाल असे. या एकंदर गोष्टींवरून विधवाविवाहाची रूढि मागें पडण्यास बौद्ध धर्मच बहुतांशीं कारण झालेला असावा. हर्षाच्या काळापर्यंत या देशांत बालविवाह रूढ नसल्यामुळें आणि स्त्रियांचीं लग्नें प्रौढ वयांत होत असल्याकारणानें त्या काळीं विधवाविवाहाचा निषेध फारसा जाचक होत नव्हता. पण पुढें त्यांत बालविवाहाची भर पडून विवाहाच्या बाबतींतील स्त्रियांचें स्वातंत्र्य पूर्णपणें नष्ट झालें. मात्र, विधवाविवाहाचा प्रघात बंद पडला तो बौद्धधर्मानें प्रत्यक्ष बंद पाडलेला नव्हता, बौद्धधर्मांतील निवृत्ति-

मार्गाचा तो साहाजिक परिणाम होता, हें विसरतां कामा नये. कांहीं असलें तरी, चंद्रगुप्त मौर्याच्या काळापर्यंत वैदिक धर्मीयांमध्यें विधवाविवाह रूढ होता आणि तो शास्त्रनिषिद्ध मानला जात नव्हता, ही गोष्ट अर्थशास्त्रावरून निर्विवाद सिद्ध होते. मनुस्मृतींत नियोगाचा विधि कांहीं श्लोकांत सांगून पुढें द्विजांना तो निषिद्ध आहे म्हणून एका श्लोकांत सांगितलें आहे. हा निषेधपर श्लोक अर्थात्च चंद्रगुप्त मौर्याच्या काळानंतर रचलेला असला पाहिजे. चंद्रगुप्त व हर्ष यांच्या दरम्यानच्या काळांत विधवाविवाह पायरी पायरीनें बंद झाला, असें मनुस्मृतींत अक्षतयोनि विधवेचा पुनर्विवाह करण्यास हरकत नाहीं (अ. ९ श्लो १७६) असें सांगितलें आहे त्यावरून दिसतें. विधवाविवाहाचा प्रघात असल्याबद्दलचे दुसरे पुरावेहि सदर्हू स्मृतींमध्यें सांपडतात. हल्लीं उपलब्ध असलेल्या मनुस्मृतींत विधवाविवाह बंद पडण्याचा प्रयत्न झालेला दिसतो, व त्यावरून हल्लींच्या मनुस्मृतीचा कांहीं भाग बुद्धोत्तरकालीं रचिलेला आहे हें स्पष्ट होतें.

जातिभेदाच्या बाबतींतहि अर्थशास्त्राच्या योगानें बराच प्रकाश पडतो. अनुलोम विवाहांना त्या काळीं मोकळीक होती (पृ. ८८), प्रतिलोम विवाह मात्र निषिद्ध मानले जात, असें अर्थशास्त्रावरून दिसून येतें. चंद्रगुप्त मौर्याच्या काळीं अनुलोम विवाह रूढ होते याविषयीं मेगॅस्थेनिसच्या लेखांतहि आधार सांपडतो. त्या काळीं ब्राह्मणादि द्विजांना खालच्या जातींच्या स्त्रियांशीं विवाह करतां येत असे. मनुस्मृतींतहि " द्विजानें आपल्या अगदीं जवळच्या खालच्या जातीची स्त्री केल्यास तिच्या ठिकाणीं होणारी संतति त्याच्याच जातीची होते, " असें म्हटलें आहे (म. स्मृ. १०,६), आणि अर्थशास्त्रांतहि तसेंच सांगितलें आहे. म्हणजे ब्राह्मणाला क्षत्रिय, क्षत्रियाला वैश्य व वैश्याला शूद्र स्त्रीपासून झालेली संतति अनुक्रमें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य म्हणजे पितृवर्णाचीच समजण्यांत येई. पतीचा वर्ण व पत्नीचा वर्ण यांच्या दर्ज्यांत एकापेक्षां अधिक वर्णांचें अंतर असल्यास मात्र त्या संबंधापासून झालेल्या संततीला अंबष्ठ, उग्र, निषाद, पारशव अशीं उपजातिवाचक नांवें देण्यांत येत असत. प्रतिलोम विवाहजन्य संततीला मनुस्मृतींतल्याप्रमाणेंच अर्थशास्त्रांतहि कमी दर्जा दिलेला आहे व त्यायोगें प्रतिलोम विवाहांची हीनता दर्शविली आहे. तथापि, सूत व मागध हे प्रतिलोम संबंधानें जन्मास आलेले असतांहि त्यांपैकीं

जे विद्या व शील यांनीं संपन्न असत त्यांना पुराण कालीं ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यापेक्षांही वरच्या दर्ज्याचे असें समजण्यांत येई, हें कौटिल्यानें कबूल केलें आहे. अर्थशास्त्राच्या काळाच्या सुमारास पूर्वीची गुणकर्मानुसार वर्णांतर करण्याची पद्धति नाहींशी होऊन त्या ठिकाणीं जातिभेद दृढतर करण्याची प्रवृत्ति सुरू झाली होती. कदाचित् अर्थशास्त्राच्या पूर्वींहि कांहीं शतकें ही प्रवृत्ति सुरू झाली असेल. परंतु त्या काळीं हल्लींची तीव्र निर्बंधयुक्त अभेद्य (watertight) जातिभेद-पद्धति अमलांत नव्हती हें स्पष्ट आहे. अनुलोम विवाह प्रचारांत असून अगदीं जवळील खालच्या वर्णाच्या स्त्रीपासून झालेली प्रजा पित्याच्या वर्णाचीच समजली जाई, आणि इतर प्रकारची अनुलोम विवाहजन्य संततिहि बेकायदेशीर म्हणून मानण्यांत येत नसे; त्याचप्रमाणें प्रतिलोम विवाह निंद्य मानण्यांत आले होते तरी ते साफ बंद झाले नव्हते. चंद्रगुप्त मौर्य हा हिंद सम्राट् शूद्र जातीचा होता, हें प्रसिद्धच आहे. त्याचा विवाह सेल्यूकस या ग्रीक राजाच्या कन्येशीं झालेला होता. यावरून परधर्मीयांना हिंदु धर्मांत घेण्याची वहिवाट त्या वेळीं होती आणि परदेशीय लोकांशीं शरीरसंबंध केल्यानें हिंदुत्व नष्ट होत नव्हतें, असें दिसून येतें. या चंद्रगुप्ताचा नातू जगद्विख्यात् चक्रवर्ती सम्राट् अशोक हा ब्राह्मण जातीच्या राणीच्या पोटीं जन्मला होता व तिचें नांव सुभद्रांगी असें होतें, असा 'अशोकावदान' या प्राचीन ग्रंथांत उल्लेख आहे. प्रतिलोम विवाह त्या काळीं साफ बंद झाले नव्हते, याविषयीं हा पुरावा लक्षांत ठेवण्यासारखा आहे. चंद्रगुप्त व त्याचा मुलगा म्हणजे अशोकाचा पिता बिंदुसार हे दोघेहि वैदिक धर्मानुयायी होते. बिंदुसार हा बौद्धधर्मानुयायी असता तर कदाचित्, गौतमबुद्धाचा धर्म जातिभेद मानणारा नव्हता, या मुद्यावर, बिंदुसार या शूद्र राजानें ब्राह्मण स्त्रीशीं विवाह केला हा पुरावा प्रतिलोम विवाहाच्या बाबतींत अग्राह्य मानतां आला असता. परंतु चंद्रगुप्त व बिंदुसार हे दोघेहि वैदिक धर्मानुयायीच होते, अशोकानें मात्र राज्यारोहणानंतर थोड्या वर्षांनीं बौद्धधर्म स्वीकारला, या गोष्टी लक्ष्यांत घेतां सदरहू पुरावा बराच महत्वाचा आहे. तसेंच, शूद्र पुरुष व ब्राह्मण स्त्री यांच्या विवाहापासून झालेल्या संततीची चांडाळ वर्गामध्यें गणना होत असे, असें अर्थशास्त्र व मनुस्मृति यांच्यावरून दिसतें. परंतु ही नुसती धमकी होती, त्या धमकीची अंमलबजावणी होत नव्हती, असेंच म्हणावें लागतें. सदरील

नियमाप्रमाणें, खरें म्हटलें असतां, अशोकाची चांडाळवर्गांत गणना व्हावयास पाहिजे होती. त्याचा राज्यावर वारसा पोहोचतां कामा नये होता आणि खरोखरच त्याला चांडाळ समजण्यांत आलें असतें तर बिंदुसाराचे मंत्री व प्रजाजन यांनीं अशोकाला सिंहासनावर आरूढ होऊं दिलें नसतें. तसें झालें नाहीं आणि अशोकाला कोणींहि आजपर्यंत 'चांडाळ' जातीचा ठरविलेलें नाहीं. चांडाळ जात ही शूद्रब्राह्मणीसंबंधाची प्रजा होय, ही कल्पना किती निराधार व हास्यास्पद आहे, याचें विवेचन पर० रमेशचंद्र दत्त यांनीं 'Civilisation in the Buddhist Age' या पुस्तकांत 'Caste' (जाति) या प्रकरणामध्यें केलें आहे, तें या बाबतींत अवश्य लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. असो. कौटिल्याच्या काळीं अनुलोम विवाहांना उघड मोकळीक असे, पण त्यानंतरच्या एक हजार वर्षांच्या काळांत जातिनिर्बंध अधिकाधिक दृढ होत गेले व हर्षाच्या काळीं, ह्यूएनत्संगानें म्हटल्याप्रमाणें, जातीजातींतच विवाह होत असत. तथापि अनुलोम विवाह साफ बंद झाले नव्हते व याला पुरावा खुद्द हर्षाच्या चरित्रांतच सांपडतो. हर्ष हा जातीनें वैश्य होता असें ह्यूएनत्संग म्हणतो व तें अगदीं खरें दिसतें. ह्यूएनत्संगानें वेगवेगळ्या प्रांतांतील राजघराण्यांच्या जाती बिनचूक दिलेल्या आहेत आणि खुद्द हर्षाचा तर तो स्नेही व आश्रित होता, त्याअर्थी हर्षाची जात समजण्यांत त्याच्याकडून चूक होईल हें संभवनीय नाहीं. 'वर्धन' व 'भूति' हीं वैश्यांचीं उपपदें होतीं व हर्ष हा 'हर्षवर्धन' या नांवानेंच इतिहासांत प्रसिद्ध आहे. हर्षाची बहीण राज्यश्री कनोजच्या मौखरी–क्षत्रिय घराण्यांत दिलेली होती आणि हर्षाचा जांवई ध्रुवभट हा वलभीच्या उच्च क्षत्रिय घराण्यांतील होता. एवंच, कौटिल्याच्या काळानंतरच्या एक हजार वर्षांतहि अनुलोम विवाहपद्धति सर्वथैव लुप्त झाली नव्हती, असेंच अनुमान निघतें. सध्यांच्या स्वरूपांतला जातिभेद कौटिल्याच्या काळीं नव्हता. तो गेल्या हजार-बाराशें वर्षांतलाच आहे. अर्थशास्त्रावरून किंवा मनुस्मृतीवरून, त्या काळीं वंशभेदाइतकें वृत्तिभेदाला महत्व प्राप्त झालें नव्हतें; मुख्य चार वर्ण व त्यांच्या मिश्रसंबंधाच्या कांहीं जाति, इतक्या पुरताच जातिभेदाचा विस्तार होता, वृत्तिभेदजन्म (धंदेवाचक) जाती म्हणण्यासारख्या मुळींच नव्हत्या, एकाच जातीचे लोक वेगवेगळे धंदे करीत असत, असेंहि दिसून येतें.

कौटिल्यानें अर्थशास्त्रांत जातिभेदाचा विचार करतांना क्षत्रिय व वैश्य यांचें अस्तित्व गृहीत केलें आहे. अर्थात् क्षत्रिय व वैश्य यांचें अस्तित्व नाकबूल करणारीं

'नंदान्तं क्षात्रियकुलं' व 'कलाद्यन्तयोः स्थितिः' ही वचनें कौटिल्याच्या काळानंतरच बनविलीं गेलीं असलीं पाहिजेत हें उघड होय. 'नंदान्तं क्षत्रियकुलं' याचा अर्थ कदाचित् असा मानतां येईल कीं, नंदवंश स्थापित झाल्यापासून व तदनंतर त्याचा उच्छेद झाल्यापासून, चंद्रगुप्त मौर्यादि शूद्र राजांच्या हातीं सार्वभौम सत्ता आली आणि क्षत्रियांचें पूर्वीचें महत्व राहिलें नाहीं. चंद्रगुप्त व अशोक हे शूद्र होते, गुप्त व वर्धन हे राजे वैश्य होते, समुद्रगुप्तानें तर अश्वमेध केला होता आणि हर्षानें दिग्विजय करून चक्रवर्तित्व संपादिलें होतें, त्याचप्रमाणें क्वचित् ठिकाणीं ब्राह्मण राजेहि होते, असें इतिहासावरून दिसून येतें. अर्थात् क्षत्रियांचा राजपदाचा अनन्याधिकार नंदवंशाच्या समाप्तीनंतर राहिला नव्हता. तथापि तेवढ्यावरून क्षत्रिय जात अजिबात नष्ट झाली होती असें म्हणणें खास अप्रयोजकपणाचें होय.

बुद्धपूर्वकाल व बुद्धोत्तरकाल यांच्या दृष्टीनें जातिभेदाविषयीं विचार करतां असें म्हणावें लागतें कीं, जरी खुद्द गौतम बुद्धाचा जातिभेदावर तीव्र कटाक्ष होता आणि बौद्धधर्माचा आरंभींचा रोंख समाजांत समता स्थापण्याकडे होता, तरी बौद्धधर्म हिंदुसमाजांतील जातिभेदाचें निराकरण करूं शकला नाहीं, इतकेंच नव्हे तर, बौद्धधर्माच्या उत्कर्षाच्या कालांत जातिनिर्बंध शिथिल न होतां दृढतरच होत गेले. वैदिक धर्मानुयायांप्रमाणें बौद्धधर्मानुयायांनाहे जातिभेदानें ग्रासलें होतें आणि या देशांत बौद्धांचा असा स्वतंत्र समाजहि नव्हता. वैदिकधर्मानुयायी व बौद्ध यांच्या दरम्यान् अन्नसंबंध व शरीरसंबंध होत असत, दोघांनाहि एकाच प्रकारचीं जातिबंधनें पाळावीं लागत, बौद्धधर्म म्हणजे एक स्वतंत्र धर्म मानला जात नसून शैववैष्णवांप्रमाणें एक पंथच समजला जात असे. गौतमबुद्धाचें निर्वाण झाल्यावर बौद्धधर्माच्या शुद्ध स्वरूपाचा व मूळ हेतूचा हळुहळू लोप होऊं लागला. बुद्धानें उपदेशिलेल्या धर्मांत पुढें पुढें विशेषतः बौद्धधर्माच्या महायानशाखेमध्यें हिंदुधर्मांतील देवदेवता, मूर्तिपूजा, मंत्रतंत्र इत्यादिकांचें बंड वाढलें हें प्रसिद्धच आहे. या देशांतील बौद्धधर्मांत हिंदुधर्मांतल्या इतर भेसळीबरोबर जातिभेदाचाहि प्रवेश झाला; बौद्धधर्माचा हिंदुसमाजावर जो विशिष्ट परिणाम झाला तो दया, पापभीरुता, इत्यादि नैतिक बाबतींत व निवृत्तिमार्गाच्या विशेष प्रचारांतच होय. जातिभेदाच्या बाबतींत बौद्धधर्म फारसें कांहीं करूं शकला नाहीं, हें कबूल करणें भाग आहे.

कौटिल्याचें अर्थशास्त्र वाचल्यावर आपल्या दृष्टीपुढ या देशांतील साडेबावीसशें वर्षांपूर्वीच्या संस्कृतीचें चित्र उभें राहातें. ही संस्कृति आणि आपल्या परिचयाची हिंदुसंस्कृति यांच्यामध्यें पुष्कळ फरक आहे, हेंहि आपल्या लक्ष्यांत आल्याखेरीज राहात नाहीं. पाश्चात्य संस्कृतीशीं जेव्हां आपण भारतीय संस्कृतीची तुलना करतों तेव्हां, पाश्चात्य संस्कृति ही जडवादप्रधान (materialistic), प्रवृत्तिपर व इंद्रियविषयलोलुप अतएव राजस व तामस असून हिंदी संस्कृति ही आध्यात्मिक, निवृत्तिपर आणि सत्वगुणप्रधान आहे असेंच नेहमीं म्हणत असतों. तसा भेद मानावयाला खरोखर कितीशी जागा आहे, अशी शंका अर्थशास्त्र वाचल्यावर मनांत उत्पन्न होतें. कविश्रेष्ठ रवींद्रनाथ टागोर यांच्या 'विश्वभारती' विद्यालयांतील एक अध्यापक प्रो० विंटरनिट्झ यांचें मत, वैदिक संस्कृति मूळची रजस्तमोगुणयुक्त जडवादात्मक (grossly materialistic) असून तिच्यांत आध्यात्मिकता व सत्वप्राधान्य हीं बौद्धधर्मामुळें आलीं, असें आहे. उपनिषदांतील तत्वज्ञान उच्च प्रतीचें आहे ही गोष्ट लक्ष्यांत घेतां, वैदिक संस्कृतीवरील उपर्युक्त आरोप वस्तुस्थितीला धरून नाहीं असें म्हणावें लागतें. वेदाच्या निरनिराळ्या अंगांमध्यें वैदिक संस्कृतीची उत्क्रांति दिसून येते व ही उत्क्रांति उपनिषद् ग्रंथांमध्यें परिणत झाली आहे. प्रमुख उपनिषदांचा काल (कारण कांहीं उपनिषदें अगदीं अर्वाचीन काळचीं व बनावट आहेत असें उघड दिसून येतें) अर्थशास्त्राच्या पूर्वींचा आहे, त्याअर्थीं कौटिल्याच्या काळापूर्वीं वैदिक तत्वज्ञानाची परिणति झाली होती असें मानलें पाहिजे. आतां, कौटिल्याच्या काळाचाच विचार केला आणि त्याच्या अर्थशास्त्रामध्यें प्रतिबिंबित झालेली तत्कालीन संस्कृतीच लक्ष्यांत घेतली तर प्रो० विंटर्निट्झ् यांच्या मतांत बराच सत्यांश आहे हें कबूल करावें लागतें. कौटिल्याच्या काळापूर्वींच बौद्धधर्माची स्थापना झाली होती, परंतु तत्कालीन संस्कृतीवर बौद्धधर्माचा म्हणण्यासारखा परिणाम झाला नव्हता म्हणून अर्थशास्त्र हा ग्रंथ बुद्धोत्तरकालांतला असला तरी संस्कृतींतील परिवर्तनाच्या दृष्टीनें तो बुद्धपूर्वकालीनच समजला पाहिजे हें आम्हीं आरंभीं दर्शविलेंच आहे. बुद्धाचा धर्म म्हणजे वैदिक धर्माचीच एक शाखा होती. बौद्धधर्मांतील तत्वज्ञान उपनिषदें व दर्शनें यांच्या पायांवर उभारलेलें होतें. या पायावर बुद्धानें ज्या आचारविचारांचें प्रतिपादन केलें ते आचारविचार वैदिक संस्कृतीच्या परंपरेला सोडून नव्हते,

मात्र तत्कालीन आचारविचारांपेक्षां पुष्कळ उच्च दर्ज्याचे होते. बुद्ध हा धर्मसुधारक होता. त्यानें वैदिक संस्कृतीला उजळा दिला व तसा उजळा देण्याची कां व किती आवश्यकता होती याची कल्पना कौटिल्याच्या ग्रंथामध्यें प्रतीबिंबित झालेल्या संस्कृतीचें स्वरूप लक्ष्यांत घेतां, येऊं शकते. अर्थशास्त्रांतील संस्कृतीमध्यें अध्यात्मप्रवणता म्हणण्यासारखी दिसत नाहीं आणि तत्कालीन नीतिविषयक कल्पना बऱ्याच हीन प्रतीच्या दिसतात. त्यांत सुधारणा करावयाला आणि तसें करून भारतीय संस्कृतीला तिचा प्राचीन उच्च दर्जा प्राप्त करून द्यावयाला बौद्धधर्मच कारण झाला यांत शंका नाहीं.

कौटिल्याच्या ग्रंथांत प्रतिबिंबित झालेली भारतीय संस्कृति ही वैदिक धर्माच्या अवनतीच्या काळांतील अतएव विकृत स्थितींतील संस्कृति होय. मंत्र, तंत्र, अभिचार, जारण, मोहन इत्यादिकांचें बंड या काळांत होतें याविषयीं अर्थशास्त्रांत ठिकठिकाणीं पुरावा आहे. शकुनापशकुन, फलज्योतिष यांचेंहि अस्तित्व प्रस्तुत ग्रंथांत आढळून येतें. कौटिल्य हा असाधारण बुद्धिमत्तेचा पुरुष होता, तो अतिशय धूर्त व पाताळयंत्री म्हणून भारतीय वाङ्मयांत अद्यापि प्रसिद्ध आहे. त्यानें आपल्या ग्रंथांत लोकांच्या अज्ञानाचा, भोळसर समजुतींचा, अंधश्रद्धेचा राजा, राजमंत्री व गुप्त हेर यांनीं कसा फायदा घ्यावा, कसकशा प्रकारचे कपटप्रयोग करून लोकांना चकवावें, इत्यादि गोष्टींचें वर्णन केलें आहे. परंतु त्याबरोबरच तो स्वतःहि तशा प्रकारच्या अंधश्रद्धायुक्त समजुतींमध्यें गुरफटून गेलेला आहे. कोणीहि मनुष्य कितीहि बुद्धिवान् व धूर्त असला तरी तो आपल्या काळच्या समजुतींच्या पलीकडे फारसा जाऊं शकत नाहीं, इतर कमी बुद्धिवान् व कमी चाणाक्ष अशा लोकांच्या अज्ञ समजुतींमध्यें तोहि कमीजास्त प्रमाणानें भागीदार असतो, समकालीन लोकांच्या अज्ञानाचा कांहीं अंश तरी त्याच्या मनाला चिकटल्याखेरीज राहात नाहीं, या नियमाला एकटा कौटिल्यच कसा अपवाद असूं शकेल ? असो. वरील अज्ञ समजुतींना कांहींसा प्रतिकार बौद्धधर्मानें केला असेल, परंतु तो असावा तितका जोरदार नव्हता आणि तो म्हणण्यासारखा यशस्वी होऊं शकला नाहीं, असें बौद्धधर्माचा प्रसार चालू असतां पाशुपत, अघोर, शाक्त इत्यादि पंथांचाहि उघड किंवा चोरून प्रसार होत होता, खुद्द बौद्धधर्मांतच तंत्रमार्गाचा प्रवेश झाला होता, इत्यादि गोष्टींवरून म्हणावें लागतें. अशोकाच्या काळापासून हर्षाच्या काळापर्यंत किंबहुना, बऱ्या-

वाईट साधनांनीं जैन व बौद्ध यांचा नायनाट करणाऱ्या कुमारिल भट्टाच्या कालापर्यंत बौद्ध धर्माचा प्रसार झपाट्यानें होत असतां व बराच झाला असतांहि, मधून मधून यज्ञयागप्रधान कर्ममार्गाचा पुरस्कार करणारे, वैदिक धर्माचा अभिमान बाळगणारे, अश्वमेधासारखे मोठमोठे यज्ञसमारंभ करणारे अनेक लहान मोठे राजेमहाराजे व सम्राट् उत्पन्न झाले; काश्मीरचा राजा मिहिरकुल व वंगदेशचा शशांक गुप्त यांनीं तर बौद्धांचा अतिशय छळ केला; यावरून बौद्धधर्माशीं वैदिक कर्ममार्गप्रधान धर्म उघड टक्कर देत होता हें दिसून येतें. कांहीं बाबतींत म्हणजे दया, अहिंसा, निवृत्ति यांचा प्रसार करण्यांत बौद्धधर्माची वैदिक धर्मावर छाप बसली; परंतु तीं तत्वें आपलीशीं करून वैदिक धर्मानें बौद्धधर्माशीं सामना केला, आणि शेवटीं, आपलें विशिष्टत्व विसरून गेलेला, बुध्दाच्या उपदेशांतील रहस्याला मुकलेला, तंत्रमार्ग व अंधश्रद्धा यांनीं पोखरून गेलेला बौद्धधर्म पराभूत होऊन या देशांत स्मृतिशेष झाला.

कौटिल्याच्या ग्रंथांत व्यक्त होत असलेल्या भारतीय संस्कृतींतील अनेक गोष्टी हीनमनोवृत्तिनिदर्शक असून त्यांबद्दल कोणाहि हिंदूला अभिमान वाटावयाचा नाहीं आणि कित्येक आचारविचार पाहून तर एका काळीं या देशांत तसले आचारविचार रूढ व शिष्टसंमत होते याबद्दल आश्चर्ययुक्त खेदहि वाटेल. राजकीय बाबतींतील निष्ठुरपणा, कपटप्रयोग, तामसी महत्वाकांक्षा इत्यादि गोष्टींबद्दल स्वतः कौटिल्यावर कांहीं जबाबदारी येत असली, कौटिल्याच्या जागीं दुसरा कोणी विशेष सात्विक स्वभावाचा लेखक असता तर त्यानें इतकी नैतिक निःशंकता(unscrupulousness) दाखविली नसती असेंहि म्हटलें तरी एकंदरींत कौटिल्याचे विचार हे त्या काळाचे कमीजास्त प्रमाणानें निदर्शकच समजले पाहिजेत. शत्रूचा नाश करण्याचे कित्येक उपाय रानटी, अत्यंत क्रूरपणाचे व वाचकाच्या अंगावर शहार आणणारे असे आहेत. तत्कालीन नैतिक अधोगतीचें तें स्पष्ट प्रत्यंतर आहे. कित्येक विषादिक प्रयोग व कृति कौटिल्यानें सांगितल्या आहेत त्या अतिशय हिडिस, ओंगळ व आत्यंतिक तामस वृत्तीलाच शोभतील अशा आहेत. या देशांत एका काळीं असल्या कल्पना प्रचलित होत्या याबद्दल हल्लींच्या भारतीयांना लज्जाच वाटेल. कांहीं कृति सांगितल्या आहेत त्यांत थोतांडच भरलेलें असून त्या काळची अंधश्रद्धा त्यांवरून प्रतीत होते. चाणक्यासारख्या बुद्धिमान् व चतुर पुरुषानें त्यांवर विश्वास ठेवून त्या नमूद

कराव्या, हें आश्चर्य होय. त्यावरून साधारण लोकसमुदायांत किती मूढ समजुती प्रचलित असतील याची कल्पना करावी. त्या काळीं तमोगुण किती वाढला होता, धनराज्यादि लोभापुढें पतिपत्नींमधील व पितापुत्रांमधील प्रेम कसें नष्ट होत असे याचा पुरावा, कौटिल्यानें राणीपासून राजाला भीति असते याविषयीं दिलेलीं मुबलक उदाहरणें (पृ. २९) आणि राजपुत्रापासून राजाला असणाऱ्या भीतीसंबंधाचें विवेचन (पृ. २३) यांमध्यें सांपडतो. बौद्धधर्माच्या उत्कर्षकालीं व तदनंतर आतांपर्यंत या देशाच्या इतिहासांत असलीं उदाहरणें, मुसलमान राजघराण्यांतील आपसांतले कलह व खून यांचीं उदाहरणें सोडून दिल्यास, फारच थोडीं, केवळ अपवादादाखल आढळतात, या गोष्टीचें अर्थशास्त्रांतील वरील वर्णनें वाचतांना स्मरण झाल्याखेरीज राहात नाहीं. राजनीतींतील संधिविग्रहाच्या बाबतींतील कौटिल्याचें धोरण मॅकिआव्हेलीच्या धोरणाशीं बरेंच जुळतें आहे. गुप्तहेरांसंबंधाचें विवेचन वाचून गेल्या महायुद्धामधील जर्मनीच्या व दोस्त राष्ट्रांच्या गुप्त हेरांच्या कारस्थानांची आठवण होते. ' अभ्युच्चीयमानः समाधिमोक्षं कारयेत् ' म्हणजे उत्कर्ष पावलेल्या राजानें (आपलें सामर्थ्य पुरेसें वाढलें आहे असें पाहून, पडत्या काळांत केलेला) तहनामा धाब्यावर बसवावा, हें सूत्र वाचून आजकालची राजनीतिसुद्धां हेंच धोरण अनुसरत आहे, राष्ट्राराष्ट्रांमधील करारांना कोणी उघडपणें ' कागदाचीं चिटोरीं ' (Scraps of paper) म्हणतात, तर दुसरे तोंडानें तसें न म्हणतां कृति मात्र तशाच प्रकारची करितात, याची आठवण झाल्याखेरीज कशी राहील ?

कौटिल्याच्या काळीं प्रजेवर निरनिराळ्या प्रकारचे कर लादलेले होते. दारू, मीठ, नाटकतमाशे वगैरे करमणुकी, वेश्या यांच्यावरील कराचें उत्पन्न, सरकार वसूल करीत असे; जंगलखात्याच्या उत्पन्नांत बारीक सारीक बाबींचाहि विचार केला जात असे; सुराध्यक्ष, लवणाध्यक्ष, गणिकाध्यक्ष, कुप्याध्यक्ष (फॉरेस्ट ऑफिसर) वगैरे निरनिराळे अंमलदार असत आणि राजाच्या खजिन्याची भरती करण्याकडे बारकाईनें लक्ष्य देण्यांत येत असे, असें अर्थशास्त्रावरून दिसतें. त्या काळीं राजाराजांमध्यें वरचेवर युद्धें होत आणि त्याकरितां चढाओढीनें ते आपलें लष्करी सामर्थ्य वाढवीत असत, अर्थात् लष्करी खर्चाची बाब दांडगी होती, हें लक्ष्यांत घेतां वरील प्रकारें हरएक रीतीनें राज्याचें उत्पन्न वाढविणें अपरिहार्यच होतें. आजमितीसहि लष्करी खर्च व

लढाया यांच्यापायीं लोकांवरील करांचा बोजा वाढला आहे, नवीन नवीन कर अमलांत येत आहेत, हें प्रत्यक्ष अनुभवाला येत आहे.

कौटिल्याच्या काळीं नरमेध (पृ० १६८) व गवालंभ (पृ० १७३) हे दोन्ही रूढ होते. ब्राह्मणाच्या उत्तरक्रियेच्या प्रसंगीं गाईचा बळी देत, यावरून हिंदुसमाजांतील गोवधनिषेधाचें श्रेय बौद्धधर्मालाच मुख्यत्वेंकरून दिलें पाहिजे. चंद्रगुप्ताच्या काळीं नियोग व गवालंभ हीं वर्ज्य मानलेलीं नव्हतीं आणि अश्वमेध करण्याची राजे लोकांची परंपरा समुद्रगुप्ताच्या काळापर्यंतहि चालली होती, यावरून ' कलिवर्ज्य ' प्रकरण चंद्रगुप्ताच्याच नव्हे तर हर्षाच्याहि काळानंतरचें असावें हें रा. चिंतामणराव वैद्य यांचें अनुमान योग्य दिसतें. असो. त्या काळीं गुलामगिरीची पद्धतिहि प्रचलीत होती (पृ० ९४), मात्र अनार्यांनांच गुलाम करीत. गणिकांची स्थितिहि कांहीं अंशीं गुलामांसारखीच होती. अमुक मनुष्याच्या आश्रयानें राहा असा सरकारी हुकूम झाला असतां जी वेश्या तो हुकूम अमान्य करील तिला एक हजार फटके मारण्याची शिक्षा अर्थशास्त्रांत सांगितलेली आहे. ' न मांसभक्षणे दोषो न मद्ये न च मैथुने ' अशा प्रकारची मनूनें वर्णिलेली सामाजिक नीति त्या काळीं प्रचालित होती. स्त्रीपुरुषांच्या दरम्यानची नीति बरीच शिथिल होती: एकाद्या स्त्रीची प्राणसंकटांतून एकाद्यानें सुटका केली तर त्या स्त्रीनें सुटकेच्या वेळीं तसें कबूल केलें असेल तर त्याला संभोगसुखहि दिलें पाहिजे, मात्र ती उच्च कुळांतील व अपत्यवती असेल आणि त्या पुरुषाविषयीं तिला संभोगेच्छा नसेल तर तिच्यापासून द्रव्य घेऊन त्यानें तिला करारांतून मुक्त करावें, अशा प्रकारचे स्त्रीपुरुषांमधील शरीरसंबंधाला हीनत्व आणणारे नियम शिष्टसंमत होते. त्याचप्रमाणें पूर्वीं दर्शविल्याप्रमाणें मंत्रतंत्र, जादुटोणा वगैरेसंबंधानें अनेक अज्ञ समजुती प्रचलित होत्या; शिक्षांचे कित्येक प्रकार शुद्ध रानटी होते; मानवी प्राणांची फारशी पर्वा नव्हती; ' अश्वमेधावभृथस्नानेन तुल्यो हस्तिनो वध इति ' इत्यादि वचनांवरून पुण्यसंपादनाच्या मार्गांविषयीं चमत्कारिक व अघोर कल्पना लोकमान्य होत्या, आदिकरून त्या काळाची काळी बाजू दाखविणाऱ्या गोष्टी प्रस्तुत पुस्तकांमध्यें आढळून येतात.

आतां, सदरील काळ्या बाजूबरोबर दुसरी उजळ बाजूहि चाणक्याच्या काळाच्या ठिकाणीं दिसून येते, तिचाहि येथें निर्देश करणें अवश्य आहे. कित्येक बाबतींत त्या वेळीं भारतीय संस्कृतीनें किती अघाडी मारली होती, तें पाहून

कौतुक वाटल्याखेरीज रहात नाहीं. इतकेंच नव्हे तर त्या काळच्या कांहीं सुधारणा व विचार पाहून आश्चर्यहि वाटतें. कौटिल्यानें आपल्या नांवाला अनुसरून जसें कुटिल राजनीतीचें विवेचन केलें आहे त्याचप्रमाणें आपल्या विशाल व दूरदर्शी बुद्धीला शोभेल अशा रीतीनें त्यानें राजधर्मांतील कित्येक उदात्त त्रिकालाबाधित तत्त्वेंहि प्रतिपादिलेलीं आहेत. राजा व प्रजा यांच्यामधील संबंध व प्रजेसंबंधाचीं राजांचीं कर्तव्यें यांविषयीं चाणक्यानें नमूद केलेले अनेक विचार सांप्रतच्या कालींहि राजेलोकांनीं व राज्यकर्त्यांनीं लक्षांत ठेवून अनुसरण्याजोगे आहेत (पृ.२७ व २९). शत्रूशीं निर्दयपणानें वागण्याचा व त्याचा पाडाव करण्यासाठीं बऱ्यावाईट साधनांचा उपयोग करण्याचा जसा उपदेश आहे तसाच, विजयी राजानें आपल्या शत्रूला जर त्याच्या संरक्षणाचें अभिवचन दिलेलें असेल तर पिता जितक्या काळजीनें पुत्राचें रक्षण करितो तितक्याच काळजीनें त्या विजयी राजानें ह्या आपल्या आश्रिताचें रक्षण केलें पाहिजे, असासुद्धां उपदेश केलेला आहे (पृ. १३५). म्हणजे उदात्त राजधर्म आणि प्रामाणिक राजनीति यांचाहि प्रस्तुत पुस्तकांत समावेश झालेला आहे. पगाराचें प्रमाण, नोकरांची लायकी, नोकरीवर असतां मेलेल्या लोकांच्या बायकामुलांची व्यवस्था, अशा बाबतींतील विचार कोणत्याहि काळीं सर्वमान्य होण्यासारखे आहेत. चोरी पकडून देण्याची राजाच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी इतकी होती कीं, चोरीचा तपास केला परंतु पत्ता लागत नाहीं, असा रिपोर्ट करून त्यांना वेळ निभावून नेतां येत नसे; चोरांचा पत्ता लावून त्यांच्यावरील आरोप शाबीद केला नाहीं व चोरीस गेलेला माल मालकाला मिळवून दिला नाहीं तर स्वतः त्यांना चोरीची भरपाई मालकाला करून द्यावी लागत असे. हा नियम आज अमलांत येईल तर पोलीस खात्यांतील लोक आपलीं कामें विशेष दक्षतेनें करितील असें कोणाला वाटणार नाहीं ? "व्यापारी, कारागीर, तमासगीर, भिक्षेकरी, जादूचे खेळ करणारे या सर्वांना चोर असें समजून त्यांच्या त्रासापासून राजानें प्रजेचें संरक्षण करावें" असें सांगितलें आहे त्यांत राजाच्या कर्तव्याची मर्यादा बरीच विस्तृत केल्यानें व प्रजाहिताविषयीं अतिशय बारीक दृष्टि असल्याचें दिसून येतें, हल्लींचीं सरकारें केवळ महायुद्धासारख्याच आपत्तीच्या वेळीं बाजारांतील वस्तूंच्या किंमतीचें नियंत्रण करितात, परंतु कौटिल्याच्या काळीं राजे लोक त्या बाबतींत नेहमींच लक्ष्य ठेवीत असत, असें दिसतें. जंगलाचें संरक्षण करण्याविषयीं काळजी घेण्यांत येई, परंतु गुरचरणासारख्या बाबतींत

त्याच प्रमाणें शेतीला आवश्यक असेल तितक्या पुरत्या सवलती लोकांना देत असत. कामगारवर्गासंबंधानें आणि धनी व कामगार यांच्यामधील करारांच्या बाबतींत नियम असत. विणकामाचें महत्त्व फार असे व तें एक सरकारी उद्योगखातें होतें. गरीब अब्रूदार स्त्रियांना उपजीविकेचें साधन म्हणून काम पुरविण्याची खास व्यवस्था होती; त्यांच्या घरीं मोलकरणींमार्फत काम पाठवून देण्यांत येई. कारखान्यांत स्त्रियाहि कामावर असत आणि त्यांना वागविण्यासंबंधाचे योग्य नियमहि असत. कृषिशास्त्रासंबंधानें त्याकाळीं पुष्कळ बारकाईनें विचार झालेला होता. राजाकडून शेतकऱ्यांना योग्य ती मदत करण्यांत येई. पर्जन्यमापनाविषयींची कल्पना त्या काळच्या लोकांना अपरिचित असावी असें साहाजिकच कोणाला वाटावयाचें, परंतु वस्तुस्थिति तशी नव्हती (पृ० ६४). त्या काळीं पशुहिंसा फार होत असे, गोवधहि विशिष्ट प्रसंगीं शास्त्रसंमत मानला जाई, तथापि गुरांच्या संरक्षणाचीहि काळजी घेतली जात असे आणि जनावरांचा सररहा संहार होऊन शेतकी, दूधदुभतें आणि अवलादवाढ यांच्या बाबतींत तो नडूं नये म्हणून वासरें, अंडील बैल व दुभत्या गाई मारण्याची मनाई होती (पृ० ६८) इतकेंच नव्हे तर शिकारी लोकांच्या हौसेच्या पायीं कित्येक पशुपक्ष्यांच्या जाती नष्ट होऊं नयेत म्हणून कांहीं पशुपक्षी व जलचर प्राणी सरकारी संरक्षणाखालीं घेतलेले असत, व त्यांची शिकार करणारांना दंड होत असे. अशा संरक्षित अरण्यांना 'अभयवनें' अशी संज्ञा होती (पृ० ६७). यूरोपीयन स्त्रियांच्या शिरोभूषणांना लागणाऱ्या चित्रविचित्र रंगाच्या सुंदर पिसांसाठीं जगांतील निरनिराळ्या जातींच्या पक्ष्यांचा संहार होऊं लागला व त्या जाती नामशेष होतात कीं काय अशी भीति पडली तेव्हां यूरोपांतील कित्येक देशांत अशा पिसांची आयात कायद्यानें बंद करण्यांत आली. पण अभयवनांच्या द्वारें त्या बाबतींत चाणक्यांच्या काळीं आगाऊ काळजी घेण्यांत येत असे. मुंबईच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशननें वांद्र्याच्या कत्तलखान्यांत गाईम्हशी मारण्याच्या बाबतींत त्या जनावरांच्या वयाचा निर्बंध हल्लींच घातला आणि अद्यापि दुभत्या वयाच्या गाईम्हशींची हत्या साफ बंद पडलेली नाहीं, यावरून साडेबावीसशें वर्षांपूर्वीची भारतीय सुधारणा कांहीं बाबतींत किती पुढें गेली होती तें दिसून येतें. त्या काळीं आगी विझविण्याचे मोठमोठे बंब नव्हते, परंतु आगी लागूं नयेत आणि लागल्याच तर त्या तत्काळ विझवितां याव्या याकरितां

नागरिकांनीं विशिष्ट निर्बंध पाळावयाचे असत आणि घरोघरीं आग विझविण्याच्या साधनांची तरतूद करून ठेवावयास कायद्यानें भाग पडलें जाई. आगीसारख्या आपत्तीच्या प्रसंगीं एकमेकांना मदत करणें हें एक आवश्यक सामाजिक कर्त्तव्य मानलें जाई व त्यांत अंगचुकारूपणा करणाराला सरकारकडून शिक्षा होत असे (पृ. ८०). राज्यांतील प्रत्येक गांवासंबंधाच्या तपशीलवार माहितीची नोंद सरकारी दफ्तरामध्यें केलेली असे; गहाण, विक्री, बक्षीस इत्यादिकांकांची नोंद (रजिस्ट्रेशन) होत असे; ' रेकॉर्ड ऑफ राइट्स् ' सारखी पद्धती अमलांत होती; प्रजागणती व पाळीव पशुपक्ष्यांचीहि गणती करून लोकांचे उद्योगधंदे वगैरेसंबंधाचीहि माहिती गोळा करून दफ्तरीं ठेवली जाई. इतकेंच नव्हे तर गेल्या तीन चार वर्षांतच इकडे लेबर ऑफिसच्या मार्फत कामगारवर्गांतील लोकांच्या कौटुंबिक जमाखर्चाची (family budgets) माहिती गोळा करण्याचा उपक्रम झाला तोहि त्या काळीं अपरिचित नव्हता ! गांवांतील प्रत्येक कुटुंबाच्या आर्थिक स्थितीची–आयव्यया–संबंधाची माहिती सरकारी दफ्तरामध्यें नमूद केलेली असे, असेंहि दिसून येतें. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, पाश्चात्य देशांतहि कालपरवांपर्यंत ' टौन प्लॅनिंग' (town planning) माहीत नव्हतें व हिंदुस्थानांतील लोकांच्या कानांवर तर तो शब्द गेल्या पांचदहा वर्षांतच पडूं लागला आहे; परंतु चाणक्याच्या काळीं ' टौन प्लॅनिंग'ची कल्पना अपरिचित नव्हती असें त्याच्या ग्रंथांत, शहरांतील मुख्य राजमार्ग व इतर मार्ग यांची आंखणी कशी असावी, त्यांची रुंदी किती किती असावी, शहराच्या कोणत्या भागांत कोणत्या प्रकारची वस्ती असावी, घराघरांमध्यें किती अंतर असावें, खिडक्यांची उंची किती असावी, इत्यादींविषयीं ज्या सूचना दिल्या आहेत व जे नियम सांगितले आहेत त्यांवरून दिसून येतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्या काळची संस्कृती कांहीं बाबतींत हल्लींच्या पाश्चात्य संस्कृतीच्या बरोबरीची व थोड्या बाबतींत तिच्यापेक्षांहि वरच्या दर्जाची होती.

कायदेकानूंच्या बाबतींत पाहिलें तरीहि अनेक गोष्टींत सूक्ष्म विचार व कांटेतोल न्यायाची आवड हीं दिसून येतात. स्त्रीधनासंबंधाचे नियम, विधवा व नवरा नाहत्ता असलेल्या स्त्रिया यांना पुनर्विवाहाच्या बाबतींत असलेली मोकळीक, वयांत न आलेल्या गणिकेशीं तिच्या इच्छेविरुद्ध अथवा तिची इच्छा असतांहि संबंध ठेरणराला होणारी शिक्षा, अविवाहित कन्येशीं संबंध ठेवणाराला देण्याच्या शिक्षेंतील परिस्थितीच्या मानानें केलेला फरक इत्यादि पाहून त्या काळांतील कायदे करणारांच्या सूक्ष्म विचारसरणीचें व कांटेतोलपणाचें कौतुक वाटल्याखेरीज

राहात नाहीं. त्या काळीं गुलामगिरीची पद्धति प्रचलित होती व अनार्यांपुरतीच गुलामगिरी मर्यादित होती; तथापि गुलामांना वागविण्याच्या बाबतींत कांहीं नियम होते (पृ० ९५) व ते धन्यांना पाळावे लागत असत. तसेंच सामाजिक भेद असले तरी, कोणीं कोणाच्या चालीरीतींची निंदा करावयाची नाहीं, जो तशी निंदा करील तो दंडाला पात्र होत असे (पृ० १०६). सामाजिक कार्यांच्या व आचारविचारांच्या बाबतींत मनुस्मृतीमध्यें जशीं परस्परविरुद्ध अर्थाचीं वचनें सांपडतात तशीं अर्थशास्त्रामध्यें सांपडत नाहींत. कौटिल्यस्मृति एकसूत्रबद्ध असून तिच्यामध्यें प्रक्षिप्त वचनें असलीं तरी तीं अगदीं विरळ आहेत आणि औदार्य व न्यायप्रियता यांच्या दृष्टीनें पाहिलें तरी मनुस्मृति ही कौटिलीय अर्थशास्त्राची बिघडविलेली आवृत्ति आहे याविषयींहि कांहीं शंका वाटत नाहीं.

'सोम' हें नांव कोणत्या वनस्पतीला होतें, हल्लीं ती वनस्पति कोणत्या नांवानें ओळखली जाते, याविषयीं सांप्रत संशोधकांमध्यें अतिशय मतभेद आहे. कोणी म्हणतात सोम म्हणजे हल्लींची गुळवेल होय, दुसऱ्या कित्येकांच्या मतें नाचणे, हरीक यांसारखें तें एक धान्यच असावें, तर ती भांगेसारखी कैफी वस्तु असावी असा इतरांचा समज आहे. चंद्रगुप्ताच्या काळापर्यंत या वनस्पतीची लोकांना माहिती होती, असें अर्थशास्त्रामध्यें, सोम वनस्पतीच्या लागवडीकरितां कांहीं जमीन राखून ठेवावी (पृ. ४३) असें सांगितलें आहे त्यावरून दिसतें. एका काळीं इतकी आवश्यक मानलेली वनस्पति हल्लीं ओळखतांहि येऊं नये, तिचा संशोधकांना पत्ताहि लागूं नये हें आश्चर्य नव्हे काय? कदाचित्, सोम मादक असल्याकारणानें बौद्ध धर्माच्या उत्कर्षकालीं यज्ञयागांबरोबर व मांसाहाराबरोबर सोमसेवनाचा प्रचार लुप्त झाला असावा, सुरापानाप्रमाणें सोमपानहि निंद्य समजलें गेलें असावें, आणि वैदिक धर्माच्या अभिमान्यांना सोमसेवनाच्या चालीचें पुनरुज्जीवन करणें इष्ट वाटलें नसावें व त्यामुळें सोम म्हणजे काय त्याची ओळखहि राहिली नसावी. 'मध्ययुगीन भारता'मध्यें रा. चिंतामणराव वैद्य यांनीं, हर्षाच्या काळापर्यंत हिंदुस्थानांतील लोकांना कपडे शिवण्याची कला माहीत नव्हती, ती अरबांनीं प्रथम इकडे आणली असावी, असा तर्क नमूद केला आहे. परंतु चंद्रगुप्त मौर्याच्या काळीं म्हणजे हर्षाच्या पूर्वी सुमारें एक हजार वर्षें कपडे शिवण्याची कला भारतीयांना माहीत असावी, असें अर्थशास्त्रावरून (पृ. ४९) म्हणावें लागतें. कौटिल्याच्या वेळीं जर शिवणकला परिचित होती तर हर्षाच्या काळीं ती अस्तित्वांत नसेल हें संभवनीय नाहीं. आणखी एक गोष्ट अर्थशास्त्रावरून (पृ. ४९) आढळून येते ती ही कीं, अपरान्तक

प्रांतांत म्हणजे कोंकणांत कापसाचीं चांगलीं वस्त्रें त्या काळीं तयार होत असत. कोंकणची भूमि कापसाच्या लागवडीस योग्य नाहीं, कोंकणांत फक्त देवकापूस उत्पन्न होतो, हें ध्यानांत ... त्या काळीं देवकापसाचें सूत काढून त्याचीं तलम वस्त्रें विणीत असें दिसतें.

कौटिल्याच्या ग्रंथामध्यें सध्यां मराठी भाषेंत प्रचलित असलेल्या भत्ता, (जंगल) कूप, (धान्याचें) खळें, वेठ, इत्यादि कित्येक शब्दांचा उगम सांपडतो व भाषा-व्युत्पत्तीच्या दृष्टीनें विचार करणारांनीं तिकडे अवश्य लक्ष्य देण्यासारखें आहे. सदरील शब्द जसे आधुनिक मराठींत अद्यापि अपभ्रष्ट स्वरूपांत कां होईना सांपडतात, तसे ते बहार (मगध) प्रांतांतील व उत्तर हिंदुस्थानच्या इतर भागांतील हल्लींच्या देशभाषेंत रूढ आहेत किंवा काय, नसल्यास तेथें ते लुप्त होऊन महाराष्ट्रांतच ते कां प्रचलित असावे, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. राज्यांतील अधिकाऱ्यांच्या चंद्रगुप्तकालीन संज्ञा व हर्षकालीन संज्ञा यांच्यामध्यें फरक दिसतो. हल्लींच्या पाटील, कर्णिक, कुळकरणी या नांवांशीं हर्ष-कालीन अक्षपटलिक व करणिक हीं नांवें जुळतीं आहेत. अर्थशास्त्रांतला ' समाहर्ता ' हा हर्षकालीन ' विषयपति ' असावा. कदाचित् प्रांतभेदानें अधिकाऱ्यांच्या नांवांत बदल पडलेला असावा. मगध व कान्यकुब्ज या प्रांतांतील परिभाषा भिन्न असणें स्वाभाविक आहे; शिवाय दरम्यान जवळ जवळ एक हजार वर्षांचा काळ लोटलेला होता.

कौटिल्याच्या काळीं जो शिस्तवारपणा व पद्धतशीरपणा असल्याचें प्रस्तुत पुस्तकावरून दिसून येतें तो नंतरच्या काळीं भारतीयांमध्यें राहिला नव्हता. नैतिक बाबतींत बौद्धधर्माच्या प्रसारापासून भारतीयांचें पाऊल पुढें पडलें, पण व्यवहारशुद्धता, दक्षता, शोधकपणा या गुणांचा कौटिल्याच्या काळानंतर हळुहळू लोप होत गेला. सोंवळ्याओंवळ्याचें बंड वाढलें, खाण्यापिण्याच्या बाबतींतच सगळा धर्म येऊन बसला, जातिनिर्बंध परमावधीचे खडतर झाले, स्त्रियांची परवशता वाढली, फलज्योतिष आणि ब्राह्मणभोजनें व संतर्पणें यांचें अधिकाधिक प्रस्थ माजत गेलें, निवृत्तिमार्गाच्या पोकळ गप्पा व आयतखाऊपणा यांचा सुकाळ झाला, आळशी वेदांत व दैववाद यांचा फैलाव झाला, परदेशगमन बंद होऊन लोक कूपमंडूक बनले, शारीरिक श्रम करण्यांत कमीपणा वाटूं लागला, कित्येक उप-युक्त धंद्यांवर व व्यवसायांवर हीनत्वाचा छाप बसला, धर्माच्या नांवावर कित्येक जातींवर जुलूम होऊं लागला आणि यायोगें आपसांत असंतोष उत्पन्न होऊन स्वराज्यविषयीं बहुजनसमाजांत अनास्था उत्पन्न झाली, असंतुष्ट जाती परकीयांना सामील झाल्या व अशा रीतीनें एका काळीं भौतिक संस्कृतीच्या शिखरावर

आरूढ झालेला विद्याकलासंपन्न जागरूक भारतीय समाज मूढ व हतबल होऊन परकीयांच्या आधीन झाला. कांहीं बाबतींत नैतिक प्रगति झाली खरी, परंतु अखेरीस हिंदुलोक कर्तृत्व व स्वातंत्र्य यांच्याबरोबर थोडेंबहुत शीलहि गमावून बसले. मात्र या परिणामाबद्दल बौद्धधर्मालाच जबाबदार धरणें योग्य होणार नाहीं. इतर देशांत–चीनजपानमध्यें बौद्धधर्माचा असा परिणाम झाला नाहीं. हिंदु धर्मानें बौद्धधर्मापासून कांहीं गोष्टी घेतल्या, परंतु त्याबरोबर त्याला बुद्धानें प्रतिपादिलेल्या मूळ तत्त्वांपासून च्युत व्हावयास लावून शेवटीं त्याची दुर्दशा केली. असो.

चाणक्यानें अर्थशास्त्रांत सांगितलेल्या कित्येक गोष्टी अगदीं अप्रयोजक असल्या तरी ख्रिस्ती शकाच्या तीनशें वर्षें पूर्वी पाश्चात्यांची काय स्थिति होती व त्यानंतर कित्येक शतकांपर्यंतहि ते किती मागसलेले होते हें विसरतां कामां नये. रानटीपणाच्या शिक्षा गेल्या शेंदोनशें वर्षांपूर्वी तिकडे देण्यांत येत असत. पाश्चात्य वैद्यक तर अलिकडचेंच आहे. जादूटोणा करणें (witchcraft) हा एक भयंकर गुन्हा मानला जात असे व सैतानाशीं संगनमत केल्याच्या आरोपावरून वेडसर व विक्षिप्त स्त्रीपुरुषांना जाळून किंवा अन्य प्रकारें जीवें मारण्यांत येत असे. अशा रीतीनें लाखों माणसें नाहक ठार मारण्यांत आलीं. हा प्रकार इंग्लंडांत व अमेरिकेंत सतराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत चालू होता. लूथर, वेस्ले यांसारखे धर्मसुधारक चेटूक खरें मानीत आणि नांवाजलेले विद्वान न्यायाधीश चेटक्यांना शिक्षा देत. अशा अनेक बाबी दाखवितां येतील. अर्थात असल्या गोष्टींवरून कौटिल्याची योग्यता कमी समजणें चुकीचें होईल. कौटिल्याचा फलज्योतिषावर मुळींच विश्वास नव्हता असें नाहीं; परंतु तो कर्तव्यवादी असल्यामुळें फलज्योतिषावर फाजील विश्वास ठेवणारांना त्यानें ठपकाहि दिलेला आहे (पृ.१४१).

भारतीय लोक मुळापासूनच अध्यात्मप्रवण वृत्तीचे ही कल्पना अर्थशास्त्रावरून फोल ठरते. उपनिषदें व बौद्ध धर्म यांच्यामधील उच्च तत्वज्ञान व उच्च नीतितत्वें आणि कौटिल्याच्या काळाचा कणखरपणा यांचा म्हणजे प्रवृत्तिनिवृत्तीचा मिलाफ करून आणि आधुनिक परिस्थिति व शास्त्रीय शोध यांना अनुसरून आचारविचारांत बदल करून भारतीयांना आपलें जगांतील संस्कृतीमधील आद्यस्थान पुनः प्राप्त करून घेणें शक्य आहे या आशेला अर्थशास्त्राच्या वाचनानें पुष्कळ पुष्टि मिळते.

शुद्धिपत्र.

प्रकाशकाचें हृद्गत यांतील ५ व ६ व्या ओळींतील "व सदर पुस्तक...... शिफारस केली आहे." हें वाक्य गैरसमजुतीनें लिहिलें गेलें आहे.

उद्धृत संस्कृत वचनांचें

शुद्धिपत्र.

—:*:—

पृष्ठ		ओळ	अशुद्ध	शुद्ध
११		१७	सभ्यग	सम्यग
१६		३	दण्डनीति	दण्डनीतिं
,,		६	दारकर्म	दारकर्म
२०		२५	गच्छत्	गच्छेत्
२२		५	द्व्यक्षं	द्व्यक्षं
,,		२३	लभेत्	लभेत
२३		५	एकश्शयीतंश्शयीत	एकश्शयीत
२५		१	वीज	बीज
४४		१४	जयस्तेज ऐवजीं	जवस्तेज हा पाठ चांगला
		१५	विजयी ऐवजीं	वेगवान् अर्थ घ्यावा.
४८	खालून	३	पाण्डय	पाण्ड्य
४९		४	व्हार्दीय	हार्दीय
५४		५	अक्षशालायाम	अक्षशालाम
५७	खालून	४	स्थुलमपि	स्थूलमपि
६३		२२	सा स	साहस
६४		१७	अतित	अमित
६६		१६	सचारिणः	सञ्चारिणः
६८		७	विक्रीणीरम्	विक्रीणीरन्
७५		२१	द्विरन्ह स्नान	द्विरह्नः स्नान
७८		१२	बाह्यं	वाह्यं
,,		,,	व्यवहारां	व्यवहारं

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
८०	१७	एकस्थान	एकस्थान्
८२	१०	सिध्दयेयुः	सिद्ध्येयुः
९३	१४	स्नम्भे	स्तम्भै
,,	२२	अनिर्दशाह	अनिर्दशाहा
१०६	९	परस्त्री	परस्त्रीषु
,,	११	प्रमादमोहादि	प्रमादमदमोहादि
,,	१६	स्त्रीयः	स्त्रियः
,,	१६	विष्ठ भिमज्जनं	विष्ठानिमज्जनं
११९	१२	मेकमह	मेकमहः
१२७	२२	प्रयोज्यं	प्रयोज्यः
१३९	१८	व्याधिदुर्भिक्षं	व्याधिर्दुर्भिक्षं
१६४	२१	चारति	चरति
१७२	११	पञ्चशद्	पञ्चाशद्
९७२	३	अनिष्टर	आनिष्टैर
१७६	६	मजयात्	मज्यात्